म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : निबंध
सं.क्र. : 9423
REFBK-0013737

REFBK-0013737

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम ... [illegible] दि. ... [illegible]
क्रमांक : ... [illegible] ... बौ. वि. ...
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ना. क्र. [illegible]

# साहित्य-प्रसाद

: संपादक :

पां. कृ. सावळापूरकर

श्री. मा. कुलकर्णी

भीमराव कुलकर्णी

मूल्य :
अडीच रुपये

प्रथमावृत्ती :
ऑगस्ट १९६४

प्रकाशक :
प्रा. अरविंद मंगरूळकर
चिटणीस म. सा. परिषद्
टिळक-रस्ता, पुणे २

मुद्रक :
द. वा. आंबेकर
आर्यभूषण मुद्रणालय
पुणे ४

महाराष्ट्र - साहित्य - परिषद
टिळक - रस्ता, पुणे २

# नि वे द न

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या वतीने प्रस्तुत गद्यवेच्यांचे ' सा हि त्य – प्रा सा द ' हे पुस्तक प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. श्री. मा. कुलकर्णी आणि प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी परिश्रमपूर्वक तयार केले आहे. संपादकत्रयांच्या या परिश्रमाबद्दल मी परिषदेतर्फे मनापासून आभार मानितो. ' साहित्य–प्रासादा'त जे अनेक प्रकारचे वेचे घेतले आहेत, त्यांचा हेतू विद्यार्थ्यांना त्या-त्या वाङ्मय-प्रकारांचा सुजाण परिचय करून देणे हा आहे. या वेच्यांच्या साक्षेपी वाचनाने विद्यार्थ्यांना मराठी वाङ्मयातील अनेकविध रचनांची आणि शैलींची चांगल्या प्रकारे ओळख होईल, अशी उमेद आहे.

' साहित्य–प्रसादा'त आपले लेख समाविष्ट करण्यासाठी ज्या लेखकांनी आणि लेखांच्या हक्कदारांनी औदार्याने परवानगी दिली, तीबद्दल त्या लेखकांचे आणि हक्कदारांचे मी परिषदेच्या वतीने हार्दिक आभार मानितो. परिषद त्यांची ऋणी आहे. या संदर्भात पुढील लेखक आणि हक्कदार यांचा ऋणनिर्देश करणे अग‌त्याचे वाटते :

द. वा. पोतदार, वि. दा. सावरकर, विनोबाजी भावे, सरोजिनी बाबर, ना. सी. फडके, श्री. के. क्षीरसागर, रा. भि. जोशी, वि. द. घाटे, व्यंकटेश माडगूळकर व भीमराव कुलकर्णी; व्यवस्थापक, आर्यभूषण प्रेस ( ह. ना. आपटे ), प्रसाद-प्रकाशन ( शि. म. परांजपे ), प्र. श्री. कोल्हटकर ( श्री. कृ. कोल्हटकर ), दप्तरी ( के. ल. दप्तरी ), म. श्री. माटे ( श्री. म. माटे ), वि. गो. दिवाकर ( ' दिवाकर ' ) व आ. रा. देशपांडे ( कुसुमावती देशपांडे ).

**अरविंद मंगरूळकर**

चि ट णी स

महाराष्ट्र-साहित्य-परिषद, पुणे–२

# प्रस्तावना

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेसाठी मराठीतील काही प्रथितयश साहित्यिकांनी लिहिलेल्या गद्यवाङ्मयातील उताऱ्यांची निवड करून व आवश्यक तेथे ते उतारे संपादून प्रस्तुत पुस्तक तयार करण्यात आले आहे.

वैचारिक व ललित अशा दोन्ही प्रकारच्या वाङ्मयप्रकारांचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा, अशी दृष्टी ठेविली आहे. प्राचीन गद्याचा नमुना कळावा, म्हणून बखरीतील एक उतारा प्रारंभी देऊन मागाहून 'लोकहितवादी'पासूनचे लेखक निवडिले आहेत.

प्रस्तुत उताऱ्यांच्या अभ्यासाने त्या-त्या लेखकांचे अन्य वाङ्मय वाचण्याची इच्छा तर विद्यार्थ्यांस व्हावीच, पण त्याच वेळी त्यांच्यावर चांगले संस्कारही व्हावे, हा उद्देश आहे. बुद्धीचे क्षेत्र अधिक व्यापक व सुसंस्कृत करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. त्या उद्दिष्टानुसारच प्रस्तुत पुस्तकाची रचना करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावरून मराठीच्या वैचारिक व वाङ्मयीन विकासाचे क्षेत्र या काळात कसे चौफेर विस्तृत आणि सुप्रतिष्ठित होत गेले आहे, याची कल्पना करिता येईल.

या संग्रहाच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांना 'साहित्य-प्रासाद-प्रवेश' मनोरंजक व उद्बोधक होईल.

शेवटी लेखकांची संक्षिप्त माहिती, टीपा, स्वाध्यायासाठी काही प्रश्न दिले आहेत. त्यांचा विद्यार्थ्यांना उपयोग होईल.

महामंडळाच्या शुद्धलेखनाप्रमाणे सर्व वेचे छापिले आहेत.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी व्यक्त केलेल्या इच्छेस अनुसरून त्यांचा लेख मात्र अ-ची बाराखडी योजून छापिलेला आहे.

**संपादक**

नागपूर :
१ जून, १९६४

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि ........

# क्र म णी


१. कृष्णाजी अनंत सभासद
सुटका ... १

२. लोकहितवादी
हिंदू लोकांनी उद्योग करण्याची आवश्यकता ... ७

३. विष्णु कृष्ण चिपळूणकर
खरा टीकाकार ... ११

४. गोपाळ गणेश आगरकर
व्यापारवृद्धी ... १८

५. बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर
परदुःख शीतल ... २३

६. हरी नारायण आपटे
समर्थांकडे जाताना ... २८

७. शिवराम महादेव परांजपे
काळ ... ३६

८. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
साक्षीदार ... ४१

९. दत्तो वामन पोतदार
श्रीयत्नदेवाची पूजा ... ४७

१०. विनायक दामोदर सावरकर
अंदमान आले ... ५२

११. केशव लक्ष्मण दप्तरी
स्वतंत्र भारताकरिता शिक्षणपद्धती ... ५८
१२. श्रीपाद महादेव माटे
गिरिजन आणि परिजन ... ६२
१३. विनोबा भावे
मते आणि मतप्रचार ... ६९
१४. सरोजिनी बाबर
लोकगीते : मराठी काव्य ... ७४
१५. दिवाकर
प्रवासी ... ८०
१६. नारायण सीताराम फडके
हरवली म्हणून सापडली ... ८५
१७. कुसुमावती देशपांडे
मध्यान्ह ... ९२
१८. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर
बोलण्याची कला आणि ऐकण्याची कला ... ९६
१९. रामचंद्र भिकाजी जोशी
ब्रह्मयाची नगरी ... १०४
२०. विठ्ठल दत्तात्रेय घाटे
आबा गेले ... १११
२१. व्यंकटेश माडगूळकर
पार ... ११८
२२. भीमराव कुलकर्णी
पपईचोर ... १२४

सा हि त्य – प्रा सा द

सा हि त्य – प्रा सा द

१३०३६

## : १ :

### कृष्णाजी अनंत सभासद

राजे आले ही खबर पादशहास समजून रामसिंग पुढे भेटीस पाठविले. रामसिंग येऊन भेटले. रघुनाथपंत कोरडे पहिले हेजीब पाठविले तेही येऊन भेटले. पादशहाचे सर्व वर्तमान सांगितले. बाह्यात्कारी समाधान खुशाली सांगितली. "मनात पादशहाचे काय आहे न कळे" असे बोलिले. रामसिंग भेट घेऊन पादशहापाशी आले. वर्तमान सांगितले. पादशहांनी एक हवेली जागा सचंतर शिवपुरा म्हणून वसवून ( तेथे राजे ) राहिले. मुहूर्त पाहून पादशहाचे भेटीस चालिले. पादशहांनी सदर करून पाच हत्यारे आपणाजवळ ठेवून, कंबरबस्ती करून आंगात जरीची कुडती घालून खासा तख्ती बैसला. तैसेच तख्ताजवळ मोठे मोठे शूर मर्दान व तख्ताचे आसपास दोन हजार माणूस उभे केले. तैसेच आमखास यामध्ये कुलवजीर मुस्तेद करून उभे केले. मनात की, "शिवाजी सामान्य नाही. सैतान आहे. अफजलखान भेटीमध्ये मारिला. तैसाच उडोन तख्तावरी आला आणि आपणास दगा केला तरी काय करावे?" असे समजून मुस्तेदीनिशी बसला. राजियासी भेटीस बोलाविले. राजे व पुत्र संभाजीराजे व कारकून व हुजूर अगत्याअगत्य दहाजण भेटीस रामसिंग घेऊन गेले. पादशहाची नजर जाहाली. पादशहा बोलला जे "आवो शिवाजीराजे". असे बोलताच राजियांनी तीन सलाम केले. मनात भाव धरिला की, श्री शंभुमहादेव एक, दुसरा श्री भवानी, तिसरा महाराज पितियास, ऐसे तीन सलाम केले आणि उजवे बाजूस जसवंतसिंग महाराज नवकोट मारवाडचा राजा त्याचे शेजारी खालते उभे राहावयासाठी हुकूम ( पातशहांनी ) केला. राजे व पुत्र उभे राहिले. रामसिंग यास पुसले की, "आपणावरते शेजारी कोण?" असे पुसिले. त्यास रामसिंग बोलिला जे "महाराज जसवंतसिंग". असे ऐकताच राजा

क्रोधयुक्त होऊन बोलिला की, " जसवंतसिंगासारखा उमराव! याच्या पाठी माझ्या लष्करांनी पाहिल्या असतील. याचे खाले आपण उभे राहावे म्हणजे काय ? " असे क्रोधे बोलून रामसिंगाची कटार माजेची घेऊन महाराजा यास मारितो म्हणवून कटार मागू लागले. मग रामसिंग " धीर धरणे " म्हणून बोलू लागले, शब्दाशब्दी होताच पादशहास कळले. पादशहा म्हणू लागले की, " काय जाहले ?" रामसिंग बोलिला की, " जंगली वाघ हयवान. त्यास गर्मा जाहला. काही करीणा जाहला. " असे बोलताच पादशहाचे मनात शंका उत्पन्न जाहली. काय होईल ते न कळे. म्हणून रामसिंगास पादशहा बोलिले की, " राजियास घेऊन डेरियास जाणे. उद्यासाद्या सावकाश मुलाखत होईल." असे बोलताच राजे व राजपुत्र व रामसिंग, राजियाचे लोक देखील हवेलीस गेले. राजा बाहेर गेल्यावरी पादशहा संतोष जाहला आणि "मोठा अनर्थ चुकला. शिवाजी व आमची नजर जाहली होती " ऐसे बोलून राहिले.

राजे डेरियास गेलियावरी रामसिंग व आपण बैसोन बोलिले जे " कोण पादशहा! मी शिवाजी, मजला जसवंताखालते उभे करावे! करीणा काही पादशहास समजत नाही. " ऐसे बोलिले. रामसिंग बोलिला जे, " तुम्ही भेटीस येऊ नये. आले तरी रस-रंग राखून निघून जाणे. तुम्ही येथून सुखरूप गेलेत म्हणजे आम्हांस मोठी जोड जाहाली. " असे बोलून रामसिंग आपले हवेलीस गेले.

राजियांनी आपले कारकून, हुजरे व रघुनाथपंत कोरडे यांसी बोलावून आणून विचार केला. " पुढे तजवीज काय करावी ? पादशहाची मजालस कळली. तेथून यश पावून निरोप घेऊन कैसे जावे ? पादशहाजवळ काही एक कार्य कबूल करून गेलियाविना पादशहा निरोप देत नाही. " ( मग ) रघुनाथपंत कोरडे यास सांगोन पाठविले की, " तुम्ही पादशहास उद्या जाऊन अर्ज करणे की, स्वामीशी आमचा दुसरा विचार नाही. आपण निखालस आपले पुत्र घेऊन देखील भेटीस आलो. सेवकाजवळोन चाकरी घ्यावी. दक्षणेस कुल आदलशाई व कुल कुतबशाई दोनी पादशाही घेऊन हजरतीस देतो. वरकड सुभे रवाना करता त्याची कामगिरी पाहणे आणि आपली कामगिरी पाहणे. " ऐसे कितीएक गोष्टी बोलून एकांती घुसलखानियात भेटीस बोलाविले ( म्हणजे ) भेटी घेऊन कित्येक मजकूर बोलू म्हणून अर्ज करणे. " म्हणून सांगितले. त्याजवरून रघुनाथपंत कोरडे दुसरे दिवशी पादशहाजवळ येऊन येणेप्रमाणे करीणा लिहून पाठविला. पातशहाने रोखा

वाचून चित्तात विकल्प धरिला आणि पत्राचे पाठीशी जाब लिहिला की, " सबुरी करणे. तुमचा मुद्यामाफक करू. " असा जाब लिहिला. त्याणी येऊन राजियासी सांगितले की, " सबुरी करणे. " तेव्हा विकल्प आहे. दिलखुलाशाने जाब दिला नाही. असा तर्क राजियाने केला.

तेच दिवशी शास्ताखानाने–जाफरखान दिवाण, पूर्वील पादशहाचे वेळेसही त्यास दिवाणगिरी चालत होती, परंतु मुतालिकाचे हातून कारभार होता. ऐसे, त्या—जाफरखानास सांगून पाठविले की, " शिवाजी मोठा दगेखोर आहे. विद्यावंत असे. आपल्या गोटात शिरला तेव्हा चाळीस गज जमीन उडाला आणि बाडात शिरला असा पादशहांनी भेटीस नेऊ नये. नेला तरी चाळीस पन्नास गज जमीन उडोन दगा देईल. " असे सांगून पाठविले. त्याजवरून जाफरखानाने पादशहास हे वर्तमान जाहीर केले. पादशहा मनात खोचून त्याने खरे मानले. बळकट मनात विकल्प धरिला.

दुसरे दिवशी राजे यास कळेऊ की, जाफरखान दिवाणाने आपला गिल्ला पादशहाजवळ केला. असे कळोन रघुनाथपंत कोरडे यास जाफरखानाकडे पाठविले की, " आपले भेटीस येतो. " म्हणून पाठविले. त्याने बहुत वेळ मनात तजवीज करून ' बरे येऊ द्या ' म्हणोन सांगितले. त्यावरून राजे जाफरखानाचे भेटीस गेले. सन्मान बहुत केला. कित्येक आपले सरंजामाविशी सांगितले, परंतु त्याचे मनात आले नाही. बाहेर ' बहुत बरे ' म्हणून बोलिला. जाफरखानाची बायको ती शास्ताखानाची बहीण. तिने खानास आतोन सांगून पाठविले की, ' शास्ताखानाची बोटे तुटली, अफजुलखान मारिला, तसे तुम्हांसही शिवाजी मारील. त्यास लवकर निरोप देणे. ' मग राजास वस्त्रे देऊन निरोप दिला. " पादशहास अर्ज करून सरंजाम करवितो. " ऐसे बोलिला. मग राजे डेरियास आले. " जाफरखानही दिलखुलाशाने बोलिला नाही. बरे, श्री करील ते खरे " म्हणून बोलून राहिले.

दुसरे दिवशी पादशहा याणी राजापाशी ५००० स्वार व पायदळ पोलादखान कोतवाल यास ( नेमून ) हुकूम केला की, " तू राजाच्या डेऱ्याभोवती चौकी देऊन खबरदारीने राहणे. " त्यावरून कोतवाल येऊन डेरा ठोकून राहिला. मग राजे घाबरे झाले. कष्टी होऊ लागले. संभाजी राजे यांस पोटाशी धरून बहुत खेद केला. निराजीपंत व दत्ताजीपंत व त्रिंबकपंत याणी बहुता प्रकारे समाधान

केले. तेव्हा राजे बोलले जे, "आता काय हुन्नर करावा ?" असा विचार करता रात्र झाली. मग श्री भवानी स्वप्नात येऊन साक्षात्कार झाला की, "काही चिंता न करणे. येथून तुजला सर्व शत्रूंस भूल घालून मोहनास्त्र घालून पुत्रासहवर्तमान घेऊन जाते. चिंता न करणे." म्हणोन अभय झाले. मग जागृत होऊन आप्तविषयी लोकांस सांगितले आणि समाधान मानिले.

दुसरे दिवशी नाना जिन्नस मेवा खरेदी करून आणविला. आणि वेळूचे पेटारे आणवून १० पेटारे मेवा भरिला. एका पेटाऱ्यास दोघे दोघे मजूर लावून मध्ये लाकूड घालून मेवा वजिरास पाठविला. चौकीच्या लोकांनी पुसले की, "पेटारे कोणाचे ? कोठे जातात ?" मजुरांनी उत्तर दिले की, "राजे याणी चौघा वजिरांस मेवा पाठविला आहे." त्यांनी एकदोन उघडून पाहिले. तो मेवा खरा. मग जाऊ दिले. असा रावता रोज लाविला. मग आठचहू रोजांनी आपले स्वार व किती एक कारकून लोक यासही 'पळणे' म्हणून सांगून पाठविले. मग ते कुल पळाले.

मग एके दिवशी राजे व राजपुत्र एकच पेटाऱ्यात बसले. पुढे–मागे पेटारे करून मध्ये पेटारियात बसून चालिले. तेवेळी आपला साज सर्व उतरून हिरोजी फरजंद यास घालून, आपले पलंगावरी निजविला. हात मात्र त्याचा उघडा बाहेर दिसू दिला. आणि शेला पांघरून निजविला. आणि एक पोरगा रगडावयास ठेविला. जवळील कारकून होते त्यांस अगोदर दिल्लीपलीकडे तीन कोसांवर एक गाव होता तेथे ठिकाण करून पुढे रवाना केले होते. आणि आपण उभयता पेटारियात बसून निघोन चालिले. चौकीचे लोक होते त्यांणी एकदोन पुढील पेटारे उघडून पाहोन वरकड पेटारे न उघडता जाऊ दिले. शहराबाहेर दोन कोसांवरी जाऊन पेटारे टाकून पायउतारा होऊन, कारकून ज्या गावी होते त्या गावास गेले. कारकून बराबरी घेतले. अवघियांनी रानात बसून विचार केला की, "आता जरी नीट आपले देशास जातो तरी तिकडे लाग करून फौजा धावतील. तिकडे जाऊ नये. दिल्लीपलीकडे जावे. वाराणसीकडे जावे." असे करून राजे व संभाजीराजे व निराजी राऊजी व दत्ताजी त्रिंबक व राघोमित्रा मराठा ऐसे निघोन चालिले. वरकडांस मनास मानेल तिकडे जाणे म्हणून सांगितले. आपण व राजपुत्र व इतर लोक कारकून ऐसे वाराणसीकडे आंगास राखा लाऊन, फकिराचे सोंग घेऊन मथुरेकडे गेले.

मागे दिल्लीमध्ये हिरोजी फरजंद पलंगावरी निजला होता. तो चार प्रहर रात्र व तीन प्रहर दिवस तैसाच निजला. चौकीचे पोलादखानाचे लोक कोटडीत येऊन पाहतात ( तो ) राजे शेला पांघरून निजले. पोर पाय रगडीत होता. पोरास लोक पुसतात की, " राजे आज फार वेळ निजले ? " पोर म्हणतो की, " शिर दुखते. " ऐसे पाहोन लोक जातात. तैसाच तीन प्रहर दिवस हिरोजी निजला होता. तो प्रहर दिवस असता हिरोजी उठोन आपली पांघुरणे, चोळणा, मुंडासे घालून पोर बरोबरी घेऊन बाहेर आला. चौकीदारांनी पुसिले त्यांस हिरोजीने सांगितले की, " शिर दुखते. कोणी कोटडीत जाऊ लागेल त्यास मना करणे. आपण औषध घेऊन येतो. " म्हणून चौकीदारांस सांगून दोघे बाहेर गेले. रामसिंगाचे गोटास जाऊन त्यास एकांती वर्तमान सांगोन आपण तेथून निघोन देशाचा मार्ग धरिला.

मग रामसिंग पातशहाच्या दर्शनास गेला. पातशहास अर्ज केला की, " शिवाजी आपले मार्फतीने आला होता. त्यास पातशहाने चौकी अलाहिदा दिली. आपणांकडे काही इलाखा नाही. " बादशहा बोलिले की, " तुम्हांसी त्याचा इलाखा नाही. पातशाही बंदा. त्यास पातशहा सर्फराजी करतील. तुम्ही त्याचे दरम्यान नाही. " असे बोलल्यावर रामसिंगांनी तसलीम करून डेरियास आले.

नऊ तास दिवस आला. नववे तासा चौकीचे लोक म्हणत होते की, " आज माणसाचा राबता नाही. राजा श्रमी जाहला आहे. म्हणून चाकर सांगतात. त्याजवर कोणी जात-येत नाही. काय वर्तमान ? " म्हणून एकजण कोठडीत पाहावयासी गेला. तो पलंगावरी कोणी नाही. राजा पळाला ऐसे जाहले. हे देखोन पोलादखानाने पातशहाजवळ वर्तमान सांगितले की, " राजा कोटडीत होता. वरचेवर जाऊन पाहात असता एकाएकी गईब जाहला. पळाला किंवा जमिनीमध्ये घुसला की असमानामध्ये गेला, हे न कळे. आम्ही जवळच आहो. देखत देखत नाहीसा झाला. काय हुन्नर जाहला न कळे. " ऐसे जाऊन सांगताच पादशहास आश्चर्य वाटून बहुत तजविजीत पडला आणि कुल फौजांस ताकीद करून चौतर्फा अष्ट दिशेस दोन लाख साठ हजार स्वार शोधावयास रवाना केले. त्यास सांगितले की, " शिवाजी हुन्नरवंत आहे. एखादा वेष धरून जात असेल, तरी तुम्ही जंगम, जोगी, संन्यासी, तापसी, बैरागी, नानकपंथी, गोरखपंथी, फकीर, ब्राह्मण, कंगाल, ब्रह्मचारी, परमहंसी, वेडी, नानापरीची सोंगे, शोध करून, राजा

ओळखून, कैद करून आणणे. " अशी इशारती सांगोन रवाना केले. फौजा चोहोकडे स्वार जाहल्या आणि पातशहांनी मनात शंका धरली की, " राजा शहरात कोठे दडून राहिला आणि रात्रीस आपणांस दगा करील. " म्हणून तजवीज करून, बहुत सावध चौकी पहारा ठेवून जागेच पलंगावर राहून बैसले. लोक कंबरबस्ती करून रात्रंदिवस जवळ ठेवले. ये जातीने राहू लागले.

पुढे राजे व राजपुत्र मजल दरमजल चालोन मथुरेस गेले. मथुरेमध्ये ओळखीचे माणूस शोधिता कृष्णाजीपंत व विसाजीपंत हे त्रिवर्गबंधु ब्राह्मण, मोरोपंत पेशवे यांचे मेहुणे, त्यास निराजीपंत ओळखीत होते. त्याणी जाऊन, त्यांची भेट घेऊन वर्तमान सांगितले. त्याणी धैर्य करून कबूल केले. त्याजवर त्यांचे घरी संभाजी राजे पुत्र ठेविले की, " आपण देशास आपल्या राज्यात जाऊन पावलो म्हणून तुम्हांस पत्र व जासूद पाठवितो. तुम्ही राजपुत्रास घेऊन देशास सर्व बंधू आपल्या कुटुंबानिशी येणे. तुमचे सर्व प्रकारे चालवू. उर्जित करून बक्षिस देऊ. " असे सांगोन राजपुत्रास ठेविले. आणि त्यांचा एक बंधू कृष्णाजीपंत समागमे घेऊन वाराणशीस गेले. " गया प्रयागी यात्रा तुमचे ओळखीने तुम्ही आपल्यास करून देणे. " म्हणून सांगून, त्यांस बरोबर घेऊन, वाराणशीस आले. तेथे गुप्तरूपे स्नान करून, श्रीविश्वेश्वरदर्शन करून प्रयाग-स्नान केले व गयावर्जन केले. तेथे कर्जही उदंड घेऊन धर्मही केला. पुढे देशास आपले राज्यात यावे असे केले. नीट वाटे यावे तरी पादशहाच्या फौजा गेल्या त्या मार्गे जाता नये, म्हणून विचार करून गोंडवणातून भागानगर विजापुरावरून राजगडास आले. मार्गी कित्येक जागा उदंड शोध पडला होता. अपाय होता. दगाच व्हावा असे जाले होते. परंतु श्री भवानीने संरक्षून स्वस्तिक्षेम आणिले. निराजीपंत व दत्ताजीपंत व राघोजी मराठा असे चौघे आले. राजगडास आलियावर थोर धर्म मोठा महोच्छाव केला, साखरा वाटल्या. तोफांचे आवाज केले. मातुश्रीने व कारकुनांनी व लष्कर, गड, कोट हशम सर्वांनी संतोष करून खुशाली केली.

० ०

अनुक्रम ३८२-८७ वि: ... 
क्रमांक ...१५२८३... नों दि ...



# हिंदू लोकांनी उद्योग करण्याची आवश्यकता

लोकहितवादी

प्राचीन काळचे हिन्दू लोक हे आपले देशात स्वस्थ होते. परकी लोक या देशात फार येत नव्हते व प्रजा थोडी होती, हे प्राचीन काळचे इतिहासावरून कळते. कारण दक्षिणभागी हिंदुस्थानात पहिली वस्ती थोडी व अरण्ये फार होती. हिंदुस्थानात उत्तरभागी मात्र लोक राहात होते व तेही फार थोडे असतील. याजवरून हे दिसते की, त्या वेळचे राजांच्या राजधान्या फार जवळ जवळ होत्या; म्हणजे अयोध्या, मथुरा, कानपूर, हस्तिनापूर इत्यादी. यांजवरून त्या राजांचे राज्य संक्षेपित होते, यात संशय नाही; व लोकही विरळा असतील आणि पीकपाणी फार, यांमुळे शिल्लक राहात असेल.

कारण जितके लोक खाणार होते तितक्याचे उद्योगाने जे पिकत होते, ते फाजील राहात होते. यांमुळे आळसाच्या प्रवृत्ती निघाल्या, आता तसे नाही; आता लोक फार वृद्धिंगत जहाले व त्यांस खावयास मिळत नाही; कारण सर्व उद्योग करीत नाही. जितके लोक उद्योग करितात तितक्यांचे उद्योगाचे उत्पन्नावर आळशी लोक फार जाले, त्यांचा निर्वाह होत नाही. तत्रापि उद्योग करण्याचे या लोकांस अजून समजत नाही.

मुख्यत्वेकरून ब्राह्मण लोक उद्योगाचे शत्रूच आहेत. ते पहिल्याप्रमाणे पाहतात; परंतु त्यांचे शापाचे ढोंग होते, ते अगदी गेले. त्यांस जेवावयास दिल्हे म्हणजे ईश्वर तृप्त जहाला; त्यांचे मुख तेच देवाचे सुख; त्यांचा हात तोच देवाचा हात; हे ढोंग लोकांस कळून आले. हे फुकट खाणारे असे लोक समजतात. परदेशचे लोक या देशात आले, त्यांनी तर या ढोंगाची परिस्फुटता फारच केली. सर्व आळशी लोकांस पुरेल अशी सामग्रीही या देशात नाही. जसे एका घरात दहा मनुष्यांचे अन्न असते, तेथे पंचवीस पाहुणे आले म्हणजे

घरच्या माणसांनी उपाशी राहावे तरच पाहुण्यांचा काही निर्वाह होईल. तशी या देशाची हल्ली स्थिती आहे. पहिल्याने मुसलमान लोक या देशात आले. बाहेरचे लोक जे येतात ते काही मेहनत करण्यास येत नाहीत; ते आयते खावयास येतात. तेव्हा हजारो मोगल लोक, नबाब, अमीर, सरदार हे या लोकांचे उद्योगावर खाऊ लागले मग अर्थातच या लोकांस कमती पडू लागली.

नंतर अलीकडे इंग्रज इकडे आले. तेही काही इकडे शेतभात मळाटळा करण्यास आले नाहीत. ते इकडे श्रीमंत होऊन चार पैसे इकडून घेऊन घरी जावे, यास्तव येतात. व ते शहाणे आहेत तेव्हा ते गरीब लोकांप्रमाणे का खपतील बरे? त्यांनी सुखाचा जागा, मोठाली कामेकाजे उपटली. हजारो इंग्रज लोक अमीरांप्रमाणे इकडे येऊन राहतात, व हजारो इंग्रज शिपाई इकडे येतात. इतक्या या लोकांचे पोषण हिंदू लोकांचे मेहनतीने जे उत्पन्न व्हावयाचे त्यातच होते. वास्तविक म्हटले तर फार पाहुणे आले म्हणजे त्यांनी उपाशी राहावे. परंतु हे साधारण पाहुणे नव्हत, तर ते शूर, विद्वान, गुणी व जबरदस्त आहेत. तेव्हा आपले लोकांपुढे ठेवलेल्या पत्रावळी त्यांनी ओढल्या आणि हे लोक त्यांचे तोंडाकडे पाहत बसले. याजमुळे या लोकांस पाऊस पडूनही दुर्भिक्ष आहे. कोणत्याही देशात तेथील लोकांचा सुखेकरून निर्वाह व्हावा, इतके पीक होते; परंतु जर बाहेरचे लोक त्यात पुष्कळ आले तर जमिनीने अन्न सर्वांस कोठून पिकवावे व पुरवावे? याजमुळे हे लोक भिकारी झाले आहेत. अमीरपणा, शिपाईगिरी, राज्यकारभार या लोकांकडे होता, तेव्हा कोणतेही प्रकारचे दुर्भिक्ष नव्हते. कारण देशात जे उत्पन्न होत होते ते खाऊन ते स्वस्थ होते. ही गोष्ट स्पष्ट रीतीने कळण्याकरिता मी थोडा अजमास करून हिशेब लिहितो.

सरासरी हिंदुस्थानात एकंदर पाच लक्ष कोस औरस चौरस आहेत. त्यांपैकी अडीच लक्ष कोस राने, डोंगर, नद्या, खडक, झाडे, घरे, शहरे इत्यादिकांमुळे नापीक आहेत. ते वजा देऊन बाकी अडीच लक्ष कोस चांगले पिकाचे आहेत. आणि एकंदर या देशात माणसे दहा कोट आहेत. तितक्यांना अन्न पाहिजे. तेव्हा याची वाटणी बसविली तर एक कोसास चारशे माणसे पडली. त्यात चारशे माणसांपैकी निम्मे स्त्रिया. बाकी दोनशांपैकी शंभर माणसे उद्योगावाचून म्हणजे आजारी, वृद्ध, बाळे, आंधळे, वगैरे व्यंग व व्यापारी, अंमलदार, तमासगीर, श्रीमंत हे सरासरी शंभर. बाकी शंभर राहिले, ते काम करणारे.

इतक्यांनी मेहनत करून चारशे लोकांचा निर्वाह करावा. तेव्हा शंभर माणसे एक कोस जमिनीत खपली तर चारशांचे पोट भरण्याइतके उत्पन्न करतील, किंबहुना जास्ती करतील.

परंतु काळेकरून लोकांमध्ये श्रीमंती वाढत चालली, तो आव्शी लोक वाढत चालले. म्हणजे जो एकटा श्रीमंत आहे तो आपणच काम केल्याशिवाय खातो असे नाही. त्यास चाकर पाहिजेत, घोडे पाहिजेत, धुवावयास परीट पाहिजेत, शिंपी शिवावयास पाहिजेत, ऊन लागेल म्हणून अब्दागिरी पाहिजेत. रस्ता दिसत नाही म्हणून मशालजी, चोपदार इत्यादी मिळून तो एकटा पंचवीस माणसे घेऊन बसला. आणखी जो जो श्रीमंती वाढली तो तो गाणार पाहिजेत, वाद्य वाजविणारे पाहिजेत, देवपूजा करावयास भट पाहिजे व पंक्तीस दहा पाने पाहिजेत, हे अनर्थ झाले, तत्रापि सर्वांचा भार शंभर माणसांनी सोसला आणि सुखेकरून राहिले. परंतु आता काय झाले की, या लोकांचा ताटांत इंग्रज लोक, मुसलमान लोक आले, ते काही बरोबर घेऊन आले नाहीत. आमच्यांपैकी खावयास आले, आणि तेही एकटे खाणारे नव्हत. एक एक असा श्रीमंत की, त्यांचे मागे पन्नास रिकामे माणूस; कोणी घोडा खाजविणारा, कोणी रथ हाकणारा, कोणी हिशेब लिहिणारा, कोणी कारकून, कोणी कपडे नेसविणारा, कोणी शिजविणारा, कोणी पोराला दूध पाजणारा, असे होते. कारण ते स्वता काही काम करावयाचे नाहीत. यांजमुळे हा समुदाय चारशांमध्ये येऊन पोचला. व आपले लोक जे श्रीमंत होते हे काही आपली खोड टाकीत ना, ते श्रीमंती असावी अशी इच्छा करणार. व इंग्रज तशीच इच्छा करणार. तेव्हा दोघांचा निर्वाह चालेना आणि आपले लोक भिकारी होत चालले.

ब्राह्मण म्हणतात की, आजपर्यंत आम्ही काम कधी केले नाही व पुढे करणार नाही. स्त्रिया काम करावयाचा नाहीत. तेव्हा इतक्या सर्वांचा निर्वाह कसा होईल? याजमुळे जरूरी येऊन पडली की, आपले लोकांनी श्रीमंती सोडावी आणि ती सर्व इंग्रजांकडे द्यावी. तरच निर्वाह होईल. व कांही काळ असेच चालले तर आपले लोकांत एकही श्रीमंत वाचणार नाही. कारण श्रीमंती राहणे अवघड पडेल. इतक्यांचा निर्वाह होत नाही. याजमुळे हे लोक अर्थातच भिकारी झाले. त्यांत आणखी या देशातील कामे व व्यापार इंग्रजांनी घेतले. जड्ज तेच; माजिस्ट्रेट तेच; वस्त्रे विकणारे तेच; माल आणणारे तेच; टंकसाळ घालणारे तेच; व

शिपाई तेच. इतक्या लोकांची कामे पूर्वी आमचे लोकांमध्ये होती तेव्हा ठीक होते. परंतु ती सर्व त्यांचे हाती गेली, तेव्हा जा जा लोकांची कामे त्यांनी घेतली ते ते लोक रिकामे झाले आणि उपाशी मरू लागले. यात त्यांनी इतक्या सर्वांस अन्न कोठून पुरवावे ?

तेव्हा परिणाम असा होईल की, आपले लोक सगळे शेतभात करणारे होतील आणि श्रीमंत सावकार व अमलदार इंग्रज होतील. जितकी मेहनत करून पिकवावयाचे काम, तितके आपले लोकांकडे राहील. जितके सुखाने खाऊन राहावयाचे काम, तितके ते लोक बळकावतील. तेव्हा अर्थातच हे लोक भिकारी झाले. परंतु इतकी मजल येऊन पोचली नाही. कारण अद्याप कोठे काही संस्थाने आहेत, व ती जरी धुंदीत आहेत तरी द्रव्यवान आहेत, याजमुळे चार माणसांचा निभाव होतो व हिंदू लोक चार सुखी आहेत, असे नजरेस पडतात. परंतु हे फार दिवस चालणार नाही. कारण जी संस्थाने आहेत, ती मृतप्राय होऊन राहिली आहेत. कोणामध्ये शहाणपण नाही. ती एका पाठीमागून एक जाणार. अस्तु.

असा प्रसंग आला, तेव्हा आपले लोकांस सुखी होण्याची युक्ती कोणती म्हणाल, तर अशी आहे की, जितके इंग्रज लोकांचे व्यापार व रोजगार इकडे कमी होतील तितके या लोकांस जास्ती सुख आहे. याजकरिता या लोकांनी विद्या व ज्ञान यांचे प्राप्तीस झटावे व इंग्रजांप्रमाणे शहाणे व्हावे. आणि जे व्यापार ते करितात ते आपण करावे. कोणी म्हणतील की, त्यांस द्रव्य अनुकूल आहे आणि या लोकांजवळ द्रव्याची अनुकूलता नाही, तर ही गोष्ट खरी; परन्तु त्याचा निर्णय आज लिहिणे जरूर नाही; जेव्हा सर्व लोक पुढे सरावे अशी इच्छा करतील व रानटीपणाचा समजुती सोडून देतील, तेव्हा अनुकूलता सहज होईल.

० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों दि: ..................

: ३ :

## खरा टीकाकार

### विष्णुशास्त्री चिपळूणकर

मूळ ग्रंथाचे ज्ञान असल्याशिवाय टीकाकार एरवी केवढाही विद्वान असला तरी ते व्यर्थ होय, हे उघड आहे. ज्या मनुष्यास एखाद्या वस्तूचे पूर्ण ज्ञान नाही, किंबहुना मुळीच नाही, त्याने त्याविषयी आपले मत सांगणे हे मुळीच शोभत नाही; पण मनुष्याच्या मनाचा असा काही चमत्कार आहे की, स्वतःच्या अज्ञानाची केवळ कल्पनाही त्यास सहन होत नसते. आपणांस अमुक अमुक विषय अगदी कळत नाही व यास्तव त्यावर मत देण्यास आपण सर्वथा अयोग्य, अशी मनाची पक्की खात्री फारच थोड्या सुज्ञ लोकांची झाली असते. ज्या त्यास बहुधा असे वाटत असते की, मला जितके ज्ञान आहे, त्यापेक्षा अधिक दुसऱ्यास काय असायचे आहे? व माझी जी मते आहेत त्यांत चुकीचा संभव असेल तरी कसा? तर असा मूर्खपणाचा दुरभिमान बहुतेक लोकांच्या मनास जडला असल्यामुळे हव्या त्या गोष्टीवर हवे तसे मत झोकून न देणारे फार थोडे. असो. तर ग्रंथावर टीका करण्यास निघालेले गृहस्थ अशा प्रतीचे कामाचे नाहीत. आपण ज्याचे गुणदोष लोकांस दाखवणार तो ग्रंथ खरोखर आपणास पुरतेपणी समजला आहे असा निश्चय झाल्यावरच टीका करणाराने त्या कामास हात घालावा. नाही तर तो अर्धामुर्धा समजून तितक्यावरूनच जर गुणदोषविवेचनास आरंभ केला तर ते त्या कर्त्याच्या उपहासास मात्र कारण होईल व लोकांत सत्याचा प्रसार होणे एकीकडेच राहून मूर्खपणाची मते मात्र चोहीकडे माजतील.

दुसरा गुण सत्यप्रीती. हाही गुण वरच्यासारखाच टीकाकर्त्याच्या अंगी अवश्य असला पाहिजे. याची योग्यता तर वरच्याहूनही अधिक आहे; पण त्याच मानाने तो जगात फारच विरळा आढळतो. दुसऱ्याच्या ग्रंथावर जो टीका करायाची ती केवळ सत्यास अनुसरूनच करायाची व ती करण्यात सत्याचा उदय व असत्याचा

ऱ्हास करणे येवढाच काय तो हेतू, हा प्रकार फारच थोडा सापडेल. एरवी टीका करणाऱ्यांचे सामान्यतः उद्देश पाहिले तर द्वेषबुद्धीने, मत्सराने किंवा उगीच गमतीखातर दुसऱ्याची निंदा करावी, त्याची फजिती उडवावी, त्याची कीर्ती दूषित करावी, इतकाच असतो. किंवा इतकेही नसले तरी निदान आपले नाव लोकांपुढे यावे, आपली विद्वत्ता प्रदर्शित व्हावी, इतका तरी असतो. आता हे खरे की, वरील दुष्ट मनोवृत्तीच्या प्रेरणेनेच कोणी एखाद्या ग्रंथावर चर्चा केली असूनही जर तीत असत्याचा लेशही नसला तर ती केवळ दोषास पात्र होत नाही; तरी वरील वृत्तीचे अवलंबन सर्वथा अश्लाघ्यच होय. सुविचाराच्या योगाने ज्यांचे मन थोर झाले असते ते त्यास आपल्या निर्मळ अंतःकरणात कधी थारा देत नसतात. असो; तर जो कोणी एखाद्या ग्रंथकाराचे गुणदोष जगास प्रगट करण्याकरता हाती लेखणी धरील त्याने अगोदर सत्यास स्मरावे आणि त्यास धरूनच मी पुढील सगळा मजकूर लिहीन असा अगोदर निश्चय करावा. असे करणे केवळ परमार्थ-बुद्धीस्तवच त्यास योग्य आहे असे नव्हे तर त्याने निव्वळ स्वार्थ पाहिला तरी-सुद्धा वरीलच मार्ग श्रेयस्कर होय, हे त्याच्या लक्षात येईल. कारण जरी त्याने आपल्या विद्वत्तेच्या व कीर्तीच्या भरावर चढून जाऊन खोटीच मते लोकांच्या मनात भरवून देऊन त्यांस काही वेळ फसवले व त्याबद्दल तात्कालिक कृतार्थता मानली तरी कधी ना कधी तरी त्याची लबाडी बाहेर पडेल हे त्याने खूप समजून ठेवावे. सत्यरूप दैवत असे कडक व जाज्वल्य आहे. त्याच्या क्षोभामुळे मोठ-मोठ्या प्रचंड ग्रंथकारांचाही चुराडा होऊन जातो! मग छोटेखानी लुटपुट्या ग्रंथ-कारांचा खुर्दा तर कोणीकडच्या कोणीकडे उसळून जात असेल कोण जाणे! असो; तर याप्रमाणे वर जी सत्यानुसरणाविषयी आम्ही सूचना केली ती केवळ स्वार्थ-दृष्ट्याही यथार्थ होय. ग्रंथाविषयी जो यथार्थ विवरण करील, म्हणजे गुण असतील तेवढे गुण व दोष असतील तेवढे दोष जो यथास्थित दाखवून देईल, त्याचीच टीका चिरकाल जगास मान्य होऊन राहील.

तिसरा गुण शांत स्वभाव. हाही टीकाकारांच्या अंगी अवश्य पाहिजे असून वरच्यासारखाच क्वचित आढळतो. त्याचे कारण वरील कलमातच आले आहे. ते अर्थातच हे की, टीकाकर्त्यांची प्रवृत्ती मुळी वर सांगितलेल्या द्वेषमत्सरा-दिकांनीच प्रायः होत असल्यामुळे वरील गुणास जागाच राहात नाही. क्रोधास वश होऊन जेथे चित्ताचा क्षोभ झाला तेथे शांतता कशी राहावी? असो; पण

क्षोभाचाही उद्गार बाहेर पडण्यास मनास काहीशी तरी शांती असावी लागते. ती मुळीच नसून चित्तास अतिशयित क्षोभच जर केवळ झाला असला तर मनाचे व्यापारही नीट चालण्यास कठीण पडेल. म्हणजे जसा मनुष्य अतिशयच रागावला असला तर त्याचा कंठ दाटून येऊन शब्दही पुरता तोंडावाटे निघेनासा होतो, त्याप्रमाणेच मनुष्य रागाने अगदी देहभान विसरून गेला म्हणजे त्याची बुद्धीही गोंधळून जाते. काय बोलायचे किंवा लिहावयाचे ते त्यास एरवी जेवढे सुचेल तेवढेही त्या हातघाईच्या वेळी न सुचून तो अगदी बेफाम होऊन जातो व वेड्यासारखे भलभलतेच बरळूसुद्धा लागतो. असे की, तोच मनुष्य पुढे काही दिवसांनी आपला वेडेपणा पाहून विस्मय पावेल. असो; तर मनाच्या शांततेची इतकी आवश्यकता आहे की, रागाचे बोलणे किंवा लिहिणे संगतवार होण्यास-सुद्धा तीवाचून चालत नाही. मग हजारो वाचकांस मान्य होईलशी ग्रंथरचना करायची असल्यास तर तिचे अगत्य केवढे आहे हे काय सांगावे? का की, ग्रंथ रचायचा म्हणजे सगळा विषय अगोदर साद्यंत मनात आणून त्याची यथास्थित मांडणी करायची असते. व वाक्यरचना वगैरे जितकी उत्कृष्ट होईल तितकी साधावी लागते. तेव्हा हे सर्व क्षोभ पावलेल्या मनुष्यापेक्षा शांत, स्थिर, मनाच्या मनुष्यास जास्त साधेल हे उघड आहे. हे एक झाले. दुसरे असे की एखाद्या ग्रंथावर वगैरे जो अभिप्राय देणे तो शांत, गंभीर व सभ्य अशा रीतीने दिला असता त्याचे काही निराळेच वजन पडते आणि त्याने जे काम होते ते रागाच्या सपाट्यात उगीच पुष्कळ गोंगाट केला, वेडयावाकडया शिव्या आसडल्या अशाने अगदीच होत नाही. या दुसऱ्या प्रकाराने टीका करणारावरून मात्र लोकांचे मन उडते व त्याचा हलकटपणा व पोरकटपणा जगात प्रगट होतो. शिवाय वरील शिव्यांनी त्याच्या पक्षास बळकटी यायची ती तर एकीकडेच राहून त्याची दुर्बलता मात्र लोकांस भासू लागते. कारण लोक पक्के समजतात की, ज्या अर्थी याने शिव्यांचा एकदा भडिमार केला आहे त्या अर्थी याजपाशी प्रमाणे तितपतच असतील. कारण ज्याच्याजवळ सबळ प्रमाणे आहेत, तो शब्दपांडित्याचा किंवा शिव्यांचा भडिमार करण्याच्या भरीस कधी पडणार नाही. जी ठोक प्रमाणे त्यास माहीत असतील ती दाखवून तो खुशाल बिनधोक बसेल. आपल्या प्रति-पक्षाच्या शिव्यांचीही तो काडीइतकीही पर्वा करणार नाही. कारण त्याचा पोकळपणा त्यास फडफडीत दिसून येईल व जे सुज्ञ आहेत ते त्याने कधी फसले जाणार नाहीत हेही पक्के समजेल. असो; तर याप्रमाणे मनाची शांतता ही

टीकाकर्त्यास अत्यंत आवश्यक असून तिच्या योगाने त्याच्या लेखास काही विलक्षण थोरवी व भव्यपणा ही येतात की, ज्याप्रमाणे दोहो पक्षांच्या वकिलांच्या कोट्या व एकतर्फी उत्तरे-प्रत्युतरे सगळी ऐकून घेतल्यावर न्यायाधीश आपल्या उंच आसनावरून निःपक्षपातपणाचा चोख निवाडा अगदी स्वस्थ अंतःकरणाने बोलून जातो. त्याप्रमाणे सारांश, टीकाकर्त्याचा अभिप्राय वकिलाप्रमाणे एकतर्फी कधी नसावा, तर न्यायाधीशाच्या निर्णयाप्रमाणे सत्याच्या तर्फेचाच असावा.

चवथा गुण सहृदयता. सहृदयता म्हणजे ज्यावर टीका करावयाची त्यात हृदयाचा पूर्ण अभिनिवेश होण्याची योग्यता. ही योग्यता अर्थातच सर्व मनुष्यांच्या ठायी असत नाही, अथवा असली तरी सारख्या प्रमाणाने असत नाही. जगात जे एवढे मतवैचित्र्य दृष्टीस पडते यास मुख्य कारण वरील होय. प्रत्येक मनुष्याची जन्म-सिद्ध प्रकृतीच निराळी पडल्यामुळे व पुढे ज्या अवस्था त्यास प्राप्त होतात त्याही सर्वांच्या सारख्या नसल्यामुळे, मनुष्या मनुष्यामध्ये रुचिभिन्नत्व उत्पन्न होते हे साहजिकच आहे. पण त्यातूनही कित्येक मनुष्यांच्या ठायी वरील सहृदयता गुण इतरांच्याहून जास्त आढळतो. म्हणजे दुसऱ्याच्या मनोवृत्तीशी आपली मनोवृत्ती मिळविणे हे त्यास सहज करता येते. हा गुण असणे हे मनाच्या किंवा हृदयाच्या विशालत्वाचे चिन्ह होय, आणि त्याचा अभाव हा अर्थातच त्याच्या उलट गुणाचे म्हणजे वरील दोहोंच्या संकुचितत्वाचे दर्शक होय. तर जो एखादा ग्रंथावर टीका करण्याचें मनात आणील त्याने अगोदर आपल्याशी हे पाहावे की, सहृदयत्व पावण्याची माझी योग्यता आहे की नाही. नाहीतर काय प्रकार होईल, तो उघडच आहे. समजा, की जयदेवाच्या 'गीतगोविंद' काव्यावर किंवा मराठेशाहीत रामजोश्यासारखे सुरस लावण्या करणारे जे कित्येक कवी झाले, त्यांच्या कवनां-वर टीका करण्यास शुकाचार्यासारख्या परमहंसांनी हातात लेखणी घेतली, तर टीका किती उत्तम तऱ्हेची होईल याचे अनुमान सहज करता येईल! तसेच धर्मप्रतिपादक किंवा वेदान्तविषयक ग्रंथावर एखाद्या रंगेल विनोदी मनुष्याने जर टीका करण्यास आरंभले तर ते किती साधेल? बिशप बटलर नावाच्या एका धर्माध्यक्षाने इंग्रजी भाषेत एक मोठा विख्यात ग्रंथ वरील विषयावर रचला आहे, त्याविषयी कित्येकांनी असे मत प्रदर्शित केले आहे की, तो ग्रंथ पाहिल्याबरोबर आमचे डोके दुखू लागे. एलिझाबेथ राणीचे खजिनदार लॉर्ड बर्ले म्हणून कोणी होते, त्यांस, स्पेन्सरच्या सर्व प्रसिद्ध काव्याबद्दल राणीने काही इनाम करून दिले

या गोष्टीचे मोठे आश्चर्य वाटले. त्या प्रसंगी त्याचा असा उद्गार निघाला; 'अहो, हे काय वेड आहे, नुसते एक यःकश्चित गाणे केल्याबद्दल एवढे इनाम?' दुसऱ्या एका प्रसंगी असे झाले की, कोणा काव्याची कोणी फार प्रशंसा केली असता एका तत्त्वज्ञाचा उद्गार निघाला, 'अं:– यात काय आहे? या काव्याच्या योगाने बाजारात दाणे स्वस्त झाले की काय हे मला सांगा!' असो, तर याप्रमाणे ज्यात आपल्याला गम्य नाही त्यात वेडेपणाने शिरले म्हणजे अशी विचित्र मते उत्पन्न होतात. यास्तव एखाद्या ग्रंथावर लेखणी उचलण्यापूर्वी टीकाकाराने याचा अगोदर नीट सुमार पाहावा की, मी हे काम हाती घेणार खरे, पण याशी सहृदयता पावण्याची माझी योग्यता आहे काय? नसली तर आंधळ्याने तजबिरीची परीक्षा करू गेल्यासारखे त्याचे मत वेडगळ ठरेल. या ठिकाणी कोणास असा भ्रम उत्पन्न होईल की, मनुष्याची विद्वत्ता मोठी असल्यावर त्यास हवे त्यावर मत देण्यास काय हरकत आहे? असो; तर एकंदरीत या सहृदयता–गुणाची नुसत्या विद्वत्तेहून फारच अधिक योग्यता आहे व म्हणून एखाद्या ग्रंथावरील अभिप्राय जरी मोठी विद्वत्ता खर्चून लिहिला असला तरी वरील गुणांच्या अभावी वरील मत केवळ कवडीचा माल होय.

आता जगात सामान्यतः जी ग्रंथादिकांवर टीका चालते ती कितपत योग्यतेची असते व कोणकोणत्या प्रकारची दृष्टीस पडते याविषयी थोडेसे निरूपण करणे अवश्य आहे. प्रथमतः लोकव्यवहारात हा प्रकार सहज ध्यानात येणारा आहे की, एकंदर लोकांची स्तुतीपेक्षा निंदेकडे फारच विशेष प्रवृत्ती असते. कोणी अमळ वर डोके काढले न काढले, कोणाची अमळ कोठे प्रशंसा झाली न झाली, की लोकांत ते साहेनासे होऊन लागलीच चोहोकडे त्याचे निंदक उभे राहतात. म्हणूनच पुष्कळ मोटमोठ्या ग्रंथकारांनी व विशेषतः बहुतेक सर्वांनी आपापल्या ग्रंथांच्या प्रस्तावनांतून खलांचे माहात्म्य वर्णिलेले आढळते. असो, तर यावरून स्पष्टच आहे की, टीकेचे सामान्य स्वरूप म्हटले म्हणजे मूळ ग्रंथाचे दूषण किंवा खंडन हेच होय. दुसऱ्याची स्तुती करण्याकरिता कोणी एखाद्या ग्रंथावर विवेचन केले आहे असे बहुधा काही आत मतलब असल्याविना झालेले सापडणार नाही. आता एकंदर सगळ्या लोकांचा दुसऱ्यास नावे ठेवण्याकडेच येवढा रोख का दिसून येतो याविषयी जर अमळ विचार केला तर त्याचे कारण स्वाभिमान हे तेव्हाच लक्षात येईल. ज्याच्या त्याच्या मते शहाणा काय

तो मी, माझेच सर्वांनी गुणवर्णन करावे, असेच बहुधा असते. यास्तव दुसऱ्याची जेवढी प्रशंसा झाली तेवढी आपल्यातून वजाच झाली असे मनाच्या कोतेपणामुळे त्यास वाटते. यामुळे दुसऱ्याच्या निंदेस जो तो बहुधा सतत टपलेला असतो. कित्येक जे खरोखरच बुद्धिमान व शहाणे म्हणून निवडलेले असतात त्यांची अशी समजूत असते की, दुसऱ्याच्या करण्यास आपण सर्वथैव चांगले म्हणून त्यात काहीच दोष काढला नाही, तर आपला थोरपणा तो काय राहिला ? स्वतःमुद्धा जी ग्रंथरचना हातून घडावयाची नाही, तिची परीक्षा करतानाही काही गुणांचा उल्लेख करून शेवटी काही ना काही तरी खरी किंवा खोटी कुलंगडी काढून स्तुती आणि निंदा शेवटी सरासरी समानच करून टाकतात ! हा प्रकार वरच्याहून पुष्कळ बरा, पण टीकाकाराच्या सत्यनिष्ठेस याचे योगाने कलंक लागतो हे उघड आहे. दुसरे कोणी असे असतात की, त्यास गुण व दोष दोन्ही दाखवावे लागतातच; पण दोषांवर पांडित्य करणे त्यांस जितके आवडते तितके गुणांचे विवरण करणे अगदी आवडत नाही. यास्तव गुणांचा उल्लेख सरासरी काही थोडासा करून दोषांवर ते यथास्थित घसरतात. हा प्रकार अर्थातच द्वेषबुद्धीशिवाय किंवा मत्सरी स्वभावाशिवाय घडत नाही. पण कसाही असला तरी सरळ स्वभावाच्या मनुष्यास तो खचीत पसंत पडणार नाही. कोणाच्या स्वभावात पक्षपातीपणाचे इतके प्राबल्य असते व प्रकृती इतकी हेकटपणाची असते की, त्यास एक गुण तर गुणच नाही तर दोष तर दोषच यांखेरीज काही -बिलकूल दिसत नसते. त्यांच्या आवडीचे किंवा त्यांच्या मतासारखे जे ग्रंथ असतील त्यांत त्यास सर्वच गुणमय दिसून दोषांचा लवलेशही सापडावयाचा नाही; आणि वरच्या उलट ठिकाणी सर्वच दोषरूप भासून गुणाचा लेशही सहन व्हावयाचा नाही. अशा टीकाकारांच्या ठायी अर्थातच दुराग्रह म्हणजे अगदी जागृत असतो; कारण कोणतीही वस्तू केवळ गुणमय किंवा केवळ दोषमय असावी, हे सृष्टिनियमासच मुळी विरुद्ध होय. तेव्हा अशा टीकाकर्त्यास सहजच सत्याचा उपमर्द करून गुणांस दोषांचे व दोषांस गुणांचे रूप देण्याची खटपट करावी लागते. असो; तर याप्रमाणे बहुधा ग्रंथावरील टीकांचे प्रकार अनेक दृष्टीस पडतात.

वर जे प्रकार सांगितले ते अहंकारादी दुष्ट मनोवृत्तींची फले असल्यामुळे अर्थातच थोडेबहुत सर्व दूषणार्हच होत. आता खऱ्या टीकाकर्त्याचे स्वरूप येथे थोडक्यात सांगतो. ज्या ग्रंथावर टीका करावयाची त्याचे पूर्ण ज्ञान व त्याशी

सहृदयता हे गुण त्याच्या अंगी अगोदर हवेत हें वर सांगण्यात आलेच आहे. पण याहून दुसरे जे गुण सांगितले ते तर टीकाकर्त्यास अधिकच आवश्यक होत. त्याच्या योगाने टीकेस खरी शोभा व खरी योग्यता येते व ती सर्वांस मान्य होते. फार तर काय, पण ग्रंथकर्ता जर समंजस असला तर तोही तीस मान डोलावल्यावाचून राहणार नाही. ही टीका म्हणजे अशी की, ती केवळ तिऱ्हाईत-पणे व निष्पक्षपातीपणाने केली असून केवळ सत्यनिरूपणाखेरीज तीत टीका-काराचा दुसरा बिलकुल काही एक उद्देश नाही, असे स्पष्ट दिसले पाहिजे. टीका-काराचे काम गुण व दोष दोन्हीही दाखविण्याचे आहे; यास्तव ते दोन्ही प्रगट करून त्यांचा उल्लेख कशाचीही लेशमात्रसुद्धा अत्युक्ती न करता त्याने केवळ प्रांजलपणे केलेला असावा. दोष दाखविताना मूळ ग्रंथकर्त्यावर शेखी मिरविण्याची आपली हौस आहे असे टीकाकर्त्याकडून जितके न दाखवेल तितके बरे; तसेच गुण दाखविताना तो त्याचा मित्र असल्यास त्याची फाजील प्रशंसा करणे हेही अगदी वाजवी नाही. तर जे दोष असतील ते उघड निर्भीडपणाने स्पष्ट बोलून जाऊन जे गुण असतील त्यांबद्दल ग्रंथकर्त्याची त्याने वाजवी रीतीची तारीफ करावी. असो; एकंदरीत ज्याप्रमाणे खरा न्यायाधीश शत्रुमित्रभाव विसरून जाऊन केवळ उदासीनपणे कैदीचा इन्साफ करतो किंवा खरा व्यापारी खऱ्या वजनांनी गिऱ्हाइकांच्या पदरात चोख माप घालतो; किंवा खरा उत्कृष्ट चितारी जसा मूळचा चेहरा असेल तसाच हुबेहूब तसबिरीत उतरून देतो; त्याप्रमाणेच ग्रंथावर टीका करणारा असावा.

⊙ ⊙

: ४ :

# व्यापारवृद्धि

गो. ग. आगरकर

आपल्या भाषेतील ‘ व्यापार ’ शब्द अत्यंत व्यापक आहे. शरीराच्या व मनाच्या कोणत्याही चलनावस्थेस व्यापार म्हणतात. ‘ व्यापारा ’च्या या मूळ अर्थापासून बाकीचे अर्थ निघालेले आहेत. सांप्रत निबंधावलीत त्याचा सार्वत्रिक अर्थ घेऊन तत्संबंधाने काही विचार वाचकांपुढे आणण्याचा इरादा आहे.

ज्यांनी सामाजिक स्थित्यंतरांचा लक्षपूर्वक विचार केलेला नसतो, त्यांस असे वाटत असते की, मृगयेवर चरितार्थ करून राहणारे रानटी लोक, पशुपालन किंवा कृषिकर्म करून राहणाऱ्या लोकांपेक्षा विशेष उद्योगी असतील. पण ही त्यांची चुकीची समजूत आहे. मांस, स्तन्य आणि धान्य ही मनुष्याच्या उपजीविकेची मुख्य साधने होत. यांपैकी कोणत्याही एकावर, दोहोवर किंवा साऱ्या तिहींवर मनुष्यास आपला चरितार्थ करता येतो. शिकार करणे, मेंढरे, गाई, ससे, कोंबडी, डुकरे वगैरे जनावरे पाळणे व दूधदुभते करणे, आणि जमीन तयार करून तीत धान्य, भाजीपाला व फळफळावळ उत्पन्न करणे—या तीन गोष्टींपैकी पहिलीपेक्षा दुसरीस व दुसरीपेक्षा तिसरीस, अधिक श्रम, अधिक आत्मसंयमन व अधिक दूरदृष्टी लागतात, हे सहज समजण्यासारखे आहे. तेव्हा ज्या लोकांत उपजीविकेची ही तिन्ही साधने अस्तित्वात आली असून त्यांची आवश्यकता पडू लागली असेल, ते लोक पहिल्या किंवा पहिल्या आणि दुसऱ्या साधनाने उपजीविका करणाऱ्या लोकांपेक्षा अधिक उद्योगी असले पाहिजेत, हे उघड आहे.

मनुष्याशिवाय इतर प्राण्यांपैकी काही केवळ उद्भिज्जाहारी व काही मांसोद्भिज्जाहारी असे आहेत. फक्त मनुष्यमात्र या तीन प्रकारांच्या आहारांपैकी पाहिजे तो आहार करून राहू शकतो. पण जसजशी त्याला उन्नतावस्था येत

जाते, तसतसा त्याचा मांसाहार कमी होत जाऊन उद्भिज्जाहार वाढू लागतो व शेवटी तो केवळ उद्भिज्जाहारी होईल किंवा होणे त्यास भाग पडेल, असे कित्येकांचे मत आहे. पण येथे आपणास त्याची चर्चा करीत बसण्याची गरज नाही. येथे इतकेच ध्यानात ठेविले पाहिजे की, मनुष्याशिवाय इतर प्राण्यांचे जे तीन वर्ग आहारभेदावरून केले आहेत, त्यांपैकी कोणत्याही प्राण्यास आपले भक्ष्य 'गोपालवृत्ती'चे किंवा 'कृषीवलवृत्ती'चे अवलंबन करून संपादिता येत नाही. अशा रीतीने आपला चरितार्थ करण्याची बुद्धी व सामर्थ्य फक्त मनुष्यातच आहे. मनुष्याशिवाय इतर प्राणिसंख्येची वृद्धी नैसर्गिक प्राण्युत्पत्तीवर व भूमिगत उद्भिज्जोत्पत्तीवर अवलंबून असते. ती कमी झाली की त्यांची संख्या कमी होते व अधिक झाली की अधिक होते. मनुष्याची तशी गोष्ट नाही. त्याच्या शरीराच्या व मनाच्या विशिष्ट रचनेमुळे त्याला आपल्या उपजीविकेस लागणाऱ्या वस्तू हव्या तितक्या उत्पन्न करता येतात. यामुळे मनुष्याची संख्या आणि त्यास लागणारे अन्न ही एकसारखी वाढत आहेत.

मनुष्यांत व इतर प्राण्यांत दुसरा आणखी एक भेद आहे तो हा की, मनुष्यांची उपभोगेच्छा इतर प्राण्यांच्या उपभोगेच्छेसारखी मर्यादित नाही. इतर प्राण्यांस उदरपोषण आणि सजातिवर्धन याशिवाय इतर सुखांची कल्पनाही नसते, असे म्हणण्यास हरकत नाही. यामुळे त्यांच्या दोन क्षुधांचे समाधान होत असले म्हणजे ते सुखी असतात. मनुष्यांची तशी गोष्ट नाही. इतरांप्रमाणे ह्या दोन क्षुधांची पीडा त्यांच्या पाठीमागे लागली असून, शिवाय त्यांस अनेक प्रकारचे मानसिक व शारीरिक उपभोग घेता येण्यासारखी मने व शरीरे प्राप्त झाली आहेत; व या अनेकविध उपभोगांकडे त्यांची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. हे अनेक उपभोग घेण्याचे त्यांच्या अंगी जे सामर्थ्य आहे त्यामुळे ते इतर प्राण्यांपेक्षा अधिक सुखी आहेत किंवा नाहीत हा वादग्रस्त प्रश्न आहे व याचे समाधानकारक उत्तर देता येईल असेही वाटत नाही. थोड्या वासना आणि थोडी तृप्ती व पुष्कळ वासना आणि पुष्कळ तृप्ती – या दोन स्थितींपैकी इष्टतर कोणती, याचा निर्णय करण्यास कोण समर्थ होणार आहे? या वादात समंजस मनुष्याने कधीही पडू नये. मनुष्यास विचार करता येऊ लागल्यापासून, काही पहिला व काही दुसरा पक्ष घेऊन भांडत आहेत, व तदनुरोधाने प्रवृत्ती व निवृत्ती असे दोन विचार व आचारपंथ झाले आहेत. फल-

मूलाशन करून राहावे, पूर्ण वैराग्याचे अवलंबन करावे, पर्वतांच्या गुहांत वास करावा, आणि संसाराच्या भानगडीत पडू नये, असे निवृत्तिपंथाचे प्रचारक आज शेकडो वर्षें सांगत असता, व बऱ्याच अंशी वागून दाखवीत असता, प्रवृत्तिमार्गाकडे जग अधिकाधिक जात चालले आहे. तेव्हा सामान्य विचाराअंती असे दिसून येईल की, अनेक उपभोग भोगल्यापासून मनुष्य इतर प्राण्यांपेक्षा अधिक सुखी होवो किंवा न होवो, त्या गोष्टीचा निर्णय करण्याच्या भरीस मुळीच न पडता अनेक उपभोगांची वांच्छा करावी, ते प्राप्त होण्यासाठी रात्रंदिवस झटावे, आणि त्यापासून होईल तितके सुख करून घ्यावे, असा मनुष्याचा सामान्य स्वभाव आहे, व याच स्वभावामुळे मनुष्यांच्या व इतर प्राण्यांच्या वर्तनात इतके अंतर पडले आहे.

मनुष्याच्या आहारवस्तू कष्टसाध्य आहेत व त्यांची उपभोगेच्छा अमर्याद आहे, येवढ्या दोन गोष्टी स्पष्टपणे ध्यानात आल्या म्हणजे त्यास इतर प्राण्यांपेक्षा शेकडोपट अधिक उद्योग का केला पाहिजे, हे सहज समजणार आहे. हे ज्यास पक्के समजून येईल तो सहसा निरुद्योगी होणार नाही. याशिवाय निरुद्योगी लोकांस उद्योगी लोकांच्या वश होऊन किती त्रास सोसावा लागतो, हे ज्यास कळले असेल तो तर स्वतः उद्योगी होईल इतकेच नाही, तर इतरांसही उद्योग करण्यास प्रवृत्त करील. विशेष उद्योगी मनुष्यांचे सान्निध्य नसल्यास सामान्य उद्योग करून आयुष्य घालविणे शक्य आहे. पण कोणत्याही कारणाने उद्योगी मनुष्याशी गाठ पडल्यास, एक तर त्याच्याप्रमाणे उद्योग करण्यास, किंवा त्याच्या अधीन होऊन तो ठेवील त्या स्थितीत राहण्यास, तयार झाले पाहिजे. सध्या आम्हा निरुद्योगी हिंदू लोकांची उद्योगी इंग्रज लोकांशी गाठ पडली आहे. तेव्हा एक तर आम्ही त्यांच्यासारखा उद्योग करण्यास राजी झाले पाहिजे, किंवा ते ज्या स्थितीत ठेवतील त्या स्थितीत राहण्यास सिद्ध असले पाहिजे. आमचे भावी स्वातंत्र्य, अथवा आमचे निरंतर दास्य, सर्वथैव आमच्या उद्योगावर अवलंबून आहे.

मनुष्यांच्या उद्योगाचे किंवा प्रवृत्तिप्रणीत मानसिक व शारीरिक चलनावस्थेचे दोन भेद आहेत. एक नियामक दुसरा उत्पादक. नियामक उद्योग म्हणजे ज्या उद्योगामुळे मनुष्यास आपल्या समाजात व्यवस्था ठेवता येते. राजे, मंत्री लष्करी शिपाई, न्यायाधीश, पोलीस, सामान्य नीतिशिक्षक वगैरे लोकांचा उद्योग पहिल्या प्रकारचा आहे; म्हणजे हे समाजयंत्राचे फक्त चालक किंवा व्यवस्थापक आहेत.

शेतकरी, कोष्टी, सुतार, गवंडी वगैरे सर्व प्रकारचे कारागीर व धंदेवाले लोक दुसऱ्या वर्गात येतात, म्हणजे त्यांचा उद्योग उत्पादक आहे. सुधारलेल्या राष्ट्रातील काही लोक पहिल्या प्रकारचा, काही दुसऱ्या प्रकारचा, व काही दोन्ही प्रकारचे उद्योग करीत असतात. देशाच्या विशिष्ट स्थितीप्रमाणे या निरनिराळ्या वर्गांतील लोकांचे प्रमाण कमी अधिक होत असते. केवळ नियामक उद्योग करणारांची संख्या अगदी स्वल्प असून, थोडासा नियामक व पुष्कळसा उत्पादक उद्योग करणारांची मोठी संख्या ज्या देशात असते तो विशेष सुखी असतो. अमेरिकेत सध्या अशी स्थिती आहे. त्यामुळे तेथील लोक इतर देशांतील लोकांपेक्षा प्रत्येक बाबतीत फार पुढे सरसावले आहेत. अमेरिकन लोकांस उत्पादक उद्योग करण्याचे जणू काय वेड लागून गेले आहे, व त्यामुळे संयुक्त संस्थाने इंद्रलोकतुल्य होऊन गेली आहेत. या संस्थानांच्या खालोखाल इंग्लण्ड व फ्रान्स हे देश आहेत. सगळ्याच देशांतील लोकांस सारखा उद्योग करण्याची स्वाभाविक व कृत्रिम साधने असतील, व साऱ्यांस सारखे वैभव प्राप्त करून घेता येईल, असे आमचे म्हणणे नाही. तथापि एक गोष्ट आम्हांस पक्की ठाऊक आहे की, कोणत्याही देशातील लोकांस प्राप्त होण्यासारखे जे सुख असेल ते त्यांना वर सांगितलेल्या पद्धतीने उद्योग केल्याशिवाय कधीही प्राप्त होणार नाही. ज्या लोकांस उत्पादक उद्योगाचा कंटाळा, व काही हौस असली तर नियामक उद्योगाची, असे लोक मोठेपणास कधीही चढणार नाहीत. पण सध्या तर आमची तशी स्थिती होऊन गेली आहे. ज्याला त्याला अंमलदार व्हायला पाहिजे. सगळ्यांनीच अंमलदार होऊन चैन करण्याची इच्छा धरल्यावर चैनीचे पदार्थ तरी उत्पन्न करणार कोण? उत्पादक उद्योग करण्याची हौस सार्वत्रिक होऊन संपत्ती व व्यापार वाढल्याशिवाय सर्वांस चैन तरी कोठून करता येणार? अंमलदार मुळीच नकोत असे आमचे म्हणणे नाही. पण शेरभर मसाला आणि मूठभर तांदूळ अशी स्थिती काय कामाची? १७८९ साली फ्रान्स देशात जी मोठी राज्यक्रान्ती झाली तिच्या अनेक कारणांपैकी फाजील अंमलदार हे एक मुख्य कारण होते. जिकडे तिकडे अंमलदारांचा सुळसुळाट होऊन गेल्यामुळे देशातील वार्षिक संपत्तीचे उत्पन्न अगदी संपुष्टात आले होते; इतकेच नाही, तर जे थोडे उत्पादक लोक काबाडकष्ट करून थोडीबहुत संपत्ती उत्पन्न करीत, त्यावर पराकाष्ठेचा जुलूम होऊ लागला होता. अंमलदार वाजवीपेक्षा अधिक झाल्याने उत्पादक रयतेचे दोन

प्रकारांनी नुकसान होते. एक, त्यांच्या पगारासाठी तिला आपल्या प्राप्तीचा बराच वाटा द्यावा लागतो. दुसरे, त्यांच्या जुलमामुळे केलेले उत्पन्न आपल्या हाती लागेल किंवा नाही, अशाविषयी तिला संशय येऊ लागतो. या दोन कारणांमुळे उत्पन्न करण्याची इच्छा मंदावते, आणि तसे झाले म्हणजे सर्वांचेच नुकसान होते. हाच परिणाम सरकारी अंमलदारांशिवाय इतर प्रकारचे अनुत्पादक लोक वाढल्यानेही होतो. फाजील धर्माधिकारी, फाजील नीतिप्रसारक, फाजील शिक्षक, फाजील अडते, फाजील लेखक ( पत्रकर्ते, पुस्तककर्ते वगैरे ), फाजील वकील, फाजील राजकारस्थानी या सर्वांच्या फाजीलपणात, म्हणजे त्यांची वाजवीपेक्षा जास्त संख्या होण्यात, कष्टाळू रयतेचा फार तोटा आहे. अशा प्रकारचे लोक मुळीच नसावेत, असे आमचे म्हणणे नाही. तसे झाल्यास समाज मुळीच सुरळीत चालावयाचा नाही. पण त्यांचे कमीपण त्याला जितके विघातक आहे तितके त्यांचे अधिकपणही विघातक आहे. आमच्या इकडील अलीकडच्या सुशिक्षित लोकांनी सरकारी नोकरीवर सगळा जीव ठेविल्यामुळे आपली किंमत किती कमी करून घेतली आहे बरे ? हाडांची काडे करून, व शेकडो रुपये खर्च करून, बी. ए. पर्यंत अभ्यास करावा, आणि पुढे फळ काय ? तर रेव्हिन्यू खात्यात, किंवा शाळाखात्यात, ३०-३५ रुपये दरमहाची नोकरी ! चांगला सुतारसुद्धा तुमच्या शाळेचा उंबरठा न चढता २५-३० रुपये सहज मिळवितो, हे या ग्राजुएटास समजू नये काय ? तसच कोठे १०-१२ रुपयांची जागा रिकामी झाली की, तीबद्दल शेपन्नास मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या उमेदवारांचे अर्ज ! धिक् तुमची विद्या आणि तुमचे कर्तृत्व ! कष्टाने संपादिलेल्या विद्येचा असा सवंग विक्रय करावयाचा काय ? विद्यार्जनाने विकसित झालेली मने स्वतंत्र धंदे स्थापण्याकडे लावाल तर तुम्हास अन्नाची किंवा मानाची काय वाण पडणार आहे ? पण खांदा देऊन काम करण्याची व दुसऱ्याचे गुलाम न होता स्वतःच्या करामतीवर चरितार्थ संपादण्याची धमक आता कोठे राहिली आहे ?

◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......................... वि: ..................
क्रमांक .......................... नों दि ..................

: ५ :

# परदुःख शीतळ

अण्णासाहेब किर्लोस्कर

( पडद्यात ) अग ए कुसुमावती, लवकर दार उघड.

**कुसुमा०**—कोण ही? सारंगनयना हाका मारते आहे वाटते.

**सुभद्रा**—कशाला मेली ओरडत आली कोण जाणे! सखे, पाहा जा बरे.

[ कुसुमावती जाते व सारंगनयनेसह पुनः प्रवेश करते ]

**सुभद्रा**—( सारंगनयनेस ) कायग, तुला माझ्या अंग धुण्याची तयारी करून ठेवायला सांगितले होते, मग इकडे कशाला आलीस?

**सारंग०**—हो; मी तयारी करून वाट पाहात बसले होते; पण धाकट्या वहिनीसाहेबांनी आपणांस लवकर अंग धुण्यास घालून वृंदावनाच्या चौकात घेऊन यायला सांगितले, म्हणून मी गडबडीने कळवायला आले.

**सुभद्रा**—कोणी? रुक्मिणीवहिनीने का?

**सारंग०**—हो, अगदी लवकर यायला सांगितले आहे.

**सुभद्रा**—अहाहा! आज किती दिवसांनी माझी आठवण झाली तरी वहिनीला ही!! बरे, चला तर. ( सर्व उठतात. )

**कुसुमा०**—कायग, सारंगनयने, धाकट्या बाईसाहेबांचे अंगधुणे झाले?

**सारंग०**—अग केव्हाच झाले. त्या आता वृन्दावनाच्या चौकात पूजेला बसल्या आहेत व तेथेच ताईसाहेबांना घेऊन यायला सांगितले आहे.

**सुभद्रा**—कायग, इतक्या गडबडीने मला बोलावू पाठविण्याचे काय कारण असेल बरे? तुला काही कळले आहे का?

**सारंग०**—त्यांनी काही मला सांगितले नाही; पण थोरल्या सरकारांनी मोठ्या समारंभाने वाड्यात एक स्वामी आज भोजनास आणले आहेत, त्यांच्या दर्शनाला जाण्याकरिता असेल असे मला वाटते.

**सुभद्रा**—हे कशावरून तू म्हणतेस !

**सारंग**—अष्टनायिका व सर्व यादवस्त्रिया, यांनी यतिमहाराजांच्या दर्शनाला सोवळ्याने यावे, अशी वर्दी देण्याकरिता आपल्या हाताखालच्या चोपदारांस आपले वृद्ध कंचुकी सांगत होते, ते मी ऐकले त्यावरून म्हणते.

**सुभद्रा**—असो; काही का असेना, गेले पाहिजे खरे. चल लवकर, मला अंग धुवायला घाल. अग कुसुमावती, माझे सोवळे व पेला घेऊन तिकडे ये.

[ सुभद्रा व सारंगनयना जातात. ]

**कुसुमा०**—धाकट्या वहिनीसाहेबांकडून बोलावणे आले हे फार चांगले झाले; नाही तर ताईसाहेबांचा शोक आणखी किती वाढला असता, हे काही माझ्याने सांगवत नाही. ( पडद्याकडे पाहून ) अगबाई ! ह्या पाहा धाकट्या वहिनी-साहेब तर पूजेला येऊन बसल्या. आता लवकर ताईसाहेबांना घेऊन गेले पाहिजे. ( निघून जाते. )

[ तदनंतर तुळशीची पूजा चालली आहे, व जवळ परिचारक उभे आहेत, अशी आसनस्थ रुक्मिणी प्रवेश करते. ]

**रुक्मिणी**—( पूजा संपवून ) अरे अशोका, माझी जपाची माळ दे.

[ परिचारक माळ देतो ती ओटीत घेऊन जप करीत बसते. ]

[ तदनंतर सोवळ्याने विदूषक येतो, आचमन करतो व शेंडी पुसतो. ]

**रुक्मिणी**—( जप संपवून प्रदक्षिणेस उठते व विदूषकास पाहून ) आज स्नान इकडेच झाले वाटते ?

**विदू०**—हो, आज स्वामीमहाराजांचा प्रसाद घेण्याला इकडेच आलो आहे.

**रुक्मिणी**—परवा भावोजींनी इतकी शोभा केली तरी अजून उशिरा स्नान करण्याची संवय गेली नाहीसे दिसते.

**विदू०**—माझे प्रातःस्नान झाले होते; पण इकडे येताना वाटेत कुतऱ्याच्या शेपटीवर पाय पडला त्यामुळे पुनः स्नान करावे लागले.

**रुक्मिणी**—असे असे. आताशा सोवळे बरेच माजले आहे तर? बरे तिकडले कोठपर्यंत आले आहे?

**विदू०**—स्वामिमहाराजांचे स्नान–आन्हिक आटपले. आता सर्व यादव-स्त्रियांची दर्शने चालली आहेत. तुम्हांला काय सांगू वहिनी, या इतक्या स्त्रियांच्या नमस्काराला " नारायण ", " नारायण " म्हणता म्हणता यतिमहाराजांचे डोळे पांढरे होतील असे वाटते.

**रुक्मिणी**—बरे तिकडील गर्दी आटपली म्हणजे मी व वन्से दर्शनाला येतो.

**विदू०**--ठीक आहे. ( असे म्हणून जाऊ लागतो )

**रुक्मिणी**—भटजी, ही दक्षणा घेऊन चला. ( परिचारकास ) अरे, तो विडा व दक्षिणा त्यांना दे. ( परिचारक तसे करतो. )

**विदू०**—कोण? ताईसाहेब ना? ह्या पाहा आल्याच. (असे म्हणून निघून जातो.)
[ तदनंतर कुसुमावतीदासीसह सुभद्रा सोवळ्याने प्रवेश करते. ]

**रुक्मिणी**—( सुभद्रेजवळ जाऊन ) वन्से, माझ्या निरोपासरशा अंग धुवून आलात हे माझे मोठे भाग्यच समजायचे; नाही तर काय विचारता? नाही माझी अंग धुण्याची तब्बेत लागत, धुवीन मी हवी तेव्हा, असे सांगून धाडले असते तर मी काय करणार होते?

**सुभद्रा**--वहिनी, सगळ्यांनीच माझ्यावर शस्त्र उपसले आहे तेव्हा तू तरी का कमी करशील! चालू दे! मी आता दगडापेक्षा देखील घट्ट झाले आहे!!

**रुक्मिणी**—( सुभद्रेचा हात धरून ) बरे, या इकडे बसा आधी. ( तिला जवळ घेऊन बसते. पाठीवरून हात फिरवून तोंडाकडे पाहून ) ही पाहिली दोन दिवसांत काय दशा होऊन गेली ती. वेळेवर अन्न खायचे नाही, झोप घ्यायची नाही, जेव्हा तेव्हा उगीच संताप करून घ्यायचा, अशाने प्रकृती कशी बरे नीट होईल?

**सुभद्रा**—हो, हो, माझा समाचार घेता घेता तुला फार श्रम पडले बरे वहिनी! अग, माझ्यावर प्रसंग गुदरल्यावेळी फुकाचे दोन शब्द तरी येऊन बोलायचे होतेस?

**रुक्मिणी**—हे पाहा वन्से, तुम्ही ऐन लग्नाच्या वेळेस नाहीशा झाला असे ऐकले आणि जे मला झालं ते काही सांगवत नाही. मला बसलेली जागा सोडून

काही उठवेना व शब्दही माझ्या तोंडातून निघेना. मनात भलभलत्या कल्पना येऊ लागल्या. काय सांगू तुम्हांला, तशी वेळ वैऱ्यालाही येऊ नये. इतक्यात पुनः तुम्ही मंदिरात आहात, अशी वार्ता ऐकताच मी तशीच धावत तुमच्याकडे यायला निघाले; पण गर्गगुरूंची सगळ्यांना अशी ताकीद झाली की, पुरुषांनी-देखील तिकडे जाऊ नये; फक्त तुमच्या दासींनी मात्र तुमच्याजवळ असावे. एक-दोन दिवस जाऊन तुमची प्रकृती अम्मळ ताळ्यावर आली, म्हणजे मग तुम्हांला भेटावे, म्हणूनच बरे वन्से तुम्हांला भेटल्यावाचून राहिले मी.

**सुभद्रा**—वहिनी, तू किती जरी साधून घेतलेस तरी मी खरे सांगते की, तुझी पहिल्याप्रमाणे माझ्यावर ममता नाही.

**रुक्मिणी**—हे कशावरून म्हणता तुम्ही ?

**सुभद्रा**—अग तुझी तशी ममता असती, तर तू माझी इतकी विटंबना चालली असता, डोळ्यांवर कातडे ओढून बसली नसतीस.

**रुक्मिणी**—वन्से, आता बोलले तर तुम्हांला खंडीभर रागमात्र येईल. मला सांगा, काय तुमची विटंबना चालली आहे ! तुम्ही होऊन विनाकारण आपल्या जिवाला संताप करून घेता.

**सुभद्रा**—मला ज्या गोष्टीचा मनापासून तिटकारा आहे, ती गोष्ट तुम्ही जबरदस्तीने माझ्याकडून करवायला लागला, तर ती विटंबना नव्हे का ?

**रुक्मिणी**—हं हं, आता आले ध्यानात. भावोजींनी इतके सायास करून दुर्योधनाला देण्याचे ठरविले ते काय तुमच्या अकल्याणाकरिता ? अहो, त्यांच्या-सारखा वर आज सगळ्या पृथ्वीत तरी मिळेल का ? केवढी राजसत्ता ! किती ऐश्वर्य ! इतके असून, बरे सौंदर्यात तरी कमतरता आहे ? तीही नाही, फार काय सांगू, उद्या तुम्ही त्यांची पट्टराणी झाला, म्हणजे आम्हांलादेखील तुमच्यापुढे मान लववावी लागणार आहे; समजलात ?

**सुभद्रा**—पुरे पुरे वर्णन. नवराबायकोंनी जसा काय एकच कित्ता गिरविला आहे. वहिनी, तो इंद्रापेक्षा देखील भाग्यवान असला तरी, मला नको असल्यावर, तेथे आग्रहाने मला देऊन, माझ्या जन्माची माती का करता ?

**रुक्मिणी**—छे छे, असे बोलू नये. असले भाषण आम्हां बायकांना शोभत नाही.

**सुभद्रा**—परदुःख शीतळ आहेग वहिनी. आता मी बोलले तर दुसऱ्यांची वर्मे काढता, असे म्हणशील.

**रुक्मिणी**—काही नाही. काय बोलायचे असेल ते खुशाल बोला.

**सुभद्रा**—बरे तर वहिनी, तुझ्या भावाने तुला शिशुपालराजाला देऊ केली होती. तो काय रूपाने, पराक्रमाने किंवा ऐश्वर्याने कमी होता, म्हणून तू चोरून ब्राह्मणाबरोबर पत्र पाठवून, कृष्णाला वरलेस ते का बरे? याचे समर्पक उत्तर दे म्हणजे मी तुमचे सगळे ऐकते.

**रुक्मिणी**—( काही उत्तर न देता मान खाली घालून बसते. )

**सुभद्रा**—( तिला हाताने हलवून ) अहो वहिनीसाहेब, बोला, आणखी काही उपदेश करा.

**रुक्मिणी**—वन्से, तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे; परंतु तुमच्या मनाप्रमाणे माझ्याकडून काही होण्याजोगे नाही, म्हणून मी इतके आढेवेढे घेऊन बोलत होते.

**सुभद्रा**—हे बघ वहिनी, तू मनावर घेऊन कृष्णाच्या मनात चांगले भरवून दिलेस म्हणजे पुरे आहे. तो मग हव्या त्या रीतीने माझ्या मनासारखे करील.

**रुक्मिणी**—मी ही गोष्ट तिकडे काढली नाही, असे समजता की काय तुम्ही? मी याविषयी बोलले की, एकेक डोळा एवढाला करायचा; मग मी बाई भिऊन जाते. काय करावे बरे?

**सुभद्रा**—काय हवे ते कर; पण मी जिवंत राहावे असे जर तुझ्या मनात असेल, तर हरतऱ्हेने कृष्णाचे मन वळवून त्याच्याकडून वचन घे; आणि तसे तुझ्या मनातून नसले तर आताच सांग, उगीच आशा लावून फसवू नको.

**रुक्मिणी**—( सुभद्रेस पोटाशी धरून ) वन्से, तुमचे दुःख पाहून माझे काळीज की नाही तिळतिळ तुटते; पण मी वर दाखविले नाही. असो; आता तुझी अगदी स्वस्थ राहा. माझ्याकडून होईल तितके मी करीन बरे.

[ गडबडीने विदूषक येतो. ]

**विदू०**—हं, वहिनी, आक्का, चला लवकर. यतिमहाराज पाटावर बसले. दादासाहेबांनी सांगितले आहे की, हस्तोदक आक्कासाहेबांनीच घातले पाहिजे.

**रुक्मिणी**—ठीक आहे. वन्से, चला स्वामी महाराजांचे दर्शन घ्यायला.

[ असे म्हणून सर्व जातात. ]

० ०

: ६ :

# समर्थांकडे जाताना

ह. ना. आपटे

ज्या वस्तूच्या लाभाची अतोनात वांच्छा धरावी, मात्र ती वस्तू लाभू नये, परंतु तिचे महत्त्व मात्र घटकोघटकी अधिकाधिक नजरेस यावे, अशा स्थितीत त्या वस्तूच्या लाभाबद्दल किती औत्सुक्य उत्पन्न होते याचा अनुभव प्रत्येक मनुष्यास आहेच आहे. राजांची अवस्था अशीच झालेली होती. समर्थांच्या धर्मनिष्ठेबद्दल, पुण्य प्रतापाबद्दल, निर्लोभतेबद्दल त्यांनी अनेकवार ऐकले, त्यांच्या शिष्याचा सहवास घडल्याकारणाने तर त्यांस ते गुण प्रत्यक्ष दृष्टीस पडले, परंतु मुख्य गुरूंच्या दर्शनासाठी कितीही प्रयत्न केले तरी सफल झाले नाहीत; श्रीधरस्वामींनी त्यांस वारंवार समर्थांचे श्लोक व समर्थांच्या ओव्या म्हणून दाखवाव्या; त्यातील तो गंभीर अर्थ व स्वधर्माभिमान कानी पडून मनी उतरला म्हणजे राजे तल्लीन होऊन त्यांस समर्थांच्या दर्शनाची अधिकच उत्सुकता व्हावी. विजापुरास तानाजी वगैरेंना जाऊन किती तरी दिवस झाले, परंतु अद्यापि त्यांचेकडील काहीच वार्ता नाही हे पाहून उद्विग्न होऊन तिकडे जाण्यास उद्युक्त झालेल्या राजांना आता इकडे परळीकडे एकवार जाऊन येण्याची गोष्ट काढली असता बरे वाटणार आहे, असे वाटून स्वामींनी तिकडच्या गोष्टी काढल्या. कसेही करून समर्थांचे प्रत्यक्ष दर्शन मला करवा, असा राजांचा एकसारखा नाद आज कित्येक दिवसपर्यंत चाललाच होता व प्रत्येक वेळी स्वामींचे त्यांना असे सांगणे होते की, समर्थांचे दर्शन रिक्त हस्ताने घेणे योग्य नाही, त्यांना पैशाअडक्याची मुळीसुद्धा जरूर नाही, पण आपण एखादा प्रांत अगर किल्ला सर करून घेऊन तो जर त्यांना प्रथम भेटीची गुरुदक्षिणा दिली तर त्यांचे दर्शन घेण्यास गेल्याचे सार्थक होणार आहे, तेव्हा तसे करीपर्यंत आपण दर्शन घेण्याची खटपट करण्यात काही तात्पर्य नाही. राजांच्याही मनात ही गोष्ट होतीच, परंतु

अद्यापि काही किल्ला अगर एखादा प्रांत मुसलमानांच्या हातून हिरावून घेण्याइतकी अंतर्बाह्य तयारी झाली नव्हती. असा प्रकार चालला असता आतापर्यंत सांगितलेल्या काळापर्यंतची कथा आली. विजापुरास याने स्वतः जाणे अगदी अकारण व धोक्याचे अशी श्रीधरस्वामींची तर पक्की खात्री आणि राजांचा तर एकसारखा निदिध्यास आपल्या मित्राचे काय झाले ते पाहण्यास स्वतः जाण्याचा. तेव्हा आता चित्तवृत्ती दुसरीकडे आणि तीही चांगल्या प्रकाराने आकर्षण होईल अशा कोणा व्यक्तीकडे ओढून घेतल्याखेरीज हा त्यांचा नाद सुटावयाचा नाही असा पक्का विचार करून त्यांनी समर्थांचे दर्शन घडल्यास घडवतो, सध्या घडण्याचा प्रसंग आहे असे बोलणे काढले, इतकेच नव्हे, तर घडले तर याच प्रसंगी घडण्याचा संभव आहे असेही सुचविले. समर्थांचे दर्शन होण्याचा संभव, निदान त्यांच्या निवासाने पवित्र झालेल्या रमणीय प्रदेशाचे दर्शन होण्याचा संभव, ऐकून राजास मोठा आनंद झाला. समर्थांचे शिष्य श्रीधरस्वामी आपल्याबरोबर प्रत्यक्ष असता तर ते खास होईलच असा साहजिकच राजांच्या मनात आशांकुर उत्पन्न झाला. तथापि आपण विजापुरास जाऊ जाऊ म्हणून हट्ट धरून होतो, म्हणून स्वामींनी उगीच तर काही हे काढले नसेलना, असे त्यांच्या धूर्त मनात आले नाही असे नाही. हसत हसत त्यांनी तसे बोलूनही दाखविले आणि स्वामींनीही तत्काळ त्यांस सांगितले, " राजे, तुम्ही विजापुराला जाऊ नये हाच माझ्या मनाचा हेतू खरा. तुमच्या हातून किती तरी महत्त्वाची कार्ये होणार आहेत. मी केवळ कारणमात्र आहे. समर्थांनी दिव्य दृष्टीनेच आपल्याला ध्यानी आणून ठेविले आहे. तेव्हा आपण आपला जीव धोक्यात घालणे म्हणजे केवळ या सर्व आशा विफल करून टाकण्यासारखे आहे. समर्थांची तपश्चर्या चालली आहे ती स्वतःला काही पुण्यबळ मिळवावे म्हणून नव्हे, तर त्या पुण्यबळाचा उपयोग आपल्या हातून मोठमोठाले दिग्विजय होऊन मराठा तेवढा सगळा एक व्हावा, मराठी राज्य म्हणून काही स्थापन व्हावे असा त्यांचा हेतू आहे. हा त्यांचा हेतू साध्य करणे सर्वस्वी तुमच्या स्वाधीन आहे. तपश्चर्या किती कठोर आहे हे पाहण्याची इच्छा आपल्यास आहे, ती आताच पुरी केली असता आपणांस बरे वाटून आपल्या स्वतःच्या हातून केवढे पराक्रम होण्याजोगे आहेत हे कळून येणार आहे, म्हणून मी आपणांस या प्रसंगी तिकडे चलण्याविषयी म्हणतो आहे. या प्रसंगी आपली व समर्थांची प्रत्यक्ष भेट जरी न झाली तरी आपल्यास त्यांचे दर्शन खास करवितो. "

स्वामींनी इतके सरळपणाने सांगितल्यावर राजांसही ते त्यांचे बोलणे सयुक्तिक वाटून त्यांनी विजापुरास न जाता समर्थांच्या दर्शनाचा लाभ झाल्यास पाहावे म्हणून ते दोघेही निघाले. आपण कोणीकडे जातो हे कोणासही या प्रसंगी कळू न देण्याबद्दल त्यांनी खबरदारी घेतली. नेहमीप्रमाणे त्या दऱ्याखोऱ्यांतून पहारा असावयाचा तसा होता. अगदी दरीच्या तोंडाशी व देवळाच्या तोंडाशी ज्यांचा पहारा असावयाचा त्यांस मात्र स्वामी व राजे कोणीकडे गेले आहेत हे ठाऊक होते. बाकी मंडळीस स्वामींची पक्की स्थिती माहिती होती. ते कित्येक दिवसपर्यंत त्या भुयारातून बाहेर येतही नसत. आपल्या एका टाक्यावरच स्नान वगैरे विधी करून समाधी लावून बसत असत. त्याप्रमाणेच हल्लीही स्थिती असेल, असे अगदी बाहेर बाहेरच्या व पागेकडल्या पहारेकऱ्यांस वाटले होते. शिवाजीराजे तर काय ? अलीकडे अलीकडे महिना महिना पंधरा पंधरा दिवस कोठे तरी नाहीसे होऊन एकदम कोठून तरी पुनः येत, तळ कोकणात अगर दुसऱ्या कोठे लुटालूट करण्यास स्वारी गेली म्हणजे घरच्या मंडळीला किंवा कोणालाही काही समजत नसे. तशाच प्रकारे आताही कोठे गेले असतील असे कित्येकांस वाटे. जे वाडयात नौकर असत अगर वाडयातून खऱ्या खोट्या बातम्या लागण्याचा ज्यांना संभव असे ते लोक मात्र काही कंड्या पिकवीत. ते कसेही असो, परंतु सध्या स्वामी भुयारातल्या देवळात नसून राजे व ते दोघेही बरोबर गेले आहेत अशी बातमी निवडक असामींखेरीज बाकीच्यांस नव्हती. तानाजीस कळली, ती अर्थातच त्यांच्या निवडक असामींकडून.

इकडे स्वामी व राजे यांनी आपला गुप्त पोशाख करून घोड्यावर स्वार होऊन समर्थांकडचा मार्ग धरला. स्वामी घोड्यावर बसणारा मोठा हुषार होता, परंतु गोसाव्याच्या जातीला भाडोत्री घोड्याखेरीज दुसऱ्या घोड्यावर बसण्याची सवय कोठली ? अशी बतावणी करण्याचे त्यांनी आरंभिले आणि शिवाजीराजांनी आपण कोण व एकटेच कोणीकडे चाललो हे कोणास न कळेल असाच थाट केला होता. वाटेने जाताना आपल्या हिंदू प्रजेची किती वाईट स्थिती आहे, तिला पुनः पूर्व-स्थितीवर आणण्याला काय काय उपाय योजावे, आणखी ते योजण्यात पुष्कळ पैसा लागेल तो कसा जमवावा. मुसलमानी राज्य आज काही नाही तरी दोनतीनशे वर्षे दक्षिणप्रांती बळावत चालले आहे, आणि इतका छळ होत असूनही लोकांना तेच बरे वाटत आहे. कोणी तरुण मंडळी मिळाली तर मिळेल, नाही तर आपल्या

गरीबगुरीब लोकांवरच आपली भिस्त ठेवून आपणास कार्यभाग करून घेण्याची पाळी येईल; त्रास होतो, हा गरीबगुरिबांना जास्त होतो. मोठमोठ्या सरदारांपैकी एकाला झाला, तर इतरांना चांगला अनुभव येतो. शिवाय सगळ्या सरदारांत आपापसात तंटेबखेडे आणखी मत्सर असून दुसऱ्यावर प्रसंग आला, तरी बाकी-च्यांस काही वाटेनासे झाले आहे. आपली व आपल्या वंशातल्या लोकांची दरबारी बडेजाव कशी होईल इकडे त्यांचे सारे लक्ष असल्यामुळे कोणी कोणास मदत करील, किंवा सगळे मिळून मराठी राज्यस्थापना होईल असे काही करतील हा संभव दिसत नव्हता; जर आपल्यासारख्यांनी त्यांच्या मदतीची पर्वा न करिता काही आपणच करून दाखविले, व आपण खरोखर काही पराक्रम करीत आहो, आपल्याला यश येत आहे, आणखी बादशहाप्रमाणे आपणही दरबार थाटवून कोणाला जहागिरी, कोणाला इनामे देऊ शकतो असे दिसू लागले, तर आपल्याकडे हे सरदार कदाचित येऊ लागतील, नाही तर आपल्याला आपले सरदार निराळे करावे लागणार, हे सर्व त्यांच्या बोलण्यात आले. स्वामींनी आपला कित्येक वर्षांचा अनुभव याप्रसंगी शिवाजीराजांस सांगितला. श्रीधर-स्वामींची व राजांची गाठ पडून व परिचय होऊन आज इतके दिवस झाले, परंतु स्वामींचे आज जितके मन खुले करून बोलणे झाले इतके कधी झाले नव्हते. आज स्वामी अगदी आनंदात आले असून फारच मन मोकळे करून बोलत होते. आपण आजपर्यंत कोणकोणत्या प्रांतातून कसेकसे हिंडलो, कोणकोणते लोक पाहिले, त्यांच्याशी या बाबतीत कसकशा गोष्टी काढल्या आणि प्रत्येक ठिकाणी केवळ निराशेचे उद्‌गार मात्र निघतात, मुसलमानी छळ सर्वांनाच होत आहे, त्याचा भयंकरपणा भासत आहे, परंतु त्याचा प्रतिकार कसा करावा हे मात्र कोणास सुचत नाही. प्रतिकार होणे शक्य नाहीच, हा प्रकार असाच चालावयाचा, हीच बुद्धी ज्याला त्याला आहे, असे आपल्या आढळात आले. गरीबगुरीब लोकांत ही स्थिती, परंतु सरदार लोकांत ही बुद्धीसुद्धा नाही. स्वामिसेवा करावी आणि त्यांचा प्रसाद म्हणून जे काही तुकडे मिळतील ते घ्यावे व त्यांवर संतुष्ट राहावे, आणि वेळप्रसंग साधल्यास आपली व आपल्या मुलांची बडेजाव ज्या मार्गाने होईल तो मार्ग धरावा, असा प्रकार सरदारांत होता. कित्येकांचा तर बाणा हा, की दुसऱ्या आपल्याहून वरचढ अशा घराण्यांचे वर्चस्व दरबारी आहे ते मोडून आपण त्याच्याहून वरचढ कसे व्हावे याविषयी सदोदित खटपट करीत असावयाचे. अशा स्थितीत आपल्यासारख्याला कोणाची तशी मदत मिळेल हे अगदी संभवनीय नाही.

महाराष्ट्रात, अगदी कर्नाटकाच्या हद्दीपर्यंत आपण हिंडत हिंडत जाऊन ठिकठिकाणी आपण लहानापासून थोरापर्यंतची मने पाहिली. बहुतकरून गरीबगुरीब लोक तळमळतात, परंतु निराशेमुळे अगदी स्वस्थपणे दिवस लोटीत आहेत आणि सरदारी बाण्याच्या लोकांची नजर बादशहाच्या दरबाराकडे आहे. जो उठतो तो जुळल्यास आपले घोडे पुढे ढकलण्याचे साधेल तर साधण्याच्या खटाटोपात असतो. खरी स्वामिभक्तीची उदाहरणे फारच क्वचित. हजारांत एखादे. आपण स्वामिभक्तीचा आविर्भाव आणल्याने सध्या आपले काम होते, आहे तर ते साधावे अशांचाच भरणा फार, असा आपला अनुभव आहे. असे त्यांनी कित्येक प्रसंगी दृष्टीस पडलेल्या उदाहरणांवरून सांगितले. कित्येक मजेदार उदाहरणे प्रत्यक्ष पाहिलेली सांगितली आणि एकंदर सरदार–दरकदारांच्या मदतीवर अवलंबून राहणे केवळ अयोग्य व धोक्याचे. जे काय करावयाचे ते गरीबगुरीब मावळे, शेतकरी, हेटकरी, रामोशी अशा लोकांना जमवून त्यांच्या मदतीने केले पाहिजे ही गोष्ट शिवबाराजांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न स्वामींचा चालला होता. बोलता बोलता स्वामींनी आपले प्रवासवृत्त थोडेथोडे सांगितले. त्यावरून स्वामींच्या साहसाची व समर्थांच्या चरणावरील भक्तीची शिवबांस चांगली कल्पना येऊन त्यांचे मन अत्यंत आश्चर्य व पूज्यभाव यांनी भरून गेले आणि ते एकसारखे चित्त देऊन ऐकीत होते. समर्थांचे दर्शन होवो किंवा न होवो, स्वामींच्याबरोबर हा प्रवास केल्याने आपणास आज किती तरी लाभ झाला असे त्यांस वाटू लागले. महाराष्ट्रात त्या काळी जाधव, मोरे वगैरे जी मोठमोठाली मराठे मंडळी होती, त्या सगळ्यांच्या सद्यःस्थितीचे चित्र, प्रत्येक घराण्यातील जिवंत असलेल्या मुख्य पुरुषाची एकंदर दानत, नेक, मते सर्व काही त्यांस त्या वेळी समजली, व श्रीधरस्वामींच्या मनात खरोखरच मराठी राज्याची संस्थापना व्हावी अशाबद्दल किती कळकळ आहे, याचे ज्ञान आजपर्यंत जितके झाले नव्हते तितके आज आपणांस झाले असे त्यांस वाटू लागले. जर शिष्यत्व पत्करावे तर श्रीधरस्वामींप्रमाणे आणखी समर्थांसारख्या गुरूंचे पत्करावे, असे आजपर्यंत त्यांस जितक्या वेगाने वाटत होते त्याच्याहीपेक्षा अधिक वेगाने आज वाटू लागले आणि पहिल्यापेक्षा समर्थांच्या दर्शनाविषयीची त्यांची उत्कंठा अधिकाधिक वाढली.

अशा प्रकारे प्रवासातील दिवस, काही मजेदार अनुभव घेत, व काही मागल्या अनुभवाच्या गोष्टी बोलत ते दोघे चालले असता एका खेड्यात जाऊन पोहोचले. उन्हाची वेळ झाली होती, यामुळे स्वारींनी गावाच्या बाहेरच्या एका महादेवाच्या

देवळात बेलाच्या झाडाची गार छाया होती, तेथे गाशा हंतरला. नदीकाठ असल्यामुळे थंडगार वाराही येत होता. भोजनाची सोय करावयाची म्हणून स्वामी खेड्यात जाऊन येतो असे म्हणून गेले होते. आदले रात्री अशाच एका झाडाच्या छायेत निजल्याकारणाने घामावर वारा लागून राजांचा हात दुखत होता. त्यामुळे व त्याच रात्री बराच ज्वर आल्याकारणाने स्वामींनी त्यांस तेथे बसवून आपण शिधासामग्री विकत आणण्यास गेले होते. नाहीतरी नित्याचा क्रम असा, की स्वामींनी मुक्कामाच्या जागी बसून आपली स्नानसंध्या आटपावी आणि राजांनी बाजारात जाऊन शिधासामग्री घेऊन यावे. नंतर स्वामींनी अन्न तयार करून राजांस घालावे. आपला समर्थांच्या ठिकाणापर्यन्तचा अज्ञात प्रवास अशा तऱ्हेने त्यांनी चालविला होता, परंतु स्वामींनी आज त्यास कोठे बाहेर जाऊ दिले नाही. राजे स्वस्थ पडले होते आणि ते पडले होते तेथून घाटावर चांगली दृष्टी जात होती. नदीस पाणी पुष्कळ होते. नदीच्या पैलथडीलाही एक गाव असून इकडल्याप्रमाणे तिकडेही एक देऊळ होते. त्या देवळाकडे व त्याच्या घाटाकडे राजांची सहज दृष्टी गेली, तो तेथे काही विलक्षण प्रकार त्यांच्या नजरेस पडला. नदीतून एक ब्राह्मण स्नान करून ओलेत्याने हातात तांब्या भरून घेऊन वर देवळाच्या पायऱ्या चढून चालला होता; तो चार पायऱ्या वर चढून गेला नाही तोच, खालच्या अंगास नदीच्या काठी काही धुणारा एक इसम धावत धावत येऊन त्याच्या अंगावर थुंकला! हे पाहताच राजांच्या अंगाचा नुसता तिळपापड उडाला आणि आपण पाहतो आहोत हे आहे काय, खरे की खोटे असे मनात येऊन स्वारी पडली होती ती चटकन उठून बसली आणि टक लावून तिकडे पाहू लागली. तो ब्राह्मण संतापाने काही तरी बोलत आहे आणि त्याच्या अंगावर थुंकणारा इसमही काही रागात व काही हसत बोलून त्याची चेष्टा करीत आहे. ब्राह्मण पुनः खाली उतरला आणि नदीत शिरला. पुनः त्याने स्वच्छ स्नान केले आणि तांब्या भरून पायऱ्या चढू लागला. तिकडे तो इसमही आपल्या धुण्याच्या जागी गेला होता. तेथे जाऊन त्याने धुण्यापैकी कायसेसे उचलले आणि ते बरोबर घेऊन पुनः धावत धावत ते हातातले त्या ब्राह्मणाच्या अंगावर झोकून दिले होते, ते अंगावर पडताच ब्राह्मणाच्या अंगावर शहारे आल्याप्रमाणे त्याचे अंग थरारले; ते इकडे राजांस दिसले. शिवाय त्याच्या थरारण्याच्या भरानेच त्या हातचा तांब्या त्याच्याच पायावर पडून अगदी मटकन खाली बसावे लागण्याइतकी त्यास दुखापत

झाली असावी असे दिसले. तो दुसरा इसम त्याला काही तरी बोलतच होता. ब्राह्मण तिरीमिरी येऊन पडल्याप्रमाणेच खाली बसला होता. हा प्रकार पाहताच हे काय असावे याबद्दल राजांस संशय आला आणि तो विलक्षण संशय येताच त्यांच्या अंगात काही विलक्षण तऱ्हेचे स्फुरण चढलेले दिसले. लागलीच क्षणाचाही अवकाश न करिता स्वारी त्वेषाने उठली आणि आदले दिवशी आपल्यास ज्वर आला होता, आपण गार पाण्यात एकदम कसे जावे, किंवा आपला एक हात दुखतो आहे, पोहताना काय होईल, असे प्रश्न मनात येऊसुद्धा न देता कपडे काढून टाकून काचा कसून आपली तलवार आडवी तोंडात धरून स्वारींनी पाण्यात उडी घेतली; आणि समोरच्या घाटावरील ब्राह्मणाकडे एकसारखी दृष्टी ठेवून सपासप पाणी तोडीत स्वारी समोर चालली. पाण्याला मध्ये चांगली धार होती. परंतु तिला टाळण्यासाठी आपला रस्ता एक केसभरसुद्धा बदलला नाही. अगदी घाटाजवळ जाऊन पाहतात तो जो प्रकार दृष्टीस पडला त्याबरोबर आपला जो संशय होता तोच खरा झाला असे त्यांच्या नजरेस आले. स्नान करून वर जाणारा अगदी म्हातारा ब्राह्मण असून त्याच्या अंगावर थुंकणारा कोणी खाटीक होता. मग काय विचारता ? राजांस इतका संताप आला की, त्यांचे भान कोणीकडच्या कोणीकडे नाहीसे होऊन तडाख्यास घाटाच्या पायऱ्यांपर्यंत पोहोचून पायऱ्या चढून वर गेले आणि तलवारीच्या एका फटक्यासरसे त्या मुसलमानास त्यांनी खाली पाडले. ब्राह्मण अगदी म्हातारा होता. तो वर पाहतो तो आपल्यापुढे एक तलवार उपसलेला पुरुष उभा आणि आपल्याला छळणारा वार लागून खाली पडलेला. हा तलवार उपसून त्या मुसलमानास वार करणारा कोण, आपल्यालासही मारतो की काय ? असे वाटून " महाराज, मी आपल्या पाय ......... " असे बोलत बोलतच तो राजांच्या पायांवर पडला. तो घाव लागून पडलेला मुसलमानही काही शिव्या पुटपुटत होता. राजांनी तिकडे मुळीच लक्ष दिले नाही. ब्राह्मणास मात्र आश्वासन देऊन उठविले, आणि काय हकीकत झाली ती विचारली. तो ब्राह्मणाने सांगितले, " महाराज, मी आपला स्नान करून त्या तिथे माध्यान्ह संध्या करीत होतो, इतक्यात हा खाटिक ती गोमातेची आतडी– दुष्टाने कुठे मातेचा वध केला असेल तो असो – घेऊन आला, आणि माझ्या शेजारीच पलीकडे पाण्यावर धाडकन टाकून दिली. माझ्या अंगावर शिंतोडे उडाले. आणखी तो भयंकर प्रकार पाहून संतापाने माझ्या तोंडून ' अरेरे चांडाळा,

कुठे ही पातकं फेडशील ?' असे शब्द निघाले. मी तसाच तिकडच्या बाजूला येऊन स्नान करून वर चाललो, तो चांडाळ धावत येऊन माझ्या अंगावर थुंकला. मी रागाने त्याला दोन शिव्या देऊन पुनः खाली जाऊन स्नान करून वर देवळात बसावे म्हणून चाललो तो पुनः दुष्टाने येऊन माझ्या अंगावर ही आतडी टाकली. महाराज, आता ब्राह्मणांचा आणि गोमातांचा वाली कोणी नाही."
राजांस पुढे ऐकवेना.

० ०

: ७ :

# काळ

शि. म. परांजपे

एखादे कार्य झालेले असते, होणार असते, किंवा होत असते. झालेले असते ते पूर्वी, होणार असते ते मग, आणि होत असते ते हल्ली. ह्यांपैकी कार्य होत असते, त्यातील काही भाग झालेला असतो व काही भाग होणार असतो. उदाहरणार्थ, एखाद्या पुस्तकाची काही पाने छापून तयार झालेली असतात व काही तयार व्हावयाची असतात. अशा स्थितीत जे पुस्तक असते 'छापून होत आहे' असे म्हणण्याचा परिपाठ आहे. परंतु जे कार्य पूर्ण होण्याला अवश्य लागणाऱ्या गोष्टींपैकी अगदी शेवटची गोष्टदेखील घडून गेलेली असते, ते कार्य झालेले आहे. आणि जे कार्य पूर्ण होण्याला अवश्य लागणाऱ्या गोष्टींपैकी अगदी प्रथमच्या गोष्टीलादेखील सुरुवात झालेली नसते, ते कार्य होणार आहे असे म्हणण्याचा परिपाठ आहे. ह्याच विस्तृत रीतीने स्पष्ट करून सांगितलेल्या वरील कल्पना भूत, भविष्य आणि वर्तमान ह्या तीन शब्दांनी आपण नेहमी व्यक्त करून दाखवीत असतो. पण जितके अशा रीतीने आपल्या कल्पना व्यक्त करतात तितक्या सर्वांनाच त्यांचा अर्थ काय, त्या कशा अस्तित्वात आल्या, त्या कोणत्या मुख्य मूळ कल्पनेवर अवलंबून आहेत, इत्यादी प्रश्नांची माहिती असते असे नाही. धूर पाहिला म्हणजे तेथे आग आहे हे पुष्कळांना समजते, पण ह्यावरून त्यांनी तर्कशास्त्रातील प्रमेयांचे अध्यापन केलेले असते असे नाही. त्यातलाच वरील प्रकार आहे, पण ह्या गोष्टी थोड्यांना माहीत असतात, म्हणून त्यांचा त्या मानाने जास्तीच ऊहापोह झाला पाहिजे. पूर्वी, पुढे, हल्ली इत्यादी व्यवहार जे आपण नेहमी करतो, त्या सर्वांना आधारभूत जी कल्पना तिलाच आपण 'काळ' असे म्हणतो. काळ हा पदार्थ डोळ्याने दिसण्यासारखा नाही किंवा स्पर्शाने जाणता येण्यासारखा नाही. तरी पण

डोळ्याला दिसत नाही किंवा हाताला लागत नाही, म्हणून त्याचे अस्तित्वच *नाही असे मात्र म्हणता येणार नाही. कारण ज्ञानाची द्वारे अनेक आहेत.* जे प्रत्यक्ष दिसत नाही ते कदाचित अनुमानाने सिद्ध होत असते; आणि प्रस्तुत विषयाची स्थिती अशीच आहे. काल, आज, उद्या, पूर्वी, हल्ली, पुढे इत्यादी व्यवहार काळ म्हणून काही पदार्थ नसता तर आपणाला करताच आला नसता. आंब्याचे झाड नसले तर त्याजवरील फळ खायला मिळणे जसे अशक्य, तसेच काळ हा पदार्थ अस्तित्वात नसता तर पूर्वीचा काळ, हल्लीचा काळ, पुढचा काळ असले प्रयोग जे आपण पावलोपावली करतो ते करता आले नसते. पण ज्या अर्थी ते करता येतात, त्या अर्थी काळाचे अस्तित्व कबूल करणे भाग आहे. ह्या काळाला आदी आणि अन्त हे मुळीच नाहीत. ज्याप्रमाणे सूर्य पूर्वेकडील क्षितिजावर आल्यापासून पश्चिमेकडील क्षितिजाच्या खाली जाईपर्यंतच काय तो आपल्याला दिसतो, त्याच्या आधीच्या आणि नंतरच्या स्थितीबद्दल आपल्याला काहीच कळत नाही, त्याप्रमाणे काळाचादेखील काही भाग मात्र जाणता येतो; आणि त्याच्या आधीचा भाग आणि नंतरचा भाग ह्यांविषयी मनुष्याचे पूर्ण अज्ञान असते. पृथ्वीच्या पृष्ठभागावर उभ्या राहिलेल्या मनुष्याला ज्याप्रमाणे आपल्या पायांखालील जमिनीच्या पोटात काय आहे आणि आपल्या डोक्या-वरील आकाशाच्या पोकळीत काय आहे हे समजत नाही, त्याप्रमाणेच काळाच्या आद्य आणि अंत्य स्थितीचा विचार करू लागले म्हणजे मनाची अवस्था होऊन जाते. होकायंत्र बिघडून जाऊन वादळात सापडलेले गलबत, चोहोकडून धुक्याने वेढून गेल्यामुळे वाट चुकलेला वाटसरू, आणि काळाच्या आनंत्याचे मोजमाप काढणारा तत्त्ववेत्ता—ह्यांना फार झाले तर आपल्यापुढली चार हात जागा एवढेच काय ते दिसत असते. इतिहासाच्या साधनाने काळाच्या उगमाकडे आणि ज्योतिःशास्त्राच्या साधनाने काळाच्या मुखाकडे जाण्याविषयी मनुष्याचे सतत प्रयत्न चालले आहेत, पण त्यांना कितीसे यश आले आहे? उपलब्ध साधनांपैकी अतिशय प्राचीन असे जे वेद त्यांच्या कालमानाविषयीच्या वादाच्या भानगडीत न पडता स्थूलमानाने वेद सहा हजार वर्षांचे जुने आहेत असे काहींच्या मता-प्रमाणे घटकाभर मानले–तरी काय? सहा हजार वर्षांपासूनच काळाला सुरुवात झाली असे त्यावरून कोणाला म्हणता येणार आहे? सारांश, परमेश्वराप्रमाणेच काळ हा आद्यन्तरहित आहे, आणि आदी व अन्त ह्यांनी विरहित हा काळ

असल्यामुळे परंपरेने ह्याच्याही अंगात पुष्कळ विलक्षण शक्तीचा समावेश झालेला आहे. परमेश्वर हे सगळ्यांचे मुख्य कारण आहे, आणि काळ उपाधीभूत आहे. काळ हा जसा अनादी आणि अनंत आहे तसाच तो सर्व ठिकाणी आणि सर्व वेळी असतो. म्हणून जगात आजपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडून आल्या त्या त्या सर्व काळाने पाहिल्या आहेत, व ह्यापुढे ज्या ज्या गोष्टी घडून येणार असतील त्याही सर्व काळाला पाहावयाला सापडतील. अशा प्रकारचे काळाचे भव्य, उदात्त, गंभीर आणि अतर्क्य स्वरूप लक्षात आणले म्हणजे काही काही तत्त्ववेत्ते काळ हे निराळे द्रव्य न मानता त्याचे परमेश्वराशी तादात्म्य मानितात, ते किती यथार्थ आहे, हे चांगले लक्षात येईल. आणि त्याच तत्त्वाला अनुसरून लाक्षणिक रीतीने बोलावयाचे म्हटले, तर आजपर्यंतच्या सर्व अनंत गोष्टी काळाने केलेल्या आणि पाहिलेल्या आहेत असे म्हणण्याला हरकत नाही. मध्य आफ्रिकेत आणि राजपुतान्यात हत्तीच्या अंगाएवढाल्या समुद्राच्या लाटा उसळताना आणि त्यावरून हत्तीच्यापेक्षा दसपटींनी मोठी अशी गलबते फिरताना याने पाहिली असली पाहिजेत. हिमालय पर्वताच्या जागी डोळे फिरून जातील इतके खोल खळगे आणि अटलांटिक महासागराच्या जागी मेघमंडळात घुसणारी पर्वतशिखरे कदाचित याने पाहिली असतील. इजिप्त देशातील उंच उंच मनोरे बांधलेले आणि जमीनदोस्त झालेले याने पाहिले आहेत. बॅबिलोनच्या कळसाचे काम चालले असता दररोज वाढत वाढत तो अगदी स्वर्गलोकाजवळ जाऊन ठेपलेला याने पाहिला आहे, व त्याच्या पूर्वीचे सारे लोक एक भाषा बोलत होते ती याने ऐकिली आहे. निनेव्ही, कैरो, सीरिया, पॅलेस्टाइन इत्यादी शहरांचा आणि देशांचा उत्कर्ष आणि अपकर्ष दोन्ही याने पाहिलेले आहेत. रोमचे राज्य उभारलेले आणि मोडलेले दोन्ही याने पाहिली आहेत. याने घोड्यांना आणि पर्वतांना पंख असलेले पाहिले आहेत. याने समुद्राचे गोडे पाणी प्राशन केले आहे. अर्जुनाच्या एका बाणापासून हजारो बाण उत्पन्न होत, आणि रावणाला दहा तोंडे होती—ह्या सर्व गोष्टी त्याला थोतांड वाटत नाहीत. याने ऋषींना ऋग्वेदातील सूक्ते रचीत बसलेले असताना पाहिले आहे. याने विश्वामित्र आणि वसिष्ठ यांच्या भांडणाला काय काय कारणे झाली ती लक्षात ठेवली आहेत. याने आजपर्यंत कैक राजांची राज्ये, गर्विष्ठांचा गर्व, बलाढ्यांचे बल आणि मस्तवाल्यांची मस्ती ही लयाला गेलेली पाहिली आहेत, आणि यापुढे पाहील. एजिस्, टार्क्विनस, नीरो यांनी गरिबांवर

पुष्कळ जुलूम केला, पण अखेरीस याच्यापुढे त्यांचा जुलूम चालेनासा झाला. अलेक्झांडर आणि ज्युलियस सीझर यांनी आपल्या सैन्याने साऱ्या शत्रूंना जेरीस आणले. पण जेव्हा याच्याशी लढाई करण्याचा प्रसंग आला तेव्हा तेच उलटे जेरीस आले. सालोमन आणि मार्क्स ऑरेलिअस हे राजे मोठे शहाणे होऊन गेले, पण ह्याच्यापुढे त्यांचे शहाणपण चालेना. गरीब लोक जुलमाने गांजून, भुकेने व्याकूळ होऊन, उन्हाने करपून किंवा थंडीने गारठून गुडघ्यांत डोके घालून डोळ्यांतून टिपे ढाळीत बसत,—तेव्हा खऱ्या मित्राप्रमाणे चार युक्तीच्या गोष्टी सांगून हाच त्यांच्या मनाला धीर देत असे. लढाईत पराभव पावून शत्रूच्या हाती सापडलेल्या जिवंत राजांकडून रोमन बादशहा रोम शहरातून आपले विजयरथ ओढवीत असत.—त्या वेळी त्या गुलाम राजांना किंवा राजकीय गुलामांना शत्रूचे वैभव आणि आपली विपत्ती सहन करण्याचे सामर्थ्य खऱ्या शूरांप्रमाणे हाच त्यांच्या डोळ्यांपुढे येऊन देत असे. ल्युक्रेशिआवर टार्क्विनसने जुलूम केला, रावणाने सीतेला चोरून नेले, आणि दुःशासनाने द्रौपदीला भर सभेत नग्न करण्याचा प्रयत्न केला, त्या वेळी ब्रूटसच्या, रामाच्या आणि भीमाच्याही आधी मोठ्याने गर्जना करून ' सूड ! सूड ! ' हे शब्द हाच ओरडला. दैत्यांनी रसातळाला पोचविलेल्या वेदांचा प्रचार यानेच फिरून सुरू केला. हिरण्यकशिपूचे पोट यानेच फाडिले. बळीचे डोके यानेच ठेचले आणि रावणाचे गळेही यानेच कापले. जेव्हा जगात अनाचार अतिशय वाढला तेव्हा लोकानुग्रहासाठी शुक्राचार्य, नारदमुनी, सॉक्रेतीस, गौतम बुद्ध, जीजस ख्राइस्ट इत्यादी महात्म्यांना यानेच लोकांपुढे आणून ठेविले. असे मोठमोठे उपकार यानेच जगावर केले आहेत व पुढेही याच्या हातून होतील. वास्तविक पाहता उत्पत्ती, स्थिती आणि लय ह्या तिन्हीला हाच कारणीभूत आहे. अशा दृष्टीने पाहिले असता ब्रह्मा, विष्णू आणि शिव ह्या तिन्ही देवतांचा हा एकवटलेला अवतार आहे. वास्तविक हा त्रिमूर्तिमय असून कधी कधी फक्त शिवाची आणि त्याची एकरूपता आहे असे वर्णन करण्यात येते, पण हे भ्रममूलक आहे. दूरदर्शी राजकारणी पुरुषाप्रमाणे याने पुढे काय काय गोष्टी करावयाच्या ते सुद्धा सर्व ठरवून टाकले आहे. कोणते निरुपयोगी म्हणून पाडून टाकायचे आणि कोणते नवीन बांधावयाचे,: कोणत्या भरभराट संपलेल्या शहराची जागा राने लावण्यासाठी मोकळी करून घ्यावयाची आणि कोणत्या रानातील जागा साफ करवून नवीन शहरे वसवावयाची, कोणत्या राजांना तक्तावरून खाली ओढावयाचे, आणि कोणाला तेथे नेऊन बसवावयाचे,

कोणत्या लोकांच्या गळ्यांत विजयश्रीकडून माळा घालावयाच्या आणि कोणाच्या पायांत गुलामगिरीच्या बेड्या अडकवावयाच्या, हे सर्व याने कायम करून ठेविले आहे. आणखी हजारो वर्षानंतरच्याही पृथ्वीच्या पृष्ठभागावरील राष्ट्राचा नकाशा याने कुशल चितान्याप्रमाणे सर्व रंगवून तयार केला आहे. हिरवा, पिवळा, तांबडा, निळा, पांढरा हे निरनिराळे रंग कोठे कोठे कसे भरावयाचे याचा याने कधीच निकाल लावून टाकला आहे. अशा प्रकारची व्यापक कल्पना काळ हा शब्द उच्चारला म्हणजे मनात येते,—आणि हाच काळ शब्दाचा मूळ अर्थ.

๏ ๏

: ८ :

# साक्षीदार

श्री. कृ. कोल्हटकर

न्यायसभांत निर्डावलेल्या लोकांना 'साक्षीदार' हा किती विलक्षण प्राणी आहे हे सांगावयास नकोच. इतर लोकांसही त्याच्या बुद्धिमत्तेची, नीतीची व व्यवसायाची ओळख व्हावी ह्या हेतूने हा वर्णनात्मक लेख लिहीत आहे.

या प्राण्याचे मातापितर 'पुराव्याची गरज' व 'पोटगी भत्ता' हे होत. गरज ही कल्पकतेची आई, हे नाते तर प्रसिद्धच आहे. आई एक असल्यामुळे साक्षीदार व कल्पकता ही अर्थात बहीणभावंडे झाली. या दोघांचे सख्य किती आहे व साक्षीदारास त्याच्या बहिणीचे प्रसंगी किती साहाय्य असते हे अनुभवानेच कळण्याजोगे आहे.

या प्राण्यास मुख्य व्यवसाय बहुतकरून लोकांतील तंटे तोडणे हा असतो. यामुळे जेथे जेथे म्हणून देवघेव वगैरे चालली असेल तेथे तेथे हा अगदी ठेवलेला असावयाचा! जेथे ऋणको धनकोस वसूल देत असेल किंवा धनको दस्तऐवज लिहून घेत असेल तेथे हा सार्वजनिक प्राणी तो सर्व प्रकार सूक्ष्म दृष्टीने अवलोकन करीत असतो. कोणत्या मनुष्याने कोणत्या रंगाचे पागोटे घातले आहे, रुपये वसूल देताना किती किती मोजून दिले, कशात बांधून आणले होते, मालाचे माप कोणत्या धातूचे होते, माल आणलेल्या गाडीच्या बैलांचा रंग कोणता होता, वगैरे लहानसहान गोष्टींचीसुद्धा नोंद त्याच्याकडून होत असते. जेथे वाटणी चालली असेल तेथे हा प्राणी हजर असावयाचाच. लग्नसमारंभ किंवा दत्तकविधान चालले असेल तेथे एक वेळ उपाध्या नसला तरी चालेल, पण साक्षीदार पाहिजेत; मग तो अन्य जातीचा असला तरी हरकत नाही. एकदा तर एका मुसलमान साक्षीदाराने एका हिंदूच्या लग्नप्रसंगी हजर राहून अंतरपाट धरल्याचेही शपथेवर सांगितले! बरे, हा प्राणी नुसत्या सार्वजनिक प्रसंगीच हजर असतो, असे

नाही; तर दुसऱ्यांचा एकान्त चालला असतानाही हजर राहण्याची याची तयारीच! नवराबायकोचे प्रेमळ संवाद, खुनी लोकांची कारस्थाने, इत्यादी प्रसंगी त्या त्या प्रसंगांच्या प्रत्यक्ष वाटेकऱ्यांशिवाय दोघेजण तेथे हजर असतात—एक परमेश्वर व दुसरा साक्षीदार! पण त्या रीतीने या नामाचा एकवचनी उपयोग केल्याने वाचकांचा गैरसमज होईल, तो घालविण्याकरिता प्रथमच एका गोष्टीचा उल्लेख केलेला बरा. ती गोष्ट हीच की, साक्षीदार एकटा कधीही असावयाचा नाही. नेहमी दोन किंवा अधिक साक्षीदार एकत्र आढळून येतात. अर्थात हा प्राणी कळप करून राहणारा (Gregarious) आहे, परंतु चमत्काराची गोष्ट ही की, जरी इतरांमधील भांडणे तोडण्याचा साक्षीदारांपैकी प्रत्येकास हव्यास असतो, तरी त्यांचे एकमेकांशी कधीही पटत नाही. विवक्षित प्रसंगी कोणती वेळ होती असे त्यांना विचारल्यास, एकाचे प्रातःकाळ तर दुसऱ्याचे संध्याकाळ असे मत पडेल व तिसऱ्याचे मत त्या वेळी रात्र झाली असून प्रकृत साक्षीदाराशिवाय सर्व गाढ झोपेत होते असे पडेल! तीन साक्षीदारांत अशी त्रेधा होण्यासारखे मतवैचित्र्य! मग त्यांची जास्ती संख्या असल्यावर विचारूच नये. एकदा आम्ही चौघा साक्षीदारांस एका घडलेल्या प्रसंगाच्या काळाविषयी विचारले असता एकाने शपथेवर (साक्षीदार शपथेशिवाय तोंडातून ब्रही काढीत नाहीत!) असे सांगितले की, त्या प्रसंगी पावसाची मुसळधार सुरू होती; दुसऱ्याने सांगितले, थंडी पडल्यामुळे चोहोकडे आगट्या पेटल्या होत्या; तिसऱ्याने वसंतपूजा चालली असून चांदण्यात अंगास उटी लावीत असल्याचे निक्षून सांगितले! चवथ्या साक्षीदाराने चवथीच गोष्ट सांगितली नाही, ह्याला त्या बापड्याचा इलाज नव्हता. कारण उन्हाळा, हिवाळा व पावसाळा ह्या काळांव्यतिरिक्त चवथा काळच त्याच्या ऐकिवात नव्हता. सारांश, साक्षीदारांच्या विरुद्ध विधानांची एकवाक्यता करता करता नाकी नव येतात. बरे, ही विधाने खोटी असतात असातलाही प्रकार नसतो. कारण सगळ्यांनी शपथा वाहिलेल्या असतात. शिवाय भवभूतीने वर्णन केलेल्या 'वाचमर्थोऽनुधावति' या कोटीतच साक्षीदारांची गणना असते. पंचमहाभूते त्याच्यापुढे हात जोडून उभी असतात. एखादा साक्षीदार रात्रीची सहल करण्यास निघाला असता, जर अंधारात एखादे चौर्यकर्म चाललेले असेल, तर स्वच्छ आकाशातसुद्धा वीज चमकून ते कर्म त्याच्या नजरेस आलेच म्हणून समजावे. पंचमहाभूतांप्रमाणेच इतर मनुष्यप्राणीही साक्षीदारास वश असतात. कधी कधी चोराने, घरात शिरून, कडी लावली

असताही, साक्षीदाराची चाहूल ऐकताच त्याने कडी उघडून व त्याला आत घेऊन नंतर त्याला साक्षी ठेवून चोरी केल्याचे आमच्या ऐकिवात आहे.

दुसऱ्याच्या कामात हात घालण्याच्या इच्छेबरोबर देवाने या प्राण्यास तद्नुरूप इंद्रिये व बुद्धी दिली आहे हे सुदैवच समजावयाचे ! एका आंधळ्या साक्षीदाराने एकदा एका मनुष्याच्या पागोट्याचा रंग पिवळा होता हे प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिल्याचे सांगितले. प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिल्यावर खोटे तरी कोणी म्हणावे ? तसेच वार्धक्यामुळे बहिरे झालेल्या साक्षीदारांचे कान दुसऱ्यांची व्यवहारासंबंधी होणारी बोलणी ऐकताना चांगले शाबूत होतात, व तरुण साक्षीदारांना फार लांबून ऐकू येते. साक्षीदारांची आठवण तर फारच बळकट असते. सामान्य मर्त्यांची आठवण विशेष कारण नसताना दहा पाच वर्षांपलीकडे जात नाही, व तिची पकड ठळक गोष्टींवरच असते; पण साक्षीदाराच्या आठवणीची मगरमिठी फार भयंकर असते. पाहिजे तितकी क्षुल्लक बाब असू द्या व तिला कितीही वर्षे लोटलेली असोत, साक्षीदारांना ती आठवण नाही असे होणारच नाही. पंधरावीस वर्षांपूर्वीचे जमाखर्च ते घडाघड मुखोद्गत म्हणून दाखवितात; मग ते कितीही घोटाळ्याचे का असेनात ! हा प्रकार पाहताना अलीकडील काही वक्त्यांची आठवण झाल्यावाचून राहात नाही. हे वक्ते वरून एखादे जोरदार भाषण पाठ करून, किंबहुना छापवूनही काढून ते सभेत पाठ म्हणून दाखविताना त्यातील सुभाषिते किंवा प्रसिद्ध पुरुषांच्या उक्ती सांशक मुद्रेने व If I remember right (जर माझी आठवण धड असेल तर ) अशा उद्गारांसहित उच्चारीत असतात. साक्षीदारांचा प्रकार मात्र यापैकी नसतो हो ! त्यांना खरोखर मोठ्या भानगडीच्या रकमा कालांतराने जशाच्या तशा आठवतात. जितकी जितकी क्षुल्लक गोष्ट तितका तितका तिचा ठसा यांच्या मनावर अधिक ! परवा एका साक्षीदाराने वीस वर्षांपूर्वी ऐकलेल्या पंचवीस रकमा आणे-पैसुद्धा बिनचूक सांगितल्या ! तसेच दुसऱ्या एकाने लहानपणी पाळण्यात ऐकलेल्या वाटणीसंबंधीच्या गोष्टी चाळीस वर्षांनंतर अचानक न्यायसभेपुढे आणिल्या ! या पलीकडचे उदाहरण, श्रीकृष्णाच्या भाषणास हुंकार देणाऱ्या गर्भस्थ अभिमन्यूशिवाय एकही आढळणार नाही अशी माझी खात्री आहे.

आता साक्षीदार झाला तरी तो मनुष्यच असल्यामुळे वरील विधानास काही अपवादही आहेत. उदाहरणार्थ, जरी त्याला पुष्कळ वर्षांपूर्वीची गोष्ट पूर्णपणे आठवते तरी नुकत्याच होऊन गेलेल्या गोष्टी पुष्कळदा त्याच्या आठवणीतून

निसटूनही जातात. त्याच्या स्मृतिपटावर उमटणाऱ्या चित्राचे स्पष्टत्व बहुधा कालसान्निध्याशी व्यस्त प्रमाणावर असते. नुक्तीच मुखावाटे निघालेली गोष्ट लक्षात न राहिल्यामुळे कधी कधी त्याच्याकडून परस्परांशी विसंगत विधाने बाहेर पडतात. तसेच नेहमी परोपकाराकडे दृष्टी असल्यामुळे खाजगी हितासारख्या क्षुल्लक गोष्टीकडे तो दुर्लक्ष करितो. ' वसुधैव कुटुंबकम् ' हेच त्याचे व्रत असते. वर सांगितलेल्या फर्ख्या हिशोबी साक्षीदाराला तुम्ही जर विचारले की, ' जेथे या जमाखर्चाच्या गोष्टी चालल्या होत्या तेथे तुझे काय काम होते ? ' तर ते त्याला मुळीच सांगता येणार नाही. त्याचप्रमाणे ' दोन वर्षांपूर्वी तुझ्या बापाच्या श्राद्धास कोण ब्राह्मण बोलाविले होते ? ' असा प्रश्न केल्यास तो कुंठित होईल; पण वीस वर्षांपूर्वी एकत्र जमलेल्या पन्नास मंडळींपैकी प्रत्येकाचे नाव, पोशाख, धंदा, आई-बापांची नावे, एकंदर वंशावळ, वाटेल ते विचारिले तरी तो तुम्हास दाद देणार नाही. शिवाय जरी वर सांगितल्याप्रमाणे साक्षीदारांची नष्ट झालेली इंद्रियेही कधी कधी पालवतात, तर कधी कधी डोळे असूनही काही वस्तू त्यांना दिसेनाशा होतात. हे एकदेशीय ग्रहण बहुतकरून दस्तऐवज लिहिणारांच्या डोळ्यांना लागते. त्यात नमूद केलेल्या गोष्टीखेरीज इतर गोष्टी त्यांना मुळीच दिसत नाहीत; इतकेच नाही, तर पुष्कळदा तारण गहाणखताऐवजी ताबेगहाणखत व ताबेगहाणखताऐवजी खरेदीखत, केवळ हस्तदोषामुळे त्यांच्याकडून लिहिले जाते.

साक्षीदारांना चिलीम ओढण्याचे एकच व्यसन असते; पण ते त्यांच्या फारच पथ्यावर पडते. कारण त्यांचे हे व्यंग माहीत असल्यामुळे समान व्यसनी लोकांकडून अर्थातच तमाखूसेवनात पंक्तीचा लाभ देण्यासंबंधाने त्यांना पाचारण येते, व ते आले म्हणजे त्यांना त्यांची भीड न तुटून इतरांचे व्यवहार निरीक्षण करण्याचा त्यांचा मार्ग सहजच खुला होतो. जेव्हा ते तंबाखू ओढीत नसतात तेव्हा ते बहुत-करून बाजारास जात असतात. पण अशा प्रसंगीसुद्धा इतर लोक त्यांचा मार्ग रोखून त्यांना तंटे तोडण्याकरिता ओढून नेतातच. साक्षीदार एकमेकांशी कधीही बोलत नाहीत. एकमेकांबरोबर लांबचा प्रवास करण्याचा प्रसंग जरी आला तरी त्यांचे परस्परांशी वर्तन दोन इंग्रज गृहस्थांच्यासारखेच तुसडेपणाचे असते. न्याय-सभेत येईपर्यंत तर त्यांची एकमेकांशी ओळखही नसते.

साक्षीदारांची सत्यप्रियतेबद्दल फार ख्याती आहे. ते ज्यांच्या वतीने बोलाव-यास येतात ते जरी नेहमी त्यांचे नातेवाईक किंवा सावकार असतात तरी ते

खरे असेल तेच सांगतात व त्यांना कितीही प्रश्न विचारले तरी 'माहीत नाही' हे शब्द त्यांच्या तोंडावाटे कधी बाहेर पडावयाचे नाहीत. एवढेच की, कधी कधी प्रसंगानुसार त्यांच्या उत्तराचा नमुना बदलतो. उदाहरणार्थ, उलटतपासणीच्या वेळी त्यांचे उत्तर प्रश्नरूप किंवा सामान्य सिद्धान्ताच्या स्वरूपाचे असते. समजा, आपण एखाद्या साक्षीदाराला विचारिले, की 'अमुक अमुक करार चावडीवर झाला की काय?' तर या प्रश्नाला उत्तर खालील दोहोंपैकी एका स्वरूपाचे आहे असे तुम्हांला आढळेल:—'असे करार चावडीशिवाय दुसरीकडे कशाला होतील?' किंवा 'असे करार चावडीवरच व्हावयाचे'. या उत्तर देण्याच्या पद्धतीत वैचित्र्य असून शिवाय तीपासून लौकिक ज्ञानही प्राप्त होते. ही उत्तर-सरणी साक्षीदारांच्या इतकी अंगवळणी पडून गेलेली असते की, कधी कधी तिच्यामुळे खालच्याप्रमाणे मासलेवाईक प्रकार घडून येतात.

प्रश्न—तुम्हांला चार बायका होत्या की काय?

उत्तर—सगळ्यांनाच चार चार बायका असतात.

प्रश्न—पहिली बायको मेली वाटते?

उत्तर—मरू नये तर तिने काय करावे?

प्रश्न—तिच्यापासून तुम्हांला एक मुलगा झाला होता ना?

उत्तर—माझ्यापासून होऊ नये तर काय...?

साक्षीदारांना घातलेले प्रश्न त्यांना सहसा कळत नाहीत, त्यामुळे कधी कधी ते त्यांना विसंगत उत्तरे देतात, व कधी कधी कोणी, केव्हा, कोठे इत्यादी प्रतिप्रश्न विचारून व प्रश्नातील काही शब्दांचा पुनरुच्चार करून पृच्छा करणारास पुरेपुरेसे करतात.

एखाद्या प्रसंगाचे वर्णन करण्याची साक्षीदाराची तऱ्हा कादंबरीतल्या-प्रमाणे व्यवस्थित व मोहक असते. 'अमक्या प्रसंगासंबंधाने तुला काय माहीत आहे?' असे त्याला मोघम विचारले असता, मुद्द्याच्या गोष्टीकडे एकदम न येता 'सहा महिन्यांपूर्वी एक दिवशी सकाळी मी निजून उठून तोंड धुऊन शेताकडे जात होतो, इतक्यात—' इत्यादी स्थलकालादी तपशिलासकट सर्व हकीकत तो आपण होऊन अस्खलितपणे देतो. पूर्वी मुळीच तयारी नसताना याप्रमाणे सुसंबद्ध भाषण करणारा वक्ता विरळाच आढळून येईल.

एक महत्त्वाची गोष्ट सांगावयाची राहिली. ती ही की, या सर्वज्ञ प्राण्याला स्वतःचे वय मुळीच माहीत नसते. एखादा तरणाबांड स्वतःस मरणाच्या दारी बसलेला समजतो, तर एखादा थेरडा स्वतःस विशीच्या आतच मानीत असतो. पण साक्षीदारांच्या वयांची माहिती न्यायाधीशास चांगली असते. त्यांच्या कागदपत्रावरून असे खात्रीलायक समजते, की या प्राण्याचे वय नेहमी पाचाच्या बाराखडीत असते. उदाहरणार्थ, एखाद्या साक्षीदाराचे पस्तिसावे वर्ष संपले की, इतर क्षुद्र जंतूंप्रमाणे छत्तीस, सदतीस इत्यादी मधल्या पायऱ्यांवर पाय न ठेविता तो एकदम चाळिसाव्या वर्षात प्रवेश करून दस्तऐवज वाचण्याकरिता चाळिशी विकत घेतो.

साक्षीदार जबानी देताना बहुतकरून आढ्याकडे पाहात असतो; जणू काय आपला खरेपणा जाहीर करण्याकरिता तो त्रिकालज्ञानी ईश्वरास आव्हानच करीत आहे. त्याचप्रमाणे बोलताना तो सारखा खोकत किंवा खाकरत असतो. पण हा परिणाम बहुतकरून चिलीम ओढण्याचा असावा. व्यसनी लोकांनी यापासून अवश्य धडा घ्यावा.

० ०

: ९ :

# श्री यत्नदेवाची पूजा

द. वा. पोतदार

*केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ॥*
*येत्न तो देव जाणावा । अंतरी धरिता बरे ॥*
–श्रीसमर्थांची कविता ( धुळे, पृ. ३८९ ).

आरंभिलेल्या सत्कार्यात यशःप्राप्ती व्हावी म्हणून मंगल करण्याची वहिवाट आपल्याकडे फार पुरातन आहे. परमेश्वराच्या खऱ्या स्वरूपाचा निर्णय करणे अतिशय कठीण आहे. परमेश्वर कसा आहे ? त्याला रूप, रंग, आकार काही आहे किंवा नाही ? का तो अरूप, निर्गुण आणि निराकारच आहे ? पाहावे तो, सहस्रशीर्ष, सहस्राक्ष, सहस्रपाद असे त्याचे वर्णन वेदादिग्रंथांतून केलेले आढळते; तर कोणी त्यास राम, कृष्ण, शिव, शक्ती, गजानन अशी नावे देऊन त्याची अवतारकृत्ये वर्णितात. म्हटले तर तो साकार आहे, म्हटले तर तो निराकारही आहे. तो सगुण आहे तसाच निर्गुणही आहे. निर्गुण असला तर त्याचे वर्णन कसे करावे ? निर्गुणाचे मंगल कोणत्या शब्दांनी करावे ? यांपेक्षा परमेश्वरचिंतनातच जन्म घालविलेल्या श्रीसमर्थांसारख्या महानुभव पुरुषाने परमेश्वराच्या स्वरूपाचे एके जागी जे वर्णन केले आहे त्याचा उलगडा करूनच आपण आज त्या परमात्म्याचे तर्पण करू.

समर्थ सांगतात की ' येत्न तो देव जाणावा. ' यत्न हाच परमेश्वर. परमेश्वराला यत्नदेव हे नाव समर्थांनी पदरचे दिले आहे असे नाही. या यत्नदेवाचे जुने नाव कर्मदेव असे आहे. विजयदेव, कीर्तिदेव, श्रीदेव, यशोदेव अशी दुसरीही पुष्कळ नावे याला आहेत. या यत्नदेवाचीच अखंड आराधना करून पूर्वी जनकादिक कृतार्थ झाले असा दाखला श्रीकृष्णांनी दिला आहे–**कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः** ।–इतका हा यत्नदेव जुनाट आहे. तो अनादी असून अनंत आहे.

त्याच्या प्रसादाशिवाय भाग्य किंवा थोरवी प्राप्त व्हावयाची नाही. त्याची अवहेलना करणाऱ्यांचे कधीही कल्याण होत नाही. आपल्या उपासकांचे मनोरथ पुरविण्यास तो सदैव तत्पर असतो. वस्तुतः तोच निरनिराळ्या युगात, निरनिराळ्या स्थळी राम, कृष्ण, शिव, गणपती, भवानी, दत्त इत्यादी अनेक रूपांनी नटलेला दिसतो. आपल्या भक्तांकरिता 'सुख ठेवून' यानेच स्वतः अनेक अवतारांत 'दुःख घोटले' आहे. हा रात्रंदिवस जागता असतो. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्वत्र हा गुप्त रूपाने वास करितो. हा जातिभेद पाळीत नाही, लिंगभेद ओळखीत नाही, व वयोभेद मानीत नाही. या पृथ्वीतलावर आशेचा महावृक्ष यानेच लाविला. दीनदुबळ्यांचे रक्षण करण्यासाठी हाच मूषकगरुडादी वाहनांवर बसून धावत आलेला आहे. ह्याच्या पराक्रमांचा सांगोपांग इतिहास अठराही पुराणांत सारखाच वर्णिलेला आढळतो. युगांतरीच्या देवदानवांच्या युद्धांतून हा जातीने नेहमी हजर असावयाचाच. शुक्राचार्यांकडून 'संजीवनी' विद्या मिळविण्याचे कामी यश यावे म्हणून कचाने या यत्नदेवाचीच उपासना केली होती. श्रीरामचंद्र वनवासात असताना, यानेच त्यांना धीर दिला होता. बलसागर मारुतीने जलसागर उल्लंघिला त्या वेळी त्याच्या देहात यानेच गुरुरूपाने प्रवेश केला होता. द्रोणागिरी उचलून आणण्याच्या कामी त्या बलभीमाला यानेच हातभार लाविला होता. याच्याच जोरावर अभिमन्यूने चक्रव्यूह फोडिला. भारतीय युद्धातील महावीरांना हाच उत्साह देत होता. विजयनगरचे साम्राज्य यानेच स्थापन केले. शिवाजीमहाराजांबरोबर प्रतापगडी भवानीसमक्ष याने अनेक खलव्रते केली. आग्र्याहून पेटाऱ्यांत बसून महाराज सुटून आले, त्या वेळी महाराजांना हा पोटाशी धरून बसला होता. औरंगजेबाच्या तंबूचे सोनेरी कळस संताजी घोरपडे कापून नेत असता 'शाबास! भलेबहाद्दर!' असे उद्गार यानेच काढिले. हा बाळाजी विश्वनाथाबरोबर कोकणातून वर घाटी आला. माधवराव पेशव्यांच्या सर्व स्वाऱ्यांत हा जरीपटका संभाळीत होता. यजमानाचा टोमणा ऐकून रामा प्रभुणे शागीर्द काशीस जावयास निघाला, तेव्हा यानेच त्याला उत्तेजन दिले. बुटेदरडीच्या गुहेत बसून दासोपंतांचा गीतार्णव याने मोठ्या हौसेने लिहून काढिला. अगीनदासादि शाहिरांचे पवाड्यांचा ह्यास भारी शोक आहे. थोरल्या आबासाहेबांनीं मराठेशाहीची स्थापना केली त्या वेळी हा सदैव आनंदात रंगून गेला होता.

अशा या पतितोद्धारक यत्नदेवाची भक्ती करावयाची म्हणजे सदोदित बेहद्द कष्ट करावयाचे. '**कष्टचि नाही ते निर्फळ**' असे समर्थांनी स्वच्छ लिहिले आहे. कष्टाच्याच जोडीला आशा, उत्साह, जोम, तरतरी हे सर्व गुण असल्याशिवाय यत्नदेवाच्या पूजेची सांगता होत नाही. या सर्वांच्याही आधी सत्तत्त्वाचे अधिष्ठान पाहिजे हे सांगावयास नको. यत्नदेवाची पूजा करण्याला लागणारे हे सर्व उपचार सहज मिळू शकतील अशी दशा म्हटली म्हणजे विद्यार्थिदशा. या काळात नवजीवनाचा संचार शरीरात होत असता ताजे रक्त उसळत असते. भावी आयुःक्रमाची दिशा याच काळात ठरते. यासाठी हा काळ यत्नदेवाची आराधना करण्याला फार अनुकूल गणला आहे. या वयात जर का यत्नदेवाच्या मंदिराकडे पाय वळले नाहीत, तर उदयाचा मार्ग सुटला असे निभ्रांत समजावे. '**कमाईची हाणे पाहिली उदंड । नाही तया खंड येती जाती ॥**' या तुकोबारायांच्या उक्तीप्रमाणे या जगात व्यर्थ येरझाऱ्या घालीत बसावयाचे, की आटोकाट श्रमसाहस करून कीर्तिरूपाने मागे उरावयाचे हा निश्चय याच वेळी, म्हणजे तारुण्याच्या आरंभकाळातच करावयाचा असतो, बाजारबुणग्यांत सामील व्हावयाचे किंवा वीर म्हणून गाजावयाचे हा निर्णय एव्हाच ठरवावयाचा असतो. खुर्यात मोजले जावयाचे अथवा महार्ह रत्नांत गणले जावयाचे, याचा निकाल येथेच लावून घ्यावयाचा असतो. यासाठी यत्नदेवाच्या उपासनेचे बळ, महत्त्व, फलश्रुती याच विद्यार्थिदशेत कानी पडणे अत्यवश्य आहे. ती या वयात जर कानी न पडेल, तर मग पुढे जरी दुंदुभिगर्जना केली तरी कामाला यावयाची नाही. एकदा माणूस आईतखाऊ किंवा म्हैसमंगळू यांच्या वर्गात पडला म्हणजे कामातून गेला.

आईतखाऊ, म्हैसमंगळू व कष्टाळू अशी तीन प्रकारची माणसे जगात आढळतात. पैकी आईतखाऊ होणे किंवा आयत्या पिठावर रेघा ओढणे यात मर्दपणा नाही; शिवाय ते स्वाधीनचे नाही. सबब विचारात घेण्याचे कारण नाही. म्हैसमंगळू होऊन आळसाने जांभया देत बसणे यात माणुसकी नाही. ते पशूचे लक्षण, तस्मात सर्वथा त्याज्य होय. तिसरे कष्टाळू. हेच यत्नदेवाचे पूजक. हा कष्टाळूपणाचा मार्गमात्र माणुसकीचा आणि मर्दपणाचा अतएव स्पृहणीय आहे. तथापि त्याचा अवलंब पुष्कळांकडून दुर्दैवाने करण्यात येत नाही. कारण मेहेनतीचा स्वाभाविक कंटाळाच बहुतेकांना असतो. कष्टसातत्य हीच यत्नदेवाची उपासना, पण तीच न घडल्यामुळे निराशेच्या व दुर्दशेच्या फेऱ्यात सापडून शेकडो लोक

सफाई बुडतात. या जगात येऊन काहीच न कमाविता फुकट कुजणारे कितीतरी अभागी प्राणी या भूतलावर आहेत! काय, त्यांना हात, पाय, नाक, डोळे नाहीत? आणि शिवाजी, रामदास, नेपोलियन, वाशिंग्टन यांसारखे कृतकार्य पुरुष काय षडानन, चतुर्हस्त, त्रिपाद किंवा त्रिनेत्र होते? सर्व मनुष्यासारखे मनुष्य. मग तुम्हाआम्हांत व थोर विभूतींत फरक तो काय? फरक इतकाच की, यत्नदेवाची मनोभावे आराधना विभूतिपदवीला गेलेल्या थोरांनी केली, व आपण त्याची कास धरावयास विसरलो! परिस्थितीची सबब सांगून पुष्कळ लोक स्वतःला व लोकांना फसवू पाहतात. पण नेपोलियनसारखे कर्तबगार पुरुष असा धीरोद्गार काढितात की—परिस्थिती परिस्थिती म्हणजे काय? आम्ही करू ती परिस्थिती! 'Circumstances! I make circumstances!' हे त्याचे एके प्रसंगीचे उज्ज्वल उद्गार त्याच्यासारख्या कर्मयोग्याला व यत्नदेवाच्या एकनिष्ठ पूजकालाच शोभतात! व्यक्तीला काय किंवा राष्ट्राला काय, भाग्य नाही, वैभव नाही, महत्त्व नाही असले रडगाणे कोणी गावे? ज्यांना यत्नदेवाचा अद्भुत प्रभाव कळला नाही अशा बापुडया पामरांनी!

यत्नदेवाची आराधना करणाऱ्यांना कशाचीही वाण पडत नाही. यत्नदेवाचा प्रसाद झाला म्हणजे दुर्बलांचे सबळ होतात. यत्नदेवाची कृपा झाली म्हणजे लहानाचे थोर होतात. यत्नदेवाची तृप्ती झाली की करंट्यांचे कर्तबगार होतात. यत्नदेवाचा वरदहस्त डोक्यावर पडला की भाग्यहीनांचे भाग्यवंत होतात. यत्नदेवाचा संतोष झाला की अज्ञानांचे सज्ञान होतात, आंधळ्यांचे डोळस होतात, परतंत्रांचे स्वतंत्र होतात, सामान्यांचे असामान्य होतात, निर्बुद्धांचे सुबुद्ध होतात, फार काय, पण दगडाचे देव होतात! म्हणूनच समर्थ सर्वांना उच्च स्वराने सांगतात—

*भाग्यासी काय उणे रे।*
*येत्नावाचूनि राहिले॥*

असो! श्रीसमर्थांच्या काळी श्रीयत्नदेव अत्यंत जागृत होता. परंतु आनंदभुवनातील स्वराज्य नष्ट झाल्यावर यत्नदेवाला दुःख होऊन तो झुरणीला लागल्यासारखा झाला. त्याला आपल्या ह्या भारतवर्षाची हवा मानवेनाशी झाली; म्हणूनच की काय तो हवापालट करण्याकरिता पश्चिमेकडील देशांत गेला. तेथे गेल्यावर बराच काळ तो तेथेच रमला. परंतु सांप्रत त्यास आपल्या ह्या लाडक्या

भरतभूमीची आठवण झाली असावी असे वाटते, कारण तो आता अमेरिकेच्या मार्गाने परत यावयास निघाला असून हल्ली त्याचा मुक्काम जपानात आहे. इतक्या नजीक तो पोचला असल्यामुळे आपण सर्वांनी त्याच्या स्वागताची यथोचित तयारी ठेवणे अगत्याचे आहे व म्हणूनच यत्नदेवाला प्रिय असलेल्या तरुण विद्यार्थिवर्गाला सूचना देऊन जागृत करण्याकरिता या लेखाचे द्वारे पुकारा करितो की—

*उत्तिष्ठत ! जाग्रत ! प्राप्य वरान्निबोधत !*

शेवटी सांगावयाचे इतकेच की, 'प्रतिपन्न वस्तूंचा' निर्वाह करण्याविषयी बाणा बाळगणारे लोक सर्व आपआपल्या परीने यत्नदेवाचे उपासकच आहेत. अर्थात त्यांच्या हातचे पाणी प्यालेले आणि पिणारे सर्व या परंपरेला व यत्नोपासनेला जागतील व ते व्रत अखंड चालवून यत्नदेवाच्या कृपेने कृतार्थ होतील अशी आशा आहे. —श्रीरस्तु ! विजयोऽस्तु !

क्र. 13036

: १० : # अंदमान आले

वि. दा. सावरकर

आगबोट अंदमानाच्या बंदरात येऊन खळखळखळ करीत पाण्यात पडणारा लोखंडी नांगर टाकून अुभी राहिली. हळूहळू बंदिवानांस नेणाऱ्या मोठ्या नावा आणि अधिकाऱ्यांच्या लॉंचेस त्या आगबोटीभोवती जमल्या. अुतरण्यासाठी बोटीवर आम्हांस बराच वेळ अुभे राहावे लागले. तेवढ्यात आजूबाजूस वळून अंदमान—ज्या भूमीत आता बहुधा आमरण राहावे लागणार—तिचे निरीक्षण केले. बरोबरीचे जुने बंदिवान आणि क्वचित शिपाअी काही माहिती सांगत. ते रासद्वीप; तेथे अंदमानाचा मुख्याधिकारी चीफ कमिशनर राहतो. समुद्रात ते बेट असे शोभे की, जसा अेखाद्या अप्सरेचा सरोवरात बांधलेला बंगला. खरोखरच ते बेट बेटाच्या मानाने अितके चिमुकले, आटोपशीर आणि शोभिवंत दिसे की, क्षणभर बेच्या पडलेल्या मनाचेही मनोरंजन व्हावे. दुसरीकडे अंदमानाचे समुद्रतटास लागून लांबवर व्यवस्थेने लावलेल्या नारळांच्या झाडांच्या पंक्ती डुलत होत्या. दूरवर आंब्याच्या, सुपाऱ्यांच्या, पिंपळाच्या वृक्षांचे पुंज दिसत होते जवळच घाटावर मनुष्यांचे थव्यांच्या थवे किलबिलाट करीत जमलेले होते. त्यावरच अेका चढणीचे टोकावर नारळींच्या झुलणाऱ्या छत्राखाली अेका वर्तुळाकृती तटाचे आत अेक भव्य दालन दिसले, ते किती शांत दिसले. त्याच्याभोवती नारळांची, सुपाऱ्यांची आणि केळीची बने चवऱ्या ढाळीत होती, छत्र धरून अुभी होती. वाटे हा कोणातरी सुखवस्तू वा शांतिपरायण गृहस्थाचा बंगला असावा वा पाद्र्याचा आश्रमच असावा. विचारले, ' ते भवन कसले ? ' शिपाअी म्हणाला, ' म्हणजे ? तोच " बारीबाबा " चा सिल्व्हर जेल. ' ह्या बारीबाबाचा आणि सिल्व्हर जेलचा उल्लेख शिपायांनी बोटीवरच बंदिवानांस धमकावण्यासाठी अितक्या वेळेला केलेला होता की, तो सिल्व्हर जेल आहे अितके

सांगण्यातच त्याच्या अंतर्गत स्वरूपाचा पूर्ण बोध होओील'ही त्या शिपायांची निश्चिती काही चुकीची नव्हती. तो आणखी कृपाळू होऊन न विचारता म्हणाला, 'आता तेथेच जावयाचे आहे. तेथेच बारीबाबाच्या घरी अुतरावयाचे आहे तुम्हा सगळयांना !'

आम्हा सगळ्या बंदिवानांस डोक्यावर अंथरूण देऊन व हातात थाळीपाट देअून ओळीने अुतरविण्यात आले. घाटावर येताच शिपायांच्या आणि बंदिवानांतील अधिकाऱ्यांच्या पहाऱ्यात अितर बंद्यांस वर नेण्यात येऊन मला मात्र युरोपियनांच्या पहाऱ्यात निराळे ठेवण्यात आले. तेथे घाटावर बसलो असता माझ्या मनात विचार आला की, अंदमान समुद्रात अशा स्थळी वसलेले आहे की सामुद्रिक सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याचे महत्त्व कधीही कमी होणे शक्य नाही.

पूर्वेकडील हा अंदमान–निकोबार द्वीपपुंज म्हणजे हिंदुस्थानच्या पूर्वसमुद्राची द्वारेच होत. जर ही द्वीपे हिंदुस्थानच्या अधिकाराखाली नसतील आणि जर त्यांची तटबंदी आणि लढाअू सामर्थ्य दुर्बल असेल तर पूर्वेकडून येणारा कोणताही सामुद्रिक हल्ला अेकदम कलकत्त्याचे दारावरच ठोठावण्यास कमी करणार नाही. परंतु जर अंदमानाचा द्वीपपुंज हिंदुस्थानच्या सत्तेखाली राहील आणि त्यास वैमानिक आणि सामुद्रिक ठाण्याची योग्यता प्राप्त होअून त्याची अुत्तम तटबंदी केली जाअून तेथे भारतीय नौसैन्याचा अेक बलिष्ठ भाग नेहमी पहारा करीत राहील तर पूर्वेकडील विदेशी शत्रूच्या कोणत्याही आक्रमकास पहिला धक्का अंदमानाच्या अंगणातच मारता येअील. अंदमानाची वस्ती आणि सद्य:संस्कृती सर्वस्वी भारतीयच असल्याने तो द्वीपपुंज भारताचाच अेक राजकीय विभाग असणे न्यायप्राप्तही आहेच आहे. पश्चिम समुद्रतटास लखदीव मालदीवसारखी असणारी लहान बेटेही हिंदुस्थानी राजसत्तेच्या हातून जेव्हा निघून गेळी तेव्हा युरोपीय सामुद्रिक स्वाऱ्या अगदी घराच्या दारावर येऊन मुंबअी–गोव्यास ठोठावू लागल्या. त्यास दूरचे दूरच रोखून ठेवण्याचा काहीही अुपाय हिंदुस्थानच्या तत्कालीन देशी सत्तेस करता आला नाही. आता यापुढे तरी ती चूक सुधारून पश्चिमेस लखदीव, मालदीव, दक्षिणेस सिंहलद्वीप आणि पूर्वेस अंदमान-निकोबार द्वीपपुंज ह्या सर्व स्थलांस बलिष्ठ सामुद्रिक सैन्यशिबिरांचे आणि सिंधुदुर्गाचे स्वरूप दिले पाहिजे. आज केवळ राजकीय योगायोगाने सिंगापूर हे भारतीय समुद्राचे नाके आहे. अंदमान हे

नैसर्गिक नाके आहे. कारण अंदमान सिंहलद्वीपाप्रमाणेच भारताचाच अेक नैसर्गिक आणि सांस्कृतिक अंश आहे.

भावी भारताचे बलिष्ठ नौसाधन ( आरमार ) अंदमानाच्या अंगणात सिंधुदुर्गापुढे पहारा करीत माझ्या कल्पनातरंगात तरंगू लागते तोच " चलो, अुठाव बिस्तरा " म्हणून अेका शिपायाने अुद्धटपणाने म्हटले; कारण युरोपियन अधिकारी जवळ अुभा होता. अिंग्रजांसमक्ष हिन्दी राजकीय बंदिवानांस जितके अधिक अुर्मटपणाने आपण वागवू तितके बढतीस आपण अधिक योग्य ठरू अशी प्रत्येक हिन्दी पोलीस वा सैनिक शिपायाची अनुभवाने दृढ समजूत झालेली असते. अंदमानास होणाऱ्या अपमानाचे हे अुर्मट वाक्य सूतोवाचच होते. मी अुठलो, बिस्तरा डोक्यावर घेतला, हातात थाळीपाट धरले, पायातली जड बेडी कमरेस नीट बांधली आणि अुभा राहिलो. एकदम अुंच कळ्यावरून कोसळून पडले असता जसे शरीरास लागते तसेच अेखाद्या अुच्च विचाराच्या शिखरावरून अेकदम अेखाद्या विवश, प्रतिकूल आणि रुक्ष विचाराच्या गर्तेत ढकलले गेले असता मनासही लागते. तरीही माझ्या कल्पनातरंगात दिसू लागलेल्या भावी भारताच्या त्या बलिष्ठ नौसैन्यास भविष्यकाळाच्या स्वाधीन करून भारताच्या कठोर आणि विवश वर्तमानकाळाच्या त्या 'चलो अुठाव बिस्तऱ्यास' तोंड देण्यास मी चटकन सज्ज झालो. घाटावरून निघून अेका चढणीवर मला चढावयास सांगितले. अनवाणी आणि बेड्यांनी जखडलेल्या पायांनी मला चढण्यास अुशीर लागू लागला. शिपाअी 'चलो, जलदी चलो' करू लागला. अेकदा गोरा अधिकारी शिपायास म्हणाला, 'चालू दे त्याला, घाअी कशाला करतोस?' माझ्या मनात ती चढण चढताना अेकच विचार घोळत होता. मी समुद्रावरून अंदमानामध्ये शिरणारी ही वाट चढून वर जात आहे. अंदमानामधून भारतास परत जाण्यासाठी समुद्राकडे या मार्गाने या जन्मात पुनः मी कधी ही वाट अुतरून खाली येणार आहे का?

थोड्याच वेळात चढण संपून सिल्व्हर जेलचा दरवाजा आला. लोखंडी बिजागऱ्यांच्या दाढा करकरू लागल्या व त्या तुरुंगाच्या दाराचा जबडा अुघडला. मी त्यात घुसलो. तो जबडा बंद झाला, तो पुनः अकरा वर्षांनी परत अुघडला?

दारात पाय टाकताच दोन गोऱ्या सार्जंटांनी मला दोनही हातांत धरून अुभे केले. अितक्यात आजूबाजूच्या पहारेकऱ्यांत कुजबूज झाली 'बारीसाहेब आता है!'

बारीसाहेबांहून त्यांनी कोणतीही अधिक निष्ठुर वा कठोर व्यक्ती पाहिली नसल्याने ते माझ्या तोंडावरही ते नाव अैकताच काय भावना अुद्भवतात ते पाहू लागले. पण मी त्या भीषण भव्य तुरुंगाच्या दोन लोखंडी फाटकांच्या मध्यंतरी असलेल्या भागास भूषविण्यासाठी जे अनुरूप अलंकार धारण केलेले होते ते पाहण्यात गर्क झालेलो होतो. निरनिराळ्या प्रकारच्या हातकड्या अेकात अेक गुंफून त्यांची ही हिडिस फुले भिंतीवर लाविलेली होती. मोठमोठ्या पायबेड्या, दंडबेड्या आणि मनुष्याच्या शरीरास कष्ट देणारी अशीच अन्य आयुधे समोरच्या भागावर ओळीने लोंबकळत होती. त्या अुग्रतेची अेक शोभाच दिसत होती. त्या बेयॉनेट–बंदूक–बेड्या–हातकड्याच्या अघोर अलंकारांनी तो भीषण तुरुंग असा शोभू लागे की, जसा अेखादा मांग अुत्तम कपडे घालून फाशी द्यावयास येताना शोभतो. देशांच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे अितिहास वाचताना आणि तत्रस्थ निर्वासितांची आणि दंडितांची आत्मवृत्ते अवलोकन करताना ज्या दृश्यांची वर्णने अंगावर काटा अुभा करीत असत, त्यांतील वर्णन अक्षरशः लागू पडणारे हे दृश्य आहे. दोघा अुद्धत सार्जेटांनी धरून मला तेथे अुभे केले आहे की त्या त्या दृश्याच्या भीषणतेच्या जबड्यात माझे मनोधैर्य चुरले जावे. ती भीषणता मजकडे टक लावून डोळा वटारून पाहात होती. मीही तिच्याकडे डोळे वटारून पाहात होतो. मी तिच्याकडे डोळ्यास डोळा भिडवून पाहात होतो. दोघांची ओळख झाली. मला अेक अद्‌भुत समाधान वाटू लागले की, तर मग मीही जे वाचले ते स्वतः अनुभूत केले आणि हा येथे त्या दृश्याच्या जबड्यात, न चुरला जाता निष्कंप, निर्भीड अुभा राहिलो आहे! ब्रिस्टलच्या लंडन येथील तुरुंगात असताना मी "दोन मूर्ती" म्हणून अेक कविता केलेली होती. तिची चरणे माझे मन म्हणू लागले. आणि जय······! असे अुद्गार माझ्या हृदयात अुठू लागले.

मी त्या मनोविकाराच्या वावटळीतून किंचित सुटताच बाजूस पाहिले, तो अेक लठ्ठ काठी हातात घेतलेला गलेलठ्ठ गोरा अधिकारी मजकडे पाहात अुभा राहिलेला मला दिसला. हेच बारीसाहेब होत. आपण येणार ही वार्ता हेतुपूर्वक माझ्या कानांवर त्यांनी घालविली होती आणि आता आपल्या वाटेकडे याचे भयभीत डोळे लागतील अशा नेहमीच्या अपेक्षेने ते आले होते; पण त्याच वेळेस माझे मन वरील विजयी विचारात मग्न झाल्याने मला ते केव्हा आले ते कळलेही नाही. त्या मिनिटात त्यांनाही मजकडे पाहात राहावेसे वाटले असावे. मला ते गुपचुप

निरीक्षित असता माझी त्यांच्याकडे दृष्टी पडताच त्यांनी पाहिले न पाहिलेसे करून त्या सार्जंटास सांगितले, ‘ Leave him; he is not a tiger ’ ( सोडून द्या त्याला, तो काही कोणी वाघ नाही आहे ! )

नंतर मजकडे ती जाडी काठी रोखून ते म्हणाले, “ Well, are you the man who tried to escape at Marseilles ” ? ( मार्सेलिसला पळून जाण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य तो तूच काय ? )

त्यांच्या या अुद्धत स्वरात विचारलेल्या प्रश्नास तितक्याच अुद्धत पण संयत स्वरात मी अुत्तर केले, “ Yes, why ? ” ( होय, का ? )

माझ्या अुत्तराने बारीसाहेबांचा स्वर थोडा मावळला. केवळ जिज्ञासू ध्वनीने ते म्हणाले, “ Why did you do that ? ” ( तसे का केलेस ? )

“ कारणासाठी ” मी म्हणालो, “ त्यातील अेक कारण हे की, त्या सगळ्या त्रासातून सुटका व्हावी. ”

“ परंतु त्या त्रासात तुम्ही स्वतःच पडलेत ना ? ”

“ होय, ते खरे आहे. कारण त्या त्रासात तसे स्वतः होअून पडणे हे मला माझे कर्तव्य वाटले आणि त्या त्रासातून शक्य तर सुटणे हेही कर्तव्यच वाटले. ”

“ हे पाहा ” बारीसाहेब अगदी मनमोकळेपणा दाखवून हसत म्हणाले, “ मी काही अिंग्रज नाही. मी आयरिश आहे. ”

मी मध्येच म्हणालो, “ आणि अिंग्रज असतेत तरी तुमच्याविषयी केवळ तेवढ्यासाठी माझ्या मनात काहीही अपूज्य भाव वा तिरस्कार अुत्पन्न झाला नसता. इंग्लंडमध्ये माझ्या ताज्या तारुण्याची काही वर्षे मी घालविली आहेत आणि त्या लोकांच्या अनेक सद्‌गुणांचा मी चाहता आहे. ”

“ पण मी आयरिश आहे हे अशाकरिता सांगतो की, लहानपणी मीही अिंग्रजांच्या हातून आयर्लंड सोडविण्यासाठी चाललेल्या स्वातंत्र्यवीरांच्या झुंजीत भाग घेतला ! पण आता माझे मन पालटले आहे. हे पाहा, तुम्हांस मित्रत्वाच्या नात्याने सांगतो की, तुम्ही अजून तरुण आहात आणि मी तुमच्यापेक्षा कितीतरी पावसाळ्यांनी वडील आहे. ” ( You are still young but I am advanced in age. )

मी हसत मध्येच विचारले, “ And don’t you think that perhaps that may be the reason of the change that has come

over you ? Not increasing wisdom but dwindling energy ? "

गोंधळल्यासारखे होअून साहेब म्हणाले, " तुम्ही बॅरिस्टर आहात, मी अेक अशिक्षित बंदिवान–जेलर आहे. पण माझ्या अुपदेशास तुम्ही तुच्छ मानू नका. खून ते खून–खून कधी स्वातंत्र्य देणार नाहीत. " ( Murders are murders and they will never bring independence. )

" अर्थात; पण हे तुम्ही आधी आयर्लंडच्या सिनफीनवाल्यांना का शिकवीत नाही ? आणि मी हत्येचा पक्षपाती आहे हे तुम्हांस कोणी सांगितले ? "

विषय पालटीत ते म्हणाले, " आता सुपरिंटेंडंट येणार आहेत, वास्तविक पाहता मी तुमच्याशी राजकारणात बोलणे नियमाविरुद्ध आहे. पण तुमच्यासारख्या विद्वान, तरुण आणि प्रख्यात मनुष्यास अशा बदमाशांच्या टोळीत पाहून अंतःकरण तळमळते, म्हणून सांगितले इतकेच. आता मागे काय झाले ते झाले. त्याच्याशी मला काही कर्तव्य नाही. केवळ येथे तुम्ही कारागाराचे नियम पाळलेत की माझे काम झाले. नियमाविरुद्ध कधी वागू नका, नाही तर मला शिक्षा करावी लागेल, " हे सांगणे किती न कळत परिहासाने भरलेले होते हे त्यांच्या ध्यानातही आले नाही.

" आणखी अेक सावधतेची सूचना तुम्हांस करणे मी माझे कर्तव्य समजतो की, तुम्ही येथून पळून जाण्याचा प्रयत्न करण्याच्या भरीस पडला तर भयंकर संकटात पडाल. ह्या तुरुंगाभोवती मोठमोठी गहन अरण्ये असून त्यांत महाक्रूर रानटी लोक राहात असतात. ते तुमच्यासारखेच कोवळे पोर पाहतात व त्यास काकडीसारखे खाअून टाकतात ! हसता काय ? –काय जमादार, मी म्हणतो ते खरे की खोटे ? " जमादार अर्थातच मुजरा करीत म्हणाला, " अक्षरशः खरे साहेब ! "

" मलाही ते माहीत आहे " मी म्हणालो, " मी पकडला जाताच प्रथमतः जे पुस्तक आणवून वाचले ते अंदमानाचे सरकारी अितिवृत्त हे होय. पोर्ट ब्लेअर हे मार्सेलिस नाही हे मी जाणून आहे. "

" ठीक, तर हे पाहा, आता माझे मताप्रमाणे चला, मी तुमच्या अुपयोगी पडेन. हं जमादार, घेऊन जा यांना आत आणि त्या सात क्रमांकाच्या चाळीच्या वरच्या मजल्यातील कोठडीत बंद करून ठेव. "

: ११ :

# स्वतंत्र भारताकरिता शिक्षणपद्धती

**के. ल. दप्तरी**

मनुष्य सुखी होण्यास, पुरेशी संपत्ती, आरोग्य आणि चांगले विचार या तीन गोष्टींची आवश्यकता आहे. अर्थात त्या तीन गोष्टी मिळविण्यास आवश्यक असे खरे ज्ञान देणे आणि खरे ज्ञान मिळविण्याच्या रीतीचेही ज्ञान देणे हा शिक्षणाचा हेतू असला पाहिजे. शिवाय त्या खऱ्या ज्ञानाला अनुरूप अशी क्रिया करण्याची सवय लावणे हाही शिक्षणाचा एक हेतू असला पाहिजे.

हे हेतू साध्य होतील अशी शिक्षणपद्धती पाहिजे. ती ठरविण्याकरिता प्रथमतः ज्ञान कसे होते ह्याची मीमांसा केली पाहिजे. कोणीही मनुष्य स्वतः म्हणजेच स्वतंत्रपणे अनुभव घेऊन व विचार करून ज्ञान मिळवितो, तो ज्ञान मिळविण्याच्या रीतीचा एक प्रकार आहे. त्यास स्वतंत्रपणे ज्ञान मिळविणे किंवा संशोधन म्हणतात. दुसऱ्याच्या सांगण्याप्रमाणे अनुभव घेऊन व विचार करून ज्ञान मिळविण्याच्या रीतीचा दुसरा प्रकार. ह्यासच शिक्षण म्हणतात. शिक्षणाचाच एक अपूर्ण प्रकार आहे त्यास उपदेश म्हणतात. ह्यात दुसऱ्याने सांगितल्याप्रमाणे अनुभव घेतलेला नसतो किंवा विचार केलेला नसतो. उपदेशाने प्राप्त होणाऱ्या गोष्टीला ‘ माहिती ’ असे म्हणावे; ज्ञान म्हणणे योग्य नाही, तिला ज्ञानकल्प म्हणावे. माहितीची ज्ञानात परिणती होते किंवा होत नाही. उदाहरणार्थ, लंडन हे एक शहर आहे ह्या ज्ञानकल्पाची लंडनला गेल्याने ज्ञानात परिणती होते. शिवाजी नावाचा राजा होता ह्या ज्ञानकल्पाची ज्ञानात परिणती केव्हाच होणार नाही. ज्ञानकल्पाची परिणती ज्या अर्थी ज्ञानात होते त्या अर्थी उपदेशही उपयोगी आहेच व तो शिक्षणाचाच एक भाग समजला पाहिजे.

वरील विवेचनावरून दिसून येईल की, शिक्षण देताना एक खबरदारी जरूर घेतली पाहिजे व ती ही की, उपदेशाने पूर्ण ज्ञान होते अशी समज शिक्षितांची

केव्हाही होऊ देऊ नये. पूर्वीच्या शिक्षणात हाच मोठा दोष होता. वेद अपौरुषेय आहेत. शास्त्रेही अपौरुषेय आहेत; त्यावरून प्राप्त होणारे ज्ञान बिनचूक व परिपूर्ण आहे अशी शिक्षितांची समज गुरू करून देत. ह्यामुळे चुकीच्या ज्ञानाची परंपरा चालूच असे आणि शास्त्रातील ज्ञानाची वाढ खुंटून जाई. ह्यामुळे भारताचे फार नुकसान झाले आणि तो इतर देशांच्या मागे राहिला. संशोधनाने म्हणजेच स्वतःच्या स्वतंत्र विचाराने व अनुभवाने, मागील ग्रंथांतील चुका समजून येतात, त्याचा अर्थ बिनचूक समजतो आणि ज्ञानात नवीन भरही पडते आणि कोणताही ग्रंथ, वेद देखील, बिनचूक व परिपूर्ण आहेत असे मानता येत नाही. ह्या गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्याची खबरदारी ह्यापुढे घेतलीच पाहिजे.

ह्याचा अर्थ हा नाही की, कोणत्याही विषयाचे मागील ग्रंथ वाचू नयेत किंवा न वाचले तरी चालेल. कोणत्याही विषयाचे मागील ग्रंथ वाचणे पुढच्या लोकांनी बंद केले तर, प्रत्येक मनुष्यास ज्ञान मिळविण्याची क्रिया सुरुवातीपासूनच करावी लागेल आणि त्यामुळे ज्ञानाची वाढ होणार नाही. मागच्या मनुष्यांनी मिळविलेले ज्ञान थोड्या काळात व थोड्या श्रमांनी ग्रंथांवरून जाणून घेऊन, त्यापुढचे ज्ञान मनुष्य मिळवीत असतो, त्यामुळे मनुष्यसमाजाचे ज्ञान दिवसेंदिवस वाढत आहे. ह्या कारणामुळे कोणत्याही विषयाच्या मागील ग्रंथांचे ज्ञान आवश्यकच आहे, आणि ग्रंथ समजण्याचे ज्ञान म्हणून भाषा शिकणेही आवश्यकच आहे.

हे असे ग्रंथरूपाने संगळलेले ज्ञानही बहुतेक अनंत आहे आणि हे सर्व प्रत्येकास शिकवावे की काय असा प्रश्न येतो, त्याचा विचार करू. ग्रंथांतील ज्ञान मिळविण्याचे साधन म्हणून प्रत्येकास भाषा म्हणजे लेखन व वाचन शिकविलेच पाहिजे. अर्थात मातृभाषा प्रथम शिकवून मातृभाषेतील ग्रंथसंपत्ती भरपूर नसेल तर ज्या भाषेत ग्रंथसंपत्ती भरपूर असेल अशीही एखादी दुसरी भाषा, उदाहरणार्थ संस्कृत किंवा इंग्लिश शिकणाऱ्याच्या इच्छेप्रमाणे शिकवावी. आज हिंदुस्थानातील सर्वच मातृभाषांतील ग्रंथसंपत्ती खरोखर फार तुटपुंजी असल्यामुळे आज ज्याला अनेक गहन शास्त्रांतील ज्ञान मिळवावयाचे आहे त्याला इंग्रजी आणि काही शास्त्रांकरिता संस्कृत शिकण्याशिवाय दुसरा उपाय नाही. मातृभाषेतून सर्व गहन शास्त्रांचे ज्ञान देण्याविषयी प्रयत्न सुरू झाले असले तरी योग्य ग्रंथांच्या अभावामुळे ते सिद्धीस जाणार नाहीत, कारण योग्य ग्रंथ लिहून व छापून काढणे फार कठीण व खर्चाचे काम आहे. असो. निदान मातृभाषा तरी प्रत्येकास शिक-

विलीच पाहिजे. ज्याला इतर भाषा शिकावयाच्या असतील त्याला त्या शिकविण्यापूर्वी मातृभाषेचे व्याकरण जरूर शिकवावे. कारण मातृभाषेचे व्याकरण माहीत असल्यास इतर भाषांचे व्याकरण समजणे सोपे जाते आणि इतर भाषा त्या भाषेच्या व्याकरणाच्या साह्याने शिकणे सोपे जाते. इतर भाषा संभाषणद्वारा शिकविण्याची जी पद्धती अलीकडे निघाली आहे तिचा त्याग केलाच पाहिजे. लहान मुले मातृभाषा संभाषणद्वारा शिकतात, हे पाहून ही पद्धती चालू केली, तथापि लहान मुलांभोवती जसे मातृभाषेचे घनदाट वातावरण असते तसे परभाषेचे वातावरण उत्पन्न करता ये नाही, आणि संभाषणद्वारा परभाषा शिकविण्यास जितका कुशल शिक्षक पाहिजे तितका कुशल शिक्षक क्वचितच असतो. म्हणून संभाषणद्वारा परभाषा शिकविण्याची पद्धती टाकूनच दिली पाहिजे.

प्रत्येकाला शिकविलाच पाहिजे असा दुसरा विषय अंकगणित हा होय. आयव्ययाचा व्यवहार अंकगणिताच्या ज्ञानाशिवाय करता यावयाचा नाही, हे उघडच आहे. ह्याविषयी जास्त लिहिण्याची गरज नाही.

प्रत्येकाला शिकविलाच पाहिजे असा तिसरा विषय आरोग्यशास्त्र हा होय. आरोग्याशिवाय मनुष्य सुखी असू शकत नाही हे उघडच आहे. म्हणून आरोग्यशास्त्र प्रत्येकास माहीत पाहिजेच व अर्थात शिकविले पाहिजेच. पण ह्याकडे सांप्रत फारच दुर्लक्ष आहे. आरोग्यशास्त्राचे स्वास्थ्यहरण आणि रोगहरण असे दोन भाग आहेत. त्यांपैकी पहिल्या भागाचे थोडेसे व पुष्कळ अंशी चुकीचे असे ज्ञान आरंभी आरंभी वाचनपाठाच्या पुस्तकांतूनच दिले जाते. पण दुसऱ्या भागाचे ज्ञान अंशतः तरी केव्हाच दिले जात नाही. सांप्रत अनेक चिकित्सापद्धती— आयुर्वेद, ॲलोपथी, होमिओपाथी, वर्णचिकित्सा, जलचिकित्सा वगैरे—चालू आहेत. त्यांपैकी खरी रोगहारक चिकित्सा कोणती हे तरी जाणणे जरूर आहे. पण त्याचेही ज्ञान केव्हाच दिले जात नाही. त्यामुळे मनुष्याच्या हातून भयंकर चुका होतात व त्यांचे परिणाम त्यास जन्मभर भोगावे लागतात व त्यामुळे राष्ट्राचेदेखील नुकसान होतेच. एकूण शिक्षणाच्या ह्या भागासंबंधीची परिस्थिती फारच असमाधानकारक आहे.

प्रत्यक्ष शस्त्रक्रियेशिवाय आरोग्यशास्त्राचे इतर सर्व भाग प्रत्येकास शिकविले पाहिजेत असे वरील प्रतिपादनावरून दिसून येईल. शस्त्रक्रिया शिकण्यास दीर्घकाळ फार परिश्रम करावे लागतात व हस्तकौशल्य मिळवावे लागते, म्हणून

शस्त्रक्रिया प्रत्येकास शिकविणे शक्य नाही आणि ते जरूरही नाही. कारण शस्त्रक्रियेचे प्रसंग फारच थोडे असतात आणि त्या मानाने औषधियोजनेचे प्रसंग फारच अधिक असतात—इतके अधिक असतात की प्रत्येक कुटुंबात एक औषधियोजक वैद्य असला तरी तो पाहिजेच असतो. म्हणून प्रत्येकास स्वास्थ्यरक्षण व औषधियोजना हे भाग शिकविलेच पाहिजेत. प्रत्येकास गायन शिकविलेच पाहिजे असा निर्णय अलीकडे केला गेला आहे, त्यापेक्षा प्रत्येकास आरोग्यशास्त्र शिकविलेच पाहिजे हा निर्णय फार अधिक उपयुक्त आहे ह्यात संशय नाही.

आरोग्यशास्त्राइतकाच महत्त्वाचा विषय कर्तव्यशास्त्र हा आहे. आईबापांशी, घरच्या इतर लहानमोठ्या माणसांशी, शेजाऱ्यांशी, ग्रामस्थांशी, स्वदेशस्थांशी, परदेशस्थांशी, मित्रांशी, शत्रूंशी, पत्नीशी, पतीशी आणि सरकारशी कसे वागले असता सुख होईल ते प्रत्येकास शिकविलेच पाहिजे. शरीराच्या दृष्टीने जसे आरोग्यशास्त्र आवश्यक आहे, तसेच मनाच्या दृष्टीने कर्तव्यशास्त्र आवश्यक आहे. शरीर व मन ह्या दोहोंच्याही सुस्थितीवर सुख अवलंबून आहे.

वर सांगितलेल्या गोष्टी प्रत्येकास शिकविल्या पाहिजेत. शिवाय प्रत्येकास कोणतातरी एखादा धंदा शिकविलाच पाहिजे. धंदा म्हणजे व्यक्तीस किंवा राष्ट्रास उपयोगी अशा वस्तू निर्माण करणे किंवा अशा क्रिया करणे, जसे धान्य किंवा वस्त्र निर्माण करणे. शस्त्रक्रिया करणे, लढणे, गाणे वगैरे. ज्याचे उपजत गुण ज्या धंद्यास उपयुक्त असतील तो धंदा त्याने शिकावा असा सामान्य नियम घालता येतो. उपजत गुण वंशपरंपरेने उतरतात तथापि ह्या नियमास अपवादही क्वचित दिसून येतात. म्हणून बापाचाच धंदा मुलाने शिकावा असा सामान्य नियम असावा. तथापि इतर धंदा शिकण्याची आवड किंवा योग्यता कोणात दिसून आली तर तो शिकण्यास त्यास प्रतिबंध करू नये. कोणता तरी निदान एक धंदा प्रत्येकाने शिकलाच पाहिजे असा मात्र नियम असावाच.

आतापर्यंत प्रत्येकाने काय शिकावे ते दाखविले. ह्याला सामान्य शिक्षण किंवा प्राथमिक शिक्षण असे म्हणतात. एवढ्याने राष्ट्राच्या किंवा समाजाच्या गरजा भागत नाहीत. निरनिराळ्या धंद्यात दिवसेंदिवस सुधारणा करणे आणि उत्तम शिक्षक तयार करणे या गोष्टींची राष्ट्रास फार आवश्यकता आहे. ह्याकरिता उच्च शिक्षणाची गरज आहे. सर्व शास्त्रांचे व कलांचे सांगोपांग ज्ञान व कौशल्य

मिळवून त्यात संशोधनाने भर टाकणारे विद्वान व कलावंत राष्ट्रास पाहिजे असतात. उच्च शिक्षण हा राष्ट्राचा प्राणच होय असे म्हटले पाहिजे.

हे उच्च शिक्षण देणाऱ्यास व घेणाऱ्यासही मला एक महत्त्वाची सूचना करावयाची आहे. आजचे आमचे उच्च शिक्षित विद्वान एक तर पुरातन भारतीय ऋषींचे गुलाम बनतात किंवा पाश्चात्त्य पंडितांचे गुलाम बनतात. उदाहरणार्थ, वैद्यकाचा अभ्यास करणारा एकतर आयुर्वेदाचा अभिमानी बनतो किंवा ॲलोपथीचा अभिमानी बनतो. वेदान्त शिकणारा शंकराचार्यांचा अनुयायी होतो किंवा स्पेन्सरचा अनुयायी होतो. अशी गुलामी वृत्ती उपयोगी नाही. उच्च शिक्षणाचा हेतू वस्तुनिष्ठ खरे ज्ञान मिळविणे व वाढविणे हाच आहे व तो सिद्धीस जाण्याकरिता, स्वतंत्र विचार व स्वतंत्र अनुभव ह्यांचीच गरज आहे, हे लक्षात ठेवून उच्च शिक्षितांनी वागले पाहिजे. स्वतंत्र विचाराने व अनुभवाने मनुष्य चुकला तरी चालेल, कारण तो आपली चूक केव्हा तरी दुरुस्त करील. पण गुलाम झालेला मनुष्य आपली चूक केव्हाही दुरुस्त करणार नाही. शेवटी गुरूच्या वर्तनाविषयी सूचना करून हा निबंध समाप्त करतो. " बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले" ह्यातील तत्त्वाला अनुसरून गुरूने वर्तन ठेवावे म्हणजे गुरूचे वर्तनच मुलांस शिक्षण देत असते. शिष्यास दिलेल्या ज्ञानाला अनुरूप अशी क्रिया शिष्याकडून करवून घेणे हे शिक्षकाचे एक कर्तव्य आहे. शिक्षकच ज्ञानाला अनुरूप असे वर्तन करीत असेल, तर ते कर्तव्य करणे सुकर होते, कारण गुरूचे वर्तन पाहून त्या उदाहरणानेच शिष्य आपोआपच गुरूसारखे वर्तू लागतात. त्यांस त्याकरिता शासन ( दंड ) करण्याची गरज बहुतेक पडत नाही, आणि आपल्या उपदेशाविरुद्ध वर्तन करणाऱ्या गुरूंच्या शासनाचा शिष्यावर चांगला परिणाम होत नाही.

ह्या निबंधात सांगितलेल्या तत्त्वाकडे लक्ष देऊन शिक्षणाधिकारी व शिक्षक यापुढे वागतील अशी आशा करून हा निबंध संपवितो.

◎ ◎

: १२ :

# गिरिजन आणि परिजन

श्री. म. माटे

आपण ख्रिस्ती मिशनऱ्यांना नावे ठेवतो. नाना प्रकारच्या कारवाया करून आणि पुष्कळदा नाना प्रकारची आमिषे दाखवून ते हिंदुधर्मातील लोकांना बाटवितात, याचे आपल्याला स्वाभाविकपणेच मोठे वैषम्य वाटते. यावर प्रतिक्रिया सुरू होऊन ख्रिस्ती धर्मात गेलेली माणसे परत आपल्या धर्मात आणण्याची मोहीम जोरात चालू झालेली आहे व तिला यशही चांगले येत आहे. ठिकठिकाणचे ख्रिस्ती मठ गांगरल्यासारखे झाले आहेत आणि काही काही ठिकाणचे मठ तर अजीबातच उठले आहेत. ह्या मठवाल्यांना युरोप व अमेरिका येथील श्रीमंतांकडून आणि सुप्रतिष्ठित धर्मसंस्थांकडून चांगल्या प्रकारचा आश्रय असे; परंतु अलीकडे अलीकडे हा आश्रय दोन कारणांनी तुटू लागला आहे. आश्रय देणाऱ्यांच्या कानावर ही वर्दी गेली की, हिंदू समाजात प्रतिक्रियेला सुरुवात झाली आहे व वर्ष वर्ष वेढा देऊन तो मठ एखादा मनुष्य ख्रिस्ती बनवितो. त्याच्या छत्राखालून बेटेच्या बेटे परत हिंदुधर्मात जात असतात. अर्थात असला हा आतबट्ट्याचा व्यापार करीत राहणे त्यांना नकोसे झाले असले पाहिजे. पण याहीपेक्षा बलवत्तर कारण म्हणजे ख्रिस्ती धर्माच्या प्रसारावरची त्यांची श्रद्धाच उडाली आहे, आणि खुद्द ख्रिस्ती धर्माविषयीसुद्धा, आधुनिक कालाला अनुसरून त्यांच्या मनात साशंकता उद्भवली आहे. अर्थात कोठेतरी पृथ्वीच्या पाठीवर चार माणसे आपल्या पैशाने ख्रिस्ती झाली म्हणून त्यांच्या आत्म्याचे तारण होणार आहे या गोष्टीतला दूरान्वय त्यांना पटेनासा झाला आहे, आणि म्हणून त्यांनी आपल्या दातृत्वाचा हात एकदम आखडता घेतला आहे. अशा प्रकारे हिंदुसमाजातून सुरू झालेली प्रतिक्रिया आणि आश्रयदात्यांचे आटत चाललेले दातृत्व यांच्या माऱ्याने जिकिरीस येणारे ख्रिस्ती धर्माचे मठ लटपटू लागले असावे हे बरोबरच आहे.

परंतु आपले समाधान एवढ्याने होता उपयोगाचे नाही. आपण ख्रिस्ती मिशनऱ्यांना हसतो हे ठीक आहे, पण त्यांच्यापासून एक गोष्ट मात्र निःसंशय शिकण्यासारखी असते. जनसेवेचे व्रत त्यांना पटलेले असते; ते आपल्याला अजून पटावयाचे आहे. सुमारे ४५ वर्षांपूर्वी मी एकदा पाडळीच्या स्टेशनावरून साताऱ्यास टांग्यातून चाललो होतो. माझ्या शेजारी एक युरोपियन बाई बसली होती. तिच्या मांडीवर आपल्या इकडल्या कोणातरी अस्पृश्याची मुलगी होती. टांग्यात बसल्यावर काही वेळाने अर्थातच आमचे बोलणे सुरू झाले. त्या मुलीला व तिला पाहून मला मोठा विस्मय वाटून मी तिला विचारले, ' आपण कोठून आला ? ' ती म्हणाली की, ' मी स्वित्झर्लंडमधील आहे, मला अनेक भाषा येतात; येशूच्या धर्माचा प्रसार करण्यासाठी मी हिन्दुस्थानात आले आहे. ' आता या स्विस बाईने स्वित्झर्लंडमधील आपल्या घरातून उठावे आणि स्वधर्मप्रचारासाठी गरिबी पत्करून हिन्दुस्थानात राहावे, हीच गोष्ट अगोदर विस्मयकारक आहे. परंतु ती धर्मप्रचारासाठी जर आली होती तर येशूचा संदेश लोकांपुढे सांगून तिने संतोष मानला असता की झाले असते. पण येशूच्या धर्माचा प्रसार केवळ तत्त्वांच्या प्रतिपादनाने होत नाही. धर्मप्रसारकांना लोकसेवेचे व्रत पत्करावे लागते. दुःखितांचे दुःख निवारण करणे, रुग्णांची परिचर्या करणे आणि अडाण्याला शिक्षण देणे ही कामे करणे त्यांना अवश्यच असते. तत्त्वप्रतिपादनाला जर या गोष्टींचा पाठिंबा नसला तर आपल्या धर्मातील भूतदयेचा संदेश लटका पडेल असे त्यांना वाटते, आणि म्हणून या दूरस्थ बाईने महारवाड्यातील मुलांना शिकविण्याचे काम पत्करले होते.

पुष्कळ तरुण लोक विचारतात की, काय काम करावे ? ज्याच्या त्याच्या कानाशी राजकारणाचा पडघम वाजतच असतो. समाजाकडे लक्ष द्यावयास फार थोड्यांना फुरसत उरते. हिंदू लोकांच्या अंगी समाजाकडे बघण्याची वृत्ती जोपर्यंत उत्पन्न होत नाही, तोपर्यंत त्यांचे लोकशाही राजकारणसुद्धा पुढे सरणार नाही. लोकांत शिरावे ते त्यांना काहीतरी उच्च दर्जाचे सांगण्यास शिरावे, त्यांचे रागलोभ जागृत करावे आणि त्यांना कोणत्या ना कोणत्या तरी चळवळीत गोवून घ्यावे, एवढ्यावरच हे लोक संतुष्ट असतात. म्हणजे असे की, या लोकांचा त्यांना उपयोग करून घ्यावयास हवा असतो. कोणी कोणत्याही मताचा असो, त्याच्या विचाराची धाटणी हीच असते. लोकही ओळखून असतात. हे आपल्याकडे का आलेले आहे, याचा उमग त्यांना लवकर पडतो. त्यांच्या मनात आपला उपयोग

सरपणासारखा करून घ्यावयाचा आहे, हे कळण्याचा चतुरपणा अगदी अशिक्षित असूनसुद्धा त्यांच्या अंगात असतोच असतो, आणि मग ह्या आलेल्या पाहुण्यांच्या संबंधाने काही सौद्याची बुद्धी त्यांच्या मनात उत्पन्न होते. आपल्या समाजातील अज्ञ लोकांची अपेक्षा खरोखर अशी असते की, कोणीतरी आपल्या बऱ्यासाठी झटावे, आपले अज्ञान कोणीतरी घालवावे, आपल्या अडीअडचणीला त्यांनी उभे राहावे व आपल्याला जर कोणी छळणारे असले तर आपली कड घेऊन कोणी त्यांचा प्रतिकार करावा. काय काम करावे म्हणून विचारणाऱ्या तरुण हिंदू मुलांना मी ही गोष्ट हजारदा सांगितली आहे की, काम पुष्कळ आहे पण ते तुमच्या चवीचे असेलच असे माझ्याने म्हणवत नाही. काही विशेष प्रकारचा डांगोरा असला, वर्तमानपत्रात नौबत वाजण्यासारखी असली किंवा 'तुरत दान महापुण्य' या पद्धतीचे एखादे काम असले तर ते तुम्हाला हवे असते. पण मी जे काम तुम्हांला सांगेन त्यात कीर्ती नाही, जाहिरात नाही अन् चुटपुटतेपणाही नाही. तुम्ही जनसेवेचे व्रत पत्करा. असे म्हटले म्हणजे या उत्साही तरुणांना ही फार दूरची गोष्ट आहे असे वाटू लागते. त्यांना "पी हळद अन् हो गोरी" असे काहीतरी घडावयास हवे असते; अर्थात माझ्या उत्तराने त्यांची निराशा होते.

सर्व तरुणांना कळावयास हवे की, हिंदू समाजात आर्त प्रजा फार आहे. त्यांना कोणीतरी वाली हवा असतो. अगदी निरिच्छ आणि निर्लोभ मनाने ह्या लोकांच्या सेवेला प्रवृत्त होणे, हे हिंदुस्थानच्या उद्धाराला आणि त्याच्या भावी सामर्थ्याला अत्यंत अवश्य आहे. ख्रिस्ती मिशनरी त्यांच्यात शिरतात म्हणून नुसते जळफळण्यात काहीच मतलब नाही. ते जनसेवा करतात, पण त्यांना आपल्या धर्माचा प्रसार करावयाचा असतो असा आक्षेप कोणी कोणी घेतात. हा आक्षेप बालिश आहे. धर्मप्रसारासाठी का होईना, पण अत्यंत बिकट अशी जनसेवा ते करतात हे शिल्लक उरतेच. बरे, तुम्हांला तरी तीच गोष्ट व्हावयास हवी आहे. आपला धर्म टिकावा व डोळसपणाने तो आचरणात यावा, अशीच तुमची इच्छा आहे ना? मग ही इच्छा फलद्रूप होण्याला आपणही जनसेवेचे व्रत का पत्करू नये? ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या सेवेपेक्षा आपण केलेली सेवा आपल्या लोकांना फार जलद पटेल अन् ती त्यांच्या अंगीही लागेल. ज्याची भाषाही आपल्याला समजत नाही, जो आपल्या देशाचाही नव्हे आणि ज्याचा उपकार घेतल्यामुळे कदाचित त्याचा धर्मही पत्करावा लागेल, त्याच्याकडून सेवेचा

उपकार घेण्याऐवजी तो स्वकीयांकडून घेण्यात आपल्या माणसांना जास्त गोडी वाटेल. आपण त्यांच्यात जातच नाही आणि दुसरे कोणी गेले की ते आपल्याला खपत नाही, या आपल्या दुष्टपणाचा काय उपयोग आहे? आपले बरे करणारा त्यांना कोणी हवा असतो आणि तुम्ही तर त्यांच्या वाऱ्यालाही फिरकत नाही; मग अशा परक्याच्या आश्रयाला तो जातो म्हणून काहीतरी करावे असे ज्या तरुणांना वाटते त्यांनी हे जनसेवेचे व्रत अवश्य पत्करावे.

आमच्या या तरुण मित्रांनी सेन्सस रिपोर्टाच्या म्हणजे शिरगणतीच्या कोशांचा थोडासा तरी अभ्यास करावा आणि सरकारने जे नानाप्रकारचे जातिविषयक वाङ्मय प्रसिद्ध केले आहे तेही डोळ्यांखालून घालावे. म्हणजे ज्यांना आपण आपले आपले म्हणतो त्यांना आपण कोठे राहू दिले आहे याचे ज्ञान त्यांना होईल; आणि अशा लोकांसंबंधाने आपण कसल्या अपेक्षा ठेवतो, हे पाहून त्यांच्या जिवाला लाज उत्पन्न होईल. तीस कोटी आणि बत्तीस कोटी हे आकडे मोठे तोंडभर आहेत, पण उच्चारताना आपली तोंडे लाजेने मिटली पाहिजेत. समुद्रावर जर एखादे आरमार चालू असले तर त्या एकंदर आरमाराचा वेग कोण ठरविते, हे आपल्या या उत्साही लोकांना माहीत असते काय? ह्या आरमारात जे सगळ्यांत कमी वेगाचे जहाज असते ते त्या साऱ्या आरमाराचा वेग ठरविते! वर्गातील मंदबुद्धीच्या मुलांच्या गतीनेच एकंदर वर्गाची गती ठरविणे शिक्षकांना भाग पडते. आपल्या समाजात कोट्यवधी प्रजा अशी आहे की, जिच्या वस्तीवर अजून संस्कृतीची पहाट फटफटलीसुद्धा नाही. किती शतके झाली कोणास ठाऊक! पण अज्ञान, दास्य अन् लाचारी यांच्या तिमिरात ही प्रजा सारखी पिचत पडली आहे. विठ्ठल जसा अठ्ठावीस युगे विटेवर उभा आहे, तसे हे सारे लोक अठ्ठावीस युगे कर्दमात उभे आहेत. म्हणून ज्याला कुणाला यांच्या संबंधाने थोडेतरी ममत्व असेल, थोडीतरी स्वत्वाची आपुलकी असेल, त्याने या लोकांच्या जीवितांत शिरावे. आपला निर्वाह स्वतंत्रपणे करावा, पण त्यांच्या सेवेचे व्रत मात्र चालवावे आणि आपण आपल्या नेहमीच्या कर्दमातून या माणसाच्या प्रयत्नाने हळूहळू बाहेर पडत आहो, हे त्या माणसांच्या प्रत्ययाला आणून द्यावे. याचेच नाव स्वदेशवृत्ती, याचेच नाव धर्मश्रद्धा. फार काय सांगावे, याचेच नाव माणुसकी असे आहे.

सांगितले तर वाईट वाटेल, परंतु साधे भूतदयेचे शिक्षणसुद्धा आपल्याला मिळावयास हवे. आचारकांड अन् भूतदया यांचे द्वंद्व जर उत्पन्न झाले तर आपण

आचारकांडाला महत्त्व देतो आणि भूतदया वाऱ्यावर सोडतो. एकदा एका आडवळणी रेल्वेस्टेशनावर काहीतरी कामानिमित्ताने वडार म्हणा किंवा दुसरे कोणीतरी म्हणा, अशा लोकांची थोडीशी वस्ती झालेली होती. स्टेशनमास्तरांची वडील बहीण पोक्तशी संभावीत बाई होती. तिला लहान मुलांच्या रोगाची काही माहिती असे. एके दिवशी त्या वडारांपैकी एक बाई आपल्या लहान मुलाला घेऊन मास्तरांच्या घरी आली. तोंड उघडे ठेवून पोर धापा टाकीत होते आणि त्याच्या पोटाचा कोथळा वरखाली होत होता. त्या वैद्यीणबाई पुढे आल्या अन् त्यांनी बोटाने दाखवून त्या मुलाच्या आईलाच त्याचे पोट चाचपावयास लावले. इथे पोट दाठर लागत आहे का ? तिथे मऊ लागत आहे का ? अशा अनेक पृच्छा या सोवळ्यात असलेल्या बाईने केल्या आणि पोराच्या दुखण्याचा अंदाज केला. त्या माउलीला स्वाभाविकच वाटत होते की, आपल्या लेकराला वैद्यीण-बाईनी जवळ घेऊन पाहावे. परंतु तिला माहीत नव्हते की, आचारकांड आणि भूतदया यांचा जर लढा उत्पन्न झाला तर हे लोक आचारकांडाचा महिमा जास्त मानतात. खरोखर ही बाई जर जलद पुढे आली असती, तिने मुलाला जवळ घेतले असते आणि साक्षेपाने त्या मुलाची तिने परीक्षा केली असती तर ती जास्त धर्मशील ठरली असती, पण आचारधर्माचा पगडा आपल्या बुद्धीवर इतका बसलेला आहे की, साध्या भूतदयेचे आवाहनसुद्धा आपल्या मनाला लवकर पोचत नाही. मी हे स्वकीयांना हिणविण्यासाठी लिहीत नाही. स्वतःच्या समाजाचे यथारूप दर्शन तरुणांना व्हावे यासाठी लिहीत आहे. ते जर या कचाट्यातून बाहेर पडले अन् निर्मळ मनाने या सर्व मागासलेल्या समाजात शिरले तर ते आर्त लोक त्यांचे दोनही हातांनी स्वागत करतील. धर्मश्रद्धा, भूतदयान्वित आणि सर्वांच्याही वर म्हणजे दुसऱ्याच्या अंगातील मानवता ओळखण्याची माणुसकी ज्यांच्या अंगी आहे अशा तरुण लोकांच्या दहा-दहा, पंधरा-पंधरा टोळ्या जर रामोशी, मांग, वारली, ठाकूर, नागली, भिल्ल, गोंड, खोंड अशा नानाप्रकारच्या जातींत जाऊन जनसेवेचे मठ करून राहिल्या तर त्यांच्या हातून खरीखुरी देशसेवा झाली असे म्हणता येईल. देश म्हणजे देशातील दगड किंवा माती नव्हे; देश म्हणजे देशातील माणसे. ही केवळ आकाराने असलेली माणसे खऱ्या खऱ्या माणुसकीत आणून सोडणे आणि आज जी हिंदुधर्माच्या केवळ वळचणीखाली ती उभी आहेत तेथून घासूनपुसून, शिक्षण देऊन, संस्कार करून त्यांचा हिंदुधर्माच्या चतुःसीमेच्या

आत घसघशीतपणे प्रवेश करून देणे याचे नाव धर्माची आणि देशाची सेवा होय. म्हणून शेवटी एवढेच सांगावयाचे की, ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रयत्नांकडे थोड्या उंच अर्थाने आपण पाहावयास शिकले पाहिजे; जनसेवेचे व्रत आपण पत्करले पाहिजे. हिंदुसमाजाच्या उद्धाराची ही खरीखरी किल्ली आहे. आपल्या अंगी अलिप्तपणा फार असतो. आपण अतिशय तुसडेपणाने वागतो. आपल्या अंगचे ममत्व सग्यासोयऱ्यापर्यंतच पसरते. लोकांना दूर ठेवल्याने धर्माची जपणूक होते, असे आपल्याला वाटते. हे सारे बदलले पाहिजे. बदलले तरच आपला तरणोपाय आहे. एवढेच शेवटी निकराने सांगावयाचे आहे.

⊘ ⊘

: १३ :

# मते आणि मतप्रचार

विनोबा भावे

आपल्यात हल्ली मतभेद पुष्कळ दिसतात. मतभेद असल्यास दोष काही नाही, पण असणारा मतभेद आणि दिसणारा मतभेद ह्यांत फरक केला पाहिजे. मत म्हणजे स्वतंत्र मनाचे म्हणणे. आपले मन स्वतंत्रपणे जे सांगेल ते आपले मत. पण आपल्या मनाची स्थिती इंग्लंडच्या राजासारखी असते. इंग्लंडच्या राजाला स्वतंत्र म्हणणे कोठे आहे? पार्लमेंटने ठराव करावा, औपचारिक मंजुरीसाठी राजेसाहेबांकडे तो जावा आणि त्यांनी त्यावर सही करून टाकावी. अशी तऱ्हा आपल्या मनाची आहे. इंद्रिये काहीतरी ठराव करतात आणि मन त्यावर सही करून टाकते. एवढेच आहे की, मनाचा स्वभाव तर्कशील असल्यामुळे सही करण्यापूर्वी ते त्या ठरावाच्या समर्थनपर अशी काही युक्ती तयार करून ठेविते. त्याशिवाय त्याचे समाधान होत नाही. त्यापलीकडे इंद्रियांच्या म्हणण्याविरुद्ध तर्क चालविणे हे मात्र त्याच्या अधिकारात जणू नसतेच. साधकांनी तर्क करावा तर तो नेहमी वेदानुकूलच करावा अशी मर्यादा आहे. त्याप्रमाणे इंद्रियांना अनुकूल तर्क करण्याचे मनाचे व्रत असते. अशा प्रकारची मते हीही वास्तविक मते नव्हेत. ती फसवणूक आहे. पहाटे उठण्याचा इंद्रियांना आळस. त्यामुळे मनालाही तसेच वाटते. ते युक्तिपूर्वक म्हणू लागते, "पहाटे उठणे चांगले नाही. कारण त्यामुळे दिवसभर पुरती जागृती राहणार नाही. शिवाय, असे की, पहाटे उठणे ईश्वरी योजनेच्या विरुद्धच नाही का? मनुष्याने पहाटे उठावे असे ईश्वराला वाटत असते तर त्याने पहाटेस प्रकाश दिला असता." इतके झाले म्हणजे ते आपले निश्चित मत झाले. हरएकाला मतस्वातंत्र्य पाहिजे असे आपण म्हणतो, पण स्वतंत्र मत ह्याचा खरा अर्थ आपणांस कळलेला नाही. इंद्रियाचा १गडा बसू

न देता स्वतंत्र वृत्तीने आपले मन आपल्याला जे सांगत असेल ते आपले स्वतंत्र मत म्हणजे मनात येईल ते नव्हे, पण मन आणील ते. हा मुद्दा लक्षात ठेवला म्हणजे पुष्कळसे मतभेद झडून जातील.

इंद्रियनिग्रहपूर्वक आपल्याला जे निश्चितपणे वाटते त्या आपल्या मताचा प्रचार करणे योग्य आहे. पण अशा प्रकारचा प्रचार करण्याचे खरे साधन आचार, उच्चार नव्हे. उच्चाराने मतप्रचार करू पाहणे हा मोहच होय. हा मोह आपल्यांत फार आहे. आपले मत जर खरे असेल तर आपण त्याप्रमाणे वागल्याने त्याचा आपोआप प्रचार होईलच. आपला सत्यावर विश्वास असला पाहिजे. सत्यामध्ये स्वतःचा प्रचार करण्याची स्वयंभू शक्ती आहे. सत्य सूर्याप्रमाणे स्वयंप्रकाशी आहे. सूर्य जसा झाकला जात नाही तसे सत्यही झाकले जात नाही. आचरण टाकून बाह्य उपायांनी प्रचार करण्याचा प्रयत्न फुकट आहे. त्याचा काहीच परिणाम होऊ शकत नाही. त्याने हिंसा वाढते आणि असत्याचा प्रचार होतो. प्रचारालाही मर्यादा आहे. सूर्याची प्रचारकशक्ती किती जबरदस्त आहे? पण तोही मर्यादा सांभाळून असतो. त्यामुळे तो दुनियेचा ' मित्र ' राहून प्रचारही करू शकतो. दार बंद करून कोणी निजला आहे तर सूर्य त्याची सेवा करण्यासाठी त्याच्या दाराशी येऊन उभा राहतो, पण दाराला धक्का देऊन आत शिरत नाही. मात्र जरा दार किलकिले झाले की सबंधच्या सबंध आत शिरलाच. ही प्रचाराची मर्यादा होय. आपले मत सत्य असले तरी त्याचा स्वाभाविक रीतीनेच प्रचार झाला पाहिजे. मूक आचरण म्हणजे स्वाभाविक प्रचार. आचरणाचे मौन सुटले की हिंसा दाखल होते आणि हिंसा दाखल झाली की सत्य उडालेच. पाण्याने जसा अग्नी विझतो तसे हिंसेने सत्य विझते आणि आचरण टाकून प्रचार करण्याचा प्रयत्न म्हणजे नागडी हिंसाच. प्रचाराची घाई हीही हिंसाच आणि शिवाय अश्रद्धा, अज्ञान तर खरेच किंवा दंभ का म्हणू नये? लहान मुले बी पेरतात आणि जरा अंकुर फुटला की तो लवकर उगवावा म्हणून त्याला वर उपटतात, तसेच हे.

मन म्हणजे इंद्रियनिग्रही मनाचे म्हणणे आणि त्याच्या प्रचाराचे साधन ते कृती. हे दोन सिद्धान्त निश्चित झाले की, सर्व आकाश निवळले. कृतीबरोबर प्रसंगविशेषी अल्प उक्ती, आपण कल्पू शकतो. पतिव्रता ज्याप्रमाणे पतीचे नाव घेत नाही त्याप्रमाणे कर्मयोगी आपल्या मताचा उच्चार टाळतो. पण दोन्ही पक्षी

आपण अपवाद कल्पू शकू. क्वचित प्रसंगी आपले मत मांडण्यास हरकत नाही. पण आपले मत मांडावे, दुसऱ्याचे खंडन करण्याचा मोह टाळावा. मतप्रतिपादनात आपले मत मांडणे आणि दुसऱ्याचे खोडणे असे दोन भाग कल्पिले जातात. पण ते कल्पनेचे आहेत, खरे नाहीत. दिवा लावणे व अंधार झाडून टाकणे ही जशी दोन कामे, तसलेच हे दोन भाग. आधी दोन भागच खोटे. त्यातही पुन्हा आपला भर बहुतेक दुसऱ्याचे मत खोडण्यावरच जास्त असतो. दुसऱ्याचे मत खोडले की, तेवढ्याने आपले मत सिद्ध झालेच असे होत नाही आणि आपले मत सरळ मांडले म्हणजे दुसऱ्याचे मत खोडण्याची जरूर राहात नाही. भूमितीमध्ये युक्लिडने कोठेच खाडाखोड न करता थोडक्यात सरळ सिद्धान्त मांडले आहेत. त्या सिद्धान्ताची आज दुनियेवर सत्ता चालते. दुसऱ्याचे मत खोडून काढण्यात त्या मताविषयीचे सूक्ष्म प्रेमच असते. भक्तिमार्गात जसा प्रेमाने तसा द्वेषाने ईश्वर मिळतो असे सांगतात. बिभीषण प्रेमाने तरला तर रावण द्वेषाने तरला अशी भाषा संत बोलतात. त्यातला अर्थ हाच आहे. मिल्टनने 'पॅराडाईझ लॉस्ट' मध्ये सैतानाच्या अंगी सात्त्विकतेचा तात्त्विक द्वेष दाखवून त्याच्याविषयी वाचकांची सहानुभूती उत्पन्न केली आहे. सात्त्विकतेचा ज्याला मनापासून इतका द्वेष वाटतो त्याच्या मनात सूक्ष्मरूपाने सात्त्विकता वसत आहे, तसेच तामसपणाचा जोरजोराने निषेध करीत बसणाऱ्या माणसात आतून तामसपणा चिकटलेला आहेच, ह्यात शंका नाही.

प्रचाराचे खरे साधन कृती हेच होय. तथापि, त्याप्रमाणे प्रसंगी मतप्रतिपादनाची जरुरी कल्पून घेतली त्याप्रमाणे मतप्रतिपादनातूनही क्वचित दुसऱ्याच्या मनातील चूक दाखविण्याचा प्रसंग कल्पिता येईल. पण दुसऱ्याचे मत खोडून काढणे निराळे आणि दुसऱ्यालाच खोडून काढणे निराळे. एखाद्या मतातील असारता दाखविताना त्या मनुष्यालाही मध्येच गुंतवून टीका करणे गैर आहे. नारळाची कवची फोडून अगदी आतून खोबरे घ्यावे त्याप्रमाणे मनुष्याचे मत, चुकीचे वाटल्यास खोडून आतला माणूस ग्रहण करता आला पाहिजे. नदीचे वळण वाकडे असले तरी त्याप्रमाणे पाणी वाकडे असत नाही, किंवा भाकरी वाटोळी असली तरी तिची गोडी वाटोळी असत नाही, त्याप्रमाणे मनुष्याचे मत जरी कदाचित दूषित असले तरी आतला माणूस दूषित नसतो. नदीचे वळण किंवा भाकरीचा आकार ही जशी बाह्य परिस्थितीने बनविलेली असतात त्याप्रमाणे

मनुष्याच्या मताचे आहे. म्हणूनच मताचा विचार करताना माणूस बाजूलाच राखला पाहिजे. पुष्कळ वेळा आपण असे पाहतो की, जे मत आपल्याला एके-काळी खरे वाटत होते तेच आज खोटे वाटते. मनात विचार आल्याबरोबर लिहून टाकण्याची ज्यांना सवय आहे अशा लेखकांच्या लेखनात त्यांच्या मनाची वळणे कसकशी बदलत गेली हे दिसून येते. म्हणून शहाणे लोक स्वतःचे विचार कृतीत उतरून अंगात मुरून हृदयात भरून आपोआप बाहेर पडल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही रीतीने त्यांना प्रगट होऊ देत नाहीत. आता आपलेच जुने मत, पण आज जर आपल्याला ते पसंत नाही तर ते आपण सोडून देऊ, प्रसंगी खोडूनही काढू. पण कशा रीतीने आणि कोणत्या भावनेने ? दुसऱ्याचे मतही खोडण्याचा प्रसंग आल्यास जणू आपलेच जुने मत आहे असे समजून ते खोडले जावे. ह्याही-पेक्षा अधिक चांगला न्याय असा मांडता येईल : आपल्या जुन्या मताकडे आपण कठोर नजरेने पाहात नाही, पण पाहावे; आणि दुसऱ्याच्या मताकडे कठोर नजरेने पाहतो, पण पाहू नये. मनुष्याचे खरे मत काय आहे हे त्याचे त्यालाच नीटसे माहीत नसते. केळीच्या सोपट्याप्रमाणे मनुष्याच्या मनावर एकावर एक अनेक मतांचे पापुद्रे बसलेले असतात. हे सर्व पापुद्रे सोलून पाहिल्यास त्याचे आतले मत अगदी शुद्ध आणि सरळ असते. शिवाय कालचे माझे मत जसे आज बदलले आहे, तसेच आजचेही मत, आज कितीही पक्के वाटत असले तरी, उद्या बदल-ण्याचा संभव आहे ही गोष्ट ध्यानात वागविली पाहिजे. ह्याचा अर्थ असा नाही की, माणसाने संशयावस्थेत राहावे. संशयात मुळीच राहू नये. आज मला जसे वाटते तसे जरूर वागावे. पण दुसऱ्याच्या मताचे खंडन करताना आपल्या स्वतःच्या अनुभवावरून सिद्ध झालेली मतांची क्षणभंगुरता विसरू नये. संपूर्ण ईश्वर कोणत्याही व्यक्त स्वरूपात मावू शकत नाही. त्याचा एक लहानसा अंशच व्यक्त होतो. त्याप्रमाणे संपूर्ण सत्य माझ्या मतात असणे शक्य नाही. तसेच ईश्वराचा अंशही ज्याप्रमाणे अमुक एका वस्तूतच राहतो असे नसून सर्वच वस्तूत कमीजास्त प्रमाणाने राहतो त्याप्रमाणे सत्याचा अंशही माझ्याच मतात आहे असे नसून दुसऱ्याच्याही मतात थोडा तरी आहेच, ही श्रद्धा हाच सत्याग्रहाचा आधार, आणि हीच सत्याग्रहाची मर्यादा. कोणताही मनुष्य, समाजसंस्था सर्वथा सत्यहीन किंवा ईश्वरहीन नाही, म्हणूनच सत्याग्रहाने कोणत्याही मनुष्याला, समाजाला, संस्थेला जिंकण्याची शक्यता हा सत्याग्रहाचा आधार. कोणताही

मनुष्य, समाज, संस्था सर्वथा सत्यहीन किंवा ईश्वरहीन नाही म्हणूनच आपल्या दृष्टीने असत्यवश झालेल्या मनुष्याचा, समाजाचा, संस्थेचा प्रतिकार करताना आपण अहिंसामय साधनच वापरले पाहिजे. हीच सत्याग्रहाची मर्यादा. सारांश, मनुष्याच्या मताचा विचार करताना किंवा त्याच्या कृत्याचा प्रतिकार करतानाही, त्या मनुष्याला त्याच्या मतापासून किंवा कृत्यापासून अलग करणे, हे सत्याग्रहाचे मुख्य कलम आहे.

आजच्या पवित्र दिवशी हा बोध ग्रहण करण्याची सद्बुद्धी ईश्वर आपणांस देवो !

० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

## : १४ : लोकगीते : मराठी काव्ये

**सरोजिनी बाबर**

जीवनात येणाऱ्या हरघडीच्या सुखदुःखांनी भरलेल्या गोष्टी माणूस आपल्यापाशी सदैव बाळगून असतो. त्यामुळे त्याच्या मनात उसळून येणारे असंख्य भाव त्याच्या उरीपोटी दाटून आलेले असतात. अशा वेळी आपल्या मनाला शांती मिळविण्यासाठी त्याला बोलल्याशिवाय भागतच नाही. मनातील गोष्ट कुणापुढे तरी सांगितल्याखेरीज त्याला राहवतच नाही. त्या कारणाने त्याच्या सुखदुःखांना बोलावेसे वाटते. कल्पनेला भरारी घ्यावीशी वाटते. इच्छा-आकांक्षाना उड्डाण घ्यावेसे वाटते. त्यामुळे त्याच्या अनुभवाला एकपरीची विलक्षण धार निर्माण होते. त्याच्या मनीचा भाव जिव्हाळ्याने माखला जातो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला व्यासपीठावर चढावेसे वाटते. आपल्या भावनामय जीवनाचा आविष्कार करावासा वाटतो. अशा वेळी तो जे बोलणे करतो, भाष्य करतो, ते त्याचे एकट्याचे असे होत नाही. त्याला सामाजिक जीवनाची बैठक प्राप्त होते. मानवी जीवनातील स्थायीभावाचे पाठबळ त्या वेळी त्याला मिळत जाते. तो मोजके बोलत जातो. वेचक शब्दांची गुंफण करीत राहतो. त्याच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या शब्दांना तालसूर लाभतो. तो काव्यात बोलू लागतो. गीत सांगत सुटतो. चिरकाल टिकणाऱ्या सुंदर भावभावनांना गुंफीत राहतो. त्याच्या मनी कविता जन्माला येते.

सर्वसामान्य लोकांच्या मनात निर्माण होणाऱ्या या कवितेला 'लोकगीत' म्हटले जाते. हे गीत पिढ्यान्‌पिढ्यांच्या अंगाखांद्यावर खेळत राहते. बाळसे धरते. आपले म्हणून वैशिष्ट्य सांगत जाते. त्यामुळे ते कधी जुने होत नाही. त्याचा नित्य नवा आस्वाद घेण्यात त्यामुळेच मानवी मनाला आनंद होतो.

लोकगीतांची भाषा साधी. घरगुती वळणाची. रोजच्या बोलण्यातली. नित्याच्या वापरातली. सर्वांच्या ओळखीची. सहजसुंदर. ऐकली की मनावर ठसणारी. काळजाला जाऊन भिडणारी. कसलेही प्रयत्न न करताना आपोआप मनात घोळणारी. स्मरणात राहणारी. म्हणून तिचे वळण साधे. वाडवडिलांच्या परिपाठातले.

**उगवत्या नारायणा आधी उगव माझ्या दारी**
**माझ्या त्या बाळासंगं दुधातुपाची कर न्याहारी**

भल्या पहाटेच्या वेळी दळण दळताना उगवत्या सूर्य देवाला ही विनंती केलेली आहे. ही ओवी एका सामान्य स्त्रीने गाईलेली अशी आहे. त्यामुळे या ओवीतील या कल्पनेने शिकलेला माणूस भुलून जातो. या धरणीवर पाऊल टाकताक्षणीच सूर्यदेवाने सर्वांत प्रथम आपल्या दारात यावे. आपल्या लहानग्या बाळाबरोबर दुधातुपाची न्याहारी करावी; आणि मग उरलेल्या दुनियेत प्रवेश करावा असे ही ओवी सांगते. म्हणजे अगदी साध्या बाईला आपल्या मुलाबद्दलचा केवढा हा अभिमान की, ज्याच्या पंक्तीला तिने प्रत्यक्ष सूर्यदेवाला आमंत्रण करावे!

लोकगीतांची ही भाषा जेवढी सोपी व ओघवती तेवढीच त्यांच्यामध्ये गोविलेली कल्पनाही मोठी सुंदर असते. लेखनवाचनाचा गंध नसलेल्या, साहित्यशास्त्राचा अभ्यास न केलेल्या पण अनुभवाच्या बळावर जीवनाची गाथा उभी करू शकणाऱ्या सामान्य लोकांच्याही यापरीच्या कल्पना वाखाणण्याजोग्या असतात. केवळ पाठांतराच्या बळावर वर्षानुवर्षे त्या कल्पनेला त्यांनी जिवापाड सांभाळलेले असते. एवढेच नाहीतर—

**जिवाला माज्या जंड कसं कळालं माज्या बापा**
**अंगणी होता चाफा कळ्या पडती झपाझपा**

या ओवीत सांगितल्याप्रमाणे उत्कृष्ट उपमा–दृष्टांतही अगदी सहजतेने त्यांनी आपल्या कवितेत मांडून टाकलेले असतात. आपल्या सासरी गेलेल्या मुलीला बरे नाही हे तिच्या वडिलांना कळते कसे तर अंगणातील चाफ्याच्या कळ्या झपाझप पडतात ते बघून! म्हणजे जणू एखादा शकून–अपशकून घडावा आणि जिवाला चुटपूट लागावी तशातीलच प्रकार. शिवाय ही भावना वात्सल्याने माखलेली. जिवाला चटका लावून सोडणारी. काळजाला हात घालणारी. म्हणून लोकगीत ऐकताक्षणीच त्यात प्रकट झालेला मनोभाव तो तो प्रसंग साईन संगीत आपल्यापुढे उभा करू शकतो!

त्यामुळे लोकगीतांच्या सहवासात मानवी मनातील भावना हेलावून जातात. काळीज उडून जाते. स्थायीभाव जागे होतात. अंतःकरणाशी अंतःकरण बोलू शकते. आणि—

बंधुजी विचारीतो मैना सासुरवास कसा
सावळ्या बंधुराया बरम्या लिवून गेला तसा

या ओवीचा अर्थ जाणत्या मनाला आपोआप उलगडू शकतो. ब्रह्मदेवाने आपल्या कपाळावर नशिबाची रेघ ओढली असेल तसे आपले चालले आहे. ही सासुरवाशिणीची भाषा किती जगावेगळी! आणि दिल्या घरी सुखाने नांदायला शीक ही आपल्या आईची शिकवण मनी बाळगून झाले गेले न सांगताना असे सूचित बोलणे करणे म्हणजे तरी किती चातुर्याची गोष्ट म्हणावी. यापरीच्या ध्वनिकाव्याने मराठी मनाला भूल पडते ती अशी; आणि लोकगीत हे एक उत्तम प्रकारचे काव्य असते असे म्हणतात, त्याचाही अर्थ हा. या गोष्टीची अशा वेळी जरूर प्रचीती येते.

हिरव्या चोळीन ग दंड करीतो रसारसा
हावशी कांतायान छंद पुरवीला व्हावा तसा

लोकगीतांनी शृंगाररसाला मोठ्या लीलेने खेळविलेले असून अशा प्रकारच्या मुग्ध शृंगाराच्या आविष्काराने मराठी मनाचे काळीज चोरून घेतले आहे. नवरा-बायकोंच्यामधील प्रेम कसे आहे हे सांगण्याची ही तऱ्हा मोठी सुंदर आहे. हिरव्या चोळीमुळे मुळातच रसरशीत असलेल्या दंडाला शोभा आली असून आपल्या हौशी नवऱ्याने आपला मनीचा हेतू आपल्या इच्छेप्रमाणे पुरा केला असे ही ओवी सांगते. तसेच फारसे उघड न बोलताना वेचक शब्दांनी एकमेकांतील प्रेमाची अगाधताही ती मोठ्या डौलाने सूचित करते. तथापि—

रुणझुण पाखरा
जा माझ्या माहेरा
कमानी दरवाजा
त्यावरी बैस जा

घरच्या आईला
सांगावा सांग जा
दादाला सांग जा
ने मला माहेरा

माहेराविषयीच्या या जिव्हाळ्याने त्या शृंगाराला आणखी वैभव प्राप्त होते. गतिमान जीवनाला तालबद्धता येते आणि स्वराची शालही लाभते. जीवनातील आनंद उपभोगता येतो. वयाचे भान उरत नाही. लोकगीत सर्वांच्या आवडीचे होते ते यामुळेच. ऐकले की, गावेसे वाटते ते याच परीने. म्हणून म्हणतात की, लोकगीत वाचावयाचे नसते तर ते गावयाचे असते. आणि एकदा ऐकले की, ते स्वत:जवळ न ठेवताना दुसऱ्याला देऊन टाकावयाचे असते, त्यामुळे लोकगीतांची देवघेव एकसारखी चालू राहते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची शक्ती त्यामुळेच लोकगीत अंगी बाळगू शकते; आणि गावोगाव हे मनोभाव काळजाचा वेध घेत जिव्हाळा शोधीत फिरू लागतात. संस्कृतीला सांभाळू पाहतात. माणुसकीची जोपा करू शकतात.

चलग सये वारुळाला
नागोबाला पूजायाला
हळदकुंकू वहायाला
ताज्या लाह्या वेचायाला
या ग या गडयिनी
या ग या मैतरिणी
तेल्या तांबूळ्याच्या बाई
वाण्या बामणाच्या बाई
जमुनिया या साऱ्याजणी
जाऊ बाई न्हवणा
जिथं पाय टाकू बाई
तिथं उठल दवणा...

नागपंचमीच्या वेळी खेडेगावची गावशीव धुंद करून टाकणाऱ्या या लोकगीताने मराठी संस्कृती सांभाळलेली आहे. खेळाच्या जगात जातपात मानलेली नाही,

आणि मुख्य म्हणजे पाय पडेल तिथे दवणा नावाची सुवासिक वनस्पती उगवेल. ही मराठी स्त्रीच्या सामर्थ्याची, पावित्र्याची ग्वाही जगाला ऐकविली आहे. याच गीतामध्ये पुढे घरातील प्रत्येक स्त्रीला एखादा दागिना असल्याखेरीज एकटी-दुकटीनेच तेवढा तो घालावयाचा नाही असे सुचविलेले आहे. नागदेवाची पूजा करतानाच समाजजीवनातील एका उल्लेखनीय संस्कृतीचा इतिहास या गीताने बोलून दाखविलेला आहे.

लोकगीतांच्यामुळे सामाजिक जीवनाच्या इतिहासाचे दर्शन घडते. चाली-रीतींचा मागोवा घेता येतो. तसेच जुन्याकाळचे वैभवही नजरेत मावेनासे होते. साडेतीनशे मोती प्रत्येक बांगडीला घडविणारी रुक्मिणी, उभा सागर आंदण देणारे तिचे वडील राजा भीमक आणि मोत्यापोवळ्यांनी ओटी भरणाऱ्या घरच्या मालकिणी पाहिल्या की, या गीतांचा हेवा वाटू लागतो. या कवितेला आनंदाने सामोरे जावेसे वाटते. आणि एक वेळ तरी—

> **पालख पाळणा मोत्यांचा खेळणा**
> **जोजविते आत बाई लाडका चिमणा**
> **शिंपांचा मळा बाई स्वातीनं शिंपला**
> **मोती मोती टिपून तुझ्या छताला गुंफिला**
> **सागर सांडुनी बाई माणीक धुंडूनी**
> **चंद्रसूर्य जडविले इवल्याशा गगनी**

या सुखाचा आस्वाद घेत घरच्या तान्हुल्याला अंगाई गावी असा मोह होतो. माणीकमोत्यांच्यापेक्षाही आणि जडजवाहिरांच्यापेक्षाही तोलामोलाचे असे घरचे बाळ जोजविण्यासाठी या लोकगीताने—अंगाईने—उभा केलेला आनंद हा विशेष आगळा आहे याची खात्री पटते. सागर उफडा करून त्यातील वेचक मोत्यांनी चंद्र-सूर्यांनी जडविलेला खेळणा पालखावरती लावणारी आई किती भाग्याची म्हणावी ?

ही गीते कधीमधी वैभवाचीही भाषा बोलतात. मनाच्या श्रीमंतीची डौलदार पेरणी करतात. त्यामुळे मानवी जीवनातील दुःखांना पळून जावेसे वाटते आणि सुखांना ऐषआराम करावासा वाटतो. या गीतांच्यामुळे चंद्रमौळी घरातही लंकेचे सुख उपभोगता येते आणि कितीक दिवस आणि रात्री उलटल्या तरी न संपणाऱ्या सुखदुःखांच्या गोष्टी उकलता येतात. मनात येईल ते सारे ही कविता बोलून दाखविते. भाडभीड ती मानीत नाही. त्या कारणाने मराठी मनाचे सुंदर दर्शन

तिच्यामुळे घडू शकते. म्हणूनच लोकगीताला मानवी हृदयातील भावभावनांचे दर्शन घडविणारे भिंग मानले जाते. हातातील बांगडीमध्ये चमकणाऱ्या हिऱ्याप्रमाणे मराठीतील काव्यात हे काव्य उठून दिसते. सामान्य लोकांनी आपले असामान्य विचार या काव्यात प्रकट केल्यामुळे ते चिरंजीव होऊ शकले आहेत. म्हणून राष्ट्रीय काव्याचा, उत्कृष्ट कवितेचा आणि मायमराठीचा जुना दरबार यांचे उत्तम दर्शन घडविणारे काव्य म्हणूनही लोकगीतांचे वैशिष्ट्य आहे. कारण तोंडाने काढले आणि हाताने पेरले अशी या गीतांची पार्श्वभूमी आहे; आणि लिहिणाराचा हात गोरा तर आहेच पण तो मोठा राजबिंडाही असल्याचा दावा ही गीते करतात ! शिवाय ' पांढरे वावर, काळे बी न् चतुर म्हणतो पेरीन मी ' या ईर्षेने त्यांचा जन्म होत असल्यामुळे त्यांच्याबद्दल सांगावे तेवढे थोडेच होणार आहे.

० ०

: १५ :

# प्र वा सी

## दिवाकर

[ एक खडबडीत रस्ता. बरेचसे प्रवासी रस्त्यात बोलत उभे आहेत. दाट धुके पडले असल्याकारणाने आसपासचे काही दिसत नाही. प्रवाश्यांपैकी तिघे-चौघे म्हातारे असून, बाकीचे कोणी मध्यम वयाचे व काही तरुण असे आहेत. दहा बारा वर्षांची दोन मुले इतर वडील माणसांकडे टकमक पाहात उभी आहेत. ]

आजोबा, आपल्याला अजून किती लांब जायचे आहे हो ? आमचे पाय कि नाही दुखायला लागले आहेत.

आले, जवळ आले अं-बाळ.

हो ! असे तुम्ही किती तरी वेळा म्हणता ! ' जवळ आले, जवळ आले ' असे नुसते म्हणता पण ते कधी संपतच नाही ! हे हो काय ? एकदा सांगा ना मग किती जवळ आले आहे ते ? चालण्याचा आम्हांला अगदी कंटाळा आला आहे !

असे काय वेड्यासारखे ! धुके कोण पडले आहे ! आणि मी काय सांगू किती जवळ आले आहे ते !

मग तुम्ही कशावरून म्हणता हो जवळ आले आहे म्हणून ?

चूप बसा रे ! चारगट कोठली ! मोठ्या माणसांशी कसे बोलावे, हेमुद्धा अजून यांना धड समजत नाही !

हं: ! मुकाट्याने चालायचे दिले सोडून आणि लागले वटवट करायला ! बरे, पण आपण आलो आहोत कुठे ?

मला वाटते आपण रस्ता चुकलो.

नाही, नाही ! हाच तो रस्ता !

कशावरून म्हणतोस, हाच तो रस्ता म्हणून ?

कशावरून काय! मला आपले वाटते एवढेच.

सगळाच घोटाळा! वाट बरोबर आहे की चुकली, काहीच धड समजत नाही!

आणि पुनः आलो आहोत कुठे हेही समजत नाही!

मैल दोन मैल आपण आलो असू नाही?

येवढ्याने होते आहे! सहज अडीच-तीन मैल झाले असतील!

तीन मैल? येवढेच हो कसे असतील आजोबा? मला तर वाटते की, आपण चांगले चारपाच मैल आलो!

हं! चारपाच मैल कुठले आले आहेत! अजून पुरते मैलभरसुद्धा आलो नाही, तर म्हणे—!

काय, मैलभर काय नाही! ते गाव सोडल्याला काही थोडा वेळ झाला नाही! चांगला तास दीड तास झाला असेल!

इतका काही नाही म्हणा. फार झाले तर अर्धा किंवा पाऊण तास.

हो, हो. इतकाच.

नाही, नाही! चांगला बराच वेळ झाला आहे!

बाकी आपण ज्या गावातून आलो, त्या गावचे नाव मोठे गमतीचे आहे नाही? मला अजून राहून राहून हसू येते! काय पाहा? कोणाला आठवते का रे?

नाही बोवा, आपल्याला काही आठवत नाही. काय पाहा?—हो, असेच काही तरी आहे. टरगुन्-गुड्गुड्गुड्!

हं! हं! हं!

छे, छेः! तसे नाही! दुसरेच काहीतरी आहे!

जाऊ द्या रे! काय करावयाचे आहे त्याच्याशी! अशी कितीतरी गावे आपल्याला प्रवासात लागतात! कोण विचारीत बसतो नाव आणि गाव! आपले ठराविक जागी एखाद्या धर्मशाळेत नाही तर देवळात उतरावे, स्वयपाकपाणी करावे, झोप काढावी आणि खुशाल पुढे चालते व्हावे! गावात आहे काय, नाही काय, पाहतो कोण? आणि इतके करायला येथे वेळ कोणाला आहे!

हो तर काय! आणि आता आपण कोणत्या गावाला जाऊन पोहोचू आणि कोणत्या नाही, हे तरी कोणाला ठाऊक आहे!

हं! हं! आपले चाललो आहोत झाले.

•••६•••

मग आता चला ना पुढे. येथेच किती वेळ उभे राहायचे ?

पुढे काय चला ? धुके किती पडले आहे, आणि म्हणे पुढे चला !

छत् ! भलतेच एखादे ! नाही आपल्याला बरोबर रस्ता माहीत, आणि उगीच कुठे एखाद्या जंगलात नाही तर खोल दरीत जाऊन पडलो, तर करा काय !

नको रे बाबा ते पुढे जाणे ! आपले आहे तेथेच—

असे काय करता हो ? ज्या वाटेवर आपण उभे आहो ती ही वाट पुढे कुठे तरी गेली असेलच की नाही–? आणि शिवाय आपण येण्यापूर्वी कोणीतरी माणसे या वाटेने गेलीच असतील !

हो तर ! चांगला हमरस्ता दिसतो आहेन् ! ह्या काय बैलगाड्यांच्या चाकोऱ्या चांगल्या स्पष्ट दिसत आहेत ! आणखी काय पाहिजे ?

काही नाही ! बेलाशक पुढे चला ! धुके असले म्हणून काय झाले ! उगीच वेळ घालविण्यात काय अर्थ आहे ?

जा ! पुढे जा ! खुशाल चालते व्हा ! आम्ही साफ येथून हालत नाही ! उगीच पुढे कुठेतरी जाऊन मरावयाचे आहे ?

हो ! आजपर्यंत या वाटेने पुढे गेलेली माणसे जशी काही मेलीच असतील नाही !

कशावरून नसतील ? सगळेजण एखाद्या खड्ड्यात किंवा खोल दरीत पडून, चांगली टाळकी फुटून कशावरून मेले नसतील ?

आणि मी म्हणतो दुसरे गेले, म्हणून आपणही गेलेच पाहिजे, हे तरी काय म्हणून ?

हं: ! हं: ! हं: !

माझ्या मताने तर बोवा असे वाटते की, आपण आपले आता परत जावे आणि खुशाल पुन: त्या धर्मशाळेत जाऊन उतरावे !

हाँ ! हाँ ! काही हरकत नाही ! फार छान ! चला, परत चला !

परत जायचे ? नाही बोवा, आपण नाही परत येत. आणि पुन: आता परत जायचे कुठे ? आणि ते कसे ?

कसे म्हणजे ? आलो त्या वाटेने नीट सरळ पुन: धर्मशाळेत जायचे !

अहो, पण तेच सरळ आता दिसते आहे का ? तिकडेसुद्धा धुके किती पडले आहे ! आणि चालले परत !

अनुक्रम........................ वि: ......................
क्रमांक........................ दौ. दि. ...............


म्हणजे ? आपण आपले तसेच गेलो, तर रस्ता चुकू असे वाटते की काय ?

कशावरून नाही ? रस्ता चुकून एखाद्या खड्ड्यात–आले का लक्षात ?– किंवा एखाद्या खोल दरीत पडून, चांगली टाळकी फुटून, कशावरून नाही मरून जाणार ? बोला आता ?

अरे पण आपण आताच ह्या रस्त्याने आलो ना ?

ते खरे ! पण ज्या रस्त्याने आता आपण आलो, तोच चुकला नसेल कशावरून ?

हं ! हं ! हं !

हो बाकी तेही खरेच आहे ! मग ?

मग काय ! धुके नाहीसे होईपर्यंत आपण आपले येथेच राहू झाले.

हो हो हो, तसेच करावे झाले !

काय, तसेच काय करावे ? समजा, धुके नाहीसे होईपर्यंत आपण येथे उभे राह्यलो आणि झाला, मधे येथेच धरणीकंप झाला, किंवा दुसरेच एखादे अरिष्ट येऊन आपण मरून गेलो तर ?

हो ! तेही खरेच !

म्हणून म्हणतो, आपले पुढे चला, मग मरण आले तरी हरकत नाही ! पण पुढे जाता जाता मेलो असे तरी होईल !

नाही बोवा ! आपले त्यापेक्षा परत जाता जाता मेलेले पुरवले !

आणि त्याच्याहीपेक्षा जागच्या जागी मेलेले काय वाईट ?

हं: ! हं: ! हं !

ठीक आहे ! मी आपला पुढे चालता होतो. ज्यांना माझ्याबरोबर यायचे असेल, त्यांनी खुशाल चलावे !

चला ! हे निघालो आम्ही तुमच्याबरोबर !

अरे ए ! चाललात कुठे ? फिरा आमच्याबरोबर माघारी !

नाही ! आम्ही नाही परत येणार ! तुम्हांला पाहिजे असेल तर तुम्ही खुशाल परत जा ! कोणी तुमच्या आड येत नाही !

तुम्ही नसाल आमच्या आड येत ! पण आम्ही तुम्हांला सोडू तेव्हा ना !

असे का ? मग आम्हीही पाहतो तुम्ही कसे परत फिरता ते ?

अरे ए मूर्खांनो ! मुकाट्याने येथे उभे राहा ! आमचे ऐका !

नाही ! आम्ही तुम्हांला पुढे नेणार !

तुम्हांला आम्ही मागे खेचणार !

खबरदार ! पुढे सरकाल तर ! येथल्या येथे तुम्हांला उभे राहिले पाहिजे ! मूर्ख कोठले :

कोण मूर्ख ?

तुम्ही मूर्ख !

नाही; तुम्हीच मूर्ख !

[ सर्वजण हातघाईवर येतात. एकमेकांना ओढाताण करू लागतात. कोणी काठ्या मारतात, तर काहीजण दगडांचा वर्षाव करतात. बिचारी मुले घाबरून रडू लागतात. ' मेलो ! ', ' डोकी फुटली ! ', ' आई ! ', ' छातीत दगड बसला !', ' अरे तो पुढे पळाला ', ' धरा धरा ' असा आरडाओरडा होऊन धावपळ सुरू होते. ]

@ @

## : १६ :

# हरवली म्हणून सापडली

ना. सी. फडके

अशा वेळी अगदी मनस्वी संताप येतो, नाही का? आणि वाटायला लागते, की जगात मुद्दामच अशा काही द्वाड शक्ती लपून बसल्या आहेत, की ज्यांनी माणसाची उगीचच्या उगीच खोडी काढावी आणि आपल्या गुप्त जागेवरून त्याची मौज पाहून कुत्सितपणे हसावे! प्रेमातल्या माणसाला पानभर पत्र लिहावे आणि एकदम हातातला टाक हिंदकळून त्यावर भला मोठा शाईचा डाग पडावा, किंवा कॉलेजमध्ये मिरविण्यासाठी व मैत्रिणीची स्तुतिगर्भ चेष्टा मुद्दाम अंगावर घ्यावयासाठी नव्या तऱ्हेची, ऐन फॅन्सी चप्पल घालून जावे आणि वाटेत तिची पट्टी तुटावी, अशा दिसायला क्षुल्लक पण भारी तापदायक निराशा माणसाच्या वाट्याला एरवी आल्या नसत्या! तुम्ही काही म्हणा, माझी तर या खोडकर द्वाड शक्तीच्या अस्तित्वाबद्दल अगदी पुरी खात्री आहे. नाही तर त्या दिवशी माझ्या टेबलाच्या खणाची किल्ली हरवावी याला काही कारण?—

माझ्या अंगी इतर सद्गुण असोत नसोत, व्यवस्थितपणा तरी माझ्या स्वभावात खास आहे. हा गुण मला कोणी शिकविला आहे असेही नाही. किंबहुना गुण किंवा अवगुण माणसाच्या ठिकाणी कितपत उत्पन्न होतात याविषयी मला शंकाच आहे. बालसंगोपन, बालशिक्षण वगैरे विषयांवर टरीव साच्याचे लेख लिहिणारी मंडळी या ठिकाणी माझ्याशी कदाचित भांडायला उठतील, व मोठमोठे फिरंगी ग्रंथ हाती घेऊन ते मला भेवडावतील. पण माझ्याहीजवळ मानसशास्त्र व सारासार-विचार नावाचे भक्कम काष्ठदंडक आहेत! पण ते असो. मला सांगायचे होते येवढेच, की टापटीप व व्यवस्थितपणा माझ्या अंगी भरपूर आहे, व त्यामुळे माझी किल्ली हरवली ती मी कोठे तरी निष्काळजीपणाने ती टाकली म्हणून हरवली असे म्हणता यायचे नाही. ती मी नेहमी खुणेने ठेवीत असे, व ती मला

अंधारातसुद्धा नेमकी घेता येत असे. परंतु आज ती त्या खुणेच्या जागी दिसेना, आजूबाजूसही सापडेना, घरातल्या किल्ल्यांच्या जुडग्यातही मिळेना, साऱ्या कोटांचे व ओव्हरकोटांचेसुद्धा खिसे तपासले तरी गवसेना !

मला तरी ती अतिशय निकडीने हवी होती. इंग्लंडला गेलेल्या एका मैत्रिणीला मला पत्र धाडायचे होते. अगदी अभ्यंतरातल्या मित्रांना किंवा मैत्रिणींना पत्र पाठवावयाचे म्हणजे तो आपल्या भाग्याला आलेला एक रम्य विलास होय असे मी समजतो. प्रत्येक मित्रासाठी किंवा मैत्रिणीसाठी मी स्वतंत्र रंगाचे, आकाराचे आणि सुवासाचे नोटपेपर योजिलेले असतात, व त्यावरच पत्र लिहिण्याचा मी अगदी कटाक्ष ठेवतो. हे नोटपेपर ज्या खणात होते त्याचीच किल्ली हरवून बसली. आज शुक्रवार, विलायतचे टपाल धाडायचा अखेरचा दिवस होता. आजची डाक टळली, की आठ दिवस थांबणे प्राप्त होते. आधीच माझ्याकडून त्या मैत्रिणीला पत्र धाडण्याला जरा चालढकल झाली होती. त्यात आणखी एका आठवड्याची भर पडली, की तिचा माझ्यावर किती रोष होणार ते मला स्पष्ट दिसत होते. काही स्त्रिया अत्यंत प्रेमळ असतात. पण त्यांच्या त्या प्रेमातही विलक्षण तामसीपणा असतो व त्यांची प्रीती सांभाळताना भारी दक्षता ठेवावी लागते. काठोकाठ भरलेले भांडे डोक्यावर घेऊन तारेवर चालणे जितके कठीण तितकेच त्यांच्या प्रीतीत राहणे कठीण. बोलण्याचालण्यात आपला थोडासा तोल गेला, की मस्तकावर धारण केलेली त्यांची प्रीती सांडायला उशीर नाही लागायचा !

सारांश, आज पत्र लिहिणे तर अगदी अगत्याचे होते, ठरीव नोटपेपराखेरीज पत्र लिहावयास मी तयार नव्हतो, आणि ज्या खणात नोटपेपर होते त्याची किल्ली तर काही केल्या सापडेना ! ती आपल्या ठरीव जागी नव्हती, आणि मी ती दुसऱ्या कोठे ठेवल्याचेही मला काही केल्या आठवेना. एखादी गोष्ट आठवेनाशी झाली, की तिच्या आठवणीच्या खटपटीस बसायच्याऐवजी जरा वेळ तिचा विचार अजिबात मनावेगळा करावा म्हणजे आपोआप ती एकदम आठवते असे कोठेसे वाचले होते, म्हणून तसा प्रयोग करून पाहिला; परंतु किल्लीचा विचार थांबवावयाच्या माझ्या प्रयत्नाने तो विचार उलट अधिकच डिवचला जाऊ लागला. शास्त्रीय सिद्धांत पुस्तकातच शोभतात, व्यवहारात वापरू नये म्हणतात ते काही खोटे नाही.

आता काय करावे? कुलूप फोडावे काय?—त्या अत्याचारी मोहाला मी बळी पडलो असतो; पण तितक्यात मला आठवले, की जी किल्ली सापडत नव्हती तिची एक जोड किल्ली टेबल घेतले त्या वेळी मला मिळाली होती. माझ्या मधल्या माडीत भिंतीच्या अंगचे एक लहानसे बंदिस्त फडताळ होते. त्यात मी ती जोड किल्ली टाकली असावी असेही मला खात्रीने वाटले. कारण त्या फडताळाचा मी एखाद्या कोठीसारखा उपयोग करीत असे. माझ्या लिहावयाच्या टेबलातल्या खणात ठेवण्यासारखे जे जे नसे ते ते मी फडताळात टाकून देई. केव्हा तरी काही निमित्ताने लागणारे असे जे जे मला वाटे ते ते चटकन या फडताळात ठेवायची माझ्या विद्यार्थिदशेपासून मला सवय झाली होती. माझ्या वाचण्याच्या, ऐकण्याच्या किंवा विचाराच्या ओघात काही चांगले सापडले, की एका टाचण-बुकात त्याची नोंद करावयाची जशी मला सवय झाली होती तशीच ही सवय होती. काही चांगले वाचले, ऐकले किंवा सुचले, की ते त्या बुकात लिहिल्या-शिवाय मला चैन पडत नसे. आपण कधी हे बुक उघडून पाहतही नाही, मग हे टाचण करण्यात शोभा ती काय असे प्रत्येक वेळी माझ्या मनात येई. पण ते क्षणभरच; आणि काय लिहावयाचे ते मी लिहून टाकीत असे. तद्वतच त्या फड-ताळात काही ठेवावयाला लागलो, की मला वाटे, काय येथे ठेवून उपयोग?— आपण कधी यातली वस्तू मुद्दाम शोधून काढून वापरणार आहोत थोडीच! पण एकीकडे असे मनात येई, तर दुसरीकडे जिवाला राहवत नसे, व काय ठेवायचे ते फडताळ उघडून त्यात टाकून दिले म्हणजेच मला बरे वाटे!

म्हणून मी उठलो आणि ते फडताळ उघडून पाहू लागलो.

पण बोलून चालून मन मानेल तशा टाकलेल्या वस्तूंची जागा ती! तेथे मला तात्बडतोब हवी ती किल्ली थोडीच दृष्टीस पडणार? ती झटकन दिसावी म्हणून अस्ताव्यस्त पडलेल्या त्या साऱ्या वस्तू मी अधीरतेने इकडल्या तिकडे व तिकडल्या इकडे करू लागलो. किती नाना प्रकारच्या वस्तू होत्या त्या! जुन्या चांदीच्या दौती, जुने कंगवे, उन्हात घालायचे चष्मे, शर्टची बटणे, फाउन्टन पेनच्या पोकळ नळ्या, कॅलेंडरवरची भडक रंगातली चित्रे, लग्नमुंजीच्या निमं-त्रणांची सोनेरी शाईत छापलेली जाड कार्डे, कंपासपेटीतील चारदोन सुटी उप-करणे—अशा असंख्य वस्तूंचा गोंधळ त्या जागी झाला होता! व प्रथम जरी निर्विकार मनाने त्या उपसल्या व चाळवल्या तरी हळूहळू त्यातल्या प्रत्येक

वस्तूशी निगडीत झालेली आयुष्यातल्या त्या त्या प्रसंगाची व वृत्तीची आठवण मनात उभी राहून माझ्या अंतःकरणातही अनेक भावनांचा गोंधळ दाटल्यासारखे मला वाटले !

त्या पसाऱ्यात दोन अलगुजे पडली होती. आज जवळ जवळ पंधरा वर्षांत मी त्यांस शिवलो नव्हतो. या वयात मी अलगुज वाजवीत बसलो तर लोक हसतील. मी लोकांच्या हसण्याला किंवा टीकेला भीक घालणारा नाही. पण संगीताची आवड व समजूतही आता अशी राहिली नाही, की अलगुज वाजविण्यात माझे मन रमावे. पण ती अलगुजे मी घेतली तेव्हा ती मला किती प्यार होती ! संगीत-सुंदरीची अन् माझी पहिली जानपछान त्यांनीच करून दिली. माझी वृत्ती त्या वेळीही अतिशय संगीतलुब्ध होती; पण वडिलांचा धाक व विद्यार्थ्याची मर्यादा संभाळून मला जास्तीत जास्त धीटपणा करता येण्यासारखा होता तो एवढाच, की दोन रुपयांत मिळणारी विलायती अलगुजे आणून ती वाजवावी. आणि त्या टीचभर बासऱ्यांनी त्या काळी माझ्या जीवनात कितीदा तरी उन्मत्त आनंद ओतला होता. माझ्या बरोबरच्या वसतिगृहातल्या विद्यार्थ्यांच्या मते मी बासरी चांगली वाजवीत असे, आणि—हायरे, नवयौवनातला तो गमतीचा आत्मविश्वास !—मलाही वाटे मला चांगले वाजविता येते. म्हणून कधी खेळ आटोपल्यावर तिन्हीसांजा, तर कधी जेवण झाल्यावर रात्रीच्या प्रहरी चांदण्यात आम्ही टेकडीवर जात असू, व मी तेथे बासरीवर जे जे येत होते, ते ते वाजवीत असे. एकदा आम्ही नोव्हेंबरमध्ये परीक्षेसाठी मुंबईस गेलो. परत येताना मुंबईहून पहाटे चारला निघणारी एक गाडी त्या वेळी असे, त्या गाडीने निघालो. तेव्हा गाडी सुटल्यापासून मित्रांच्या आग्रहावरून बासरी वाजवावयास मी सुरुवात केली, व मधून गप्पा व मधून माझे एक गीत असा क्रम किती तरी वेळ चालू होता. गाडी सारे बोगदे ओलांडून ऐन घाटमाथ्यावर चढली तेव्हा एकीकडे मोठ्या उन्मादाने मी बासरीतून गीताच्या स्वरमाला काढीत होतो, व एकीकडे साऱ्या दऱ्याखोऱ्या आणि पर्वतावरची नेहमी दिसणारी वृक्षराजी लुप्त करून दशदिशा व्याप्त करणाऱ्या धुक्याच्या अफाट, तरंगत्या समुद्राची अरुणोदयाच्या प्रकाशाने उजळलेली शोभा मी नेत्रांनी लुटीत होतो. त्या घटकेला मुग्ध आनंदाचे जे शहारे माझ्या अंगावर उठले त्यांचे शब्दांनी वर्णन करू पाहणे व्यर्थ होय !—आणि गतकालातल्या अशा किती तरी आनंदाच्या घटका ती अलगुजे पाहून मला आज या वेळी आठवल्या.

ती मी हाती घेतली, काही वेळ त्यांकडे पाहात राहून तशीच धरली, व मग बाजूस ठेवली.

तेथे चार पाच चांदीची व सोन्याची पदकेही पडली होती. त्यांतली दोन मला कॅलेजात असताना वक्तृत्वनैपुण्याबद्दल मिळाली होती. त्या वेळी मी काय बोललो असेन ते आज आठवणे शक्य नव्हते हेच बरे. कारण ते आठवते तर माझे मलाच हसू आले असते. खचित मी एखाद्या उद्भटासारखी काही तरी वाचाळपंचविशी केली असेल, आणि त्या पारितोषकांवरून माझ्या नैपुण्यापेक्षा देणाऱ्याच्या अंतःकरणातल्या कौतुकाचाच बोध लोकांना झाला असेल. परंतु ती पदके मला जेव्हा मिळाली तेव्हा त्यांनी माझ्या हृदयातल्या केवढ्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेचे समाधान केले होते, व मला केवढा हर्ष प्राप्त करून दिला होता ! आज ती सुवर्णपदके जुनी होऊन विटली होती. पण जेव्हा ती मिळावी म्हणून मी झटलो तेव्हा माझ्या वांछेमुळे अधिकच वाढलेली त्यांची कांती किती अलौकिक होती ? त्यांच्या प्राप्तीसाठी केलेल्या श्रमात ईर्षा, तळमळ, विश्वास, भीती, आशा, शंका यांच्या विचित्र संमिश्रणाचे केवढे सुख मी अनुभवले होते ? भाषण मनाशी जुळवून अगर कागदावर टिपून ते शेवटी सफाईने यावे म्हणून त्यातली संकेतस्थळे मी मनात किती जपून साठविली होती, कधी कधी भरसभेत उभे राहिल्याची कल्पना करून जुळविलेले भाषण कोठे तरी एकान्तात करीत त्याचा सभेवर होणारा परिणाम माझा मीच अजमाविला होता. त्या वेळी वक्ता व श्रोता या दोन्ही भूमिका मी एकदम केल्या होत्या, आणि वक्त्याचा अभिनिवेश आणि श्रोत्याची तन्मयता ही एकाच वेळी अनुभवताना माझे चित्त थरारले होते. सभेत करावयाच्या भाषणाची मनाशी सतत जुळवणी व उजळणी करीत असूनही कसलीच तयारी न करता बोलण्याची संपादणी मी कितीदा तरी केली होती, व त्या त्या वेळी, साऱ्या जगापासून काहीतरी गुपित लपविण्याचा जो एक सूक्ष्म आनंद असतो त्याचा मनसोक्त प्रत्यय मी घेतला होता. आणि कधी कधी प्रातःकाळच्या अगदी पहिल्या किंवा संध्याकाळच्या अगदी सरत्या घटकेची शांतता व एकान्त साधून, उंचवट्याच्या उघड्या जागी जाऊन, सुराची उंची आणि वाणीची स्पष्टता साध्य करण्यासाठी खड्या आवाजात मी ओरडलो होतो. मोकाट माळावरच्या त्या बिनप्रेक्षकांच्या भाषणातला आल्हाद और असे. डोंगरावरच्या शिला, वृक्ष व पक्षी आणि रानवारा किती तन्मयतेने माझे भाषण ऐकत ! आणि कोणाची भीडमुर्वत

न ठेवता आपल्याच रंगात खळाळत वाहणाऱ्या जलौघाच्या वृत्तीने त्या ठिकाणी उंच सुरात बोलता बोलता, आपणही या सृष्टीचे एकरूप अंशच आहोत असा विलक्षण सुखाचा भास मला कित्येक वेळा होई! डोंगरावर जाऊन त्या सुखाचा अनुभव मला आता कोठला घेता येणार? ती चांदीसोन्याची पदके पाहून निदान त्या सुखाची गोड आठवण उरी मला ताजी करून घेता येण्यासारखी होती; व तसे मनसोक्त केल्यावरच मी ती हातची खाली ठेवली.

फडताळातल्या त्या पसाऱ्यात एक कुत्र्याच्या गळ्यात घालायचा धातूचा पट्टाही होता. माझी ' जाई ' नावाची एक लाडकी कुत्री होती तिचा तो होता. मी बारा तेरा वर्षांचा होतो तेव्हा एका वैदूजवळून एका भाकरीवर विकत घेऊन मी ती बाळगली होती. माझ्या आईबापांना किंवा घरातल्या कोणाही वडील माणसांना ती आवडत नसे; पण माझ्या मते ती फार गोजिरवाणी आणि हुषार होती. घरातली माणसे तिला घाण समजत; पण मला ती अस्वच्छ कधीच वाटली नाही. मी तिला अंगाखांद्यावर घेत असे, तिचे पटापट मुके घेत असे, आणि तिला पांघरुणात घेतल्याशिवाय दूर निजणे माझ्या जिवावर येई. मी शाळेतून परत येताच शेपटी हालवून व माझ्या अंगावर उड्या घेऊन ती आपला जीव कासावीस करी. एकदा गणिताच्या मास्तरांनी मला छडी मारली होती, व छडीचा तो मला पहिलाच अनुभव असल्याने घरी आलो तो हातावर अजून ते दुःख आहेसे मला वाटत होते, व मन तर त्या अपमानाने जळत होते. पण घरी येताच जाईने आपल्या भाबड्या जिभेने जेव्हा माझा तळहात आधाशासारखा चाटला तेव्हा माझे सारे मानसिक व शारीरिक शल्य पार नाहीसे झाले. जाईला दिल्याशिवाय मी कधी काही खाल्ले नाही, की प्यायलो नाही, व त्याबद्दल वडीलधाऱ्यांनी रागाची कितीही बोलणी केली तरी ती मला अवघड वाटली नाहीत. पण जाई फार दिवस मला लाभली नाही. पहिल्याच खेपेस वीत असताना तिला काय झाले कोणास ठाऊक, तिचे प्राणोत्क्रमण झाले. शेवटच्या क्षणी तिने पाण्याने भरलेल्या डोळ्यांनी माझ्याकडे जी केविलवाणी दृष्टी टाकली ती मी जन्मोजन्मी विसरणार नाही. तिचे शव नेले तेव्हा मी रडून आकान्त केला, व तिची एक आठवण म्हणून तिच्या गळ्यातला पट्टा काढून ठेवला. आज तो पट्टा हाती घेताच या साऱ्या आठवणी माझ्या मनात उचंबळून आल्या आणि नवल असे, की त्या इमानी, मुक्या जनावराच्या त्या अखेरच्या शोकपूर्ण कटाक्षाची

आठवणही मला सुखाचीच झाली. गत दुःखाच्या आठवणीपासून सुखाचाच अनुभव मिळतो हे काही खोटे नव्हे.

त्या फडताळातल्या किती वस्तूंनी माझ्या आयुष्यातले सुखदुःखाचे किती प्रसंग माझ्या दृष्टीपुढे उभे केले ते किती सांगावे? जणू माझ्या चरित्राचे एक पुस्तकच माझ्या हाती आले होते, व त्यातील प्रकरणामागून प्रकरणे मी वाचीत राहिलो होतो. ती प्रकरणे वाचताना मला जो विलक्षण आनंद झाला त्याला दुसरी कसली उपमाच देता येणार नाही. माझी टेबलाच्या खणाची किल्ली हरवली खरी; पण केवढ्या सौख्यागाराची किल्ली मला सापडली! किंबहुना, ती हरवली म्हणूनच ही सापडली!

◎ ◎

: १७ :

# मध्यान्ह

कुसुमावती देशपांडे

आमची मे महिन्याची दुपार म्हणजे वाळ्याच्या ताट्यांनी मढविलेल्या व पंख्यांनी विभूषित केलेल्या खोलीतच बहुधा जायची. अशा खोलीतल्या त्या मंद उजेडात काहीशा अस्वाभाविक परंतु अत्यंत आल्हाद-कारक थंडाव्यात आणि वाळ्याच्या सुगंधात निदान आम्हा वऱ्हाड्यांना तरी उन्हाळ्याचे सारसर्वस्व साठविल्यासारखे वाटते. अर्धवट झोपेत एखाद्या कादं-बरीची पाने चाळावी, मध्येच या कुशीचे त्या कुशीवर वळून एकदा ' हुश्श ' करावे व पूर्णपणे निद्रेच्या स्वाधीन व्हावे, हाच आमचा कार्यक्रम. माझेही हे दिवस बहुतेक असेच जातात.

पण एके दिवशी ऐन उन्हाच्या वेळी बाहेर कोणीतरी आले, म्हणून मला व्हरांड्यावर यावे लागले आणि त्या वेळेस मला कळून चुकले, की निसर्गाला खरोखरीच आपले सौंदर्य, आपली दुःखे, आपले आनंदाचे क्षण—जे जे म्हणून आपल्या जीवनात खरोखर महत्त्वाचे असेल ते ते मानवी दृष्टीपासून दडवून ठेवावेसे वाटते. एरव्ही ज्या वेळी सृष्टीच्या दैनंदिन नाटकाला आत्यंतिक रंग चढतो, तेव्हाच तिच्या सान्निध्यात राहावयाला मानव असमर्थ का ठरता ? तिच्या जीवनातला रस आपल्या अंतःकरणात साठविण्याची संधी साधून घेणे त्याच्या आवाक्याबाहेर का जाते ?

मी बाहेर आले तेव्हाचे दृश्य अगदी असेच होते. दृष्टीच्या सीमेपर्यंत काळी शुष्क जमीन पसरली होती. शब्दांच्या पलीकडे जिचे दारिद्र्य गेले आहे, अशा एखाद्या स्त्रीच्या अंगावरील फाटक्या चिंध्यांप्रमाणे वाळून कोळ झालेल्या गवताचे अवशेष भाजणाऱ्या वाऱ्याने उगीचच भुरभुरत होते. दूरवर नजर फेकली तर

मधूनच मृगजलाचे तरंग दिसत. मधूनच ती काळीभोर जमीनच तरळल्यासारखी खालवर हालल्यासारखी वाटे.

मी कितीतरी वेळ तिथे उभी राहिले—अगदी दूरवर पाहत उभी राहिले. दृष्टीच्या टप्प्यातला कानाकोपरा मी निरखून पाहिला. सगळीकडे स्तब्धता—अनिमिष स्तब्धता पसरली होती. झोप लागली होती का सृष्टीला ? छे: ! तिच्या जिवाची लाही लाही होत होती. तिचा ऊर दाटून आला होता. तिच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. क्षितिजाच्या कडेवर थोडीशी शिंदीची, काही आंब्याची झाडे अंधुकपणे दिसत होती; पण त्यांची छाया कितीशी पुरी पडणार ! त्यांची त्यांनाच याची जाणीव असल्यामुळे ती जणू विमूढपणे निश्चल उभी होती. एक कोरडा ठणठणीत रुंद रस्ता मात्र उन्हात तळपत होता—त्या काळ्या माईवरचे आपले स्वामित्व प्रस्थापित, विजयोन्मादाने तिच्या हृदयावर नाचत होता.

वर अथांग निळे आकाश पसरले होते. अस्फुट बोलाप्रमाणे एखादद्रुसरी घार तिथे त्याच त्या घिरट्या घेत होती. त्या बोलासाठी धरित्रीची धडपड होती का ? त्या अथांग आसऱ्याकडे ती डोळे लावून पाहात होती. त्या निळ्या ओलाव्यासाठी तिचा जीव पिपासला होता...

मला माझ्या एका मैत्रिणीची आठवण झाली. तिच्या जीवनातल्या एका अत्युत्कट प्रसंगी मी तिच्याजवळ होते. अशीच ती हतबुद्ध झाली होती. तिचे विशाल धैर्यशाली अंतःकरण दुःखाने भारावून गेले होते. तिच्याजवळ गेले, की माझे समाधानाचे शब्द आतल्या आत विरून जावे, माझे पाऊल मंद व्हावे. अशा आत्यंतिक दुःखापुढे, त्याच्याशी झगडणाऱ्या धैयशाली जीवापुढे मस्तक आपोआपच नम्र होते. त्या क्षणी सृष्टीसखीही अशीच आपल्या आंतरिक दुःखाशी झगडत होती.

पण मला आणखीही आठवणी झाल्या. पावसाळ्यातील दुपार. आषाढातली रात्र आपल्या काळोख्या तीव्रतेने कविलोकांच्या ध्यानात भरली; पण आषाढी दुपार ? विश्वाच्या विविधतेत रममाण होणाऱ्या कवीचीही नजर वळवून घ्यायला सृष्टीला चित्रविचित्र पोषाख केला पाहिजे. नाहीतर कुठले तरी आत्यंतिक रूप घेतले पाहिजे ना ? निसर्गाच्या अनाघ्रात सौंदर्यात न्हाऊन निघालेल्या वेदकालीन ऋषींनी उषेच्या सुषमेवर कितीतरी स्तोत्रे रचली. तिच्यामधील दैवी अंशाची प्रतीती होऊन, त्यांनी तिच्याजवळ तेजोमय जीवनाचा आशीर्वाद मागितला; पण मध्यान्हीची एकतानता त्यांनाही जाणवली नाही. ग्रीक लोकांना

निसर्गाच्या एकूण एक अवस्थेत दैवी चैतन्य दिसले व त्यांनी त्या प्रत्येक अवस्थेला मूर्तिमय स्वरूप दिले; पण त्यांच्याही सौंदर्यप्रेमी दृष्टीला मध्यान्हीच्या साध्या-भोळ्या वृत्तीत देवताकरणाइतकी आकर्षता दिसली नाही. सारखेपणाच्या शांतीतच ज्यांचे सौंदर्य साठविले आहे, अशा गोष्टीकडे त्यांचेही क्वचितच लक्ष जावे ?

खरोखर, पावसाळी दुपार म्हणजे प्रेमळपणाची मूर्ती आहे. कॉलेजातील अनियंत्रित दिवसांत कित्येक वेळा मी दुपारचा सर्वच वेळ खुल्या आकाशाखाली घालविला आहे. त्या वेळी सर्वजण मोठमोठ्या इमारतीत आपआपल्या कामात दंग झालेले असल्यामुळे सारे रस्ते खुले होतात. मानवी श्वासाचा संपर्कही नसलेला पावसाळी वारा अनिर्बंधपणे वागडू लागतो. नुकतेच वर मान करणारे कोवळे गवत आपले पंख फडफडवू लागते, त्या सौम्य उन्हाने जणू धीट होऊन इकडे तिकडे पाहू लागते. हसू लागते. येऊन गेलेल्या सरीच्या थेंबांनी झाडे पाने चमकू लागतात.

अशा वेळी माझ्या एका मैत्रिणीला व मला आत बसून जीव कोंडल्यासारखे वाटू लागे. कशाचीही फिकीर न करता, छत्रीचा कधीच विचार न करता, आम्ही आमच्या हक्काच्या शेता-टेकड्यांकडे वळावे.

एरव्ही फिरायला गेले, की आम्हांला कोण संभावीत बनावे लागे ! रस्त्याने गुणगुणायची सोय नाही, मोठमोठ्याने हसण्या-खिदळण्याची सोय नाही ! कुठे थांबावेसे वाटले, तर नीटच बसणे भाग. पण दुपार ? दुपार म्हणजे पूर्ण स्वातंत्र्याची वेळ. ते स्वातंत्र्य लाभले म्हणूनच की काय, आम्ही कितीतरी वेळ अक्षरही बोलू नये. प्रत्येकीचे मन त्या अपरंपार शांतीतच विलीन होऊन जावे. त्या विश्वस्त, प्रीतिमय, हळुवारपणे फुललेल्या वातावरणाने जीव भारला जावा. टेकडीवर पोचताच कुठेतरी, लहर लागेल तिथे आम्ही अंग पसरून द्यावे. पूर्ण सुखमय आयुष्यातदेखील इतक्या समाधानाचे क्षण क्वचितच येत असतील.

तिथे अद्‌भुतरम्य असे काहीच नव्हते. भरास आलेली, कोकिळेच्या गाण्याने निनादलेली आंब्याची झाडे नव्हती; संध्येचे विलास, तिची उत्कटता, तिचे गूढ औदासीन्य नव्हते; उषेची चैतन्यपूर्ण खळखळ, क्षणोक्षणी बदलते रंग नव्हते—काहीही नव्हते. फक्त सारख्याच सारख्या दिसणाऱ्या टेकड्या व वर अथांग पसरलेले काळसर निळे आकाश होते. जलांशामुळे भारावलेला व त्यामुळे जणू एकाच दिशेने मंदपणे वाहणारा वारा होता; पण म्हणूनच तिथे शांती होती,

अनुक्रम ... ..................... बि: .....................
क्रमांक ..................... नों दि .............



विश्रब्धपणाचे समाधान होते, म्हणूनच तिथे एक प्रकारच्या चिरंतन आनंदात मन एकत्रित होई. अशा वेळी जीवनातल्या खेचाखेचीचे—सुखदुःखांच्या धावपळीचे—खरे महत्त्वमापन होते. सर्व निरर्थक विचार-विकार गळून पडतात व जीवनातील केंद्रीभूत सत्याचे आकलन होऊ लागते.

हिवाळ्यातील दुपार तरी काय कमी मनोरम असते? त्या वेळच्या ऊबदार हवेची गोडी अस्सल सुखवाद्यांनादेखील पटेल. तिचा आस्वाद घेत उन्हात पडले असताना डोळ्यांना चारी बाजूंना जणू समृद्धीची ऊब दिसू लागते. हेमन्ताचे सोने सगळीकडे पसरलेले असते. गव्हावर सोनेरी तांबुसपणा चढायला सुरुवात होते. कडूनिंबाच्या पानांचे सोने होऊन ती गरगरा शिवाशिवी खेळत हिंडू लागतात. जसजशी शिशिराची कळा ओसरू लागते, तसतशा भिंगाऱ्याच्या झाडांवर निव्वळ सोनेरी शेंगाच शेंगा लटकू लागतात; तर पिवळ्या कांचनाचे झाड एकेका फांदीवर एखाददुसरेच सुवर्णमय फूल घेऊन डोलू लागते. पराकाष्ठेच्या एकतानतेने जणू दोघेही एकूण एक पानाला झुगारून देऊन आपल्या जीवनाचे सुवर्णमय ध्येय गाठण्याच्या आनंदात विहरत असतात. भिंगाऱ्याच्या विस्तीर्ण वृक्षावरची एकेक शेंग किंवा कांचनाच्या फांदीवरचे एकेक फूल म्हणजे जणू एकेका ओजस्वी कल्पनाबीजाचे प्रकाशमय मूर्त स्वरूपच. आपल्या जीवनरसाला बाहेर पडायला तेवढेच मार्ग ठेवून ते त्याचे जणू प्रकाशातच रूपांतर करतात व या सर्वांच्या भरीला सूर्याचे सोनेरी किरण. मिडास राजाने हेमंत-शिशिरातील दुपारच्या सौंदर्याकडे डोळे उघडून पाहिले नसावे का?

परंतु मध्यान्हीचे सौंदर्य स्थलावर किंवा ऋतूवर अवलंबून नाही. अद्भुततेपासून अलिप्त व कुठल्याही तऱ्हेच्या अतिरंजनाने अदूषित अशा वास्तविकतेचे सौंदर्य तिच्यात आहे व म्हणून जीवनाच्या मुख्य वृत्तीशी तिची वृत्ती समरस होऊ शकते. जीवनसंगीताच्या स्थायी स्वराची मधुरता व महत्त्व हिच्यात आहे. ती वेळ भावनेने ओथंबलेली आहे; पण ती भावना इतकी सखोल, इतकी संथ व अखंड आहे, की बुद्धीच्या अत्यंत प्रभावशाली झोताने तिचे निरीक्षण करून घ्यावे. मध्यान्हीच्या वेळेत समतोलपणाचे स्वारस्य, गंभीरतेचा आनंद साठवलेला आहे. तीत उच्छृंखलपणा नाही, भडकपणा नाही. अभिजातपणाला साजेसें तिचे सौंदर्य आहे. प्रगल्भ हृदयाप्रमाणे तिची दुःखे निःशब्द आहेत. त्याप्रमाणेच तिचा आनंद शांत आहे.

० ०

: १८ :

# बोलण्याची कला आणि ऐकण्याची कला

श्री. के. क्षीरसागर

जेव्हा एखाद्या प्रसिद्ध पुरुषाचे स्वभावचित्र पाश्चात्त्य लेखक रंगवितात, तेव्हा त्याच्या संभाषणचातुर्याचाही उल्लेख—अर्थात त्याचे अंगी संभाषणचातुर्य असल्यास! —करतात. कारण कोणाही माणसाचे जे अगदी पहिले गुण आपल्या लक्षात येतात त्यात रूप आणि बोलणे हे मुख्य होत. किंबहुना बोलण्यापुढे रूपही विसरून जाते आणि अशाप्रकारे डोळ्याहूनही आपण कानांना अधिक महत्त्व देतो म्हटले तरी चालेल!

बोलण्यापुढे रूपही विसरून जाते, हे मी दोन अर्थांनी म्हणतो. कित्येक माणसांची भाषणशैली इतकी आकर्षक असते, की तिजमुळे त्यांच्या रूपभावाचा विसर पडतो; तर कित्येक माणसे तोंड उघडताच इतकी उघडी पडतात की, त्या वेळी त्यांना रूप चांगले लाभले असूनही त्यांचे तोंड चुकवावेसे वाटते. शिवाय बोलण्याची कला ही अशी विचित्र कला आहे की, 'कला' म्हणताच ज्यांच्या कपाळाला आठ्या पडतात, त्यांनाही तिच्याशिवाय चालत नाही. आणि मोठ-मोठ्या लोकांच्याही अंगी ती असतेच असे नाही.

आपल्याकडेही हल्ली समकालीनांची स्वभावचित्रे रेखाटण्याची, आठवणी लिहिण्याची पद्धत वाढत आहे. आणि त्या निमित्ताने कित्येक प्रसिद्ध व्यक्तींच्या संभाषणचातुर्याकडे अथवा त्याच्या अभावाकडे लक्ष वळत आहे. साहित्यिक म्हणून, पुढारी म्हणून वा कलावंत म्हणून ज्यांना प्रसिद्धी आहे, अशांच्या लक्षात ही गोष्ट येऊन चुकल्यामुळे त्यांचे लक्ष स्वतःमधील या भागाकडे वळत आहे. आणि कित्येक तर प्रसिद्धीचे एक साधन या दृष्टीने संभाषणाचे एक तंत्रच बनवीत आहेत, असे आढळून येते. अर्थात त्यामुळे त्यांना हवी त्या प्रकारचीच प्रसिद्धी मिळेल असे नाही! कारण संभाषणासंबंधी आपल्याकडे कित्येक चमत्कारिक

कल्पना आढळून येतात ! कित्येकांचा कल जास्त बोलण्याकडे असतो. युद्धात केवळ संख्याबलाने शत्रूचा पाडाव करण्याची म्हणून एक तऱ्हा असते, त्यावरून या मंडळींनी आपली पद्धत बसविली असावी. कित्येकांचा पुस्तकी बोलण्यावर भर असतो. कित्येक भयंकर जपून बोलत आहेत, याची श्रोत्याला सारखी जाणीव होते. तर कित्येक औपरोधिक बोलण्यात हुषारी मानतातसे दिसते. कित्येक न बोलता बसून राहण्यात मोठेपणा मानतात. बैठकीत बरीच मंडळी असतील, तर ही युक्तीही करण्यास हरकत नाही. पण दोघांत एकजण घुमेपणाने असल्यास मला थोडे कसेसेच वाटते !

पण ज्यांच्या संभाषणाने आल्हाद होतो, असेही लोक भेटत नाहीत असे नाही. यांत लहान–मोठे, प्रसिद्ध–अप्रसिद्ध सर्व तऱ्हेचे लोक असू शकतील. पण माझ्या वाचकांना ही सहज ओळख पटावी म्हणून मी प्रथम प्रसिद्ध व्यक्तीच घेतो. अर्थात यांत अमुकच का निवडल्या आणि अमुक का वगळल्या अशी तक्रार मात्र चालणार नाही. ज्या प्रसिद्ध व्यक्तींचा आणि माझा परिचय आला नाही, त्यांना मी वगळणारच; आणि ज्यांचा संबंध आला अशाही कित्येक व्यक्तींचा उल्लेख मला टाळावा लागेल.

प्रसिद्ध व्यक्तींपैकी ज्या व्यक्तींच्या संभाषणात मला अनुपमेय आल्हाद होई अशा व्यक्तींत कै. माधवराव पटवर्धन यांचे नाव मी अग्रभागी घालीन. बुद्धिमत्ता, विद्वत्ता, उत्कटता, विषयवैचित्र्य वगैरे अनेक दुर्मीळ गुण माधवराव यांच्या संभाषणात जितके आढळत, तितके मला दुसऱ्या कोणाही प्रसिद्ध महाराष्ट्रीयाच्या संभाषणात आढळले नाहीत. त्यांच्या माझ्या वृत्तीत आणि मनात फारसे ऐक्य नसूनही त्यांच्याशी बोलण्यात एक प्रकारचे सौख्य मिळे. मी अनेक बुद्धिमंतांशी आणि विद्वानांशी बोललो आहे. तथापि माधवरावांशी बोलण्यात जे एक मोकळ्या मैदानाचे आणि सोसाट्याचे वातावरण असे, ते मला कुठेही आढळले नाही. एखाद्या विषयावरील माधवरावांची मते पटत नसली, नव्हे साफ चूक वाटली, तरीही त्यांच्या प्रतिपादनशैलीचे आणि प्रामाणिकपणाचे तेज इतके प्रबल असे की, सत्य आपल्या बाजूला असले तरी सत्यप्रीती त्यांच्या बाजूला अधिक आहेसे वाटे.

माधवरावांना विनोद आवडे; आणि ते भाबडे व खिलाडू असल्याने क्वचित त्यांच्या मतांचा उपहास करून विनोद केला तरी ते मनमुराद हसत, व फिरून आपले म्हणणे सरळ रेषेत मांडून दाखवीत. बोलता बोलता उसळून ते इंग्रजीत

शिरले म्हणजे त्यांच्या अस्खलित आणि ऐटदार इंग्रजीचा आनंद काही वेगळाच असे ! खाजगी बोलण्यात ते भाषाशुद्धीचा आग्रह धरीत नसत हा मी एक महालाभच समजत असे. माधवरावांच्या बोलण्यात क्वचित एकाच कारणाने दोष उत्पन्न होई. ते सर्व माणसांना जवळ जवळ सारखीच सरळ समजत. स्वभाव लक्षात घेऊन बोलण्याइतकी विनोदबुद्धी त्यांच्याजवळ नव्हती व त्यामुळे कित्येकदा अस्थानी मोकळेपणा आणि औदार्य दाखविण्याचा दोष त्यांच्या हातून घडे.

तांब्यांचे बोलणे म्हणजे मूर्तिमंत काव्यप्रेम असे. ते प्रारंभी अबोल व गंभीर वाटत; पण बैठक रंगल्यावर इंग्रजी मराठी कवितांच्या पंक्ती, तत्त्वप्रतिपादन, प्रतिस्पर्धी विचारसरणीवर हल्ला वगैरे सर्व प्रकार पाहावयास सापडत. बोलताना त्यांच्या डोळ्यांत जे विलक्षण तेज दिसे ते साधारणतः गूढवाद्याखेरीज कोणाच्या डोळ्यांत दिसत नाही, अशी माझी समजूत आहे. तांबेही मधेच उसळून इंग्रजी बोलत. तांब्यांच्या बोलण्यात उत्कटता व आवेश असे पण ते भोवतालच्या लोकांपासून अलिप्त आहेतसे वाटे. अर्थात मनमोकळेपणाचा आनंद माधवरावांच्या बोलण्यात अधिक मिळे.

माधवराव किंवा तांबे यांचे इतर गुण कोणतेही असोत, बुद्धिमत्तेत त्यांची बरोबरी करू शकतील अशी माणसे नसतात असे नाही, पण केवळ बुद्धिमत्तेने संभाषण रंगत नाही. माधवरावनंतरच्या पिढीतील माणसांच्या बाबतीत तर मी असे पाहिले आहे, की बुद्धिमान माणसेच संभाषणाचा आनंद देण्यास नालायक ठरतात ! या मंडळींपैकी काहींचा ठराविक विषय म्हणजे ' लेटेस्ट ' इंग्रजी पुस्तकांचे उल्लेख. त्यातही रमून जाऊन एखादा विषय सहजगत्या विचारविनिमयाकरता काढतील असे नाही. अखिल जग म्हणजे, latest पुस्तके वाचण्याचे एक शर्यतीचे मैदान आहे, अशी त्यांची कल्पना दिसते ! अर्थात अशा संभाषणाचे पर्यवसान पुस्तकाच्या कॅटलॉगची तोंडी आवृत्ती काढण्यात होते ! कारण ' लेटेस्ट ' म्हटलं तरी प्रत्येकजण तीच पुस्तके वाचील असे नव्हे. शिवाय ऐकणाराही बहुधा या लेटेस्टच्या रोगापासून मुक्त नसल्याने तो आपली यादी बाहेर काढतो, आणि मग खऱ्या संभाषणाचा भुकेला श्रोता बहुधा तेथून काढता पाय घेतो !

अशा बुद्धिमंतांची आणखी एक कल्पना म्हणजे औपरोधिक भाषण म्हणजेच काय तो हुशार व विनोद ठरण्याचा मार्ग ! कित्येकजण बुद्धिपुरस्सर स्वीकारलेल्या

अबोलपणाची साथ या उपरोधोर्मीस करावयास लावतात. कदाचित मंद बुद्धीच्या श्रोत्यावर या अस्त्राचा झालेला इष्ट परिणाम पाहून त्यांनी त्याचा सार्वत्रिक प्रयोग चालविलेला असतो की काय कोण जाणे! माधवराव पटवर्धनांच्या नेमकी विरुद्ध अशी ही तऱ्हा झाली! माधवराव आपल्यासमोर कुत्सित अगर निर्बुद्ध मनुष्य असला, तरी तितक्याच मोकळेपणाने आणि तितक्याच उत्कटतेने बोलत. तर हे उपरोक्त वर्गातील लोक मंदमती आणि कुत्सित लोकांकरिता तयार केलेले उपरोधास्त्र सर्रास सर्वांवर सोडतात. त्यांच्या या सवयीचे मूळ कदाचित त्यांना यापूर्वी भेटलेल्या श्रोतृवर्गात असेल. पण श्रोत्यांच्या वृत्तीप्रमाणे आणि कुवतीप्रमाणे ज्यांच्या संभाषणपद्धतीत बदल होत नाही, त्यांची पद्धती मी जिवंत पद्धती समजत नाही.

आणखी एक पद्धती म्हणजे 'अतिसावध' संभाषणपद्धती! या पद्धतीचे भोक्ते मत देताना घाबरतील, स्तुती करताना घाबरतील, साधे विधान करतानासुद्धा घाबरतील. समजा, त्यांना असे म्हणायचे आहे की, "गटेचे आत्मचरित्र किंवा रोमाँ रोलाँ चे 'आय् विल् नॉट् रेस्ट्' किंवा मॉरिस् हिंडसचे एखादे पुस्तक ...मी परवा वाचले व ते मला फारच आवडले..." तर एकदम ते तसे म्हणून मोकळे होणार नाहीत; ते खाली मान घालून चोरट्या नजरेने तुमची चर्या न्याहाळीत म्हणतील, "आपण रोमाँ रोलाँचे 'ऑय् विल् नॉट् रेस्ट्' वाचले असेलच." आणि समजा, तुम्ही ते वाचले असले, तर त्यांचा रोमाँ रोलाँविषयीचा उत्साह आणखी पन्नास टक्के कमी होईल! आणि तुम्ही वाचले आहे की नाही याची आधी चौकशी करून ठेवण्यात तरी जिला मी 'घाबरटपणाची मनोवृत्ती' म्हणतो तीच असते. आपण एखाद्याचे मोठे कौतुक करायला जावे आणि लोकांना ती नवीन नसावी, मग त्यात आपले काय राहिले?

आपण दुसऱ्याच्या हास्याचा अगर अनुकंपेचा विषय होऊ नये ही एकमेव काळजी वाहता वाहता, या मंडळींच्याजवळ जी काय अल्पस्वल्प उत्कटता आणि सहजता असेल तीही कोळपून जाते. त्यांचे बोलणे म्हणजे भांडून अबोला धरलेल्या नवराबायकोनी, अथवा नुकतेच सुतक आलेल्या भावांनी वेळ घालविण्याकरिता मांडलेल्या बुद्धिबळाच्या डावासारखे असते! डोक्यास शीण होऊन पुनः खेळाचा आनंद नाही तो नाहीच!

अशा प्रकारचा सावधपणा अधिकारारूढ लोक, सार्वजनिक पुढारी वगैरेंना भिन्न हितसंबंधाच्या लोकांशी बोलताना दाखविणे जरूर असते; पण साध्या खेळी-

मेळीच्या बैठकीतही जे लोक इतके जपून बोलतात, त्यांच्यापासून कोणाला कधी आनंद मिळत असेलसे मला वाही वाटत. शेक्सपियरच्या शब्दांत थोडा फरक करून सांगायचे झाल्यास मी, “They would weep on their wedding day ” असे म्हणेन !

संभाषणात मोकळेपणा व उत्कटपणा यांना मी पहिले स्थान देतो. पण याचा अर्थ जे भडाभडा एकसारखे बोलत राहतात, त्यांची संभाषण-पद्धती मला मान्य आहे असा नव्हे. कारण एक गोष्ट मला सांगितली पाहिजे. एकसारखे बोलून श्रोत्याला गुदमरवून टाकणाऱ्या मंडळींच्याजवळ मोकळेपणा आणि उत्कटपणा असतोच असे नाही. वर वर्णिलेल्या ‘ सावध–पद्धती ’त प्रतिपक्षाची मात न होऊ देण्याबद्दल जी ‘ परेशानी ’ असते तीच या ‘ धबधबा-पद्धती ’त असते.

कधी कधी केवळ तारतम्याच्या अभावामुळेही हा अतिरेक होतो. अर्थात उत्कटतेच्या खालोखाल तारतम्य व चातुर्य यांना महत्त्व आहे. तारतम्याच्या अभावामुळे अथवा अनजानपणामुळे, भाषणातिक्रमण करणारांत, तरुण मंडळींची संख्या अधिक असते. एखादे वेळी ही मंडळी एखाद्या माणसाबद्दल आदर दाखविण्याकरिता म्हणून भेटीला जातात आणि त्याचे मत आपल्यासंबंधी चांगले व्हावे, त्याला आपली बुद्धिमत्ता दिसावी, म्हणून त्याच्यावर भाषणाची सरबत्ती सुरू करतात. यात तारतम्याभावामुळे एकच चूक झालेली असते. ती ही की, बोलण्यापेक्षाही ऐकण्यात कित्येकदा अधिक बुद्धिमत्ता दिसून येते, हे ही मंडळी लक्षात घेत नाहीत ! विशेषतः आपल्याहून अधिक बुद्धिमान आणि ज्ञानवान मनुष्याकडे गेल्यानंतर, आपल्या भाषणाने त्यास आपली बुद्धिमत्ता दाखविण्यापेक्षा, आपल्या श्रवण-पद्धतीने ती दाखविणेच अधिक सोपे व श्रेयस्कर असते.

कारण ऐकण्याची कला ही बोलण्याच्या कलेइतकीच महत्त्वाची आहे; आणि या दोन कला परस्परावलंबी तर आहेतच ! ऐकण्याची कला नाहीशी झाल्यास, बोलण्याची कला टिकणे शक्य नाही. माझ्याकडे माझे चाहते म्हणून आलेल्या काही लेखकलेखिकांना ऐकण्याच्या कलेचे महत्त्व मला ऐकवावे लागले आहे. बिचारे बुद्धिमान आणि सज्जन होते. त्यांना माझा परिचय आणि माझे भाषण हवे होते, म्हणून तर ते मुद्दाम ओळख करून घेऊन आले होते ! पण उत्साहाच्या भरात ते आपल्या आगमनाचा हेतूच विसरून गेल्यासारखे दिसले !

दा. क्र. ७३०३०

पण मला त्या मंडळींनी दिलेला मोठेपणा कदाचित काल्पनिकही असेल; आणि ऐकण्याची कला अंगी नसल्याने त्यांच्या बैठकीत त्यांचे कदाचित तितकेसे नुकसान झालेही नसेल. पण ऐकण्याची कला अलीकडे लुप्त होत चालली आहे हे मला पुण्यातील एका प्रख्यात पंडितांच्या बैठकीतील अनुभवावरूनही अनुभवास आले. मी माझ्या एका विनोदी मित्राला एकदा गमतीने म्हटलेही होते की, " दोन लुप्तप्राय कला " या विषयावर मी एकदा लिहिणार आहे. तो म्हणाला, " त्या कोणत्या ? " " The art of listening and the art of blushing. " ऐकण्याची कला नाही म्हणून तरुण पुरुष ज्ञानाला मुकत आहेत आणि तरुण स्त्रिया सहजलभ्य अशा मोहकतेला मुकत आहेत !

मी केवळ गंमत म्हणून बोललो असेन पण या दोहोतही साधारणधर्म विनयाचा आहे. त्याच्या अभावामुळे आजच्या कित्येक तरुणांना आपल्याहून अधिक योग्यतेच्या व आपल्याहून वेगळ्या पिढीतील व्यक्तींकडून ज्ञानलाभ करून घेता येत नाही, हे मी वर निर्देशिलेल्या पंडितांच्या बैठकीतच पाहिले आहे. ज्याच्याशी संभाषण केल्यास आजच्या पिढीत नाणावलेल्या विद्वानासही ज्ञानाचा लाभ होईल, त्याच्याकडे अर्धेकच्चे तरुण येऊन श्रवणापूर्वीच खंडनास सुरुवात करतात व ज्ञानलाभास मुकतात, तेव्हा मला त्यांची कीव येते !

पण विनय आणि लज्जा यांचा केवळ अभिनय करून चालणार नाही. विनय म्हणजे मनाचा ताजेपणा, कोवळेपणा होय. तो अल्पवयस्कांत स्वभावतःच असतो. व्यक्तींचा आणि सृष्टीचा मोठेपणा पाहून आपल्या कोवळ्या वयात आपण मुग्ध आणि स्तिमित होतो. पण थोडेफार सज्ञान होताच आपले मन खुंटल्यासारखे व निबर बनते. पण वस्तुतः ते तसे होण्याचे काहीच कारण नाही. आपण वयाने वाढलो अगर शरीराने निबर झालो तरी महापुरुषांपुढे आणि महान सत्यांपुढे आपण बालकच नसतो काय ? ही बालवृत्ती टिकविणे हेच ज्ञानार्जनाचेही रहस्य होय; व स्नेहार्जनाचेही रहस्य होय. आजकाल अज्ञान वयातच मनाने निबर झालेले तरुण, आणि स्त्रीजन्माला येऊनही पुरुषी आव आणणाऱ्या तरुणी यांचा जमाना आला आहे की काय असे वाटते. या मानसिक ' निबरपणामुळे ' ज्ञानाचीही हानी होते आणि सौंदर्याचीही हानी होते !

लज्जेचा आणि सौंदर्याचा विषय निघाल्यावर स्त्रियांमधील संभाषणकौशल्यासंबंधी लिहिणे अपरिहार्यच आहे. सर्वसाधारण म्हणून सांगायचे झाल्यास स्त्रिया

बोलण्यात चतुर असतात—नव्हे, पटाईत असतात, हे कोणालाही कबूल करावे लागेल. ' बायका ' या माझ्या पुस्तकांतील ' बायका ' या लेखात, स्त्रियांचा हा गुण सांगितलाही आहे. ज्या प्रख्यात पुरुषांच्या संभाषणपटुत्वाचा मी उल्लेख केला, त्यांच्या वर्गात स्त्रियांना घालता येणार नाही. ज्यांना इंग्रज लेखक Conversationalist म्हणून म्हणतात त्यांच्या बोलण्यात बहुश्रुतता, चातुर्य, बुद्धिवैभव वगैरे गुणांसच महत्त्व असते. पण स्त्रियांचे ' वाक्पाटव ' व्यावहारिक आणि मर्यादित क्षेत्रांत अधिक अनुभवास येते. जेव्हा निश्चित विषय नसल्यामुळे पृथ्वीच्या पाठीवरील कोणताही विषय निघतो, अशा बैठकीत स्त्रिया पुरुषांपुढे टिकाव धरणार नाहीत. परंतु कौटुंबिक बैठकीत एखाद्या नियोजित समारंभाची चर्चा असू द्या; नाही तर एखाद्या ऋणानुबंधी कुटुंबातील नवराबायकोच्या तंट्या-संबंधीचा न्यायनिवाडा असू द्या: नाही तर एखाद्या बहकलेल्या मैत्रिणीचा इतिहास निघू द्या—स्त्रिया अस्खलितपणे वक्तृत्व करतील. त्या बोलण्यात ओघ आढळेल, आत्मविश्वास आढळेल आवेश आढळेल, अस्सल मराठीचा नमुना आढळेल.

शहाण्या स्त्रिया आपल्या वाक्चातुर्याचे क्षेत्र ओळखतात व त्या बाहेरचे विषय निघताच मुग्ध आणि चकित अशा श्रोत्यांची भूमिका वठवून बलवान प्रतिस्पर्ध्या-लाही अंकित करतात. तर उलट कित्येक स्त्रिया सर्वच क्षेत्रांत सारख्याच आत्म-विश्वासाने आणि आवेशाने बोलण्याच्या भरीला पडतात आणि फसतात !

बौद्धिक विचारविनिमयही नसेल आणि काही व्यावहारिक वाटाघाटही नसेल तर बैठक रंगविण्यास हमखास हजर होणारे विषय म्हणजे लोकापवाद आणि विनोद. विनोद सर्वांनाच साधतो असे नाही आणि तरी ज्यांना विनोद साधत नाही ते विनोदाचा नाद सोडतात असेही नाही. त्यामुळे तर संभाषणात विनोदाचे स्थान फार महत्त्वाचे ठरते. वस्तुतः ही गोष्ट जितकी दुःसाध्य आहे तितकीच सुसाध्यही आहे. सर्वांनीच बुद्धिप्रधान आणि पुस्तकी विनोदाची हाव का धरावी ? आनंदाच्या आणि गमतीच्या लहरीत असल्यास साधी माणसेही सुंदर विनोद करून जातात; तर उलट मनात आनंद नसता ओढून आणि उकरून विनोद करणाऱ्या बुद्धिमन्तांची कीव येते !

विनोद करण्याची सर्वांत निकृष्ट पद्धती तुम्हांस माहीत आहे काय ? नसल्यास ऐका. दैनिक आणि साप्ताहिक ' टाइम्स 'मधील वाचलेला विनोद फिरून एकदा जबरदस्तीने भर बैठकीत श्रोत्यांना ऐकविणे !

संभाषणात हमखास येणारा, राहता राहिला विषय म्हणजे लोकापवाद ऊर्फ स्कँड्लस ! लोकांच्या भानगडीसंबंधी कधीही बोलू नये हा नियम सांगण्याइतका मी भोंदूही नाही, की तो पाळण्याइतका मी साधूही नाही. मनुष्यस्वभाव हा सर्वत्र व सर्वकाळ सारखाच असणार ! रहस्याविषयी कुतूहल हा आपणा सर्वांचा स्वभावच असतो; आणि तरीही त्या कुतूहलातही सरस–नीरस नसतेच असे नाही. लोकापवादासंबंधी मनुष्य ज्या वृत्तीने बोलतो त्यावरून त्याचा स्वभाव ओळखता येतो. कित्येक माणसे लोकांच्या गौरवासंबंधी अत्यंत चिकित्सेखोर आणि शंकित अशी असतात; तर उलट लोकापवाद म्हटला की त्यांचीच आस्तिक्य बुद्धी आणि श्रद्धा जागृत होते ! तसेच दर बैठकीत एक तरी पहिल्या प्रतीचा लोकापवाद सांगता आला नाही, तर दिवस वाया गेला असे ते समजतात. ही विकृत वृत्ती सोडल्यास, लोकापवादास संभाषणात स्थान आहे व राहणारही हे कबूल केले पाहिजे. मी असे एकदोन पट्टीचे बोलणारे पाहिले आहेत—ते प्रख्यात साहित्यिक आहेत—की, जे ओळीने दोनदोन तीनतीन तास प्रख्यात व्यक्तींची कुलंगडी, विश्वास बसलाच पाहिजे इतक्या ‘दस्तऐवजी’ पुराव्यानिशी पुरवू शकतात !

ऐकण्याच्या कलेचे माहात्म्य मी वर वर्णन केलेले आहे; पण “न ऐकण्याची” म्हणूनही एक कला आहे असे मला वाटते; व तिचा उपयोग मी अशा प्रसंगी करतो.

संभाषणपटू म्हणून अशा मंडळींची ख्याती झालेलीही मी पाहिली आहे. उत्कट आणि बौद्धिक संभाषण आपल्याकडे दुर्मीळ; आणि अशा संभाषणाचे भोक्ते तर त्याहूनही दुर्मीळ—आणि म्हणूनच माधवराव तांबे यांच्या संभाषणकलेची आठवण मला विशेषच होते !

० ०

...

: १९ :

# ब्रह्याची नगरी

रा. भि. जोशी

सृष्टी रचण्याचे सगळे काम पुरे झाल्यावर ब्रह्मदेवाने कृतकृत्यतेचा एक निश्वास सोडला, आणि मग ती अशी आपल्यासमोर धरून तो विचार करू लागला, की ह्या सृष्टीत आता आपल्याला राहण्यासाठी कोणते ठिकाण ठरवायचे. शेवटी आपल्या आठही डोळ्यांनी आपण रचलेल्या सृष्टीचे चौफेर निरीक्षण करून त्याने महाराष्ट्राच्या साधारण मधोमध येणारे गोदावरी नदीच्या उत्तर तीरावरचे एक ठिकाण नक्की केले, आणि आपल्या सृष्टीची केवळ सुप्रतिष्ठाच ठरेल असे प्रतिष्ठान नावाचे नगर तिथे उभे केले. कल्पान्तापर्यंत ते नगर उभे राहायचे असल्यामुळे ती वेळ केव्हा येणार ते आपल्याला कळावे म्हणून त्याने नदीच्या काठापासून काही अंतरावर एका उंच जागी एक सुंदर कोरीव काम केलेला दगडी खांब उभा केला. ह्या खांबाच्या शेंड्यावर बसून चिमणी पिऊ शकेल इतके गोदावरीचे पाणी चढले म्हणजे सृष्टीवर प्रलय होणार, आणि ब्रह्म-देवाला मग पुन्हा रचनेच्या कामाला आरंभ करावा लागणार. तो खांब अजून पैठणात उभा आहे.

ब्रह्मदेवाने स्वतःसाठी जे नगर निर्माण केले ते एखाद्या राज्याची राजधानी व्हावे; चौल, ठाणे, सोपारा अशा लांबलांबच्या बंदरांतून मिसरसारख्या समुद्र-पारच्या देशातला माल तिथे यावा आणि तिथून चारी ठिकाणी जावा; ते विद्यांचे आगर, धर्माचे न्यायपीठ, आणि कवींचे संमेलन-स्थान व्हावे; मातीच्या माणसांना पराक्रमाची प्रेरणा देणाऱ्या शालिवाहनाने तिथे आपले कर्तृत्व गाजवावे; हाल राजासारखा कविवत्सल, रसिक, पराक्रमी, आणि अद्भुतरम्य दिव्यमानुषी कथांचा नायक होण्याइतका लोकप्रिय राजा ह्या नगराला लाभावा आणि त्याने पैठणची कीर्ती आणि प्रतिष्ठा कळसाला चढवावी ह्यात नवल काय राहणार !

अनुक्रम........................ बि: ...... ..
क्रमांक ........................ नों. दि. ...


हालाच्या ह्या वैभवशाली राजधानीतल्या वाड्यांच्या घोटीव भिंतीत प्रतिबिंबित झालेल्या प्रणयक्रीडा वाटसरांची चित्ते विचलित करीत आणि त्या नगरातल्या विलासिनींच्या स्तनतटावरून धुतल्या गेलेल्या अंगरागाने रंगलेला गोदावरीचा प्रवाह पाहून, इंद्रधनुष्य भूमीवर उतरले की काय असा अंतरिक्षात संचार करणाऱ्या यक्षगंधर्वांना संभ्रम उत्पन्न होई.

पैठणात आजही प्रचंड वाडे आहेत. त्यांच्या आतल्या भिंतीही तशाच घोटीव असतील काय? आणि असल्या तर त्यांत आज काय प्रतिबिंबित होत असेल? असे मनाला विचारीत रस्त्याची वाळू चरचर तुडवीत चाललो होतो तेवढ्यात, "हा वानोडे सावकारांचा वाडा, ह्याला चौदा चौक आहेत. म्हणजे होते. आता काही आहेत काही नाहीत. निर्वंश आहे. हा लघू सावकारांचा वाडा. हे पेशव्यांचे सावकार होते. निर्वंश आहे. हा अमक्याचा वाडा. ह्यांनी आपल्या पाहुण्यांसाठी गंगेच्या घाटापासून आपल्या घराच्या दारापर्यंत रुपयांच्या पायघड्या घातल्या. निर्वंश आहे. हा देऊळगावच्या राजेसाहेबांचा वाडा. हाली मरम्मत नाही."

असे आमच्या वाटाड्या भटजीचे शब्द कानांवर पडले, आणि मी भानावर आलो. भटजी एकामागून एक मोठमोठे वाडे दाखवीत होते आणि "निर्वंश आहे, निर्वंश आहे," असे सांगत होते. त्यांनी असे कितीतरी वाडे दाखवले. जोते आणि पहिला मजला दगडाचा, वर विटांचे काम. दगडाला दगड, विटेला वीट इतकी घट्ट भिडलेली की वर्षे लोटली तरी कागद शिरकवायला फट नाही. वाड्याचे कोपरे बाहेरून गोल केलेले. अगदी तासून काढल्यासारखे सफाईदार. आणि त्या गोलपणाला उठाव देण्यासाठी वरच्या अंगाला कोपऱ्यातूनच पुढे आलेली एक सज्जेदार खिडकी. दाराच्या दारवंठ्यावर आणि गणेशपट्टीवर नजर वेधून घेणारे नाजुक रेखीव कोरीवकाम. वाडा लहान मोठा कसाही असो, नमुना एक. पण बहुतेक वाड्यांच्या बाहेरच्या भिंती तेवढ्या नारळाच्या कठीण करवंटीसारख्या शाबूत आहेत. आतले खोबरे काळाने कुरतडून टाकले आहे; "भिंत खचली, कलथून खांब गेला" अशी स्थिती आहे. वर्षानुवर्षाच्या बंदिवासातून मुक्त झाल्याप्रमाणे वाड्यांचे चौक, दालने, ओसऱ्या, पडव्या, उन्हा-पावसाचे, वाऱ्या-वादळाचे, खुल्या हृदयाने स्वागत करताहेत. बाहेरच्या आणि आतल्या भागामधला माणसाने निर्माण केलेला आडपडदा दूर झाल्यामुळे वाऱ्याने तिथे रानातल्या सर्व वनस्पतींची बीजे आणून टाकली, पावसाने ती रुजवली, उन्हाने

वाढवली, त्यांची मोठाली झाडे-झुडपे आता देवघरा–स्वयंपाक घरापासून बाहेरच्या देवडीपर्यंत सर्वत्र फोफावताहेत. एवढ्या थोर गजान्त श्रीमंत सावकारांच्या वाड्यांच्या भिंती चोरांना फोडता येऊ नयेत म्हणून दगडाच्या असाव्या हे स्वाभाविकच आहे. आज चोरांची भीती बाळगण्यासारखे आत काहीही राहिलेले नसले तरी कर्तव्यनिष्ठ भिंती मात्र उभ्या आहेत. आणि " अहो आश्चर्यम्! " दारांना कुलपे आहेत. दाराशेजारच्या भगदाडांतून तुम्ही वाटल्यास आत जा, पण दारातून जायला मनाई आहे. कारण त्या वाड्याचा अजून कुणीतरी मालक आहे. ते गंजलेले, लावल्यापासून कधीच न उघडलेले, कदाचित कधीच उघडले न जाणारे कुलूप त्याचे आहे.

ज्या वाटेने हे वाडे गेले, त्याच वाटेने धोंडीबाबांचा ( शिवदिनकेसरीचा— नवनीतात ह्यांची तुमची ओळख झाली असेल ) वाडा चालला आहे. पुरुषभर उंचीचे दणकट दगडी जोते असलेला हा वाडा कुबट, दमट, आणि कोंदट झाला आहे. पाय आत जाईल इतका जमिनीचा भुसा झाला आहे. दारातून पायऱ्या चढून वर गेले म्हणजे डाव्या अंगाला देवडीवर एक अरब दिसतो. त्या वाड्याचा, त्यानल्या मालमत्तेचा आणि समोर चौकाच्या पलीकडे देव्हाऱ्यात देव आहेत त्यांचा वाली–रखवाली तो आहे. देवांमध्ये एक बेलफळाएवढा मोठा तपकिरी रंगाचा सूर्यबाण आणि कवठाएवढा मोठा स्फटिक गोल आहे. त्या सर्वांवर धूळ चढली आहे. त्यांची कधी पूजा होते, कधी होत नाही. कधी' पाहऱ्यावरच्या अरबालाच ते पाहवत नाही, आणि तो आपल्या खांद्यावरच्या रुमालाच्या पदराने ती धूळ झटकून टाकतो.

मागल्या अंगाला धोंडीबाबांची स्नान-संध्येची, खाजगी देवपूजेची जागा आहे. तिथे दुसरे छोटे देवघर आहे. ह्या इथल्या छोट्या चौकाभोवतीच्या कमानीवरचे, वरच्या माडीच्या कठड्याचे, खांबावरचे, लाकडातले कोरीव काम, हस्तिदंतावरच्या कामाची आठवण व्हावी इतके नाजुक, सुरेख, सुबक आहे. नक्षीची विविधता, मेहेरपींचा डौल आणि रचनेचा समतोलपणा नजरबंदी करणारा आहे. पण चौकाच्या मागच्या बाजूची वरची एक तुळई मध्येच खचली आहे तिने दुसऱ्या तुळया खाली ओढल्या आहेत. ठिकठिकाणाहून सुटलेल्या लाकुडकामाचा अंगणात ढीग उभा झाला आहे. त्यात रोज भर पडते आहे. तेलपाणी नसल्यामुळे लाकडांना फटी पडलेल्या आहेत, आणि त्यांत चरे उठताहेत.

वाड्याशींच समानशील अशी शिवदिनकेसरींच्या समाधीची वास्तू गोदेच्या काठी आहे. सभामंडपाच्या भुईचा उकीर झाला आहे. तीवर चारी बाजूंनी पावसाळ्यात वरून पागोळ्या गळतात. त्यांच्या थेंबांनी केलेल्या छोट्या–छोट्या खळग्यांची सुतात ओवल्याप्रमाणे सरळ ओळ पडली आहे. तीच त्या सभाभूमीची आज शोभा. भोवतालच्या लाकडी मेहरपीवरचे मोर मानेच्या कमानी करून, छातीवर चोची टेकून ऐटीत बसले आहेत, पण आत पावसाची झड येते आहे, समोर मेघांनी व्यापलेले आकाश दिसते आहे, तरी ( लाकडाचा देह मिळाल्यामुळे ) टाहो फोडता येत नाही किंवा झेप घेऊन उडून जाता येत नाही म्हणून खिन्न झालेले दिसताहेत. गाभाऱ्याच्या दारावर वरल्या बाजूला उभे असलेले नवनाथ हा भकासपणा उघड्या डोळ्यांनी पाहताहेत. गुरूच्या हाकेला 'ओ' देऊन जो शेणपुंजीतून बाहेर आला तोही त्यांतच उभा राहून ह्या वास्तूची शेणपुंजी होताना पाहतो आहे, आणि त्यांच्याच समोरच्या बाजूला, समुद्रावरून सहज उडी मारून जाणारा मारुती, इथे आपल्याला काही करता येत नाही म्हणून, नुसताच पवित्रा घेऊन उभा आहे.

एखाद्या मातबर माणसाच्या बेफिकीर मालकीतले, धड प्रतिष्ठाही नाही आणि धड अप्रतिष्ठाही नाही, असे हे उपेक्षित जिणे जगणाऱ्या ह्या असल्या वास्तूपेक्षा उघड्या घाटावर उन्हापावसाचे तडाखे खात उभी असलेली देवळे शतपट बरी. गोदेच्या काठी नागघाटावर खरोखरच एक घाटदार देवळी आहे, देवळीतली ती नागाची पुष्ट, वळणदार, सुश्लिष्ट प्रतिमा पाहताना माझ्या मनात आले, 'श्रुतार्थेवर अनुरक्त होऊन तिच्याशी गांधर्वविवाह करणाऱ्या वासुकीच्या पुतण्याची–कीर्तिसेनाची–तर ही प्रतिमा नसेल ! तसे असेल तर श्रुतार्थेनेही योग्य पुरुषावर प्रेम केले असे म्हटले पाहिजे.' मी ह्यासंबंधी काही बोललो तेव्हा,

"श्रुतार्था म्हणजे गुणाढ्याची आई ना ?" माझ्या मित्रांनी विचारले.

मी होय म्हटले. त्यावर ते म्हणाले,

"तुमचं सगळंच चुकलं. गुणाढ्य मुळी पैठणचा नव्हेच. त्याचं गाव तिकडे कुठे मध्यप्रदेशात आहे असं काही विद्वान म्हणतात."

गुणाढ्य पैठणचा नाही म्हणजे मग, "मोदकैस्ताडय माम्" असे मलयवतीने म्हटल्यावर तिच्यावर फेकून मारण्यासाठी हालाने लाडवांचे ताट मागवल्याची

गोष्टही खोटीच का ? आणि मग, पैठण सोडावे लागल्यामुळे परदेशी झालेल्या गुणाढ्याने रचलेल्या कथा रात्रंदिवस ऐकून ह्याच पैठणच्या बाहेरच्या रानातल्या पशुपक्ष्यांनी ढळढळा अश्रू ढाळले तेही खोटेच ? मग ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या तोंडून वेद वदवले ती तरी कथा खरी का खोटी ? भागवतावरची 'हरिवरदा' टीका लिहिल्यामुळे कृष्णदयार्णवांचे कुष्ठ गेले हे तरी खरे ना ? आणि श्री एकनाथसदनी माधवजी स्वकरे चंदन घासुनी गंगेचे पाणी कावडी भरीत होते हे तर खरे कशावरून ? पण हे खोटे म्हणता येणार नाही. कारण ज्ञानेश्वरांनी ज्या रेड्याच्या मुखाने वेद बोलवले त्याचा प्रतिनिधी नागघाटाशेजारीच, एका भिंतीवर, दगडात आराखड्यासारखा उभा आहे. आता रोडावलेला आहे. वेडावाकडा आहे. आखडल्यासारखा आहे, पण आहे. कृष्णदयार्णवांचे कुष्ठ गेले असो की नसो वळणदार अक्षरांतली त्यांच्या हातची हरिवरदा ग्रंथाची पोथी आणि त्यांची पूजेतली गंडकी शिळेची काळी तकतकीत श्रीकृष्णाची मूर्ती पैठणला त्यांच्या मठात आजही दाखवतात. आणि एकनाथांच्या वाड्यात "तो" रांजण आहे. आणि अजूनही नाथषष्ठीच्या दिवशी कुणाच्या तरी रूपाने माधवजी येतात, आणि त्यांची घागर रांजणात ओतली गेली म्हणजेच रांजण भरतो. एरव्ही नाही. नाथांच्या वंशजांची अनेक घरे झाली असली, ते गोसावी–जहागीरदार झाले असले तरी त्यांच्या घराण्यावर माधवजींची अजून कृपा आहे हे ह्यावरून स्पष्ट दिसते.

नाथांवर पैठणचेही प्रेम दिसते. आज पैठण नाथांचे पैठण म्हणून ओळखले जाते. ज्या पैठणवर पंडितांनी " बाहुल्ये श्री चांगदेव राऊळाचा ठायो स्त्रियांसींचि वेधु " असा आरोप ठेवून चक्रधराला अवयवच्छेदाची शिक्षा फर्मावली, आणि अमलात आणली; ज्या पैठणकर पंडितांनी संन्याशाची पोरे म्हणून निवृत्ति–ज्ञान-देवादिकांना मुंजीची अनुज्ञा नाकारली; त्या पैठणने वास्तविक नाथांना वाळीत टाकून त्यांच्या घरादाराला आग लावायला हवी होती. गंगेतले पाणी गाढवाला पाजायचे, श्राद्धाच्या ब्राह्मणांसाठी शिजविलेले अन्न महारांना वाढायचे, आणि महाराच्या शेंबड्या पोराला उचलून कडेवर घ्यायचे ही पैठणकर ब्राह्मणांच्या दृष्टीने अब्रह्मण्य कृत्ये ठरावीत. पण त्यांच्या ह्या " सुधारकी " आचरणाविरुद्ध नाखुषी त्यांच्या मुलानेच काय ती दाखविलेली दिसते. पैठणकर पंडितांनी नाथांची गय केली ती ते सुखवस्तू प्रतिष्ठित गृहस्थ होते म्हणून की नाथांच्या साधुत्वाने

अनुक्रम .. ................ दि: ...... ..
क्रमांक ...................... नों दि: ...


त्यांना जिंकले म्हणून ? बाकी एकशेआठ वेळा अंगावर थुंकणाऱ्या यवनाला ज्यांनी आपल्या संयमाने आणि सौजन्याने वश करून घेतले त्यांना पैठणकर पंडितांना वश करून घेणे कठीण गेले नसेल.

पैठण नाथांचे आहे आणि नाथषष्ठीला तिथे थोर मांदी जमते हेही खरे आहे. तरी पैठणला आता पूर्वीची कळा राहिलेली नाही. वळचणी वाकल्या आहेत, आढी दुभंगली आहेत, कौले घरंगळताहेत, माती भुळभुळते आहे, आणि बिनझडपांच्या दारा-खिडक्यांची तोंडे सदाची भकासपणे वासलेली आहेत, अशी घरे दर दहा-पाच पावलांवर दिसू लागली म्हणजे इतिहासाची चाके ह्या नगरावरून किती निर्घृणपणे फिरली आहेत ते जाणवल्यावाचून राहात नाही.

विद्यापीठ आणि धर्मपीठ म्हणून काशीचे दक्षिणेतले प्रतिस्पर्धी असलेल्या पैठणात आज विद्या विद्यमान नाही. एका काळी तिथल्या ब्राह्मणांची मुखे विद्येच्या तेजाने तळपत असतील. आज ती कळकलेली आणि करपलेली दिसतात. सनातन हिंदू धर्माचा ध्वज उंच धरणाऱ्या पैठणमधल्या काजीच्या वाड्याचा दरवाजा त्याच्या अवाढव्यपणामुळे उरावर येतोसा वाटतो आणि त्याच्यावरचे लोखंडी खिळे डोळ्याबरोबरच काळजातही खुपतात, आणि त्याच्या शेजारचीच उंचावरली प्रशस्त मसजिद मुसलमानी सल्तनतीची मोहोर ह्या धर्मपीठावर किती ठसठशीत उठली आहे ते दाखवते. ज्या पैठणात सातशे साळीवाडा आणि नऊशे मोमिनवाडा सुखाने नांदला, आणि ज्या पैठणने पैठणीला आपले नाव आणि देशो-देशी ख्याती दिली, त्या पैठणातले पाच-पंचवीस साळी-मोमीन आज श्रीमंत शोकीनांकडून आलेल्या वर्दीनुसार काठ-पदर विणून जेमतेम रोजी मिळवताहेत, आणि पैठणचा पैठणीशी संबंध कोशातच काय तो राहिला आहे.

आज पैठणात शालिवाहनाचा वाडा म्हणून अंगणात रान माजलेली एक मशीद तेवढी शिल्लक राहिली आहे, आणि हालाचे काहीच राहिले नाही. नाव सुद्धा. पण नागघाटाच्या खालच्या अंगाने गोदावरी अजून त्याच्या वेळी जशी वाहत होती तशीच वाहते आहे. तिच्या काठी तेव्हा जशी शेते होती तशीच आजही आहेत. तुम्ही त्या त्या ऋतुत तिथे गेलात तर त्या शेतातले राजगिऱ्याचे तुरे आपली लाल किरमिजी ऐट तुमच्यापुढे ऐसपैस मिरवतील, आणि तरोट्यांवरच्या फुलांचे पिवळे धमक झुबके " तुम्ही आम्हांला विसरला नाहीत ना ?" असे आर्जवून विचारतील. कपाशीची पिवळी फुले तुमचे मोकळ्या अंतःकरणाने उज्ज्वल स्वागत

करतील किंवा त्यांची किंचित उमललेली बोंडे शुचिस्मिताने आपले निर्मळ अंतःकरण सूचित करतील. उभ्या आडोशाच्या आधारावर त्या शेतातल्या मऊ मातीत आजही गावठ्यातली तरुण-तरुणी—हलिकपुत्र आणि हलिकस्नुषा त्या काळच्या-सारखीच बेभान किंवा बुजरी प्रणयक्रीडा करीत असतील. पण तेव्हासारखा आज कोणी प्राकृत कवी त्यांच्यावर कविता करीत नाही किंवा करीत असला तर त्याची कोणाला माहिती नाही. त्या " गोदा " नदीत आजही मरहट्ट वधू तेव्हाप्रमाणेच अंग धुतात, पण त्यांच्या स्तनतटांवरून धुतल्या गेलेल्या अंगरागाने आज तिचे पाणी रंगत नाही, आणि म्हणूनच कदाचित यक्षगंधर्वही अंतरिक्षात संचार करीत नाहीत.

पण जुन्याच्या आठवणींनी पैठणला अजिबात सोडले आहे असे नाही. एखादा कबुतरबाज आपल्या कबुतरांना हाक देतो तशी जर तुम्ही त्यांना हाक दिलीत तर त्या आजही तुमच्या भोवती गोळा होतील. नागघाटावर उभे राहून तुम्ही डावीकडे लांब अंतरावर दृष्टी टाकलीत तर तुम्हाला चक्रधराच्या पहिल्या शिष्येचा, बाइसाचा, मठ दिसेल. तुमच्या ब्राह्मण वाटाड्याला " बाइसाचा मठ कुठे आहे ? " असे तुम्ही विचारले तर तो सांगणार नाही. आणि तुम्ही " तो नाही का तिथे ? " असे बोटाने दाखवलेत तर तो मान झटकून म्हणेल, " छॅः, आपल्याला नाही बा ठाऊक तिकडे काय आहे ते. आपून कधी तिथे गेलो नाही. आन् आपल्यासारख्यांनीय जाऊ नये. " पण त्याने काही म्हटले तरी तिथे तो आहे, थोडा उदास आहे, भकास आहे, पण आहे. शालिवाहनाचे पैठण कसे दिसत असेल ते पाहावे म्हणून पालथ्या पैठणचा पापुद्रा एक ठिकाणी खरवडून काढला आहे. तिथे गेलात तर पैठणच्या पोटात तुम्हाला डोकावून पाहता येईल. ज्ञानेश्वरांची आठवण करून देणारा रेडा तर नागघाटाच्या शेजारी तुमच्या मागेच आहे. तसेच नदीकाठाने उजवीकडे बघत गेलात तर शिवदिनकेसरीची समाधी, नारायण गडकरांचा मठ, कृष्णदयार्णवांचा मठ, ह्यावरून तुमची नजर वरच्या बाजूला गंगेकाठच्या नाथांच्या समाधीच्या बाहेरच्या नाथांच्या–दिशेने जाइल. कदाचित तिथपर्यंत पोचणार नाही. पण तिथे नाथांची समाधी आहे. भव्य, प्रशस्त आहे. बाईसाचा मठ आणि बाहेरचे नाथ ह्या दोन टोकांच्या मध्ये प्राचीन महाराष्ट्राचा प्राण, आणि मराठीच्या अभिमानाचे अधिष्ठान आहे. पैठणला आल्यावर बोणेबाईने चक्रधरांना म्हटले, " बा मुनिदेया हे थोर नगर : एथ तुम्ही चुकाल " तसे ते आता थोर नाही. पण थोरच आहे.

ℰ ⓛ

: २० :

# आबा गेले!

वि. द. घाटे

सकाळचे साडेपाच वाजले होते. डिसेंबर महिन्याचे थंडीचे दिवस. मी गाढ झोपेत होतो. इतक्यात कोपऱ्यातल्या टेलिफोनची घंटा घणघण वाजली. मी दचकून जागा झालो. भीतभीतच टेलिफोनकडे गेलो; कारण टेलिफोन काय सांगणार याची मला कल्पना होती. किती तरी दिवस त्या फोनची वाट पाहात होतो. गेला महिना दीडमहिना दररोज अधिकाधिक जवळ येणारी मृत्यूची पावले आम्ही ऐकत होतो. गेले तीन दिवस तर त्या मृत्युशय्ये-भोवती तो घुटमळत होता, झेप घालायला टपला होता. आज त्याने झेप घातली. त्याचे काम झाले. फोन हीच बातमी मला सांगणार हे मी मनोमन जाणले; आणि कानाशी फोन लावला. संदेश आला, "सकाळी चार वाजून पाच मिनिटांनी आबा आपल्याला सोडून गेले! जाण्यापूर्वी चांगले शुद्धीवर होते. मी 'गेल्यावर फक्त चारजणांनाच कळवा, इतरांना विनाकारण त्रास देऊ नका,' असे सांगून गेले. त्या चार निमंत्रितांत तुम्ही आहात, लौकर या."

अतोनात दुःख झाले. छातीत एक प्रकारची कळ आली. पण समाधानही वाटले. त्या देवमाणसाने मरतेवेळी आठवण केली, निरोप पाठवला, थोडेसे बरे वाटले, दुःखातसुद्धा गौरवाचा अनुभव आला.

"इतरांना विनाकारण त्रास नको" आबांचेच हे शब्द; मरेपर्यंत त्यांनी आपले व्रत इमानेइतबारे पाळले. कधी कुणाला त्रास दिला नाही. उलट सर्वांचा त्रास तत्परतेने सोसला. ऑपरेशनला तयार झाले आणि जाणूनबुजून मृत्यूच्या भेटीस पुढे झाले, ते याच हेतूने. अलीकडे ते नेहमी म्हणायचे,

"मला आता लिहिता येत नाही, बोलता येत नाही, कुणाला मदत करता येत नाही. माझे काम संपले. मला आता गेले पाहिजे. मी कुणाच्या आता उपयोगी पडत

नाही. उलट तुम्ही सारे माझ्याभोवती बसता, माझ्या काळजीत चूर असता. तुमची कामे तुम्हांला अलीकडे सुचत नाहीत. आता वाट पाहण्यात अर्थ नाही."

रघुनाथजी–आबांचे जुने स्नेही ते जेवायला येणार होते. आबांच्या अंगात ताप होता. पोटात सारखे मळमळत होते. पण पाहुणे येणार होते. आबा लगबगीने तसेच उठले. तशा स्थितीत दाढी केली, स्वच्छ तोंड धुतले, परटीचे धोतर नेसले आणि दिवाणखान्यात येऊन बसले. चेहरा कसा आनंदी आणि उत्साही. घरची मंडळी म्हणाली,

"आबा, हे काय ? बिछान्यावर पडा कसे."

आबा म्हणतात,

"हे पाहा, घरी पाहुणे येणार आहेत. माझे जुने मित्र आहेत. दमूनभागून येतील. विनाकारण माझ्या आजाराचे पुराण त्यांना सांगत बसू नका. पाहुण्यासाठी चांगले पक्वान्न कराल आणि मी अंथरुणावर कण्हत पडलेला असेन, तर त्याचा काय उपयोग ? तुमच्या सर्व व्यवस्थेवर विरजण पडेल. नव्या येणाऱ्या माणसाला आपल्या घरात येताच आनंद आणि समाधान दिसले पाहिजे. शिवाजीराजे येणार होते. समर्थांना हीव भरून आले होते. राजे येण्यापूर्वी समर्थांनी आपले हीव घोंगडीत झाकून ठेवले आणि राजांचे स्वागत केले, आठवते ना ?"

आबा जगमित्र होते. त्यांना पकडणाऱ्या पोलिसांचेही ते मित्र होते सत्याग्रह, कायदेभंग करायचा झाला की, आबा आदल्या दिवशी फौजदारांच्या घरी जात, त्यांना हसून नमस्कार करीत आणि सांगत,

"हे पाहा, उद्या अमुक वाजता सत्याग्रह करणार आहोत, बरं का ? आधी सूचना देण्यास आलो आहे. नाही तर तुमची धांदल होईल. तुम्हांला तुमचा जो बंदोबस्त करायचा तो करा. दंगाधोपा होणार नाही याची मी खबरदारी घेतली आहे. तशी तुम्ही काळजी करू नका."

फौजदारही या देवमाणसाशी तितक्याच प्रेमाने वागत. आबांची एकुलती एक मुलगी अत्यवस्थ होती. आज जाणार की उद्या, एवढाच प्रश्न होता. आणि कायदेभंग करण्याचा प्रसंग आला. फतवा सुटला. मध्यरात्री फौजदारसाहेब आबांकडे आले. म्हणाले,

अनु..... ................ बि: ....... ......
क्रमांक ........................ बो. थि.... 

" गुरुजी, मुलीचे लक्षण ठीक दिसत नाही. तुम्ही दोन-तीन दिवस घराबाहेर पडू नका. आम्ही आपले पाहून घेऊ."

आबा निश्चयाने म्हणाले,

" छे छे, तसे कसे होईल ? सहकाऱ्यांना तुरुंगात पाठवायचे आणि मी मागे घरात लपून बसायचे, हे कसे बरे दिसेल ? तुम्हीच सांगा बरे ? उद्या सकाळी मी कायदेभंग करणार. तुम्ही तेथेच असा. मुलीची काळजी करायला येथे माणसे आहेतच. मी एकटा काय करणार आहे ? "

दुसऱ्या दिवशी आबांनी मुलीचा निरोप घेतला आणि तडक जाऊन कायदा मोडला. आबांना पोलीस चौकीवर नेण्यात आले. थोड्याच वेळात आबांना गाढ झोप लागली. इकडे त्याच सुमारास मुलीचे प्राणोत्क्रमण झाले !

असे होते आमचे आबा. सासवडहून ल. ब. शुश्रूषेसाठी आले. आबांच्या पोटात अन्न जात नव्हते, राहात नव्हते, वांत्या होत होत्या. पण घरात सांगतात,

" ल ब. आले बरे का, धावून आले. आता मला बरे वाटेल. त्यांचे पाणी काढा. जेवणाची तयारी करा."

दवाखान्यात ऑपरेशनसाठी जाण्यास निघाले. आबांना सर्वांची काळजी. सुशीलाबाई धाकटी भावजय. लेकीसारखी वाढवलेली. तिला सांगतात,

" हे बघ. बापूला आताच काही कळवू नकोस; विनाकारण काळजी करीत बसेल. दूरच्या माणसाला जास्ती काळजी वाटते. पुढेमागे कळवायचे ते कळव."

जिना उतरताना आपल्या लाडक्या सुनेला म्हणतात,

" तू जिना उतरू—चढू नकोस. इथेच माझा निरोप घे. तुला दिवस गेले आहेत. दवाखान्यातसुद्धा येऊ नकोस. तुला माझी बातमी रोज कळेलच."

दवाखान्यात हीच तऱ्हा. आपल्या खोलीत जाण्यापूर्वी सर्व वॉर्डभर हिंडले, साऱ्या आजाऱ्यांची चौकशी केली. पोटात कळ येत होती. पण हसऱ्या चेहऱ्याने आजाऱ्यांना चार समाधानाच्या गोष्टी सांगितल्या; बोध केला. थोडे हसविलेही. इकडे डॉक्टर, " देण्यासाठी रक्त आणले, पण पेशंट पळाला ! " म्हणत या पेशंटचा शोध करीत होते !

ऑपरेशननंतर पाच दिवस बरे होते. सहाव्या दिवशी दुखणे उलटले. पोटात फार दुखू लागले. वांत्या सुरू झाल्या. कण्हत होते, मधूनमधून ओरडत होते. सारी मंडळी घाबरली. नर्स इतकी अनुभवी, पण तिला काही सुचेना. डॉक्टरसुद्धा

अस्वस्थ झाले. खोलीत खाली मान घालून येरझारा घालू लागले. आबा कण्हत होते आणि सर्वांना धीर देत होते.

" अरे, असे घाबरता काय? असे रडू नका; शांत चित्त ठेवा. भोगायचे ते भोगलेच पाहिजे. त्यातच माणसाची परीक्षा आहे. ' देहे दुःख ते सूख मानीत जावे '—समर्थांचा बोध लक्षात घ्या. संसारात वादळे यायचीच. ' सदा सर्वदा देव सन्नीध आहे, कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे '...तो परीक्षा घेतोय—तो परीक्षा घेतोय—माझी आणि तुमची. डॉक्टर, तुम्ही असे घाबरू नका. एकत्र बसा, विचार करा आणि काय उपचार करायचा तो ठरवा. माझी सर्व प्रकारे तयारी आहे. "

असे होते आमचे आबा—धीरगंभीर. समर्थांप्रमाणे हीव घोंगडीत लपवून ठेवणारे. आबा गेले. दोन महिने जात होते. लांबचा प्रवास. तसे नेहमी प्रवास करायचे, पण हा शेवटचा प्रवास. आता परत यायचे नव्हते. आबांनी सारी निरवानिरव केली होती. लोकांची पुस्तके वाचायला आणली होती, त्यांच्या नावाच्या चिठ्या ठेवल्या होत्या. ' अलौकिक अभियोग ' या आपल्या पुस्तकाच्या प्रती मित्रांना द्यायच्या होत्या, त्यांचीही यादी तयार केली होती. एका मासिकाला लेख देण्याचे कबूल केले होते. दवाखान्यात जाण्यासाठी घर पाच वाजता सोडायचे, तर साडेचार वाजेपर्यंत कबूल केलेला लेख संतांना शांतपणे सांगत होते. संत लिहीत होते आणि रडत होते. आबा त्यांचे सांत्वन करीत होते, म्हणत होते,

" अहो, अरविंदांची फिलॉसफी समजली ना तुम्हांला? मग असे रडता का? हा शेवटचा लेख, शांतपणे संपवू या. "

जाण्यापूर्वी आबांनी साऱ्यांची मने तयार केली होती. त्यांचे मन केव्हाच तयार होते. आबा जाणार हे निश्चित होते. तरी पण आबा खरोखरीच गेले, आता परत भेटणार नाहीत, परत बोलणार नाहीत, परत मोकळ्या मनाने आणि प्रांजलपणाने बोलणे ऐकणार नाहीत, स्वतः बोलणार नाहीत, ही जाणीव असह्य झाली. तसेच कपडे करून मी त्या मृत्यूच्या घरी गेलो. जिकडेतिकडे वातावरण शांत आणि गंभीर होते. ताई स्वतःचे दुःख विसरून कोणाचे तरी समाधान करीत होत्या. सूनबाईच्या डोळ्यांत आसवे तरळत होती; पण त्याही धीराने वावरत होत्या. नाती गोंधळून आल्या-गेल्याकडे पाहात होत्या. मृत्युघरात मी प्रवेश

केला. कालचीच ती खोली. कालच पाहिलेली. पण आज ती किती बदलली होती ? औषधांच्या बाटल्या, गिंडी, इतर साहित्य नाहीसे झाले होते. औषधांचा ओळखीचा वास येत नव्हता; उलट उदबत्त्यांचा आणि फुलांचा घमघमाट सुटला होता. खोलीच्या मधोमध खाटेवर आबा योगनिद्रेत पहुडले होते. अंगावर स्वच्छ खादीची चादर. चेहऱ्यावरचें मास झडून गेल्यामुळे आधीचेच गरुडनाक अधिक उन्नत दिसत होते. डोळे झाकले होते. एकंदर मुद्रा शांत आणि गंभीर होती. प्रवास संपला होता. साहेबचाकरी बजावली होती. मुक्काम गाठला होता. या जाणिवेनें जणू काय चेहऱ्यावर एक प्रकारची कृतार्थता दिसत होती.

त्या मृत्युघरी कोणी रडत नव्हते. मृत्यूपुढे कोणी हार खाल्ली नाही. आबांच्या घरी अतिथींचे नेहमीच स्वागत होत े. या अतिथीचेही स्वागत आबांच्या घराने केले. काल दुपारीच आबा शुद्धीवर आले. अलीकडे चोवीस तासांतून फक्त एकदोन तासच डॉक्टर त्यांना शुद्धीवर ठेवीत. शुद्धीवर आल्यावर आबांनी सर्वांना जवळ बोलावले, आपल्या दोन्ही डोळ्यांकडे बोट नेले आणि ते तसेच नकार दाखविण्यासाठी फिरविले. “ मी आता जाणार, पण कुणीही रडता कामा नये. ” हा आबांचा शेवटचा आदेश होता. आबांना फार क्लेश झाले, पाच दिवसांपूर्वीच मी भेटलो, तेव्हा ते हळूच पुटपुटले,

“ दादा, आता नाही सहन होत. तात्या टोपे फाशीला उशीर होतो हे पाहून म्हणाला होता—उशीर झाला, आता लौकर आटोपा. मीही तेच म्हणतो, आता आटोपा, फार झाले. ”

आबा नेहमी आपल्या मोटारमध्ये जिथे बसत तेथेच आम्ही त्यांना बसविले. एका बाजूस त्यांचे चिरंजीव, दुसऱ्या बाजूस मी. ताई आणि शंभूराव हळूच मंद स्वरात ‘ रघुपति राघव राजाराम–रघुपति राघव राजाराम ’ म्हणत होते. माझे डोके सुन्न झाले होते. मन भारावले होते. माझ्या तोंडातून शब्द कसे निघणार ? आबांना आम्ही ताराचंद आयुर्वेद महाविद्यालयात नेले—स्मशानात नेले नाही. १९५१ सालीच आबांनी या विद्यालयाला आपल्या शरीराचे दान केले होते. त्या विद्यालयाचे एक अधिकारी आबांना सहज म्हणाले,

“ काय करावे ? आम्हांला शवच्छेदनासाठी चांगली प्रेते मिळत नाहीत. भणंग भिकारी मरतात; त्यांच्याच प्रेतांवर काम भागवावे लागते. ”

आबांना हे एवढे पुरे होते. तात्काळ त्यांनी आपल्या देहाची व्यवस्था निश्चित केली आणि कुटुंबातील माणसांना कळविली.

आबा ज्ञान आणि विज्ञान यांचे फार मोठे उपासक. मरेपर्यंत ते ज्ञान मिळवीत होते. ऑपरेशनच्यापूर्वी त्यांना रक्त देण्यात आले तेव्हा डॉक्टरला त्या विषयावर प्रश्न विचारून त्यांनी भंडावून सोडले. रक्तदानाची ही कल्पना कोणी काढली, केव्हा काढली, इतर देशांत या दानाची काय व्यवस्था आहे, आपल्याकडे काय आहे, एका खेपेस दान करणाऱ्या माणसाचे किती रक्त घेतात, तितके रक्त परत येण्यास किती दिवस लागतात, रक्ताचे वर्ग किती, तुमच्या दवाखान्यात रक्तदान भरपूर होते का—असा प्रश्नांचा सारखा भडिमार केला. त्यांच्या मनात, बरे वाटल्यावर स्वतःच्या रक्ताचे दान देण्याचे होते असे दिसते. बोलूनबोलून त्यांना ग्लानी आली तेव्हा डॉक्टरांनी त्यांना गप्प केले होते.

आबा ऑपरेशनसाठी का तयार झाले हे आधी मला समजले नव्हते. बऱ्याच उशिरा समजले आणि त्यांच्याविषयीचा माझा आदर द्विगुणित झाला. आबांना कॅन्सर झाला होता हे आम्ही त्यांच्यापासून शेवटपर्यंत लपवून ठेवले होते. आम्हांला वाटत होते, आबांना माहीत नाही. पण ते खोटे ठरले. आपल्याला असाध्य रोग झाला आहे, कॅन्सरसारखाच तो रोग असावा, हे आबा जाणून होते. परंतु आम्ही त्यांना जसे फसविले तसे त्यांनीही आम्हांला शेवटपर्यंत फसविले. आपण वाचत नाही हे माहीत असता आबा ऑपरेशनला का तयार झाले आणि उद्याचे मरण त्यांनी आजच का ओढवून घेतले हा आमच्यापुढे प्रश्न होता. आम्ही त्यांना तसे विचारलेही. ते शांतपणाने म्हणाले,

"अहो, होणार ते होईलच. पण विज्ञानाने जे उपचार निश्चित केले आहेत ते न करणे अडाणीपणाचे लक्षण आहे. प्रयोगामधूनच शास्त्राचा विकास होत असतो. आधी चुका होतात, ठेचा खाव्या लागतात, वेळीप्रसंगी बळीही जावे लागते. असे करता करताच शास्त्राची प्रगती होत असते. काही रोगांवर अद्याप उपाय निघाले नाहीत. शास्त्रज्ञ धडपड करताहेत, प्रयोग चालले आहेत. जूलियन हक्सलेसारखे धाडसी शास्त्रज्ञ तर स्वतःवरसुद्धा प्रयोग करतात. मी असा विचार केला, मला काहीतरी असाध्य रोग झाला आहे; ऑपरेशन केल्याखेरीज काय रोग झाला आहे, त्याची लक्षणे काय आहेत, हे डॉक्टरांना कसे कळणार ? तेव्हा त्यांना ती संधी द्यावी असा मी निर्णय घेतला. नाही तर उद्या मरायचेच आहे, मग

शास्त्राच्या सेवेसाठी आज का मरू नये? मला तसे मरणाचे काहीच भय वाटत नाही. अहो, ते केव्हातरी यायचेच. 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्!' मात्र जीवन ही विकृती आहे हे मला मान्य नाही."

आबा गेल्याला दोन वर्षे झाली. रिकामा बसलो म्हणजे त्यांची आठवण येते. डोळ्यांतून एकदोन आसवे गळतात. ती आठवण दुःख देत नाही. आबांनी कधीच कुणाला दुःख दिले नाही. मग आता तरी ते कसे दुःख देतील? तरी पण चुकल्या-सारखे वाटते. एखादा सुंदर लेख लिहिला, मला स्वतःला तो आवडला की जुन्या शिरस्त्याप्रमाणे पटकन आबांकडे जाण्यासाठी उठतो आणि मग आठवते—आबा गेले!

: २१ :

# पार

**व्यंकटेश माडगूळकर**

देवळाच्या मधोमध उभे राहिले म्हणजे समोर पार दिसतो. देवळापासून दोनशेएक कदम टाकावे लागतात. पार चौरस आकाराचा आणि माणसाच्या डोक्याइतका उंच आहे; थोडा जास्तच असेल. वर चढून जायचे तर पाचसहा भल्या मोठ्या पायऱ्या चढाव्या लागतात. देवळाकडच्या अंगाने व पलीकडच्या अंगाने, अशा पायऱ्या आहेत. पाराची सगळी घडण जुन्या वळणाची आणि दांडगेश्वर आहे. आणले तसेच दगड बसवले आहेत. त्याला गवंड्याने छन्नी लावलेली दिसत नाही. गावाची वस्ती सातशे, आणि पार एवढा मोठा की निम्मे गाव त्यावर मावावे. पाराच्या मधोमध भला मोठा निंब आहे. निंबाभोवती पार बांधला आहे, का पार बांधून निंब लावला आहे, हे कळत नाही.

आमचे गाव यलमार लोकांचे आहे. यलमारांची फक्त अठराच गावे आहेत. त्यापलीकडे त्यांचा रोटीबेटी व्यवहार होत नाही. जमातीतल्या कोणाकडून अपराध झाला म्हणजे जातगंगा जमून त्याचा फैसला करीत असे. आमच्या गावापासून फार दूर नसलेल्या मंगेवाडीच्या ‘अकरावर’ हा न्यायनिवाडा होत असे. अकर म्हणजे पारच. मंगेवाडीलाच अकर का, आमच्या इथेही पाहिजे, अशा ईर्ष्येने हा पार बांधला, असे सांगतात. पण न्यायपीठ असलेले हे ठिकाण तूर्त व्यासपीठ बनलेले आहे. पारावर उभे राहून काही बोलले की, त्याला वजन येते, महत्त्व प्राप्त होते.

न्यायपीठाचा आदर म्हणून की काय, महार, रामोशी, पायरीला पाय लावत नाहीत, पारावर चढत नाहीत. वहाणा घालून पारावर चढणेही योग्य समजले जात नाही.

पारावर बसणाऱ्याने संध्याकाळी बसावे. दिवस मावळू लागला, उन्हाला चांदण्याची मवागी आली म्हणजे घरातून उठावे आणि पाराच्या पायऱ्यावर, किंवा पाराच्या कडेवर पाय सोडून बसावे. थंड वाऱ्याच्या झुळुका येत राहतात. कधी भिजलेल्या काळ्या मातीने, तर कधी ज्वारीबाजरीच्या शेताने सुगंधित होऊन या झुळुका येत असतात. उन्हाळ्यात नांगरट झाली आणि वळवाचा शिडकावा पडला म्हणजे वाऱ्याला नागरमोथ्याचा थंड सुवास असतो. पावसाळ्यात हाच वारा मातीच्या अत्तराचा फाया घेऊन येतो. हिवाळ्यात शेतांचा घमघमाट सुटतो. असा सुगंधी वारा हुंगीत पारावर बसावे. डोक्यावरच्या निंबावर चिमण्या-कावळ्यांचा गोंधळ चाललेला असतो. माणनदीकडून हदग्याच्या फुलासारखे पांढरेघोट बगळे रांगेने उडत येऊन निंबावर बसत असतात. लाल झालेल्या क्षितिजाकडून येणारी वटवाघळे पूर्वेकडे जात असतात. रानातून घराकडे येणारे बैल डुरकत असतात. गाई हंबरत असतात. गाड्या धडधडत असतात. गुरांच्या गळ्यातील घाट्या, चंगाळ्या वाजत असतात. आवाजाची दुनिया मोठी भराला आलेली असते.

सूर्य मावळतो, कडूसे पडते तसतसे हे आवाज खाली बसतात. अंधारू लागते. घरे झाडे निळ्याकाळ्या आभाळावर चित्रे चिकटविल्यासारखी दिसू लागतात. आभाळात चांदण्या चमकू लागतात. मारुतीच्या देवळात दिवा लागतो. सोनाराच्या घरात कंदील पेटतो. कुलकर्ण्यांच्या घरातील आरगीन लखलखू लागते. आणि घटकाभराने सगळीकडे कसे शांत शांत होते. निंबाच्या डहाळ्या एकमेकीच्या कानात चहाड्या करीत असतात, तो हळू आवाज तेवढा ऐकू येतो.

थंड वारा गालाला लागत असतो आणि आपण बसलेला धोंडा अद्याप निवालेला नाही, हे ध्यानात येते.

आजूबाजूच्या घरातून चाललेली बोलणी स्पष्ट ऐकू येतात. माणसे दिसत नाहीत, पण आवाज ओळखू येतात. कुलकर्ण्यांच्या घरात ताईडी, रामा जेवायला मागत आहेत, हे समजते. महारवाड्यातील येदू सुतार आपल्या मुलाला शेरडीची धार काढायला हाक मारतोय, हे कळते. वाण्याच्या दुकानात न्हाव्याची म्हातारी गूळ आणि गरा न्यायला आली आहे, तेव्हा मुंबईकडचा तिचा जावई आला असावा, असा तर्क करता येतो. मुलांची किरकीर, बायांचे वळसेदार किनरे आवाज, पुरुष माणसांचे खाकरणे, शिणल्या आवाजातील बोलणे, गुरावर दटावणे

हे सगळे ऐकू येते आणि कुणाच्या घरी काय चालले आहे, हे न पाहता, न सांगता कळते.

नामू नसल्याच्या दिव्यावर दिवा पेटवून, तो पदराआड धरून घराकडे जाताना कोणी बाई दिसते. कोण असावे याचा उगीच कयास करावा. अदमासानेच म्हणावे—

" कोण, व्हंजी आहे काय ? "

गावात बऱ्याच आत्या, काकू, व्हंजी आहेत. त्यांपैकी कोणी असले तर ती तटकन वळून आपल्याकडे पाहते. अंधारात दिसत नाही. थोडके शब्द कानी आल्याने आवाजही ओळखू येत नाही. व्हंजी चाल मंदावून विचारते.

" व्हय हो, मीच हाय ! एकटंच बसलाया ? "

" हां, बसलोय, आत्ताच आलो रानातानं. मिरचीला पाणी पाजायचं होतं आज. "

एवढे बोलल्यावर व्हंजीला आवाज ओळखतो. तिच्या आवाजात आपलेपणा येतो.

" दोडा, वारंच लई. टिकतोय का न्हाई घरापावतर ह्यो बाबा. "

असे आपल्याला, दिव्याला, वाऱ्याला एकाच वेळी म्हणत ती चालू लागते. तांबड्या पदराआड धरलेला दिवा, आकाशदिव्यासारखा दिसतो. गल्लीत शिरून व्हंजी दिसेनाशी होईपर्यंत उजेड राहिला म्हणजे बरे वाटते.

वाण्याच्या घरात धूर फार झाला आहे, वाळल्याबरोबर ओले जळत नसल्यामुळे वाणीन बेजार झाली आहे, हे वासाने समजते. सोनाराच्या वत्साबाईने आज डाळकांदा घालून सांडग्याचे कालवण केले आहे हे समजून जेवणाची इच्छा होते. कारण तव्यातील फोडणी ऐकू येते आणि वासही पारापर्यंत येतो.

मग आपण अंधारात काडी पेटवून विडी शिलगवावी आणि लाल मणी उजळीत बसावे. माणसे येत जात असतात. पायताणे, काठ्या वाजतात. कुणाचा तरी आवाज येतो,

" कोन बसलंय ? "

यावर नाव सांगायलाच पाहिजे असे नाही. आपण नुसतेच म्हणावे, " का हो, मी आहे ! "

एवढयावरून, कोण आहे ते ओळखून विचारणारा आपल्याजवळ येतो. मग एक विडी आळीपाळीने दोघांनी प्यावी. जळत जळत अगदी हिरव्या करदोड्या-पर्यंत आली म्हणजे टाकून देऊन इकडचे तिकडचे बोलावे.

जेवणवेळेपर्यंत असे पारावर छान करमते. अंधाऱ्या रात्री पारावरची बैठक जास्तीत जास्त अकरापर्यंत. पुढे तिथे बसण्यात मतलब नाही. आपले उठून देवळात यावे.

चांदण्या रात्री निंबाच्या डहाळयांच्या उखाळ्यापाखाळयांना अगदी जोर येतो. मागेपुढे वाकूनवाकून त्या काही कुजबुजत असतात. पारावर शाई ओतल्या-प्रमाणे सावली पडलेली असते. तेव्हा एकटे बसण्यात काही राम नसतो. अशा वेळी पाराच्या उबदार पायरीवर बहुधा दोन माणसे उशीरपर्यंत बसतात. आणि त्यांच्या बोलण्याचा विषय साधा राहात नाही. गावातली लफडी तंबाखूसारखी तोंडात घोळली जातात. कोण कुणाला लागून आहे, कोण पोटूशी आहे, कुणाला पदर आला आहे, असले बोलणेच होते. दोघापाशी तिसरा कोणी गेला की, बोलणे एकाएकी थांबते. तिसऱ्याला अवघडल्यासारखे होते.

चांदण्या रात्री पारावर कोणाही दोघांनीच बसावे.

थंडीच्या दिवसांत काही माणसे पारावर येऊन सकाळचे ऊन खातात. दिवस-भर एखादादुसरा माणूस पाराच्या शेजारी उभा, बसलेला असतोच. पण वर्दळ नसते. असली तरी ती लहान पोरांची. अंगात नुसतेच अंगरखे अडकवलेली भोंगळी पोरे, नुसताच पोलका किंवा नुसताच परकर नेसलेल्या लहान पोरी पारा-वरल्या सावलीत खड्याने, मातीने खेळत असतात. एवढी एवढी पोरे गुळुगुळू बोलत, डुगुडुगु हलत असतात, आणि म्हातारा निंब बघत असतो.

वर्षानुवर्षे म्हातारीच असलेली माणसे आपण पाहतो. तसाच पारावरचा निंब आहे. त्याला तरणा कोणी पाहिला असेल का, याची मला शंका आहे. खालच्या आळीचे आप्पाजीपंत वर्षानुवर्षे म्हातारे असल्याचे मी पाहतो आहे. तसेच निंबालाही पाहतो आहे. प्रचंड बुंधा असलेला आणि गुरवाच्या म्हातारीप्रमाणे अंगावर लहान लहान आवाळी असलेला निंब आपला आहे तसा आहे. रापलेल्या चेहऱ्याची आणि कणखर बांध्याची काही खेडूत माणसे पाहिली म्हणजे ही अमर आहेत असे वाटते. निंबाच्या बाबतीतही तसेच वाटते. निंबाचे म्हातारपण एका विशिष्ट जागी येऊन थांबलेच आहे.

शिशिर ऋतू आला की एरवी हिरवाकंच दिसणारा निंब पिवळा पडत जातो. डहाळ्यांची कुजबूज ऐकू येईनाशी होते. पिवळी पाने सारखी निखळून खाली पडतात. पारावर आणि आजूबाजूला वाळलेल्या काड्यांचा, पानांचा खच पडतो. गावची झाडलोट करणारी महारीण निंबाला शिव्या घालते. निंबाचा पाला गोळा करता करता तिला कसक भरते.

चैत्र मासात पुन्हा चमत्कार होतो. म्हाताऱ्या निंबाला जोमाने नवे धुमारे फुटू लागतात. पोपटी रंगाची पालवी चहू अंगाने उसळ्या घेऊ लागते. तिच्या रूपाचा अगदी उजेड पडतो. पांढऱ्या शुभ्र अशा नाजूक मोहराने निंब बहरतो आणि कसा धुंद वास सुटतो. उन्हात तगमग होऊ लागली की पारावर येऊन बसावे. वाळ्याचे पडदे चोहोबाजूंना सोडले आहेत असे वाटते.

या मोहोराचा पारावर सडा पडत असतो आणि बघताबघता हिरव्या निंबोळ्या दिसू लागतात. झपाट्याने अंग धरतात आणि लवकरच पिकून पिवळ्या-रंजन होतात. मग पिकल्या निंबावर पाखरांची झिम्मड उडते. कावळ्यांची गर्दी होते. गोडगोड निंबोळ्या खात, कुरवुरु बोलत ही वस्ताद पाखरे दिवसभर निंबाच्या डहाळ्या धरून राहतात.

आषाढात उभे वारे सुटते. निंबाला फार सावरून उभे राहावे लागते. बुंध्यावरून सरसरा धावणाऱ्या खारी भिऊन एका जागी बसतात. निंबाच्या डोलीतील पोपटाची पिले लाल चोची बाहेर काढतात आणि पटकन आत घेतात. भलतेच वारे सुटलेले असते. डहाळ्यांची दैना होते. कावळ्यांनी चोखून टाकलेल्या निंबोळ्यांचे बी या वाऱ्याने साऱ्या गावभर होते.

—आणि श्रावणात बघावे तर गावात जागजागी म्हाताऱ्या निंबाची लहान पोरे दिसू लागतात. भिंतीच्या खोबणीतून, घराच्या माळवदावर, जाऊ नये तिथे ती गेलेली असतात. पण रस्त्यावर दरवर्षी दिसणाऱ्या ‘म्हपी’ कुत्रीच्या पोरां-प्रमाणेच ही पोरेही कधी जगत नाहीत. म्हाताऱ्या निंबाला संतती उदंड होते, पण ती वाढत नाही

घरात बाळंतीण झाली की, चौकटीला निंबाचा लहान डहाळा अडकवतात. पारावरच्या निंबाचे डहाळे आज किती वर्षे चौकटींना लटकत आहेत....

माझी आई म्हणते, “मी पाहातेय तसा पारावरचा निंब आहेच!”

पाडव्याला सगळे गाव देवळात निंब खायला जमते. तेव्हा गुरव याच निंबाचा पाला काढतो. गावात एखाद्याला ‘ पान लागले ’ ( साप चावला ) म्हणजे याच निंबाचा पाला काढून पारावर वाटतात. त्याचा रस ‘ पान लागलेल्या ’ माणसाला पाजून त्याला मारुतीच्या देवळाभोवती धावतधावत प्रदक्षिणा घालावयाला लावतात. रात्रभर देवळात भजन होते आणि सकाळी पान लागलेला माणूस धड होऊन परत आपल्या घरी जातो. खरेखोटे देव जाणे ! महादा न्हाव्याला एकदा पान लागल्याचे मला माहीत आहे. हे सगळे केले आणि तो सकाळी स्वतः चालत घरी गेला.

पारावर उभे राहिले की चोहो अंगाचे आभाळ लांबवर दिसते. रोहिणी नक्षत्राची वाट बघत लोक पारावर उभे राहतात. पावसाची हालचाल दिसते. हतीताच्या वर दिसतोय, बोबेवाडीच्या अंगाने उठला आहे, महुदावर पडतो आहे, असा पावसाचा ठावठिकाणा घेत लोक या पारावरच उभे राहतात.

पाराच्या पलीकडून गावाची वाट जाते. पारावरचा खेळ संपवून मुली सासरी जातात त्या याच वाटेने. परक्या मुली गावात येतात त्या याच वाटेने. याच वाटेवर गावाबाहेरच्या विहिरीवरून वा ओढ्यावरून धुणी धुऊन परत येणाऱ्या बायकांच्या खांद्यावरचे पिळे ठिबकतात, कमरेच्या घागरी हिंदकळून थेंब पडतात. घरात तरण्या बायका सोडून, गावची तरणी पोरे रात्री याच वाटेने शेतात राखण करायला जातात.

हीच वाट स्मशानाकडे जाते.

अमर वाटणारा पारावरचा निंब आता केव्हा पडेल त्याचा नेम नाही. पुष्कळ वर्षे तो जगला आहे. आषाढाचे वारे सुटले म्हणजे कोणी आता पारावर बसत नाही. एखादे वेळी हा निंब अचानक कोसळेल आणि वाटेवरून येणाऱ्याजाणाऱ्याचा घात करील, अशी भीती गावकऱ्यांना वाटते. लोकांचा असा विचार आहे, की आपोआप पडण्याअगोदर हा निंब आता तोडावा. पार उलगडावा, आणि त्या जागी समाजमंदिर उभारावे.

विचार काही वाईट नाही.

: २२ :

# पपई चोर

भीमराव कुलकर्णी

फायनलची परीक्षा पास झाल्याचे मला कळले ते निकाल लागल्यावर दहाबारा दिवसांनी. सबंध जिल्ह्यात मी पहिला आलो होतो. खरोखर पहिला आल्याचे जे कौतुक, जो आनंद असतो तो मला कधीच अनुभवण्यास मिळाला नाही, कारण माझा जन्म एका दरिद्री कुग्रामात झाला होता. ज्या ठिकाणी फायनल पास होणे ही सर्वांत ' मोठी ' गोष्ट समजली जात होती आणि त्यापुढेही पास होण्यासारख्या काही परीक्षा असतात याची जाणीवही जवळजवळ कोणाला नव्हती.

माझ्या परीने मी मात्र पुढचा विचार करण्यात दंग होतो. तालुक्याच्या इंग्रजी शाळेत जावे आणि खूप शिकावे ही माझी इच्छा होती, परंतु मी तालुक्याच्या गावी शिकायला जावे असे कुणालाच वाटत नव्हते. निकाल समजल्यानंतर त्या दिवशी रात्री सारा वेळ डोळे सताड उघडे ठेवून मी याच एका गोष्टीचा विचार करीत पडलो होतो. फायनल पास झाल्यानंतर कुठल्यातरी एका भयानक खेड्याचे कुलकर्णीपण स्वीकारून मी चार पैसे कमवावे अशी बहुतेकांची इच्छा होती. आणि घरचे भयानक दारिद्र्य पाहून कुणीही चटकन तीच गोष्ट केली असती.

जून महिना उजाडला आणि इकडच्या तिकडच्या शाळा सुरू झाल्याचे लक्षात येऊन मी फारच अस्वस्थ होऊ लागलो. एके दिवशी गावाबाहेरच्या विहिरीत डोळे तांबडे होईपर्यंत डुंबता डुंबता मी मनाशी निश्चय केला की, काही झाले तरी आपण इंग्रजी शाळेत जाणारच.

आणि त्या निश्चयासरशी मागचा पुढचा विचार न करता अंगावरच्या ओल्या वस्त्रानिशी मी तालुक्याची वाट धरली.

संध्याकाळी चारच्या सुमारास मी शाळेची पायरी चढून हेडमास्तरांच्या खोलीत प्रवेश केला आणि घाबरत घाबरत मी माझी सगळी परिस्थिती त्यांना सांगितली.

संस्थानातल्या एका शाळेचे ते जुन्या पद्धतीचे हेडमास्तर होते. त्यांच्या हाती कसलीच सत्ता नव्हती. अगदी सुरुवातीलाच त्यांनी सांगून टाकले,

'बाबारे, शिकण्याची ऐपत नसल्यास शहाण्या माणसाने इंग्रजी शाळेची पायरी चढू नये.'

हेडमास्तरांनी अशा प्रकारे सुरुवातीलाच उत्साहभंग केला तरी माझे पाय काही तेथून निघेनात. अचानक मी तेथे ओक्साबोक्सी रडायलाच प्रारंभ केला.

माझा तो अवतार पाहून हेडमास्तर चांगलेच कावले, 'अरे रडायला काय झालं? इथे कोणी तुझी आई मेली का बाप मेला?'

'मास्तर, असं नका हो म्हणू! काहीही करा आणि मला शाळेत प्रवेश द्या.' मी शर्टाच्या बाहीने नाकातील शेंबूड पुसत त्यांना विनंती केली.

मास्तर थोडा वेळ स्तब्ध राहिले आणि मग मीच आपण होऊन त्यांना आगाऊपणे म्हणालो,

'मास्तर, मीच तो फायनलमध्ये सर्व जिल्ह्यात पहिला आलेला मुलगा!'

मास्तरांचे डोळे आश्चर्याने विस्तारले. आश्चर्याचा भर ओसरल्यावर त्यांनी माझी चवकशी करावयास सुरुवात केली. शेवटी ते म्हणाले,

'हे बघ, समज, या शाळेत मी तुला प्रवेश दिला, परंतु तुझी राहण्याची सोय काय?'

'मास्तर, मी वाटेल ते करीन. धर्मशाळेत राहीन. माधुकरी मागेन. शिकवण्या करीन, परंतु मला शिकायचं आहे हो!'

'बाबारे, गरिबाची मुलं अगोदर असंच म्हणतात, परंतु ती फार काळ शाळेत टिकत नाहीत. पहिला उत्साह ओसरला, एकदा सुट्टीत गावी गेली की ती परत येतच नाहीत.'

'मास्तर, गळ्याशपथ मी तसं करणार नाही. माझी शिकण्याची फार फार इच्छा आहे हो!'

'अगदी नक्की ना?'

'होय मास्तर!'

'मग उद्यापासून शाळेत ये.'

पडत्या फळाची आज्ञा घेऊन मी धावतच बाहेर पडलो. आपल्याला शाळेत जावयास मिळणार या कल्पनेने मला कमालीचा आनंद झालेला होता.

शाळेतून बाहेर पडून मी रस्त्याला लागलो आणि एकदम माझ्या मनात निर्माण झालेल्या आनंदाचा विरस झाला तो पुढे काय, या कल्पनेने. शाळेत जरी जावयास मिळणार असले तरी राहायचे कुठे, खायचे काय, हे पुढचे प्रश्न फारच महत्त्वाचे व अतिशय भेसूर होते.

त्यानंतरचा महिनाभराचा कालावधी मी कसा काढला असेल हे फक्त मलाच ठाऊक! माधुकरी मागण्याची गावात काही सोय नव्हती आणि गावात दोन-चार नातेवाईक असूनही कुणी आपल्याकडे राहावयास ये असे म्हटले नाही. त्यामुळे या काळात मी कधी बाजारात हिंडत राहून अडत्याच्या दुकानासमोरच्या भुईमुगाच्या शेंगा खाऊन, कधी भुईमुगाची पेंड खाऊन, आणि कधी कधी अक्षरशः खुंट गिळून राहण्याची सवय केली. एकच फाटका शर्ट आणि मळकट चड्डी होती आणि रात्री धुण्याची कुठे सोय नसल्यामुळे गावाबाहेर वरच्या बाजूस मैलभर जाऊन रिंगणीच्या फेसाने मी कपडे धूत होतो आणि म्युनिसिपालिटीचे रस्त्यावर मिणमिणणारे दोनचार दिवे असले तरी त्यांच्याखाली उभे राहून अभ्यास करण्यासाठी जवळपास एकही पुस्तक नव्हते.

अशा परिस्थितीत मी शिकवण्या करून चार पैसे मिळवू लागलो. माझ्या शिकवणीची फी फारच माफक होती. आठवड्याला ढबू पैसा. एका वाण्याकडे रात्री जमाखर्च लिहून महिन्याला बारा आणे मिळविण्याचीही लवकरच सोय करून ठेवली.

शाळेत माझी बसण्याची एक ठराविक जागा होती ती म्हणजे डाव्या बाजूची कोपऱ्यातील अंधारी जागा फाटके कपडे आणि बावळट अवतार यामुळे कुठल्याही मुलीकडे मी चुकूनही पाहात नसे आणि दुसऱ्या कुणी माझ्याकडे पाहू नये म्हणून माझी सारी धडपड चालू असे. स्पर्श केल्याबरोबर अंग आखडते घेणाऱ्या गोगलगाईप्रमाणे कुणा मुलीच्या केवळ नजरेनेच मी लाजून अर्धमेला होत असे. शाळा सुरू होण्यापूर्वी जागा पकडणे आणि सुटल्यानंतर बाहेर पडणे, ही गोष्ट लवकरच माझ्या अंगवळणी पडली.

अशा परिस्थितीत शाळेत असा एक दिवस उगवला की, त्यामुळे माझ्या शालेय जीवनात काही सोनेरी किरणांनी प्रवेश केला आणि तारुण्यसुलभ इंद्रधनुष्याच्या मोहक वातावरणाचा मला पहिला साक्षात्कार झाला.

मराठीचा तास होता आणि तपासलेल्या निबंधाच्या वह्या घेऊन मास्तर हातात छडी घेऊन उभे होते. नित्याच्या पद्धतीप्रमाणे आपल्या रागीट करड्या नजरेने त्यांनी एकवार सगळ्या वर्गाकडे पाहिले, आणि खिशातील तपकिरीची डबी उघडून चिमूटभर तपकीर काढून ती नाकात कोंबली व त्यांनी सुरुवात केली. ' यू देअर गचाळ शिंदळीचे ! ऑऽऽक्षीऽऽ··· साधा निबंध लिहिता येत नाही म्हणजे काय ? शुद्धलेखन कशाशी खातात हे तर कुठल्याही ठोंब्याला ठाऊक नाही. चांगली मिरच्यांची धुरी दिली पाहिजे एकेकाला... '

सुरुवातीची पाचसहा मिनिटे या पद्धतीने सारखा आमच्या आईबापांचा उद्धार केल्यानंतर एकदम त्यांच्या आवाजात फरक पडला. तो एकदम नरम झाला आणि आपल्या चष्म्याच्या काचांतून डोळे बाहेर काढून वर्गाकडे त्यांनी मारक्या म्हशीसारखे पाहिले.

' या सगळ्यांमध्ये कुलकर्णी कोण आहे रे तो ? '

मास्तरांच्या या प्रश्नाने आपले काळीज लक्कन हलल्याचा मला भास झाला. कारण मी माझा निबंध पोस्टामागे पडलेल्या व मी उचलून आणून स्वच्छ केलेल्या एका तांबड्या वहीवर कोऱ्या जागेत लिहिला होता.

मास्तरांच्या प्रश्नाने सगळे एकमेकांकडे पाहू लागले. कारण नाही म्हटले तरी वर्गात पाच–सहा कुलकर्णी होते.

' अरे हा तो कुलकर्णी ! ' एखादा मेलेला उंदीर हातात धरावा त्याप्रमाणे माझी ती वही उचलून मास्तर म्हणाले.

थरथरत मी उभा राहिलो.

' असा इकडे पुढे ये ! ' मास्तरांनी दरडावले.

आता चांगलेच थोबाड फुटणार याची मनाशी खूणगाठ बांधून पुढे सरकलो.

जवळ गेल्यानंतर मास्तर म्हणाले,

'सगळ्या विद्यार्थ्यांमध्ये उत्तम निबंध या विद्यार्थ्याने लिहिला आहे. फारच छान. असा निबंध लिहिला पाहिजे. वाच रे कुलकर्णी, या गधड्यांच्या लक्षात येऊ दे कसा निबंध लिहावा तो!'

मास्तरांनी अंगावर फेकलेली वही झेलून मी किरकिऱ्या आवाजात तो निबंध वाचून दाखविला.

या एका प्रसंगानेच मी वर्गात एकदम महत्त्वाचा ठरलो. सगळ्या विद्यार्थ्यांची माझ्याकडे पाण्याची दृष्टी बदलली. त्याच दिवशी दहा मिनिटांच्या सुट्टीत मी एकटाच वडाच्या झाडाखाली उभा होतो तेव्हा मला कुणीतरी विचारीत होते.

'अरे कुलकर्णी! मला तुझी निबंधाची वही वाचावयास देतोस काय?' मी नजर वर करून पाहिले तो ती एक सुंदर, नाजूक मुलगी होती. कोणाला एकेरी हाक मारण्याची मला कधीच सवय नव्हती. परंतु त्या धीट व चित्रासारख्या प्रमाणबद्ध असलेल्या गोऱ्या गोऱ्या मुलीने मला एकेरी हाक मारलेली पाहून शरीरातून कसलीतरी सळसळ जाणवली आणि तिच्या एकेरी संबोधनामुळे एकदम फार विचित्रही वाटले नाही.

'हो, हो, देतो ना!' मी कसाबसा म्हणालो व हातातील वही पुढे केली.

वही हातात घेऊन तिने उघडून पाहिली व मोठ्या कौतुकाने ती म्हणाली, 'किती सुंदर अक्षर आहे रे तुझं!'

खरोखर त्या वेळी मी जमिनीवर नव्हतो. वाटत होतं, आपणाला पंख आहेत आणि आपण खूप खूप उंचावर तरंगत आहोत. समोरचं सप्तरंगी इंद्रधनुष्य माझ्या स्वागतासाठी सहास्य वदनानं उभं आहे...

'मी वाचून उद्या वही परत दिली तर चालेल का रे?' तिच्या या शब्दांनी माझी समाधी भंगली.

'हो, हो, चालेल की!' मी उद्गारलो, आणि वही घेऊन पाठमोरी जाणारी तिची आकृती नाहीशी होईपर्यंत तिच्याकडे पाहात राहिलो.

किती किती सुंदर आहे रे अक्षर तुझं... हे वाक्य माझ्या अंतःकरणात जणू कोरलं गेलं आहे. तिच्या आवाजातील तो नाद, ती मृदुता, ते कौतुक अद्यापही माझ्या अंतःकरणात टवटवीत फुलाप्रमाणं प्रफुल्लित आहेत. आणि मोठ्या भक्ति-

अनुक्रम ................ दि: ................
क्रमांक ...................... नों दि: ..........


भावाने ते शब्द मी हृदयमंदिरी जपून ठेविलेले आहेत. त्या शब्दांशी अधूनमधून लडिवाळपणं खेळत राहणं हा माझ्या जीवनातील मोठाच विरंगुळा आहे.

दुसऱ्या दिवशी वही परत करताना तिने म्हटले,

' कित्ती कित्ती छान लिहिला आहे रे निबंध ! खरंच, असा निबंध कसा लिहितोस रे तू ? '

त्या प्रश्नाचे उत्तर काही मला देता आले नाही आणि आजही देता येईलसे वाटत नाही. परंतु त्याचबरोबर त्या वेळी वाटलं की, निबंधलेखनाइतकीच रम्यता तिच्या त्या ' कित्ती कित्ती ' ह्या शब्दांत होती. चंबूसारखे तोंड करून उच्चारलेल्या ' कित्ती कित्ती ' या शब्दांच्या पुढचा तो ' छान ' मला अजून मोठा केविलवाणा वाटतो.

मी काहीच उत्तर दिले नाही. हे तिच्या लक्षात आले, आणि मोठ्या सलगीने ती पुढे आपण होऊनच म्हणाली,

' अरे, मला शिकवशील का तू निबंध कसा लिहावयाचा तो ?... '

आता मात्र मोठी पंचाइतच होती. निबंध कसा लिहावयाचा हे मला तरी कुठे ठाऊक होते म्हणून मी तिला त्यातलं काही शिकवणार होतो ! परंतु तिच्या सहवासाचे एक लोभसवाणे स्वप्न माझ्या मनात आतापर्यंत साकार झाले होते. त्याचा मोह जबरदस्त होता. त्या ' इंद्रधनुष्या 'नं काम केलं होतं आणि मी अभावितपणानं, भाबडेपणानं नि उत्साहानं चटकन म्हणून गेलो,

' हो, हो, शिकवीन की ! '

आणि त्या दिवशी संध्याकाळी वारंवार खाली सरकणारी चड्डी सावरीत मी तिच्या बंगल्यात प्रवेश केला. गावाबाहेर तिचा मोठा प्रशस्त बंगला होता. बकाल वस्तीत एकदम उठून दिसणारी त्याची शान मोठी ऐटबाज होती.

ती व्हरांड्यातच झोपाळ्यावर बसून झोके घेत होती.

' अरे ये ये...... ' आनंदानं टाळ्या पिटीत तिनं माझं स्वागत केलं. झोपाळ्यावरून उठून तिनं मला बसावयास सांगितले, आणि ती ' आईऽ ए आई ' करीत ओरडतच आत पळाली.

तिने जवळ जवळ ओढतच आपल्या आईला आणले व बालसुलभ उत्सुकतेने म्हणाली,

‘ आई ! हाच बघ तो मुलगा. यानंच तो निबंध लिहिलाय. ’

‘ अरे वा, फारच छान. काय नाव रे बाळ तुझं ? ’

‘ श्याम ’

‘ छान ! आता येत जा बरं का आमच्या घरी. आमच्या मीनालाही निबंध गणितं वगैरे सांगत जा हं ऽ ! ’

—मी होकारार्थी मान हलविली. पुन्हा टाळ्या पिटीत मीनाच म्हणाली, ‘ अरे श्याम, चल मी तुला आमचा सगळा बंगला दाखवते. ’ मला पुढे काही बोलू न देताच ती पुढे चालू लागली आणि मी मुकाट्याने तिच्या मागून चालू लागलो.

मीनाचा बंगला खूप मोठा होता. न्हाणीघर गुळगुळीत अशा संगमरवरी दगडांचे होते, तर तिच्या वडिलांच्या खोलीत बंदुकी, तलवारी, वाघाची कातडी, हरणाची शिंगे टांगून ठेवण्यात आली होती. त्या घरातील प्रत्येक गोष्ट मला नवीन होती आणि डोळे विस्फारून ती दाखवीत असलेली प्रत्येक गोष्ट मी पाहत होतो.

—आणि खरोखर तिच्या आईने सांगितल्याप्रमाणे दररोज तिच्या घरी मी जाऊ लागलो. तिला मी कितीतरी कवितांच्या चाली शिकविल्या, गणितं सोडवून दिली, परंतु निबंध कसा लिहावा हे मात्र कधीच सांगितले नाही; आणि तिचेही अभ्यासाकडे फारसे लक्ष नव्हते. खूप गप्पा माराव्या, काही ना काही सारखं चिवचिवत राहावं, हातात हात घालून खूप भटकावं, झाडाला बांधलेल्या झोपाळ्यावर उंच उंच झोके घ्यावे, यांमध्येच ती अधिक रममाण होत असे.

तिचे वडील संस्थानचे मोठे सरदार होते. गलमिशा पिंजारून, हातात बंदूक घेऊन, खाकी पोषाखात म्हातारा बाहेर पडला म्हणजे कोणालाही कापरे भरावे, असा तो जबरदस्त माणूस होता. परंतु म्हातारा साऱ्या गावात अतिशय कंजूष म्हणून प्रसिद्ध होता. खूप मोठी इस्टेट होती, वाडवडिलांनी प्रचंड बंगला बांधून ठेवला होता. गडगंज पैसा जवळ होता, नाजूक, गोरीपान बायको होती आणि सोन्यासारखी एकुलतीएक मुलगी होती, परंतु कुठल्याही कारणास्तव म्हाताऱ्याच्या हातून तांबडा पैसा सुटणे दुरापास्त होते.

मंगळवार म्हणजे गावच्या बाजाराचा दिवस. आजूबाजूच्या खेड्यांतील कितीतरी रसरशीत फळं बाजारात गाड्याभरून हारीनं उभी असायची आणि गावातली मुले तांबडा पैसा घेऊन बाजारात पळायची. पण चुकूनही कधी म्हाताऱ्याने बाजारात

जाण्यासाठी एखादा खोटा पैसादेखील आपल्या मुलीच्या हातात देण्याचे औदार्य दाखविले नाही. मंगळवार आला की म्हणूनच मीना मोठी दुःखी दिसायची. मंगळवारी सकाळी शाळा असायची आणि अकराच्या सुमारास शाळा सुटली की फळ-भाज्यांनी भरलेल्या बाजारातून चालत घरी जाताना ती कमालीची दुःखी-कष्टी होत असे.

एकदा मंगळवारी शाळा सुटल्यावर आम्ही दोघं बाजारातून जात होतो. मध्येच एका ठिकाणी ती अचानक थांबली. कोणी शेतकरी सातआठ पिकलेल्या रसरशीत पपया घेऊन उघड्यावर विक्रीसाठी मांडून बसला होता. मीना तेथे क्षणभरच थांबली. त्या पपयांनी तिच्या मनातील आसक्ती जागी झाली होती; परंतु ती वस्तू मिळणे कठीण आहे या कल्पनेने शहाण्यासारखी ती पुढे चालू लागली. मी मुकाट्यानं तिच्या मागोमाग चाललो होतो. आमचे रस्ते फुटले आणि ती पुढे गेली आणि मी दुसरीकडे वळलो.

दुसऱ्या दिवशी शाळेत दहा मिनिटांच्या सुट्टीत ती वडाखाली भेटली. नेहमी-सारखी ती त्या दिवशी खुषीत नव्हती. बोलतही नव्हती.

'काय ग मीना, आज बोलत नाहीस तू?'

'श्याम, माझ्यासाठी एक काम करशील तू?' एकदम आवेगाने माझे हात धरून तिने विचारले.

'काय?'

'अगोदर होय म्हण!'

'होय.'

'गळ्याशपथ?'

'अगदी तुझ्या गळ्याशपथ!'

'अरे, मला पपई खावीशी वाटते रे! मला आणून देशील?'

इतक्यात सुटी संपल्याची घंटा झाली आणि त्यासरशी भानावर येऊन ती धूम पळत वर्गात शिरली.

मीही पळत वर्गात गेलो आणि कोपऱ्यातली जागा पकडली. परंतु मधली सुटी होईपर्यंत केवळ तोच एक विचार माझ्या मनात घोळत होता.

मधली सुटी झाली आणि सगळी मुले मधल्या वेळचे खाणे खाऊन येण्यासाठी भराभर गावाकडे पांगली. माझी तशी काही सोय नव्हती म्हणून रोजच्याप्रमाणे मी शाळेतल्या वर्गात एकटाच बसून राहिलो, आणि अचानक माझ्या मनात तो धाडसी विचार आला.

गावाबाहेर ओढ्याकाठी मीनाचा मळा होता आणि तेथे पपयांच्या झाडावर कितीतरी पपया लटकत असलेल्या मी पाहिल्या होत्या. पेन्सिल तासण्यासाठी एक गंजलेले ब्लेडचे पाते मी सकाळीच मिळविले होते, ते खिशातच असल्याची चाचपून खात्री करून घेऊन मी मागचापुढचा विचार न करता धूम ठोकली.

ओढ्याकाठचा मळा जवळ आला आहे, हे पाहून मी धूर्ततेने आत कसा प्रवेश करावा याचा क्षणभर विचार केला आणि मोठ्या युक्तीने काटेरी कुंपणावरून उडी मारून आत प्रवेश केला.

सावधगिरीने पपईच्या झाडाजवळ मी पोचलो आणि आजूबाजूला नजर टाकली तेव्हा मळ्यात माणसांची कसलीच हालचाल दिसली नाही. दहा-पाच झाडांवरच्या पपया हेरून रसरशीत पिवळ्या रंगाची पपई ज्या झाडावर लटकत होती तिकडे मी माझा मोर्चा वळविला. मला झाडावर तसं फारसं चांगलं चढता येत नव्हतं. पपईचं झाड म्हटलं की ते थोडसं चढायला कठीणच असतं, परंतु माझ्या अंगात चांगलेच बळ संचारले होतं. मी कसला विचार न करता झाडावर चढलो आणि वरती चढून पपई चांगली तयार असल्याची खात्री करून घेतली. त्याबद्दल शंकादेखील राहू नये म्हणून खिशातलं पातं काढून पपईचा एक तुकडा काढून ती खरोखरच पिकली आहे याची खात्री करून घेतली आणि एका हातात फळ धरून सावरून खाली उतरण्याचा प्रयत्न करताना हात घसरून मोठ्याने सरकत धपकन खाली पडलो आणि अंगाला चांगलाच मार लागल्यामुळे कण्हत चड्डी झाडीत मी उठलो. इतक्यात झाडामागे लपलेल्या दोन नोकरांनी पळत येऊन मला मुद्देमालासह पकडले आणि ' काय महाराज ! ' म्हणून दोन्ही हात दोरीनं बांधून देखील टाकले.

हात काढण्यांनी बांधून त्यांनी माझी स्वारी मीनाच्या वडिलांकडे नेली. नोकरांनी सांगितलेली हकीकत ऐकून सरदारसाहेब चवताळून अंगावरच आले. मी त्यांच्या पाया पडलो, गयावया केल्या, पुन्हा असे कधी करणार नाही असं डोळ्यांत अश्रू आणून सांगून पाहिलं, परंतु त्यांना दया आली नाही.

' तू शाळेमध्ये शिकतोस आणि हे धंदे करतोस ना ! ठीक, आता तुला तुझ्या हेडमास्तरांकडेच घेऊन जातो म्हणजे झाले ! '

' नको हो, मी तुमच्या पाया पडतो, मला क्षमा करा ! '

' ते काही नाही. चला रे ह्याला शाळेकडे घेऊन ! '

आणि मग काढण्या बांधलेली आमची धिंडका त्यांनी शाळेकडे वळविली.

शाळेत आमच्या वर्गावर त्या वेळी हेडमास्तरांचाच तास होता. सरदार-साहेबांनी आपल्या नोकरांकरवी मला वर्गात ढकलले आणि आत शिरून आपल्या गलेलठ्ठ मानेवरचा घाम पुसत ते म्हणाले,

' मास्तर, अहो मास्तर ! '

' काय हो. काय झालं ? '

' अहो, तुम्ही पोरांना शाळेत काय शिकविता हे पाहण्यासाठी आलो होतो. '

' म्हणजे ? म्हणायचं काय आहे तुम्हांला ? '

' अहो, हा तुमचा विद्यार्थी या भर उन्हात आमच्या मळ्यात झाडावर चढून पपया चोरण्याचे उद्योग करीत होता ! '

' आं ? '

' अहो, मी खोटं का सांगतोय ? हा पाहा पुरावा ' आणि त्यांनी ती पपई टेबलावर ठेवली.

क्षणात हेडमास्तरांचा चेहरा अतिशय क्रुद्ध झाला. हातातील चिंचेच्या फोकानं मला समोर उभं करून त्यांनी त्वेषाने एका पाठोपाठ सपासप झोडपायला सुरुवात केली. आणि त्याच वेळी एकापेक्षा एक अर्वाच्य शिव्याही तितक्याच त्वेषाने मस्तकावर आदळू लागल्या.

समोरच्या मुलांमुलींमध्ये चांगलीच चुळबुळ सुरू झाली होती. " पपईचोर " म्हणून कुणीतरी म्हणत होतं आणि बाकीची सगळी पोरं फिदीफिदी हसत होती. डोळ्यांतून अश्रुधारा वाहात असता रडत रडत एका बाहीनं अश्रू पुसून मी हळूच मीनाकडे पाहिले.

ती खाली मान घालून जमिनीकडे पाहात होती आणि पायांच्या नखांनी तिचा जमिनीशी चाळा चालू होता.

◎ ◎

## टीपा व स्वाध्याय

: १ :

**कृष्णाजी अनंत सभासद—** ( सुमारे इ. स. १६९४ )

याचे उपनाम हिरेपारखी. हा राजसभेत सल्लामसलत देणारा असल्यामुळे यास सभासद ही पदवी होती. राजारामाच्या आज्ञेवरून याने १६९४ ते १६९७ च्या दरम्यान शिवाजीमहाराजांचे चरित्र, तत्कालीन साधनांवरून लिहून काढले. ते ' श्रीशिवप्रभूचे चरित्र ' किंवा ' सभासदाची बखर ' या नावाने प्रसिद्ध आहे. तत्कालीन गद्य आणि इतिहास या दोन्ही दृष्टींनी ही बखर अभ्यसनीय आहे. या बखरीतून प्रस्तुत उतारा घेतला आहे.

**शब्दार्थ व टीपा—**

**सचंतर** – स्वतंत्र, **शिवपुरा** – शिवाजीमहाराजांसाठी उभारलेला स्वतंत्र तंबू, डेरा; **कंबरबस्ती** – कमरपट्ट्याने कंबर कसून; **आमखास** – दरबारचा दिवाणखाना; **मुस्तेद** – जय्यद तयारी; **पितियास** – वडील—शहाजी महाराजांस; **माजेची** – कमरेची; **हयवान** – घाबरा; **गर्मा** – उष्णता, उकाड्यामुळे अस्वस्थ; **करीणा** – अनर्थ, प्रकार ( वागण्याची पद्धत, रीत ); **रस-रंग** – गोडी; **जोड जाहाली** – लाभ झाला; **आम्हांस मोठी जोड जाहाली** – जे पाहिजे होते ते मिळाले; **मजलस** – हेतू, धोरण; **निखालस** – निश्चितपणे; **हजरतीस**– बादशहाच्या सेवेस; **वरकड** – याउपर, इतर; **मुद्यामाफक** – विचाराप्रमाणे; **गिल्ला** – तक्रार; **खोचून** – चांगल्या रीतीने पटून; **विकल्प** – शंका; **मुतालीक** – दुय्यम अधिकारी; **तजवीज** – विचार; **सरंजाम** – साधन, साहित्य; **दिलखुलाशाने** – मोकळ्या मनाने; **हुन्नर करावा** – कल्पना लढवावी; **रावता** – रतीब, वहिवाट; **लाग** – पाठलाग; **पोर** – मदारी मेहतर नावाचा मुसलमान मुलगा; **अलाहिदा** – स्वतंत्र, निराळी; **इलाखा** – जबाबदारी; **बंदी**–

सेवक, नोकर; **सर्फराजी** – सन्मान; **दरम्यान** – मध्यस्थ; **तसलीम** – मुजरा; **गईब** – गायब; **उर्जित** – उत्कर्ष, बढती; **वाराणसी** – काशी; **गयावर्जन** – (गयाव्रजन) बिहार प्रांतामध्ये गया हे पुण्यक्षेत्र आहे. त्या ठिकाणी दानधर्म करून श्राद्धादी कर्मे करणे; **महोच्छाव** – महाउत्सव.

**स्वाध्याय—**

१. सभासदाची भाषा व वर्णनशैली यांचे विवेचन करा.
२. इतिहास या दृष्टीने बखरीची योग्यता काय मानावी याविषयी काही विचार लिहा.
३. सभासदांनी वर्णन केलेला प्रसंग आपल्या शब्दांत लिहा.

: २ :

## लोकहितवादी ( सरदार गोपाळराव हरी देशमुख—१८२३–१८९२ )

दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत यांचे वडील जहागिरदार होते, परंतु त्यांच्या मृत्यूनंतर इंग्रजांनी त्यांची जहागीर खालसा केल्यामुळे गोपाळरावांस तरुणवयातच स्वतःच्या चरितार्थासाठी इंग्रजी शिकणे भाग पडले. इंग्रजीमध्ये त्यांनी मिळविलेले प्रावीण्य पाहून त्यांना लवकरच एजंट कचेरीत नोकरी मिळाली व त्यांची कुशाग्र बुद्धी पाहून त्यांना एकदम अव्वल कारकुनाची बढती मिळाली. नोकरी करता करता त्यांनी मुन्सफीची परीक्षा दिली व १८५२ मध्ये त्यांची वाईला मुन्सफ म्हणून बदली झाली.

त्यापूर्वीच त्यांनी भाऊ महाजन यांनी काढलेल्या ‘ **प्रभाकर** ’ या साप्ताहिकात पत्रे लिहावयास सुरुवात केली. अगदी तरुणपणी त्यांनी ही लिहिलेली पत्रे म्हणजे मराठी निबंधाची खऱ्या अर्थाने सुरुवात होय. ‘ **लोकहितवादींची शतपत्रे** ’ या नावाने ही पत्रे नंतर पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आहेत. वयाच्या पंचावन्न वर्षांपर्यंत गोपाळरावांनी मोठमोठ्या सरकारी अधिकाराच्या जागा भूषविल्या व नोकरीतून ते सेवानिवृत्त झाले.

१८७६ साली दिल्ली येथे भरलेल्या प्रचंड दरबारात त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांना सरकारने ‘ सरदार ’ हा किताब बहाल केला.

गोपाळरावांनी आपले सगळे आयुष्य सार्वजनिक सेवेमध्ये व लोकांना ज्ञान-दान करण्यात वेचिले, त्यामुळे अव्वल इंग्रजीतील उद्योगी व व्यासंगी पुरुषांत त्यांची प्रामुख्याने गणना होते. सबंध आयुष्यभर त्यांनी नवनवीन माहितीने भरलेले ग्रंथ लिहिले, व त्यांतील कित्येक लोकांस मोफत वाटले. इंग्रजी, फारशी व संस्कृत या भाषांवर त्यांचे चांगले प्रभुत्व होते.

लोकहितवादींनी आपल्या शतपत्रांतून सनातनी लोकांचे दांभिक आचार-विचार व लोकांची व्यसनासक्ती, आळशी वृत्ती यांवर सडेतोड कोरडे ओढले आहेत. लोकांनी विद्येची कास धरावी, डामडौलीपणा व आळस टाकून द्यावा, डोळसपणे जगाच्या इतिहासाचे व विज्ञानाचे परिशीलन करावे आणि सततोद्योगाने आणि स्वार्थत्यागाने आपले राष्ट्र उन्नतीला पोचवावे, याची उत्कट तळमळ या पत्रांतून दिसून येते.

## शब्दार्थ—

**वृद्धिंगत जहाले** – वाढले; **परिस्फुटता** – वाच्यता; जाहीररीत्या बोलणे.

## स्वाध्याय—

१. प्राचीन काळचे लोक आळशी असण्याचे लेखकाच्या मते कारणे कोणती ?

२. ब्राह्मणांनी ढोंगाची परिस्फुटता फार केली असे लेखक का म्हणतो ?

३. आपल्या लोकांस अन्नाची कमतरता का पडू लागली ?

४. आपले लोक भिकारी झाले आहेत हे सांगण्यासाठी लोकहितवादींनी कोणता हिशेब दिला आहे.

५. आपले लोक सुखी होण्यासाठी लेखकाने कोणती उपाययोजना सुचविली आहे ?

: ३ :

## विष्णु कृष्ण चिपळूणकर (१८५०–१८८२)

यांना अर्वाचीन मराठी गद्याचे जनक समजले जाते. यांनी 'निबंधमाला' मासिकाच्या द्वारा अनेक वैचारिक निबंध लिहून महाराष्ट्राचा स्वराष्ट्राभिमान, स्वभाषाभिमान आणि स्वातंत्र्याभिमान जागृत केला. तत्कालीन आंग्लशिक्षितांच्या

ठिकाणी आलेला न्यूनगंड यांनी काढून टाकला. न्यू इंग्लिश स्कूल आणि केसरी यांचे ते संस्थापक होत. प्रस्तुत निबंध त्यांच्या निबंधमालेतील एतद्विषयक लेखातून काही संक्षेप करून घेतला आहे.

### टी पा—

**जयदेव**—इ. सनाच्या तेराव्या शतकातील सुप्रसिद्ध संस्कृत कवी. याने लिहिलेल्या ' गीतगोविंद ' या काव्यात कृष्ण व गोपगोपी यांच्या लीला अतिशय आकर्षकतेने वर्णिल्या आहेत.

**रामजोशी** (१७६२–१८१२)—उत्तर पेशवाईतील प्रसिद्ध शाहीर व लावणीकार. जातीने यजुर्वेदी ब्राह्मण. पंडित असूनही तो तमाशा–लावणी यांच्या नादी लागला. परंतु पुढे तो श्रेष्ठ कीर्तनकार झाला.

**शुकाचार्य**—व्यास व वटिका यांचा पुत्र. धर्माचे व जगाच्या उत्पत्तीचे ज्ञान यास व्यासांपासून झाले. भागवत यानेच परीक्षिती राजास सांगितले.

**बिशप बटलर** (१६९२–१७५२)—प्रसिद्ध इंग्रज धर्मोपदेशक.

**एडमंड स्पेन्सर** (१५५२–१५९९)—त्याची शेफर्डस कॅलेंडर ही कविता प्रसिद्ध झाल्यानंतर राणीने त्याची ओळख करून घेतली.

### स्वा ध्या य—

१. चिपळूणकर हे मराठी निबंध वाङ्मयाचे आद्यप्रवर्तक होते हे विधान सिद्ध करा.
२. टीकाकाराचे गुण कोणते आहेत ते आपल्या शब्दांत लिहा.
३. टीका व वाङ्मनिर्मिती यांचे परस्पर संबंध काय ते विशद करा.

: ४ :

## गोपाळ गणेश आगरकर (१८५६–१८९५)

हे महाराष्ट्रातील बुद्धिवादाचे प्रणेते म्हणून ओळखले जातात. चिपळूणकरांसोबत यांनी न्यू इंग्लिश स्कूल व केसरी येथे काम केले. पुढे ते फर्गसन कॉलेजचे प्राचार्य झाले. समाजसुधारणा प्रथम झाली पाहिजे असा यांचा आग्रह होता, व त्या मताच्या पुरस्कारार्थ त्यांनी सुधारक वर्तमानपत्र काढले. त्यांची भाषा आवेशपूर्ण, विवेचन तर्ककर्कश तरीही भावनावश आणि प्रतिपादन जोरकस असे. त्यांच्या निबंधसंग्रहातून प्रस्तुत लेख घेतला आहे.

**शब्दार्थ—**

**मृगया**—शिकार; **उद्भिज्जाहारी**–शाकाहारी; **गोपालवृत्ती**—गवळ्याचा व्यवसाय; **कृषीवलवृत्ती**–शेतकी.

**स्वाध्याय—**

१. उत्पादक आणि नियामक या दोन वर्गांचे समाजात कार्य, स्थान व परस्पर प्रमाण काय असावे याबद्दल आगरकरांचे विचार लिहा.

२. मनुष्य व मनुष्येतर प्राणी यांच्या व्यापारांतील फरक स्पष्ट करा.

३. आगरकरांचा समाजसुधारणाविषयक दृष्टिकोन व्यापारवृद्धीत कसा काय आढळून येतो ते स्पष्ट करा.

— — —

: ५ :

## बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर (१८४३–१८८५)

मराठी रंगभूमीचे पुण्यपुरुष म्हणून किर्लोस्कर ओळखिले जातात. त्यांनी संगीत शाकुंतल (१८८०), संगीत सौभद्र (१८८२) व रामराज्यवियोग (१८८४ अपूर्ण) अशी अडीचच नाटके लिहिली, परंतु त्यांच्या सौभद्र नाटकामुळे मराठी वाङ्मयात त्यांचे नाव चिरस्थायी होऊन राहिले आहे.

'परदुःख शीतल' या धड्यात सौभद्र नाटकातील दुसऱ्या अंकाच्या शेवटचा भाग देण्यात आला आहे. सुभद्रेचा विवाह बलरामाने दुर्योधनाशी निश्चित केला आहे. काही आकस्मिक कारणामुळे मुहूर्त लांबणीवर पडला आहे आणि अर्जुनावरच्या प्रेमामुळे तिची वेडावल्यासारखी अवस्था झाली आहे आणि बंधुराज श्रीकृष्ण व वहिनी रुक्मिणी यांचीही वरील विवाहाला संमती आहे, अशी तिची ठाम समजूत झाली आहे. अशा वेळी सुभद्रेला रुक्मिणी भेटते. त्या वेळच्या प्रसंगाचे या उताऱ्यात बहारदार चित्रण करण्यात आले आहे. यातील यतिमहाराज म्हणजे संन्याशाचा वेष घेऊन राजवाड्यात ठाण मांडून बसलेला अर्जुन आहे, हे अगोदर लक्षात ठेविले पाहिजे.

शब्दार्थ—

**थोरले सरकार** — बलराम; **कंचुकी** — राजमहालातील राजाचा विश्वासू नोकर, अंतःपुरातील वृद्ध अधिकारी; **शिशुपाल राजा** — चेदी देशाचा पराक्रमी राजा, रुक्मिणीच्या भावाने रुक्मिणीचा विवाह शिशुपालाशी ठरविला होता; **हस्तोदक** — हातावर पाणी.

स्वाध्याय—

१. मी आता दगडापेक्षा देखील घट्ट झाले आहे, असे सुभद्रा का म्हणते ?

२. 'परदुःख शीतल आहेग वहिनी' या तिच्या उद्गारातील मर्म सांगा.

३. रुक्मिणी काही उत्तर न देता मान खाली घालून का बसते ?

४. या उताऱ्यातील विनोदाचे स्वरूप उदाहरणांसह स्पष्ट करा.

: ६ :

**हरी नारायण आपटे** ( १८६४–१९१९ )

महाराष्ट्राचे पहिले ऐतिहासिक व सामाजिक कादंबरीकार. यांनी 'करमणूक' पत्राच्या द्वारा अनेक कादंबऱ्या व कथा लिहून महाराष्ट्राला समाजसुधारणेची शिकवण दिली. यांची शैली सुबोध, भाषा घरगुती आणि व्यक्तिचित्रणे प्रत्ययोत्पादक आहेत. यांच्या 'उषःकाल' नामक प्रसिद्ध कादंबरीतून प्रस्तुत प्रकरण काही संक्षेपाने घेतले आहे.

स्वाध्याय—

१. आपटे यांनी शिवाजीची व्यक्तिरेखा कशी रंगविली आहे ?

२. हिंदवी स्वराज्य स्थापनेपूर्वी महाराष्ट्राची स्थिती कशी होती याचे अनुमान करा.

३. 'ऐतिहासिक कादंबरी' संबंधी आपटे यांची कल्पना काय असावी, असे तुम्हांस वाटते ?

: ७ :

## शिवराम महादेव परांजपे (१८६४–१९२९)

राष्ट्रीय आंदोलनाच्या काळात ज्यांनी आपल्या लिखाणाने तरुण पिढीची मने अत्यंत उत्तेजित केली अशा अग्रगण्य लेखकांत परांजपे यांची गणना होते. वक्रोक्ती व उपरोध या दोन शस्त्रांचा त्यांनी आपल्या लिखाणात भरपूर उपयोग केला. त्यांचे गद्य देखील काव्यमय असे. 'काळ' हे त्यांचे वर्तमानपत्र. त्यामुळे 'काळकर्ते' या नावानेच ते ओळखले जातात. त्याचे वक्तृत्वही शैलीदार होते. त्यांनी विविध विषयांवर रचना केली आहे. प्रस्तुत लेख 'काळ' पत्राचा प्रारंभीचा अग्रलेख होय.

### टीपा—

**काळ उपाधिभूत आहे** – काळ हा उद्देशमात्र आहे. परमेश्वर हे मुख्य कारण व काळ हा आवरणासारखा आहे.

**बॅबिलोनचे कळस** – बगदादच्या दक्षिणेस ७० मैलांवर असलेले शहर. खिस्तपूर्व ६८९ मध्ये या शहराचा विध्वंस झाला. परंतु असुर हेदेन नावाच्या राजाने ते परत वसविले व आकाशाशी स्पर्धा करणारा प्रचंड कळस बांधला, अशी आख्यायिका आहे.

**निनेव्ही** – तैग्रीस नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील पुरातन शहर.

**कैरो** – इजिप्तची राजधानी.

**सिरिया** – पश्चिम आशियातील देश.

**पॅलेस्टाईन** – सिकंदर, टॉलेमी, तुर्की व इजिप्तच्या लोकांनी हा देश शतकानुशतके पारतंत्र्यात ठेवला आहे.

**घोड्यांना आणि पर्वतांना पंख** – ग्रीक पुराणामध्ये घोड्यांना पंख असल्याची वर्णने आहेत व आपल्या पुराणांत पर्वतांना पंख असल्याचे लिहिले आहे.

**टार्क्विनस** (५३४–५१०) — रोमचा सातवा राजा.

**नीरो** (३७–६८) — रोमचा बादशहा. राजाचा खून करून हा गादीवर बसला व निर्घृणपणाने आपली आई व आपल्या दोन बायका यांचाही खून केला.

कलेबद्दल त्याला अतिशय प्रेम होते. परंतु त्याच्या अत्याचारामुळे सैन्याने बंड केले व त्यामुळे पळून जाऊन त्याने आत्महत्या केली.

**अलेक्झांडर** –( ख्रिस्तपूर्व ३५६–३२३) ग्रीकांचा जगज्जेता राजा.

**ज्युलियस सीझर** ( ख्रिस्तपूर्व १०२–४४ ) –– रोमचा प्रख्यात हुकुमशहा. त्याचा शेवटी खून झाला.

**सालोमन** – इस्रायल लोकांचा राजा. ज्यू धर्मी देवालयाची इमारत बांधून त्याने सर्व इस्रायल राष्ट्र राजनिष्ठ बनविले.

**ऑरेलिअस** ( इ. स. २७०–२७५) –– रोमचा पराक्रमी बादशहा. रोमचे वैभव याच्या कारकीर्दीत अतोनात वाढले.

**ल्युक्रेशिया** –– रोममधील एक अत्यंत सुंदर व गुणसंपन्न स्त्री.

**ब्रुटस**—डेसिमस जूनियस ( इ. स. पूर्व ८४ )–– सीझरचा सेनापती. सीझरचा खून करणाऱ्यांमध्ये हा प्रमुख होता.

**साक्रेतीस** ( ख्रि. पू. ४६९–३९९) –– विख्यात ग्रीक तत्त्वज्ञानी. त्याच्या निर्भीड तत्त्वविचारामुळे त्यास पाखंडी ठरवून विषाचा प्याला घ्यावयास लावून ठार मारिले.

**स्वा ध्या य**—

१. ' काळ ' ची व्यापक कल्पना परांजपे यांनी कशी प्रगट केली ते लिहा.

२. काळ हा निबंध लिहिण्याचा परांजप्यांचा उद्देश कोणता व तो कितपत सिद्धीस गेला.

३. ' उपरोध हा परांजपे यांच्या लिहिण्याचा विशेष होय ' हे विधान या लेखास लावून दाखवा.

: ८ :

**श्रीपाद कृष्ण कोल्हटकर**––( १८७१–१९३४ )

मराठीतील हे आद्य विनोदी लेखक म्हणावयास हरकत नाही. नाटककार म्हणून यांनी कीर्ती मिळविलीच, पण त्यापेक्षाही विनोदी लेखक म्हणून जास्त

मिळविली. ते प्रख्यात गणितीही होते. त्यांचा विनोदी लेखांचा संग्रह 'साहित्य बत्तिशी' ऊर्फ 'सुदाम्याचे पोहे' या नावाने प्रसिद्ध आहे. त्या पुस्तकातून प्रस्तुत लेख घेतला आहे.

### टीपा —

**वाचमर्थोऽनुधावति**—वाणीच्या पाठोपाठ अर्थ (आपोआपच) धावत येतो.

**वसुधैव कुटुंबकम्**— जग हेच (आपले) कुटुंब (अशी अतिशय व्यापक भूमिका).

### स्वाध्याय

१. विनोद कसा उत्पन्न होतो व तो 'साक्षीदारा'त कसा प्रतीत होतो ते लिहा.

२. 'या विनोदी लेखाचा उद्देश सामाजिक व्यंगावर टीका करण्याचा आहे' हे विधान सिद्ध करा.

३. 'साक्षीदार' या प्राण्याचे न्यायालयीन महत्त्व वर्णन करा.

~ ~ ~

: ९ :

**महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार**–(जन्म–१८९०.).

इतिहास व प्राचीन मराठी वाङ्मय यांचे साक्षेपी संशोधक. शिक्षणतज्ज्ञ व उत्तम वक्ते. स्वच्छ, प्रवाही भाषाशैली व देशप्रेमाने भरलेली ओजस्वी विचारसरणी यांचे दर्शन त्यांच्या लेखनात घडते. 'पोतदार विविध–दर्शन' या पुस्तकातून हा लेख घेतला आहे.

### टीपा —

**तर्पण** – देव, ऋषी व पितर यांना उद्देशून उदक सोडण्याचा विधी.

**कर्मणैव हि...जनकादयः** – कर्मानेच जनकादिकांनी मोक्ष संपादिला.

**शुक्राचार्य** – 'संजीवनी' विद्येच्या साहाय्याने मेलेल्यांना जिवंत करणारे दैत्यगुरु.

**संताजी घोरपडे** – राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत हा मराठ्यांचा सेनापती होता. आपल्या पराक्रमाने याने मोगलांस अतिशय हैराण केले.

**रामा प्रभुणे** ( १७२०–१७८९ ) –– न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे. सुमारे वीस वर्षेपर्यंत हा निरक्षर होता व साताऱ्च्या अनगळ सावकाराकडे शागीर्द ( नोकर ) होता, आणि सावकाराने अपमान केल्यामुळे हा शास्त्राध्ययनासाठी काशीस गेला व मोठा पंडित होऊन परत आला.

**बाळाजी विश्वनाथ** ( मृत्यू १७२० ) — पेशवे घराण्याचा मूळ पुरुष. श्रीवर्धनची देशमुखी याचेकडे होती, परंतु हबशांच्या जाचामुळे नशीब काढण्यासाठी देशावर आला.

**दासोपंत** ( १५५१–१६१५ ) –– संस्कृत व प्राकृत या दोन्ही भाषांत प्रचंड ग्रंथरचना करणारा आंबेजोगाईचा कवी.

**अगीनदास** – शिवाजीमहाराजांच्या पदरी असलेला शाहीर कवी.

**थोरले आबासाहेब** – शिवाजीमहाराज.

**महार्ह** – श्रेष्ठ.

**म्हैसमंगळू** – म्हैसूर.

**नेपोलियन** – नेपोलियन बोनापार्ट ( १७६९–१८२१ ). साध्या शिपायापासून चढत जाऊन पराक्रमाने हा फ्रान्सचा बादशहा झाला. जगद्विख्यात योद्धा व महत्त्वाकांक्षी वीर म्हणून प्रसिद्ध.

**वॉशिंग्टन** ( जन्म १७३२ ) –– इंग्लंडच्या वर्चस्वापासून अमेरिकेला याने स्वातंत्र्य मिळवून दिले. ४ जुलै १७७६ ला अमेरिकेच्या स्वातंत्र्याची याने घोषणा केली व अमेरिकेच्या प्रजासत्ताकाचा पहिला अध्यक्ष म्हणून हा निवडून आला.

**उत्तिष्ठत...बोधत** – उठा जागे व्हा आणि आपले ध्येय साध्य झाल्याखेरीज विश्रांती घेऊ नका.

**प्रतिपन्न** – अंगिकारलेले.

: १० :

## बॅरि. विनायक दामोदर सावरकर ( जन्म १८८३ )

क्रांतिकारकांचे मुकुटमणी, हिंदुराष्ट्राचे पुरस्कर्ते आणि लढाऊ तत्त्वज्ञानाचे प्रतिपादक म्हणून स्वातंत्र्यवीर बॅरि. सावरकरांचे स्थान फार उच्च आहे. कवी, नाटककार, कादंबरीकार, आत्मचरित्रलेखक, इतिहासकार या अनेक नात्यांनी सावरकरांनी साहित्यसेवा केली आहे. हे कवी असूनही प्रखर बुद्धिवादी आहेत. स्वदेशासाठी यांनी फार मोठा देहदंड सोसला आहे. ' जन्मठेप ' नावाच्या त्यांच्या अंदमानीय आत्मवृत्तातून प्रस्तुत लेख घेतला आहे.

लंडनमध्ये बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी गेले असता स्वातंत्र्यप्रेमाने त्यांनी तेथे अनेक गुप्त चळवळी केल्या. १८५७ सालच्या स्वातंत्र्य संग्रामाबाबतीत त्यांनी इंग्रजीत लिहिलेल्या ग्रंथामुळे त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला व १९११ साली त्यांच्यावर खटला चालवून सरकारने त्यांना जन्मठेपेची शिक्षा दिली.

### टीपा—

**सिंहलद्वीप** – सिलोन; **सिंधुदुर्ग** – पाण्यामध्ये बांधलेला किल्ला; **बेयॉनेट** – संगीन.

**मार्सेलालीस पळून**–१९१० ला त्यांना इंग्लंडमध्ये अटक करून हिंदुस्थानात आणीत असता सावरकरांनी मार्सेलिस बंदरात बोटीच्या पोर्ट होलमधून उडी मारून फ्रान्सचा किनारा गाठला व इंग्रजांच्या हातावर तुरी दिली, परंतु फ्रान्सच्या पोलिसांनी विश्वासघात करून त्यांना इंग्रजांच्या ताब्यात दिले.

**सिनफिनवाले** –' आयर्लंड 'मधील क्रांतिकारक.

### स्वाध्याय—

१. अंदमानसंबंधी सावरकरांची दृष्टी विशद करा.

२. ' सावरकरांची वर्णनशैली भव्य आहे आणि कल्पना राष्ट्रभक्ती व स्वाभिमान यांनी भरून गेल्या आहेत. ' हे विधान सिद्ध करा.

३. सावरकरांच्या या वेळच्या मनःस्थितीचे वर्णन करा.

: ११ :

## डॉ. केशव लक्ष्मण दप्तरी ( १८८०–१९५६ )

हे आधुनिक काळातील महापंडित व विचारवंत ग्रंथकार होऊन गेले. ज्योतिर्गणित, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, समचिकित्सापद्धती इत्यादी विषयांवर मोठे युगप्रवर्तक ग्रंथ यांनी लिहिले आहेत. संस्कृत, मराठी व इंग्रजी या तिन्ही भाषांत त्यांची रचना आहे. हिंदुस्थान देश स्वतंत्र झाल्यावर १९४७ ते १९५० या काळात त्यांनी स्वतंत्र हिंदुस्थानात असावयाच्या अनेक बाबींचा विचार करणारी एक लेखमाला लिहिली, ती ‘ स्वतंत्र भारताचा पुढील मार्ग ’ या नावाने पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. त्यातून प्रस्तुत लेख काही संक्षेप करून घेतला आहे.

## टी पा—

**अपौरुषेय** – परमेश्वरनिर्मित, मनुष्यनिर्मित नव्हे; **संगळलेले** – साचलेले; **आयव्यय** – जमाखर्च; **अलोपथी** – पाश्चात्त्य वैद्यकशास्त्र; **होमिओपाथी** – माणसाचे शरीर, मन व आंतरिक शक्ती यांचे निदान करून रोग दूर करणारी औषधीयोजना. ‘ समः समं शमयति ’ हे या चिकित्सेचे रहस्य आहे; **वेदान्त** – हिंदु–तत्त्वज्ञान.

**शंकराचार्य** (७८८–८२०) –– केरळमध्ये ब्राह्मण कुळात जन्मलेला अत्यंत तेजस्वी पंडित. हिंदुधर्माचे त्यांनी पुनरुज्जीवन केले. ब्रह्मसूत्रांवर भाष्य लिहून वादामध्ये सगळ्या पंडितांचा पाडाव केला. काश्मीरमध्ये जाऊन शारदामंदिरातील सर्वज्ञ पीठावर आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या जोरावर आरूढ झाले व ३२ व्या वर्षी समाधी घेतली.

**स्पेन्सर हर्बर्ट** ( १८२०–१९०३ ) –– प्रसिद्ध इंग्रज तत्त्ववेत्ता.

## स्वा ध्या य

१ ज्ञान कसे होते याची मीमांसा करा.

२ ‘ उपदेशाने पूर्ण ज्ञान होते अशी समज शिक्षितांची केव्हाही होऊ देऊ नये ’ या विधानाचे स्पष्टीकरण करा.

३ शिक्षणात कोणते विषय अवश्य असावे याचे विवेचन करा.

मराठी ग्रंथ ... ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... दि: ........
क्रमांक .... नों. दि:



: १२ :

**श्रीपाद महादेव माटे** ( १८८६–१९५७ )

एक शैलीदार लेखक आणि समाजसेवक म्हणून हे प्रसिद्ध आहेत. अस्पृश्योद्धारासंबंधी यांनी अनेक वर्षे भरीव विधायक कार्य केले असून ' अस्पृष्टांचा प्रश्न ' या नावाचा विवेचक ग्रंथही त्यांनी लिहिला आहे. यांच्या विविध कथा, ललित निबंध व वैचारिक लेख प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीच प्रस्तुतचा एक निबंध संक्षेपाने घेतला आहे.

**टीपा—**

**येशूचा धर्म** – ख्रिस्ती धर्म; **परिचर्या** – सेवा.

**स्वाध्याय—**

१. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे कार्य व त्याचे परिणाम यांचे वर्णन करा.

२. हिंदू तरुणांचे कर्तव्य लेखकाच्या मते काय ?

३. भूतदया आणि आचारकांड यांतील भेद स्पष्ट करून त्यासंबंधी आपले कर्तव्य काय ते लिहा.

: १३ :

**विनायक नरहर ऊर्फ आचार्य विनोबाजी भावे** (जन्म १८९४)

महात्मा गांधींचे पट्टशिष्य व भूदान आंदोलनाचे जनक म्हणून यांना जग ओळखते ! सर्वोदयी तत्त्वज्ञानाचे ते उद्गाते आहेत. त्यांचे लिखाण प्रसादगुणांनी परिपूर्ण असून मोठे प्रत्ययोत्पादी असते. ' महाराष्ट्र धर्म ' या नावाचे साप्ताहिक ते चालवीत असत. त्या पत्रातील लेखसंग्रह ' मधुकर ' या नावाने प्रसिद्ध आहे. त्यातून प्रस्तुत लेख घेतला आहे.

**टीपा—**

**युक्लिड** ( इ. स. पूर्व ३०० )—प्रसिद्ध ग्रीक गणिती. त्याची ' भूमिती ' प्रसिद्ध आहे.

**पॅरडाईझ लॉस्ट** -- प्रसिद्ध इंग्रज कवी मिल्टन (१६०८–१६७४) याने लिहिलेले महाकाव्य. १६५८ ते १६६४, सात वर्षे तो हे काव्य लिहीत होता.

**स्वाध्याय—**

१. 'मत' शब्दाची विनोबांची व्याख्या देऊन तिची योग्यायोग्यता ठरवा.

२. मतप्रचाराचे प्रभावी साधन कोणते व ते कसे अमलात आणावे ?

३. 'तर्क वेदानुकूलच असावा' या विधानाचे रहस्य स्पष्ट करा.

~ ~ ~

: १४ :

**डॉ. सरोजिनी बाबर**–(१९२०)

महाराष्ट्र सरकारच्या लोकसाहित्य समितीच्या अध्यक्ष. अनेक कथासंग्रह व कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. मराठीतील लोकसाहित्याचे संकलन व संपादनरूपाने त्यांनी अनेक ग्रंथ महाराष्ट्र सरकारच्या वतीने प्रसिद्ध केले आहेत. 'वनिता सारस्वत' या विषयावर संशोधन करून त्यांनी 'Ph. D.' ही पदवी मिळविली आहे.

**स्वाध्याय —**

१. लेखिकेच्या मते कविता जन्मास येण्याची कारणे कोणती ?

२. लोकगीतांच्या भाषेची वैशिष्ट्ये सांगा.

३. 'लोकगीत हे उत्तम प्रकारचे काव्य असते' या विधानाचे स्पष्टीकरण करा.

४. 'लोकगीता' मुळे मराठी संस्कृती सांभाळली गेली आहे, असे लेखिका कोणत्या आधारावर म्हणते ?

~ ~ ~

: १५ :

**शंकर काशिनाथ गर्गे उर्फ नाट्यछटाकार दिवाकर**–(१८८९-१९३१)

मराठीतील नाट्यछटांचे प्रवर्तक. 'नाट्यछटा' हा वाङ्मयप्रकार त्यांच्यानंतर त्यांच्या इतक्या कौशल्याने कोणास हाताळता आला नाही. नाट्यछटेबरोबरच त्यांनी काही छोटी नाटके लिहिली आहेत. 'प्रवासी' हा लेख नाट्यसंवादाच्या

स्वरूपात लिहिला आहे. मनुष्यस्वभावातील विसंगतीचे मर्मभेदी चित्रण करण्याची त्यांची हातोटी या लेखावरून वाचकांच्या लक्षात येईल.

**स्वाध्याय—**

१. 'प्रवासी' या लेखाच्या सुरुवातीच्या संवादातून वृद्ध माणसांच्या कोणत्या वृत्तीचे दर्शन होते ?

२. प्रवाशांचा जीवनक्रम या लेखात कसा वर्णिला आहे ते सांगा.

३. प्रवाशांमध्ये आपापसात मारामारी का होते ?

~ ~ ~

: १६ :

**प्रा. नारायण सीताराम फडके**— (जन्म १८९४)

सुप्रसिद्ध कादंबरीकार म्हणून फडके सर्व मराठी वाचकांना ज्ञात आहेत. ललित लिखाणाची मनोमय शैली फडके यांनी निर्माण केली. 'गुजगोष्टी' या नावाचा नवीन ललित निबंधप्रकार फडके यांनीच मराठीत प्रथम आणला. त्यांचा याच नावाच्या पुस्तकातून प्रस्तुत गुजगोष्ट घेतली आहे.

**स्वाध्याय—**

१. गुजगोष्टी म्हणजे काय ? प्रस्तुत निबंधात त्या प्रकाराचे कोणते विशेष दिसून येतात ?

२. फडक्यांची लेखनशैली विशद करा.

३. 'हरवली म्हणून सापडली' या शीर्षकाचे मर्म स्पष्ट करा.

~ ~ ~

: १७ :

**प्रा. कुसुमावती देशपांडे**— (१९०४–१९६१)

मराठीतल्या श्रेष्ठ वाङ्मयसमीक्षिका. मराठी टीका–वाङ्मयामध्ये त्यांनी आपल्या लेखनाने महत्त्वपूर्ण भर घातली. दीपकळी, दीपदान, मोळी, मराठी कादंबरी भाग १ व २ व पासंग ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'दीपदान' या पुस्तकातून 'मध्यान्ह' हा लघुनिबंध घेतला आहे.

**टीपा—**

**मे महिन्याची दुपार—** नागपूर भागातली मे महिन्याची दुपार चांगलीच रखरखीत असते.

**मिडास—**प्राचीन ग्रीकांचा राजा. त्याला प्रसन्न होऊन बॅकस नावाच्या देवाने असा वर दिला होता की, मिडास ज्याला हात लावील, त्याचे सोने होईल.

**स्वाध्याय—**

१. मे महिन्याची दुपार लेखिकेला कशी दिसली ?

२. तिच्या दर्शनाने लेखिकेच्या मनात कोणकोणत्या आठवणी जाग्या झाल्या ?

३. पावसाळी दुपार आणि हिवाळी दुपार यांपेक्षा मध्यान्हीचे सौंदर्य लेखिकेला का महत्त्वाचे वाटते ?

~ ~ ~

## : १८ :

**प्रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर**–( जन्म १९०१ )

सौंदर्यवादी टीकाकार म्हणून प्रा. क्षीरसागरांचा मुख्यतः लौकिक असला तरी कादंबरी, कथा व ललितनिबंधही त्यांनी लिहिले आहेत. या संग्रहातील त्यांचा ललितनिबंध त्यांच्या ' वादे वादे ' या पुस्तकातून संपादित करून घेतला आहे.

**टीपा —**

**कै. माधवराव पटवर्धन**–( १८९४–१९३९ ). प्रसिद्ध मराठी कवी. रविकिरण मंडळाचे प्रमुख सदस्य. फारसी भाषेवर प्रभुत्व. त्यांनी लिहिलेल्या ' छंदोरचना ' या ग्रंथास मुंबई विद्यापीठाने ' डी. लीट् ' ही पदवी दिली. अशा प्रकारची पदवी मिळविणारे मराठी साहित्यिकांमध्ये माधवराव हे एकटेच होत.

**तांबे**–भास्कर रामचंद्र ( १८७४–१९४१ ) इंदूरचे राजकवी.

**गटे**–जोहान वोल्फगँग ( १७४९–१८३२ ) जर्मन महाकवी.

**रोमाँ रोलाँ**–( १८७६–१९४४ ) सुप्रसिद्ध फ्रेंच लेखक.

## स्वाध्याय

१. संभाषणाबद्दलच्या निरनिराळ्या व्यक्तींच्या कोणत्या कल्पना आढळून येतात ?
२. लेखकाला कोणत्या प्रकारच्या लोकांच्या सान्निध्यात कसेसेच वाटते ?
३. माधवराव पटवर्धन व तांबे यांच्याबरोबर संभाषण करण्यात लेखकाला अतिशय आनंद का होतो ?
४. औपरोधिक भाषण व अतिसावध संभाषणपद्धती यांबद्दल लेखकाला काय वाटते ?
५. लेखकाच्या दृष्टीने संभाषणामध्ये कोणत्या गोष्टीला मुख्य स्थान दिले पाहिजे ?
६. बोलण्याच्या कलेपेक्षा ऐकण्याची कला महत्त्वाची कशी ?
७. स्त्रियांमधील संभाषणकौशल्याचा परिचय करून द्या.
८. संभाषणामध्ये विनोदाचे स्थान कोणते ते सांगा.
९. ' लोकनिंदा ' ही विकृत वृत्ती कशी ?

— — —

: १९ :

**प्रा. रामचंद्र भिकाजी जोशी**–( जन्म १९०३ ).

सध्या मुंबई येथे सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये इंग्रजीचे प्राध्यापक. गेली तीन वर्षे ते महाड येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य होते.

उर्दू–कथाकादंबऱ्यांचे अनुवादक म्हणून प्रथम ते मराठी वाचकांपुढे आले परंतु वैशिष्ट्यपूर्ण प्रवासलेखक व शुद्ध वाङ्मयीन मूल्यांचा आग्रह धरणारे टीकाकार म्हणून ते मराठीत मान्यता पावले.

' वाटचाल ' व ' मजल–दरमजल ' हे त्यांचे दोन प्रवासलेख–संग्रह प्रसिद्ध आहेत. हा लेख त्यांच्या दुसऱ्या संग्रहातून घेण्यात आला आहे.

**टीपा**—

**हाल राजा**–( इसवी सनाचे पहिले शतक ). आंध्रचा सतरावा राजा. महाराष्ट्री प्राकृत भाषेत याने ' गाथासप्तशती ' हे पुस्तक लिहिले आहे.

**शिवदिनकेसरी**–( १६९८–१७७४ ) पैठण येथील कवी. केसरीनाथांचे शिष्य म्हणून ' शिवदिनकेसरी ' म्हणतात. त्यांचा शिष्यसंप्रदाय फार मोठा होता.

**नवनाथ**–नाथ सांप्रदायात नऊ नाथ व चौऱ्यांशी सिद्ध मानले जातात. मच्छिंद्र, गोरख, जालिंदर, कानीफा, चरपटी, नागेश, भरत, रेवण व गहिनी हे नऊ नाथ. हे नवनारायणाचे अवतार मानले जातात.

**कृष्णदयार्णवांचे कुष्ट**–कृष्णदयार्णव ( १६७४–१७४० ) कऱ्हाडजवळील कोपारूढचे. शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण. नाव नरहरी नारायण. औरंगजेबाच्या धर्मच्छळामुळे गाव सोडून मराठवाड्यात आंबेजोगाई येथे राहावयास गेले. तेथे पन्नासाव्या वर्षी त्यांना महारोग झाला. त्यावर उपाय म्हणून त्यांनी भागवताच्या दशमस्कंधावर ' हरिवरदा ' नावाची मराठीत टीका लिहिली, त्यामुळे त्यांचे कुष्ठ बरे झाले.

**एकनाथसदनी...माधवजी**–( १५३३–१५९९ ) संत एकनाथाच्या घरी खंड्याच्या वेषाने खुद्द भगवंत पाणी भरीत अशी आख्यायिका आहे.

**बाहुल्ये...चक्रधर**–( ११९४–१२७३ ) महानुभाव पंथाचे संस्थापक. चक्रधरांना स्त्रियांबद्दल अतिशय आकर्षण आहे आणि त्यांचा उपदेश पाखंडी आहे म्हणून त्यांचा जाधवांनी शिरच्छेद केला, अशी आख्यायिका आहे,

**मादी**–समुदाय.

**हालिक**–शेतकरी.

**बाईसा, सोणेबाई**–चक्रधरस्वामींच्या शिष्या.

## स्वाध्याय

१. पैठण शहराच्या उत्पत्तीबद्दलची लेखकाने कोणती आख्यायिका दिली आहे ?

२. हाल राजाच्या कारकीर्दीत पैठण शहराचे वैभव कोणत्या प्रकारचे होते ?

३. हल्ली पैठणची अवस्था कशा प्रकारची आहे ?

४. लेखकाला पैठणमधील वाडे कशा प्रकारे दिसले ? त्यामुळे लेखकाच्या मनात कोणता विचार आला ?

५. पैठणबद्दलच्या अनेक दंतकथा खोट्या म्हणता येणार नाहीत, असे लेखकाला का वाटते ?

६. नाथांच्याबद्दलचे या लेखातील विचार मांडा.

७. ' तसे ते आता थोर नाही. पण थोरच आहे. ' या लेखकाच्या विधानाची चर्चा करा.

~ ~ ~

: १० :

## श्री. विठ्ठल दत्तात्रेय घाटे–(१८९५)

कवी, लेखक व शिक्षणशास्त्री म्हणून घाटे प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्राचा व मराठीचा कट्टर अभिमान त्यांच्या लिखाणात दिसतो. मोजकेच लेखन करूनही तन्मयता, रसिकता व नाट्यपूर्ण लेखनशैली या गुणांनी मराठी वाङ्मयात घाटे यांनी आपले असे एक स्थान प्राप्त करून घेतले आहे. सूक्ष्म चित्रणांनी युक्त व प्रत्ययकारी अशी व्यक्तिचित्रणे रंगविण्यामध्ये त्यांचा हातखंडा आहे. ' काही म्हातारे व एक म्हातारी ' व ' पांढरे केस–हिरवी मने ' हे त्यांचे दोन व्यक्ति-चित्रणात्मक संग्रह प्रसिद्ध आहेत. ' आबा गेले ' हे हृदयंगम व्यक्ति-प्रसंग–चित्र दुसऱ्या संग्रहातील आहे.

### टीपा —

**अरविंद**–अरविंदबाबू घोष (१८७२–१९५०) पांडेचरी येथे आश्रम स्थापून त्यांनी योगसाधना केली. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात त्यांच्या ' The Life Dive ', ' Lights on Yoga ' इत्यादी ग्रंथांनी महत्त्वपूर्ण भर घातली आहे.

**तात्या टोपे** – १८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धातील मराठ्यांचे सेनापती.

**हक्सले**–सर ज्यूलियन सोरेल (१८८७) इंग्रज जीवशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ व शिक्षणशास्त्रज्ञ.

**मरणं......विकृती...**

कालिदासाच्या रघुवंशाच्या आठव्या सर्गामध्ये इंदुमतीच्या निधनानंतर वसिष्ठ ऋषींनी आपल्या शिष्याकरवी अज राजास जो सांत्वनपर संदेश पाठविला त्यातील महत्त्वाचा विचार. मूळ श्लोकार्ध खालीलप्रमाणे—

मरणं प्रकृतिः शरीरिणां
विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः ।

देहधारी प्राण्यांचा मरण हा स्वभाव आहे, जीवन हीच विकृति होय असे जाणते म्हणतात.

**स्वाध्याय –**

१. व्यक्तिचित्रण म्हणजे काय ? त्याची वैशिष्ट्ये प्रस्तुत लेखात कशी आढळून येतात ते लिहा.

२. आबांचे स्वभावविशेष कोणते ?

३. लेखकांना माणसाचे मोठेपण कशात वाटते हे स्थलोल्लेखपूर्वक लिहा.

— — —

: २१ :

## श्री. व्यंकटेश दिगंबर माडगूळकर ( १९२७ )

मराठी लघुकथेमध्ये माणदेशी माणसांची व्यक्तिचित्रे रंगवून नवे चैतन्य निर्माण करणारे श्रेष्ठ लेखक. वर्णनातील बारकावे व मनुष्यस्वभावाची मोठी समज यामुळे त्यांची व्यक्तिचित्रणे मोठी आकर्षक व ठसठशीत वाटतात. ‘ माणदेशी माणसे ’, ‘ गावाकडच्या गोष्टी ’, ‘ सीताराम एकनाथ ’, ‘ काळी आई ’ इत्यादी त्यांचे कथासंग्रह व ‘ पुढचे पाऊल ’ व ‘ बनगरवाडी ’ ह्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. ग्रामीण व्यक्तिचित्रणाप्रमाणेच पार, देऊळ इत्यादी ग्रामीण वैशिष्ट्यांची मार्मिक वर्णने त्यांनी केली आहेत. त्यातील ‘ पार ’ इथे घेतला आहे.

**शब्दार्थ –**

**कडूसे** – संधिप्रकाश, नुकताच पडू लागलेला अंधार. **आरगीन** – चिमणी, रॉकेलचा दिवा. **दोडा** – द्वाड. **आवाळी** – भाजलेला ओला हरभरा.

**स्वाध्याय –**

१. आपल्या गावातील ‘ पार ’ लेखकाला कसा दिसतो ?

२. त्याच्याशी नेहमी संबंधित असलेले ग्रामीण जीवन लेखकाने, कसे वर्णिले आहे ?

३. ग्रामीण जीवनाची कोणती वैशिष्ट्ये या लेखात आढळतात ?

— — —

: २२ :

**प्रा. भीमराव बळवन्त कुलकर्णी**— ( जन्म १९३३ )

पुणे येथील सर परशुरामभाऊ महाविद्यालयामध्ये मराठीचे प्राध्यापक. कथा, कादंबरी, चरित्र, टीकालेखन, बालवाङ्मय इत्यादी विविध प्रकारचे लेखन. 'हरी नारायण', 'मुर्दाड', वाङ्मयीन रसास्वाद', 'स्वामी विवेकानंद', 'सभेत कसे बोलावे?', 'संभाषणकला', 'माणूस बोलू लागला' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. 'पपईचोर' ही कथा 'मुर्दाड' या कथासंग्रहातून घेतली आहे.

**खुंट गिळणे**—कडकडीत उपवास पडणे.

**स्वाध्याय**—

१. कथानायकाने शाळेत कसा प्रवेश मिळविला ?

२. त्याने 'निबंध' लिहिल्यानंतर कोणता प्रसंग घडला.

३. त्याच्या जीवनात आलेले 'इंद्रधनुष्य' कोणते ?

४. त्या 'इंद्रधनुष्या'मुळे त्याच्यावर कोणता प्रसंग गुदरला ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
दा. क्र. 93036

REFBK-0013737